
राम-भरतमीलन(पृ.१०१तरंग१५श्लो.२०) मारीचाकडे रावण येतो(तरंग१०श्लो.२५







कांचनमृगामागें श्रीराम(पृ१६२.तरंग११श्लो७) सीताविलाप(पृ.१६३तरंग११श्लो.२१

॥ श्री ॥

'सुश्लोकमानसा'चा हा, अयोध्या-अरण्य-किष्किन्धा-
कांडात्मक द्वितीय भाग
— ज्यांत श्रीराम-भरतादींचा अत्यंत हृदयंगम असा
भक्तिप्रेमभाव वर्णिला आहे, तो —
माझ्या प्रेमळ सत्त्वशील वडील भगिनी

ती. श्री. सौ. पार्वतीबाई (ती. सौ. कृष्णाक्का)

व

सद्भावसंपन्न उत्साहमूर्ति

ती. श्री. शंकरराव (ती. शंकर नरहर सरदेसाई)

या दंपतींस त्यांची उज्ज्वल

श्रीसीतारामचन्द्रनिष्ठा पाहून व त्यांनीं अनेकपरींनीं आम्हांस
निरंतर दिलेलें रसिक प्रोत्साहन लक्षांत आणून मोठ्या

प्रेमादरानें अर्पण करीत आहें.

सुश्लोकमानसा या श्रीशंकरपार्वतींस अर्पावें ॥
मानसरसारविंदें स्वच्छन्दें साधुवृंद तर्पावें ॥१॥

— सदाशीर्वादाभिलाषी —
रामचंद्र चिंतामण श्रीखंडे

श्रीहनुमज्जयन्ती, शके १८७५
१० मार्च १९५३, कोल्हापूर.

भरतास श्रीरामपादुकाप्रदान



संकोच की गुरुजनादिक पौर तेथ । स्नेहार्द्र बंधु भरतीं तरि सर्व चित्त ॥
श्रीराम दे सकृप त्या निज पादुकांतें । शीर्षी धरी भरत त्यांप्रति भक्तिचित्तें ! ॥२०॥
तें पुण्यराशि पदपीठ दयानिधीचें । कीं पौरजीवपरिरक्षकयुग्म साचें ! ॥
कीं रत्नपेटि भरतांतरभक्तिभावा । मंत्राक्षरें उभय रक्षणकारि जीवा ! ॥२१॥
कीं तें कपाट परिपालक सूर्यवंशा । कीं पाणियुग्म करि उत्तमकर्मपोषा ! ॥
कीं युग्म तें विमल सेवनधर्मनेत्र । श्रीरामभक्तियुगतीर्थचि तें पवित्र ! ॥२२॥
आधार तो भरत घेत मुदें भरोनी । सीतारघूत्तम जणों हृदिं लब्ध मानी ! ॥

द्वितीयसोपान—अयोध्याकांड, उत्तरार्ध तरंग १८ पृ. १[illegible]

[illegible]

प्रास्ताविक विचार

तुळसी रामचन्द्रस्य प्रेयसीति किमु ब्रुवे ।
यदस्याः पश्य दासोऽपि प्राणप्रियतमोऽभवत् ॥
पंत विठोबाअण्णा, सुश्लोकलाघव श्लोक १८५

तुळशी रामचन्द्राची प्रयशी न म्हणूं कसी ? ॥
कीं जीचा दासही झाला प्रभूला प्रिय मानसीं ॥

श्रीसीतारामचंद्रकृपेनें आज ' सुश्लोकमानस 'ग्रंथाचा द्वितीय भाग परिपूर्ण होऊन भाविक रसिकांचें हातीं देतां येत आहे याचा अत्यानंद होतो. या विभागांत पुढील ३ कांडें आहेत.

अयोध्याकांड	पद्यसंख्या	१८०२
अरण्यकांड	,,	३७८
किष्किंधाकांड	,,	२०२
उपसंहार	,,	८
इतर अधिक	,,	५
		२३९५

असे एकूण सुमारें २४०० श्लोक या भागांत आले आहेत. ते रसिकानन्ददायी होतील यांत मला संशय वाटत नाहीं. अयोध्याकांडांत सोयीसाठीं पूर्वार्ध व उत्तरार्ध असे दोन भाग पाडले आहेत. व त्यांपैकीं पूर्वार्धांत २२ तरग व उत्तरार्धांत २९ असे एकूण ५१ तरग आहेत. तरंगांची मोजणी सलग केली तरी चालण्यासारखें आहे. अरण्यकांड लहान असून त्याचे तरंग १७ आहेत. तर किष्किंधाकांड हें सर्वांतच लहान असें कांड आहे व त्याचे ६ च तरंग आहेत. एकूण या विभागांत ७४ तरंग आले आहेत. प्रथम भागांतील बालकांडाचे ५५ तरंग विचारांत घेतले तर १२१ तरंग सुश्लोकमानसाचे या दोनी भागांत मिळून आले व एकूण ७

कांडांची पद्यसंख्या सुमारें ४५४० पूर्ण झाली. व बाकीचीं तीन कांडें सुंदरकांड, लंकाकांड व उत्तरकांड हीं सुमारें २१६० श्लोकांत तिसऱ्या विभागांत श्रीरामकृपेनें लवकरच पूर्ण होऊन रसिक वाचकांना देऊं शकेन असा भरंवसा धरतों. तो सुदिन लवकर येवो !

बालकांड हें ' विमलसंतोषसंपादन ' नामानें उल्लेखिलें जातें. तर भरतचरित्रानें अत्यंत उज्ज्वल भक्तिवैराग्यसंपन्न असें हें अयोध्याकांड भक्ति-वैराग्य व उत्कृष्ट काव्यसंपदा यांचा अत्यंत सौंदर्यपूर्ण सन्निधि आहे असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं ! यांतील विविध कारुण्यपूर्ण घटनांची, भक्तिभावनाचो व स्वभावचित्रणांची रम्यता केवळ अलौकिकच आहे. व तिचें थोडक्यांत समालोचन करणें अशक्यच होय. तथापि कांहीं उत्कृष्ट स्थळांचे निर्देश केल्यावांचून रहावत नाहीं.

भरतचरित आहे पुण्यराशी अनन्त । मधुर सुखद मोदा मंगला नित्य देत ॥
कलिकलुष निवारी तीमही क्लेश नाशी । दिनकर जणु शोषी मोहरूपी निशेशी ॥
अघतति गज यांचा सिंह जें भासणारें । असह सकलतापा वारि जें सत्प्रकारें
रमवुनि जनचित्तां भंजि संसारभार । शशि जणुं रघुनाथप्रीति जी तींत सार
[अयोध्याकांड उत्तरार्ध तरंग २९]

तसेंच,

भरतवर्तन—सत्कृति—सद्‌गुण । कवण हें कवनीं करि गायन ? ॥
सकल सत्कवि लाजति वर्णितां । थकति शेष, गणेशहि तत्त्वतां ! ॥३०॥

अयोध्याकांडास ' प्रेमकांड ' हें नांवहि अधिक शोभलें असतें असें कै. श्रीमंत जामदार म्हणतात. तुलसीरामायणाच्या सर्व कांडांमध्यें हें कांड अप्रतिम आहे ! अयोध्याकांड वाचून कोणाहि भाविकास सहज वाटेल कीं गुरुप्रसादाखेरीज वाणींत इतका प्रसाद खात्रीनें यावयाचा नाहीं. असहि ' मानसहंस 'कार श्रीमंत जामदार यानीं म्हटलें आहे.

" हें कांड नवरस, दृष्टांत, रूपक, व्यवहार, स्वभावोक्ति, रामभक्ति, स्वभावनिरीक्षण इ. गुणांनीं पूर्ण भरलेलें आहे. या कांडाचा मननीय विशेष

हा कीं लोकशिक्षणाच्या भागाची यांत चांगलीच गर्दी दिसून येते. तुलसीदासांची अष्टपैलु विद्वत्ता, व्यवहारज्ञता, अलोट प्रेम, लोकशिक्षणचातुर्य इ. गुणांची साक्ष पटविण्यास हें एकच कांड पुरें आहे. हें कांड तुलसीरामायणाचा खरोखर आत्माच होय." ('मानस-हंस' पृ. ११)।

अयोध्याकांडांत वर्णिलेले एकेक प्रसंग इतके हृदयस्पर्शी, भक्तिभावनेनें, सौंदर्यानें, काव्यकल्पनांनी व प्रतिभेनें ओतप्रोत भरलेले आहेत कीं त्यांना तोड नाहीं ! हें कांड अवीट आहे. कितीदांहि त्याचीं पारायणें केलीं तरी भाविकांना तृप्तीच होणें शक्य नाहीं. काय तो रामयौवराज्याभिषेकाच्या कल्पनेचा आनंदोत्सव ! व काय तो हृदयभेदक वनवासगमनप्रसंग ! काय तो शोक ! काय तें कारुण्य ! काय तो सर्वांचा श्रीरामचंद्रावरील भक्तिभाव ! सर्वच वर्णनातीत होय ! मंथरा, कैकेयी, दशरथ, कौसल्या, राम, सीता, लक्ष्मण, सुमित्रा, सुमन्त, गुह, वसिष्ठ, वाल्मीकि, भरद्वाज, त्यांचे शिष्य, कोळी किरातादि वन्यजन यांचीं स्वभाववर्णनें, वनवासाला रामलक्ष्मणसीता चालले असतांना इतर ग्रामवासीयांचे उद्गार, निरनिराळे संवाद, निरनिराळीं नितान्त-काव्यमय रूपकें, उपमा, उत्प्रेक्षा, भाषणें, स्वभावदिग्दर्शन, नीत्युपदेशकथनें इ. या कांडांतील सर्व वर्णनें अलौकिक रससंपदांनीं नटलेलीं आहेत.

श्रीरामसीता विवाह होऊन अयोध्येंत आल्यानंतर संपत्ति, ऋद्धि, सिद्धि, यांच्या त्रिपथगाच अयोध्यानगररूपीं सागरांत धाव घेऊन अखंडित येत होत्या अशा मोठ्या सौख्याच्या पार्श्वभूमीवर श्रीरामवनवासाचा दुःखद प्रसंग विधिघटनेनें आलेला तुलसीदासांनीं वर्णन केलेला आहे. तें सर्व वर्णन समग्रच वांचलें पाहिजे. रामसीता यांचेंहि भरतावर अलोट प्रेम. कवि वर्णतात,

आलोचती शकुन उत्तम रामसीता । सन्मंगलांगिं दिसति स्फुरितें समस्तां ॥
सप्रेम ते पुलकितांग परस्परांतें । तें सांगती भरत-संगम सूचवी तें ! ॥ १-८७
" झाला असे बहुतकाल तया अभेटीं । भेटेल तो प्रिय अम्हां, शकुनें स्वहर्षीं ॥
त्याच्यापरी प्रिय तरी पर कोण आम्हां? ।नोहेचि अन्य शकुनां फल ओळखा मा !"

सर्वत्र राज्याभिषेकाची तयारी होत आहे. देवांनी सरस्वतीमार्फत मंथरेची बुद्धि कलुषित करवून तिच्याकरवी कैकेयीस पूर्वी राजानें दिलेले

दोन वर भरतास राज्य व रामास चौदा वर्षे वनवास हे मागावयास लावले. हा सर्व प्रसंग इतक्या अलौकिक पद्धतीनें तुलसीदासांनीं वर्णिला आहे कीं त्याला तोड नाहीं.

कैकेयीमान्यता ऐशी कुब्जा घेइ परोपरी ।
राणीच्या उरिं ती घाली सहाणीं कपटी सुरी ! ॥
स्वताच्या लव ना राणी विघ्ना निकट देखत ।
चर यज्ञपशु जैसा हिरव्या तृणिं हर्षित ! ॥
आयके गोष्टि ती गोड कठोरान्त परी तशा ।
कीं मधामधिं घोळोनी पीत ती घोरशा विषा ! ॥
कैकेयीस वदे कुब्जा "अहो ! आठवतें न कीं ? ।
तुम्हींच कथिली मागें मजला गोष्ट ही निकी— ॥
वर दोन तुम्हां भूपें दिले; होति तयासवे ।
घ्या ते मागोनियां आज जेणें इच्छान्ति संभवे ! ॥
भरता राज्य द्या तैसें रामातें वनवास द्या ।
सवतीच्या महानन्दा लोपवा सकला उद्यां ! ॥
घेईल जें शपथ भूपति रामनामें । प्रार्था तदांच वर हे निज-मव्यकामें ॥
मोडील ना वचन भूप तुम्हां दिलेलें । बोला कुणां वचन हें, मग कार्य झालें !॥
क्रोधागारीं जाउनीयां बसा हो ! । कार्यार्थाचा सर्वथा नाश ना हो !॥
भूपोक्तीतें ना वळा " हें वदोनी । केली क्रूरा घातकीनें स्वराणी !॥
पृ. १०—श्लो. ११८ते१२५

मंथरेनें कैकयीची बुद्धि भवितव्यताबळेंकरून पुरी फिरविली. तुलसीदासांचें स्वभावदिग्दर्शन अप्रतिम आहे. त्यांचीं रूपकें, उत्प्रेक्षा, उपमा इ. पाहिल्या म्हणजे त्यांच्या काव्यप्रतिभेची कल्पना आल्यावांचून रहात नाहीं. क्रोधागारांत बसलेल्या कैकयीस भेटण्यास दशरथ आला—

कैकयीगेहीं ये सायंकाळीं प्रहृष्ट नृपराय ।
वाटे 'निष्ठुरते'तें भेटों ये 'स्नेह' देहधर काय ! पृ. ११६-श्लो. ११

दशरथास ती पेंचांत पकडून दोन दुष्ट वर मागते ती जणों काय तिची धिक्कारच !

गोंवोनि वाक्यिं दृढ यापरि ती नृपातें ।
अत्यंत दुष्टमति होउनि बोलली ते ॥
जे तद्विचार, गमले अणु ते सवाणे ! ।
तत्रेत्र ती अणु करी उघडे कराने ! ॥ १६१ ॥
अणी भूपाचें तें मन गमतसे सुंदर वन ।
जिथें नांदे मोदें सुखखग असंख्यात रमुन ! ॥
तिथें ही कैकेयी गमलि अणु भिल्लीण अदया ।
स्ववाक्यांच्या श्येनां लवळवुनि सोडूं बधि तयां ! ॥१६२॥

राजास ते अकल्पित वज्रकठोर वर ऐकून धक्काच बसला. कैकेयी टोंचून बोलते—

वाखाणुनी प्रथम आपुलि सत्यसंधा। 'देईन दोन वर' हें वदलां कितीदा ॥
'मागेल ही जणुं' तुम्हां गमेल 'फराळ!। देईन केविं नच मीं नृप सत्यपाळ!' ॥

पृ. १४ त. २-३

असो. सर्व वर्णनें इतकीं मार्मिक व हृदयस्पर्शी आहेत कीं त्यांचें वर्णन शक्य नाहीं. क्रुद्ध कैकेयीचें वर्णन, राजाची करुणस्थिति तथापि प्रतिज्ञापालन, रामाबरोबर वनांत जाण्यासाठीं लक्ष्मणाची उत्कंठा, सीतेची समजूत काढण्याचा रामाचा निष्फळ प्रयत्न व अखेरीस तिनें वनवासास यावें अशी त्याची अनुमति, वनांत जाणें, सुमंताचें त्यांना रथांतून नेणें, सर्व नागरिकांना न कळतां पुढें निघून जाणें, वनप्रवासांतील निरनिराळीं वर्णनें, त्यांना पाहणाऱ्यांच्या मनाची स्थिति, रामभरद्वाज, व रामवाल्मीकि यांचे संवाद व चित्रकूटावर निवास, सुमंताचें अयोध्येस परत येणें व दशरथमृत्यु. पुढें भरतशत्रुघ्नाचें अयोध्येंत येणें, त्यांचा शोक व चित्रकूटास सर्वांनीं जाणें व तेथें रामचंद्रांनीं भरतास पादुका देणें इत्यादि असंख्य घटना अयोध्याकांडांत वाचतांना वारंवार हृदय भरून आल्यावांचून रहात नाहीं. या वर्णनांत अनेक ठिकाणीं सुंदर तत्त्वसारकथन, नीतिकथन, विवेक-ज्ञान-कथन, सुंदर सृष्टिवर्णन, उत्कृष्ट उपमा, दृष्टांत, रूपकें, अर्थान्तरन्यास, उत्प्रेक्षा इत्यादींनीं सर्वच तरंग ओतप्रोत भरलेले आहेत. भरद्वाजमुनि रामास म्हणतात—

कर्मे, वाङ्मन अकृत्रिम भावें। जोंवरि स्थिर तुम्हांत न व्हावें ॥
स्वर्गिही कढनि तोंवरि हर्ष। यत्न अन्य करुनीहि कणास ! ॥४६-३॥

सुमंतानें दशरथास तत्त्वबोध करायाचा प्रयत्न केला, त्यांत सांगितलें—

जे जन्ममृत्यु सगळे सुखदुःखभोग । वा लाभहानि, सुखमीलन वा वियोग ॥
हे काल कर्मवश होति सदैव नाथा । जैसे निशादिवस येति अखंड सत्तां ॥

तसेंच वसिष्ठ भरतास सांगतात पृ. ७१—श्लोक २६, २७.

अत्यार्त बोलत मुनी "भरता ! पहा हें । अत्यंत रे ! प्रबलसें भवितव्य आहे ॥
आहे विधातृकरिं सर्वहि लाभहानि । हे प्राण वा मरण कीर्ति अकीर्ति दोनी ॥
ऐशा विचारिं मग दोष कुणास द्यावा । कां व्यर्थ रोष दुसऱ्यावरतीं करावा ?"॥

भरतप्रभाव सांगतांना एके ठिकाणीं तुलसीदास म्हणतातः-पृ. ९२—७
जो रामनाम जगिं आठवि एक वार । संसारिं तो तरुनि विश्वहि तारणार ॥

गुहाचा भक्तिभाव वर्णितांना व त्यावर पुष्पवृष्टि करतांना देव उद्गार काढतात—
'श्रीरामभक्ति जगिं मंगलमूल सारी'। ऐसें स्तवोनि सुर वर्षिति पुष्पसारीं ॥
पृ. १०३, श्लोक ३६

श्रीरामभक्त निर्मोह असतात हें तत्त्वसार गुंसाइजी सांगतात—पृ. ३७-३३
श्रीरामपादकमलीं रमल्या मनासी । नाकांक्षिती विषयभोग कधीं स्वपासीं ॥

श्रीरामचरिताविषयींचें माहात्म्य पुढीलप्रमाणें सांगितलें आहे—

श्रीसच्चिदानन्द विशुद्ध राघव । जो सूर्यवंशाग्रणि पुण्यसंभव ॥
त्याचीं चरित्रें नरजन्मिचीं भवीं । तरावया सेतुपरी अम्हां हवीं ॥ पृ. १८, श्लो. १०

तसेंच वशिष्ठोपदेशांतील पुढील तत्त्व पहा—
जे पाळिती पितृनिदेश अयोग्ययोग्य । शंका त्यजून, यश सौख्य तयांच भोग्य ॥
त्यांनाच वास अमरेन्द्रनिवासिं लाभे । सत्पुत्र तातवचनां करुनीच शोभे ! ॥
पृ. ७४-४१

खरें भक्तिप्रेम, मेघचातकन्यायाचें वर्णन करून भरताने प्रयागराज प्रार्थनेंत पुढीलप्रमाणें गाइलें आहे—

अंभोद जन्मभरि कां विसरून जाय । वज्राश्म हाणि जरि याचियलाहि तोय ! ॥
सारे विराव श्रमले जरि चातकाचे । प्रेमा परी सतत वाढुनि चित्तिं सांचे ! ॥
सौवर्ण वर्णगुण वाढत अग्निदाहें । मत्प्रेमही प्रभुपदांवरि तेविं हो हें ॥
पृ. ८७ श्लो. १२, १३

भरद्वाजाश्रमांत भरताला व त्याच्याबरोबर आलेल्या सर्वांना सर्व प्रकारचे सुखभोग मुनिप्रभावानें मिळाले, परंतु भरत त्यांतहि अलिप्त कसा राहिला !—

संपत्ति ती निर्मुनि चक्रवाकी । त्या चक्रवाका भरता मुनी की ॥
तो गाढडी आश्रमपंजरांत । ठेवी जणों जोंवरि हो प्रभात ! ॥ पृ. ९२-श्लो. १६

तुलसीदासांचा विनोदहि मोठा मार्मिक असतो. चित्रकूटावरील वन्यलोक भरताबरोबरच्या मंडळींना गोड कंदफलें देत व मूल्य घेण्याचें नाकारीत व सांगत—

देणार काय अम्हि दीन तुम्हां महंतां ! । श्री काष्ठपल्लवचि हो अमुची अनन्ता ! ॥
सेवा अम्हांकरि तुम्ही प्रभु हीच माना । ना चोरितों तुमचिया वसनादिकांना ॥
आम्ही अजाण, खल, घातक जीवजातां । दुर्बुद्धि योजित दुराचरणांत हातां ! ॥
रात्रंदिसीं करितसूं जरि पापराशि । पोटीं न अन्न पटवास न वा कटीशी ! ॥

इ. इ. पृ. १०६—७५—७६

वनवासांत ग्रामस्त्रिया सीतेला 'लक्ष्मण व राम हे तुझे कोण ?' असें विचारतात व त्यांस सीता ज्याप्रकारें उत्तर देते तें अप्रतिम आहे—

सप्रेम सीता मृगशावलोचना । सलज्ज बोले मधु कोकिलस्वना ॥
" ते गौरकांती मधुर स्वभावता । हो धाकटे देवर लक्ष्मण स्वता " ॥
वस्त्रांचलें आननचंद्र झांकुनी । प्रियाकडे पाहत वक्रलोचनीं ॥
वक्रभ्रु ती खंजनमंजु सूचवी । 'स्वकांत हे' त्यां निज नेत्रपल्लवीं ! ॥

इ. पृ. ४९ श्लो. २४ ते ३०

केकेयीची समजूत काढण्याचा कांहीं विप्रस्त्रिया प्रयत्न करतात पण ती ऐकत नाहीं, त्यावेळचें वर्णन पहा—

न उत्तरें ती मुळि त्यांसि देउनी । करुद्धा बघे त्यां क्षुधितास्य वाघिणी ! ॥
व्यांधी असाध्या अशि जाणुनी तिची । त्या तैं तिच्या सोडुनि देति नादचि ! ॥

पृ. २२-श्लो. ११ व आणीचे १२ श्लोक

अशीं अनेक हृद्य उदाहरणें देणें शक्य आहे व या ग्रंथांत अन्यत्र अशीं असंख्य आहेत. राजनीतीचेंहि तत्त्वसार तुलसीदासांनीं अनेक स्थळीं सुंदरपणें व्यक्त केलेलें आहे. [पहाः—पृ ७५ श्लोक १७

मी सांगतों मनिं धरा अजि सत्य बाणा । कीं धर्मशीलचि हवा जगिं लोकराणा ॥
हें राज्यदान वर घाल हठेंचि मातें । जाईल तत्क्षणि रसातळिंच क्षमा ते ! ॥

श्रीरामभक्तिविषयीं भरत सांगतो:—पृ. ७९ श्लोक १०

तीं हो जळोत धन वैभव सौख्य, आप्त । माता, पिता, स्वजन, बंधु जगीं समस्त ॥
जीं रामचंद्रपदलाभ घडावयातें । होतीं न साह्यकर उत्सवयुक्तचित्तें ! ॥

कैकेयीरूपी खवळलेल्या समुद्र वारिसरितेचें रोमांचकारी वर्णन (पृ. १९ श्लोक २४–२६), प्रयागराजाच्या राज्याचें रूपक (पृ. ४९ श्लोक १७ ते २२), भरताच्या यशोरूपी चंद्रानें रूपक (अद्भुत चंद्रवर्णन, पृ. ८९ श्लोक १७ते२१), चित्रकूटावर राम असतांना वनश्रीला अतिशय हर्ष होऊन तेथें विवेकाचें कसें सुंदर साम्राज्य होतें त्याचें भव्योदात्त रूपक (पृ. ९९ श्लोक ५० ते ५८), रामचंद्राश्रमाकडे वाहून येणाऱ्या लोकरूप करुणानदीचें करुणोदात्तरूपक (पृ. ११७ श्लोक २९–३३), रामचंद्रानें भरतास दिलेल्या पादुकांवर उत्प्रेक्षापुष्पमाला (पृ. १३६ श्लोक २०–२२), भरतहृदयरूपी विमल आकाशाचें वर्णन (पृ. १४१ श्लोक २८–२९), इत्यादि मनोहर वेचक उज्ज्वल स्थलें अद्भुतरम्य उदाहरणांदाखल निर्दिष्ट करतां येतील.

'अरण्यकांड' या तृतीय सोपानास 'विमलवैराग्यसंपादन' हेंहि नामाभिधान आहे व यांतील शेवटचा म्हणजे १७ वा तरंग विमल-वैराग्यभक्तिसंपादन नांवाचा आहे. या कांडांतील अत्रिमुनींनीं केलेली श्रीरामस्तुति, ईश्वर–जीव–भेदवर्णन, भक्तियोगवर्णन इ. भक्तियुक्त वर्णनें, खरदूषणांशीं रामांनीं केलेलें युद्ध व त्यांतील भीषण युद्धवर्णन, मारीचप्रसंग, सुवर्णमृगवर्णन व सीताहरण, श्रीरामविरहवर्णन, जटायुभेट, शबरीरामसंवाद, नवविधाभक्तिवर्णन, पंपासरोवरवर्णन, कामसैन्यवर्णन, व नारदराम–संवाद इ. विभाग फारच सुंदर आहेत.

'किष्किन्धाकांड' अत्यंत लहान असून त्यांत अत्युत्कृष्ट सृष्टिवर्णन आहे. विशेषत: वर्षावर्णन व शरद्वर्णन हीं वर्णनें अत्यंत मनोहर आहेत. श्रीमद्भागवत दशमस्कंध पूर्वार्ध अध्याय २० यामधील वर्णनांचा मार्मिकपणा, तत्त्वसिद्धान्तभाग व चमत्कृतिपूर्ण कल्पनाविलास तुलसीदासांनीं या ऋतु-वर्णनांत उत्तमपणें व नावीन्यानें अनुकारिला आहे.

श्रीराम भरतास पादुकादान करण्यापूर्वी सांगतात (पृ. २३६) त्यांत केवढें आश्वासन आहे पहा:—

आज्ञा करीत पितृमातृगुरुप्रभूंची । गेला कुमार्गिंहि तरी कधि ना पडेचि ॥
ऐसा विचार करुनी त्यज दुःख सारें । साकेत रक्षिं, सरतो वनवास तो रे ! ॥

असो. एकूण रामचरितमानसाच्या कोणत्याहि विभागाचें कितीहि वर्णन केलें तरी तें अपुरेंच पडणार! सौंदर्यांत, भक्तिभावांत, कविकल्पनेंत व रसाविष्कारांत या मानसाचा प्रत्येक भाग इतर उर्वरित भागांशीं जणुं स्पर्धा करीत आहे असें रसिकभक्तास वाटल्यावाचून राहणार नाहीं. व ग्रंथ वाचून निरतिशय आनंद व समाधान कोणासहि झाल्यावाचून राहणार नाहीं.

मोरोपंतांनीं श्रीतुलसीदासांवर अनेक स्तुतिसुमनें वाहिलीं आहेत. तीं पाहण्यासारखीं आहेत—

भुलसी विषया येणें उलसील महासुखें ॥
कुलशीलमदत्यागीं तुलसीदास गा मुखें ॥ १ ॥

तसेंच,

श्रीतुलसीदासस्तव

श्रीमद्रामपदाब्जीं अलि तुलसीदास हा सदा गावा ॥
मागावा वर ' हरिजन भक्त भवपथीं कधीं न भागावा ' ॥ १ ॥
श्रीवाल्मीकिच झाला श्रीतुलसीदास रामयश गावा ॥
तरिच प्रेमरसाची खाणी वाणी तदीय वशगा या ॥ २ ॥
तुलसीदासें रचिलीं श्रीमद्रामायणें स्वयें सस ॥
त्यांच्या श्रवणें निवतो संसारी जीव जो सदा तस ॥ ३ ॥
सेविति तुलसीदासें रचिल्या रामायणाख्य सुरसा जे ॥
पुण्ययशी कोणीही स्वर्गांत तयांपुढें न सुर साजे ॥ ४ ॥
तुलसीदासाची सुख देती श्रोत्यांसि नित्य नव दोहा ॥
सेवितया हें म्हणते जैशी श्रीरामकीर्ति न वदो हा ॥ ५ ॥
याचें सुप्रेमभवन वचन निववितें सदा सुधा सरसें ॥
हें जों जों सेवावें तों तों सेव्यचि गमे सुधासरसें ॥ ६ ॥
राम प्रसन्न झाला तुलसीतें, जेविं पवनतनयातें ॥
साक्षात्कार असा ज्या, होइल जन कोण अवनत न यातें ! ॥ ७ ॥
वचनपति म्हणे 'तुलसीदासा ! दासीव राम तो, वातें '॥
कपि दाविती महात्मा त्या, ज्यापुनि नगर नाम ' तोषा' हें ॥ ८ ॥

ते दाशरथी तुलसीदासमठ्ठारपाळ चोरांनीं ॥
अवलोकिलें; बहु तपुनि वपु निवळुनि, कृश करुनि, घोरांनीं ॥९॥
बापा तुलसीदासा ! तुलसी दासामरद्रुरामासी ॥
तेंवेंचि तुझें नाम प्रभुच्या शोकें समान नामासी ॥ १० ॥
हा पुण्यकीर्ति सन्मत, म्हणतिल कवि कां न रामसम याला ॥
जो ज्यास पूज्य तो त्या ईश म्हणे बेविं तामस मयाला ॥११॥
कवि म्हणति 'आपणांतें राम तसे भक्त वर्ण्य कुलशील '।
तुलसी स्वजनस्तुत याशीं, या स्तवुनि, तूंहि तुळशील ' ॥१२॥
वंद्य स्तुत्य सदा हा श्रीरामसमान वासवा तुळसी ॥
पय्या उक्ति हरिजना हे, तामस मानवास वातुळसी ॥ १३ ॥
श्रीकृष्णमूर्ति जेणें केली श्रीराममूर्ति सज्जन हो ! ॥
रामसुत मयूर म्हणे 'त्याच्या सुयशोऽमृतांत मज्जन हो ' ॥१४॥

असो. गेल्या श्रीरामनवमीस 'सुश्लोक-मानस ' प्रथम भाग महामहोपाध्याय श्री. दत्तो वामन पोतदार यांचे शुभहस्तें पुणें साहित्यपरिषदेच्या मंदिरांत मोठ्या समारंभानें प्रकाशित झाला. महाराष्ट्रांतील अनेक नामांकित विद्वान् ग्रंथकार, कवि व रसिक जन या समारंभास उपस्थित होते. समारंभास हार्दिक शुभचिंतन करणारे संदेशहि अनेक दूरस्थ जनांकडून आलेले होते. पं. महादेवशास्त्री जोशी यांनीं सर्व समारंभाचें अध्वर्युत्व उत्साहानें व प्रेमानें घेतलें होतें. प्रा. मंगरूळकर यांनीं 'सुश्लोकमानस' मधीलच श्रीसीताराम-वंदनाचें श्लोकद्वय म्हणून व गायक श्री. जोशी यांनीं सुरेलपणें—

आनंदवीचि हृदिं उल्लसल्या अनन्त। प्रेमोच हर्षहि उचंबळले मनांत ॥
तोच प्रवाह कवितासरिदोघ झाला। श्रीराम—निर्मलयशोजलिं पूर आला ॥

तरंग ११—२८

हा श्लोक असावरींत गाऊन मंगलाचरण केलें. पंडित महादेवशास्त्री जोशी यांनीं स्वागतभाषण करून महामहोपाध्यायांना पुष्पहार अर्पण केला व ग्रंथप्रकाशन उद्घोषित करण्यास विनंती केली. व त्याप्रमाणें श्री. पोतदार यांनीं सुश्लोकमानस प्रकाशित झाल्याचें अत्यंत गौरवयुक्त शब्दांत सांगून ग्रंथकर्त्यास पुष्पहार घातला. ग्रंथगौरवपर अनेक भाषणें झालीं. त्यांत श्री. बाळशास्त्री हरदास, आचार्य भागवत, राजकवि यशवंत, डॉ. वाटवे, प्रा. मंगरूळकर

श्री. नी शं. नवरे, कवि बोरकर, कवि वि गो. साठये प्रभृतींनीं अतिशय गौरवपूर्वक भाषणें केलीं. म. म. पोतदार यांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत पुढील स्वरचित मार्मिक श्लोकांनीं सुश्लोकमानसाविषयीं आदर व्यक्त केला.

श्रीखण्डं नूतनं दिव्यं तुळसीदलशोभितम् ॥
अर्नेन प्रीयतां रामो लोकरूपो जनार्दनः ॥ १ ॥
पीठं तस्करवीराख्यं पञ्चगङ्गातटान्वितम् ॥
पुण्यं तु पत्तनं ह्येतत्संगमेनोज्ज्वलं खलु ॥ २ ॥
संगमेऽस्मिन्समायाता रसगंगाच्च विश्रुता ॥
सुश्लोकरत्नगर्भाढ्या त्रिवेणीफलदायिनी ॥ ३ ॥

सकाळीं ८॥ ला आरंभ झालेला हा अनेक उत्साहपूर्ण वक्त्यांनीं भूषित केलेला समारंभ दुपारीं श्रीरामजन्मानंतरपर्यंत चालला! माझ्या भाषणांत मीं सुश्लोकमानस ग्रंथास आशीर्वाद देण्यास वसिष्ठमुनितुल्य विद्वद्वर्य व रसिक पंडित लाभल्याबद्दल महामहोपाध्यायांचे, सर्व विद्वानांचे आभार मानले त्याचप्रमाणें ज्या ज्या व्यक्तींनीं या ग्रंथाच्या प्रकाशनास मोठ्या प्रेमानें हातभार लावला त्यांचेहि हार्दिक आभार मानले. समारंभास शुभचिंतन करणाऱ्यांत डॉ. जयकर, रँ. प्रो. नारळीकर, मे. जनरल थोरात, कर्नल वसंतराव देशपांडे, ना. बाळासाहेब खेर, मेजर डॉ. घारपुरे, प्रा. फडके, प्रा. कुलकर्णी. श्री. माडखोलकर, डॉ. कोलते इत्यादींचे सुंदर संदेश होते.

प्रथम विभागाचें स्वागत रसिक भक्त विद्वानांनीं अत्यंत आवडीनें चालविलें आहे. संगीतप्रवचनकार भक्तिभूषण श्री. कल्याण श्रीपाद उर्फ अण्णासाहेब कुलकर्णी यांनीं त्यांतील कित्येक श्लोक उत्कृष्ट भक्तिभरानें गाऊन श्रोत्यांस अमूप आनंद देण्याचें व्रतच घेतलें आहे! इचलकरंजी येथील श्रीमंत पुण्यशील गंगामाता आईसाहेब यांनीं मोठ्या भक्तिभावानें हा ग्रंथ वाचून फार चांगला वाटल्याचे उद्गार काढले व ग्रंथास आशीर्वादपूर्वक साहाय्यहि केलें. श्रीमंत रमाबाईसाहेब पटवर्धन, डॉवेजर राणीसाहेब जमखिंडी यांनीही ग्रंथ आगत्यानें व सद्भावानें परिशीलन करून ग्रंथकारास गौरवपूर्वक प्रोत्साहन दिलें. श्रीमंत वामनरावजी कुंबईकर गोवा यांनींहि थोर भक्तिभावानें ग्रंथाचें कौतुक केलें. श्री. वासुदेवराव व डॉ. सौ. काळे, मडगांव, कन्हाडचे

श्रीमंत चिपळूणकर, सातारचे सद्भक्त श्रीयुत कासीकर, मुंबईचे डॉ. शिरोडकर, डॉ. करंदे, डॉ. साठे, न्या. श्री. पु. मं. लाड, शेठ श्रीमान् शांतारामपंत वालावलकर, शेठ श्रीमान् मदनमोहन लोहिया, सांगलीचे डॉ. परांजपे, गुरसाळेचे राजे श्री लक्ष्मणरावजी खेर, श्रीशंकराचार्य पीठ करवीर, न्या. मू. दवळे, न्या. मू. भिडे, श्रीशशिकलाबाईसाहेब पंडित, बावडा, डॉ. पुरंदरे, डॉ. श्रीखंडे, पंढरपूर, श्री. गाडगीळ, डॉ. धायगुडे, डॉ. बालिगा प्रभृति असंख्य मंडळींनीं मला ऋणी केलें आहे.

आहिताग्नि वे. शा. सं. हरिशास्त्री वासुदेव होशिंग, भोर.
यांचा संस्कृत अभिप्राय

सुश्लोकमानसं नाम काव्यं काव्यगुणैर्युतम् ॥
प्रसन्नं सहजं रम्यं माधुर्यगुणमण्डितम् ॥ १ ॥
महाराष्ट्रीयभाषायां भवतां ह्यनुवादितम् ॥
यच्छ्रीमत्तुलसीदासप्रणीतं व्रजभाषया ॥ २ ॥
मूलकर्तुरभिप्रायो लालित्येन स्फुटीकृतः ॥
भवता तत्तु कौशल्यं मन्येऽहं कौतुकावहम् ॥ ३ ॥
यमुना तुलसीवाणी कथा रामस्य जाह्नवी ॥
भवतो ललिता भाषा शोभते नु सरस्वती ॥ ४ ॥
महाराष्ट्रजनायेदं प्रयागं खलु नूतनम् ॥
सत्काव्यकमलागारं तापसंतापहारकम् ॥ ५ ॥
निर्मितं भवता तस्माद्भवतामभिनन्दनम् ।
सादरं सप्रणामं वै करोति हरिदीक्षितः ॥ ६ ॥

भोर, ता १०।२।१९५१ हरि अपरनाम बाबा दीक्षित

श्रीसीतारामचंद्रकृपेनें येथपर्यंत आलों त्यांचीच कृपा पुढील राहिलेलें ग्रंथकार्यहि लवकरच सिद्धीस नेईल. सज्जनांनीं महोदारपणें हाच आशीर्वाद मला द्यावा ही प्रार्थना नम्रपणें करून तूर्त विश्रांति घेतों.

श्रीरामनवमी शके १८७५
२१ मार्च १९५१
' श्रीतुलसी–मंजरी '
बेलबाग वसाहत, कोल्हापूर.

रामचंद्र चिंतामण श्रीखंडे

सुश्लोकमानस अयोध्या-अरण्य-किष्किंधाकांडांची

अनुक्रमणिका

‘सुश्लोकमानसा’स लाभलेल्या कांहीं प्रशंसा

कविवर्य वे. शा. सं. श्रीयुत विश्वनाथशास्त्री कात्रे यांच्या पत्रांत पुढील श्लोक व मजकूर आहे.

“रघुकुलयश मार्गे गद्गद मद्बन्धु राम। विलस रसिकवृन्दा दत्त तें पुण्यधाम ।।
उठवि भिति हवीच्या सुप्रसंगें सुश्लोकीं; जय जय जगदानंदें येथुनी करतो मी।।१॥

पुस्तक अंतर्बाह्य मनोहर झालें आहे आज तें साधुशील श्री. द. वा. पोतदार या योग्य सत्पुरुषांच्या हस्तें प्रसिद्ध पुण्यधामीं श्रीरामजन्मदिनीं प्रसिद्ध होत आहे! आपल्या आयुष्यांतला आजचा हा सुदिवस होय! सहृदयरसिकवर्यांच्या योग्य प्रशंसनानें आज आपलें रामप्रेमरसमय विमल हृदय सत्त्वभरानें अनेकवार भरून ओंथंबेल व अनुपम समाधानानन्दांत पोहूं लागेल! आपला हा सात्त्विक उत्कर्ष पाहून माझीहि स्थिति खरोखर आपल्याप्रमाणेंच होत आहे! श्रीरामकृपेनें असे सुप्रसंग आपल्या प्रदीर्घ आयुष्यांत सतत येवोत. आपल्या स्वर्गस्थ मातृपितृदेवांच्या आजच्या आनंदाची कल्पना कोण करूं शकेल! खरोखर ‘ सर्वे धन्यास्ते च यूयं वयं च’ !! वरी एकाकी असल्यानें समारंभास हजर राहतां येत नाहीं. पण मन तिकडेच आहे पुस्तक व पत्रिका श्रीपदीं सभक्ति समर्पण केली. ” (पत्र १-४-५२ शैलाली.)

या द्वितीय भागाचें वाचन करून श्री. कात्रेशास्त्री यांनीं पुढील उद्गार २-३-५३ चे पत्रानें कळविले आहेत. तेहि वाचून मला अत्यानंद होत आहे:—“ आपलें काव्य वाचतांना आनंदाचें भरतें सारखें येत होतें. श्रीरामकथेनें रंगलेला आपल्या वाणीचा प्रवाह प्रसन्न गंभीर गंगौघाप्रमाणें वाटला. हें कळविण्यास मोठा आनंद होत आहे. सर्वच गोड व रम्य! वाचून डोळे दुखले तरी पुस्तक खालीं ठेववत नव्हतें.”

पं. हनुमान्प्रसाद पोद्दार, संपादक ‘कल्याण’ गोरखपूर यांनीं ‘मानसा’चीं चित्रें घेण्यास संमति देण्याची कृपा केली व ता. १८।५।५२ चे पत्रीं पुढील प्रशंसोद्गार ‘ सुश्लोकमानस ’ बालकांड पाहून काढले आहेत:—

Dear Sir,

Your letter of the 6th inst. and the very kind present of the first book of your Marathi rendering of Ramayan are to hand.

In spite of my little knowledge of Marathi, I could see that you have really made a great achievement. By this lovable translation you have led in your land a very wide and swollen canal from the big stream of Bhakti with which Goswami Tulsidasji so inundated the whole of the Gangetic plain that it knows no drought.

Yours Sincerely
Hanumanprasad Poddar.


श्रीमंत राजे विद्वद्रसिक श्री. लक्ष्मण सीताराम ऊर्फ रावजी भैय्यासाहेब खेर, गुरसराई जि. झांशी, उत्तरप्रदेश २४।११।५२च्या पत्रीं लिहितात:—

"......Your last letter bears date the 1st may 1952. It gave me great pleasure to feel that I was able to contribute my mite to what is definitely going to be the crowning achievement of your life's mission — the Marathi incarnation of the great epic " RamaCharita-Manas " It seems you have come equipped in so rich a measure to convey the eternal message of the first poet (" कवेराद्यस्य शासनात् ") to the perpetually changing world. That message will endure to the end of time (" यावचन्द्रदिवाकरौ ").

I have read सुश्लोकमानस of yours, not less than half a dozen times in the meanwhile & with every reading it has given me evernew pleasure — not describable in words (" अनिर्वाच्य "), only susceptible of being felt. It grips one's interest and keeps it bound to the end. All the other works of yours and they are none too few, strike one as the prepartion for this " Magnum Opus" of yours.

I hope the remaining chapters will soon be ready to see the light of the literary world......"

चित्रकार–श्रीद्विजेन्द्र] भरतास श्रीरामपादुकाप्रदान [मानसांक, कल्याण कृपेनें.



संकोच कीं गुरुजनादिक पौर तेथ। स्नहार्द्र बंधु भरतीं तरि सर्व चित्त॥ सुश्लोकमानस द्वितीयसोपान
श्रीराम दे सकृप त्या निज पादुकातें। शीर्षी धरी भरत त्यांप्रति भक्तिचित्तें! ॥२०॥ अयोध्याकांड, उत्तरार्ध तरंग २८

श्रीगणेशाय नमः ।

श्रीभवानीकमलेश्वराभ्यां नमः । श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ।

श्रीसरस्वत्यै नमः ।

तुलसीरूपिणे श्रीमद्वाल्मीकिमुनये नमः ।

यस्य प्रसादात्सुलभं स्वर्गीयममृतं भुवि ॥ १ ॥

❋ सुश्लोकमानस ❋

श्रीरामचरितमानस अर्थात् श्रीतुलसीरामायण

या महाकाव्याचा अनुवाद

द्वितीय सोपान

अयोध्याकांड

पूर्वार्ध

तरंग १ ला

मंगलाचरण

गौरी वामांकिं ज्याच्या दिसत सुरधुनी मस्तकीं शोभमाना ।
बालेन्दू भालदेशीं, गरळ गळिं दिसे, वक्षिं नागाधिराणा ॥
भस्मानें भूषिलेला सुरवर सकलाधीश चंद्राभ शर्व ।
रक्षो श्रीशंभु मातें अनुदिन शिव तो व्यापि जो विश्व सर्व ॥ १॥

राज्याभिषेकें नच जी प्रसन्नली । अरण्यवासें नच वा विषण्णली ॥
ती रामवक्त्रांबुजकांति कोमला । देवो सदा सुंदर मंगलें मला ! ॥२॥

इंदीवराभ सुकुमार मनोज्ञ-नील। वामांगि शोभलि जया दयिता सुशील ॥
हस्तीं महाशरधनुष्य जयास साजे। त्या जानकीपतिरघूत्तमिं चित्त माझें ॥ ३ ॥
श्रीसद्गुरुप्रभुपदाब्जरज:कणांनीं। स्वच्छत्व चित्तमुकुरीं क्षणिं आणवूनी ॥
श्रीरामनिर्मलयशें वदुं सद्विचारीं। जीं देत साधुनि जगीं पुरुषार्थ चारी ॥४॥
श्रीराम होउनि विवाह गृहासि येत। तेथून नित्य नवमंगल हर्ष होत ॥
चौदाहि त्या भुवनपर्वतिं पुण्यमेघ। वर्षीत सौख्यजल ज्यांन अखंड ओघ ॥५॥
तैं संपदा निरुपमोत्तम ऋद्धिसिद्धी। या रूपिणी त्रिपथगा सरिता त्रिशुद्धी ॥
साकेतपूरजलधीमधिं धाव घेती। ते सौख्यपूर कधिं वर्णुनि काय येती ! ॥६॥
तेथील पौर अतिसद्गुणरत्न कीं ते। योगी, तपी, विमल, मूल्य ज्यां न होतें ॥
नारी नर प्रकट उत्तमजाति सारे। वाटे विधातृकृति तेविं दुजी न सारें ! ॥७॥
रामस्वभावगुणशील मनोज्ञरूप। पाहोनि होत अतिहर्षित चित्तिं भूप ॥
सर्वांमनीं मुदितभाव असाच होता। रामा करोचि युवराज, नृपाळ आतां ॥८॥
प्रार्थीति लोक निज चित्तिं शिवास भावें। कीं राज्य अक्षत नृपें रघुनाथिं द्यावें।
एका दिनावसरिं लोकसमेत राजा। होता सभेंत अपुल्या बसला महौजा ॥९॥
तो लोकनाथ सकला सुकृता निधान। श्रीरामकीर्तिगुणगायनि पूर्ण मग्न ॥
ज्याच्या कृपेसि अभिलाषिति सर्व राजे। यद्रागलोभ जपती मनिं दिक्पती जे ॥
त्रैलोक्यिंही दशरथासम नाहिं झाला। कोणीहि भूपति दुजा कवण्याहि काला ॥
श्रीराम मंगलनिदान तनूज ज्याचा। तद्वर्णनस्तव अमूपहि अल्प साचा! ११
घेई करीं मुकुर तो सहजींच भूप। तो सावरी मुकुट, पाहत आत्मरूप ॥
कर्णांसमीप बघतां धवलाभ केश। वार्द्धक्य वाटत तया करि सूपदेश— ॥१२॥
कीं यौवराज्यिं अभिषेचुनि तूर्ण रामा। का ओपिशी न निजजीवन सौख्यधामा ॥
येतां विचार मनिं हो नृप हृष्टचित्त। पाहूनि योग्य शुभवेळ गुरूसि जात ॥१३॥
सांगावयासि मनिंचा सुविचार त्यातें। हृत्प्रेम भूपतनुतें पुलकीं भरी ते ॥
बोले नृपाळ "परिसा जि मुनीश ! आतां। श्रीराम सर्वपरि योग्यचि कर्मजाता ॥
तो सेवकांसि, सचिवांसि, पुरनिवासी। लोकां मदीय अरिमित्र उदासि यांसी ॥
आहे अतीव हृदयप्रिय सर्व लोकीं। जैसा मला, जणुं बहिश्चर जीव तो कीं! १५
साकारल्या जणुं तयीं तुमच्या सदाशी। ज्या अर्पिल्या मज तुम्हीं प्रभुंनीं प्रहर्षीं ॥
सारेच विप्र परिवारसमेत चित्तीं। श्रीरामिं प्रेम तुमच्याच परी करीती १६
ज्यांनीं शिरीं धरियले गुरुपादरेणू। ते वैभवें वश किती करितात नेणूं ॥

माझ्यासमान अनुभूति अशी न कोणा। या पुण्यपादरजिं मन्मति सर्व पूर्णा १७
आतां असेचि अभिलाष मनांत एक। तोही फळेल तुमच्याच कृपें सुरेख"॥
पाहोनि चित्त मुनिचें अतिहृष्ट भावें। सांगे 'विचार परिसोनि सुखी करावें' १८
बोले वसिष्ठ 'नृपते! तव नाम-कीर्ति। हीं होत सर्व करितीं अभिलाषपूर्ति॥
हे राजवर्य! तव मानसकाम होती। ज्यांतें फळें अनुसरोनिच पूर्ण येती!' १९
जाणोनियां गुरुसि अंतरिं सुप्रसन्न। राजा वदे मृदुल वाक्य· हळूंच लीन॥
'नाथा! करूं जि! युवराज मदीय रामा। सांगा समग्र परिषद् भरवूं स्वधामा २०
माझ्या समक्षचि महोत्सव हा घडावा। साफल्यलाभ नयनां सगळ्यांस व्हावा॥
श्रीशंकरें सकल काम मदीय केले। ही एक आस मम चित्तिं विशेष आले २१
ही लालसा मम पुरो! म्हणजे न चिंता। राहो न कांहिं मजला हुरहूर चित्ता!'॥
ऐकोनि तें नृपतिवाक्य शुभाढ्य सुज्ञ। आनंदकारि मुनि उत्तर दे प्रसन्न २२
'ऐकें नृपा! विमुखता धरतां जयासि। येतीच कीं अनुभवा अति दुःखराशि॥
यद्भक्तिवांचुनि न शांति मिळेल्चि जीवा। तो राम पुत्र तव, जो भजकां विसावा॥
वेगीं समारंभ करीं नृपाला!। होवो न कांहींहि विलंब त्याला॥
जैं राम होई युवराज साच। तो मंगलांचा दिनें रे! खराच!' २४
हर्षें स्वमंदिरिं नराधिप तूर्ण आला। तो बोलवी स्वसचिवादिक सेवकांला॥
ते येउनी नमिति त्या 'जय जीव' ऐसें रायें सुमंगल तयां कथिलेंहि तैसें २५
"आज्ञापिलों प्रमुदितें गुरुनेंचि आज। कीं यौवराज्यिं बसवीं सुत रामराज॥
लोकांसही जर असेल अभीष्ट हेंचि। रामा करूं जि! अभिषेक सदुत्सवेंचि"२६
ऐकोनि त्या प्रियवचा, सचिवासि हर्ष। कीं अंकुरावरि पडे उचितांबुवर्ष!॥
बोलेहि तैं सचिव जोडुनि हस्त दोनी। 'दीर्घायु व्हा नृपवरा! बहु योग्य वाणी२७
जेणें घडेल अतिमंगल सर्व लोकां। ऐसा अभीष्टतम मानस हा विलोका॥
आतां त्वरेंचि शुभमंगल हें करावें। यातें विलंब करणें न कधींच रावें"२८
राजा सुमंत सचिवोक्ति सहर्ष ऐके। कीं वाढतां तरु सविस्तर होय शाखे॥
बोले नृपाळ 'कथितील मुनीश जें जें। तें तें करा रघुवरा अभिषेककाजें' २९
हर्षें वसिष्ठ कथिती मृदु गोड वाणी। "आणा समग्र शुभतीर्थजलें त्वरांनीं॥
शुद्धौषधी फलसुमें दलमूलयुक्त"। नाना शुभा इतर वस्तु गुरू कथीत ३०
वस्त्रें अनेकपरिं सुंदर चामरें हीं। चर्में असंख्य मणिसंघ सुदीप्तिवाही॥
कार्पास रेशमि लवीं वसनें अनेक। जेणें सशास्त्र शुभ होय नृपाभिषेक ३१

अत्युक्त रीतिरचना मुनिवर्य देत । " मांडा अनेकविध मंडप हो ! पुरांत ॥
आंबे, तसे पनस वृक्ष, सुपारि, केळी । रोवूनि वीथि सजवा तुम्हि सर्व मेळीं ३२
योजूनि रत्नमणि चौक करा अनेक । बाजारहाट सजवा सगळे सुरेख ॥
पूजा गुरू गणपती कुळदेव भावें । विप्रादिकांसि अति आदरिं तोषवावें ! ।३३।
आणा पताकाध्वजतोरणांनीं । सर्वत्र शोभा नगरा भरोनी ॥
रथाश्वदन्ती कलशादि सिद्ध । करा क्षणीं मंगल शास्त्रशुद्ध " ॥३४॥
चित्तीं धरोनि मुनिचे सगळे निदेश । आपापलें निघति कार्य करावयास ॥
आज्ञा दिली मुनिवरें करण्यास जें जें । तें तें जणों गमत आधिंच पूर्ण साजे !
तो विप्र, साधु, सुर यांस समर्चि भूप । रामास हो सकल जीवन सौख्यरूप ॥
होणार ऐकुनि भला अभिषेक रामीं । साकेतिं वाद्यतति वाजति धामिं धामीं !
आलोचती शकुन उत्तम रामसीता । तन्मंगलांगिं दिसलीं स्फुरितें समस्तां ॥
सप्रेम ते पुलकितांग परस्परांते । ते सांगती भरतसंगम सूचवी तें ! ॥३७॥
" झाला असे बहुत काल तया अभेटीं । भेटेल तो प्रिय अम्हां, शकुनें स्वदृष्टीं
त्याच्यापरी प्रिय तरी पर कोण आम्हां । नोहेचि अन्य शकुनां फल सौख्यधामां ! "
रामाचिया हृदिं सदा भरतस्मृती हो । कीं कच्छपीमनिं वसे निज अंडिं लाहो !
सीतारघूत्तमिं वसे भरतानुराग । ज्यातें नसेचि उपमा तुलनेसि सांग ॥३९॥
परिसुनि घडताहे रामचंद्राभिषेक । प्रमुदित अति झाल्या राजपत्नी विशेख ॥
वर वर नभिं येतां वाढुनी पूर्ण इंदू । खळबळ लहरींनीं दर्शवी हर्ष सिंधू ! ४०
प्रथम कळवि जी हें वृत्त अन्तःपुरातें । मिळवि सकल भूषा मूल्य वस्त्रें किती तें !
पुलकिततनु राज्ञी प्रेम हर्षें भरोनी । शुभ कलश करीती सिद्ध मांगल्यखाणी ॥
स्वस्तिकें भरित चारु सुमित्रा । रत्नपूर्ण रचना अतिचित्रा ॥
हर्षमग्न रघुनायकमाता । देइ ती द्विजवरां किति वित्ता ! ॥४२॥
ग्रामदेव सुरनाग असेही । पूजि, त्यांस बलिभागहि देई ॥
" ज्यापरी सुखित होइल राम । द्या जि ! तेंचि वरदान निकाम ! " ॥४३॥
प्रार्थि रामजननी किति ऐसें । गाइलें मधुर मंगल तैसें ॥
कोकिलास्वर मनोहरवाणी । इंदुसुंदरमुखी ललनांनीं ! ॥ ४४ ॥
राज्याभिषेक परिसुनि रघूत्तमाचा । नारीनरां हृदयिं हर्ष अतीव साचा ॥
त्या मंगलोत्सवे करीति समग्र सिद्ध । सारे यथामति यथास्थिति कार्य शुद्ध ! ॥
राजा तदा वदनिं बोलवुनी गुरूतें । सांगे ' रघूत्तमिं करा उपदेश ते ते ! ' ॥

रामाकडे गुरु वसिष्ठ गृहासि येत। श्रीराम जाउनि पुढें पदिं त्या नमीत ॥४६॥
श्रीराम सादर मुनींप्रति अर्घ्य देत सर्वोपचारिं करि पूजन त्यांसि युक्त ॥
सीतेसमेत धरि तत्पदपद्म माथां। प्रार्थीत त्यां जुडुनि नम्रपणें स्वहस्तां ॥४७॥

"सेवकाच्या गृहीं येणें स्वामींचें पुण्यकारक ॥
मंगलां मूळ हें मान्यां, अमंगलनिवारक ॥ ४८ ॥
प्रेमें बोलावुनी मातें कार्यी आज्ञापितां जरी ॥
तरीहि योग्य तें होतें, वाटतें न्याय्य अंतरीं ॥ ४९ ॥
टाकूनि प्रभुता केली दासावरति हे दया ॥
पावित्र्य आणिलें आजीं आमुच्या मंदिरास या ॥ ५० ॥
आज्ञा कराल जे मातें तें मी करिन आदरें ।
भर्तृसेवाच हा लाभ वाटे मजसि हें खरें!" ॥ ५१ ॥

ऐकोनि ती प्रणयपूर्ण विनीत उक्ति । बोले मुनी रघुवरा स्तवुनि स्वचित्तीं ॥
"हे हंसवंशि अवतंसविशेष रामा!। जें बोलशी, उचित तें तुज औदार्यधामा"॥
शील स्वभाव गुण वर्णित राघवाचे । बोले मुनी पुलकितांग भरूनि साचें ॥
"योजीयला नृपवरें अभिषेक तुम्हां । तो यौवराज्यिं बसवील तुम्हांच रामा!॥
हा सर्व उत्सव यथाविधि पूर्ण व्हावा । यासाठिं संयम अजीं तुम्हि आचरावा !॥"
ऐसें कथूनि मुनि जाय पुन्हां नृपातें । श्रीराम होत परि विस्मित आत्मचित्तें ॥
चिंती "समस्त अम्हि बंधु समानहेतु । ना भोजनीं शयनिं खेलनिं भेद किंतु॥
ते कर्णवेध, शिशुता, व्रतबंध लग्न । सारें समान अमुचें जगतीं अभिन्न!५५
या आमुच्या विमल वंशिं अयोग्य एक। बंधूंसि सोडुनि वरिष्ठ कृताभिषेक!"॥
ही प्रेममूल उचिता रघुनाथचिंता। वारीत भक्तहृदिंची कटुता समस्ता॥५६॥

ये त्याच वेळीं मुदितात्म लक्ष्मण । प्रेमार्द्रहृन्मंदिर चारुलक्षण ॥
सन्मानि त्यातें प्रिय वाक्य बोलुनी । श्रीराम जो राघववंशसन्मणि ॥५७॥

वाद्यें मनोहर रवें किति वाजतात । पौरप्रमोद नच वर्णुहि ये नितान्त ॥
सारे प्रतीक्षिति जवें भरतेंचि यावें । त्याला स्वनेत्रफल सत्वर तें मिळावें ॥
सारे घरोघरिं पथीं लघु वाटिं हाटीं । नारी नर प्रचुर बोलति हेंचि दाटीं ॥
'आहे मुहूर्त उदियां परि केविं वेळ । जाईल तोंवरिहि, हा विधिचाच खेळ!॥
हे आमुचे कर विधे! अभिलाष पूर्ण । सिंहासनीं बसुत राम सपत्नि तूर्ण!॥
पाहूं तयां नयनिं जैं कनकासनीं हो! तेव्हांच जीव अमुचा कृतकृत्य कीं हो!'
सारेच बोलति "'उद्यां' उजडे कधीं ती । देवा! करा कि! अमुची अभिलाषपूर्ती॥

सिंहासनावरि अधिष्ठित रामसीता। पाहूं, तदांच समजूं अमुच्या कृतार्था ”
सारेच कांक्षिति ‘कदां उजडे उद्यां ती?’ तों देव वक्र मनिं चिंतिति विघ्नमूर्ति!
साकेतदैव चढतें बघवे न त्यांतें। चोरांसि चांदणि निशा न रुचेचि चित्तें!॥
प्रार्थीति सारे सुर शारदेप्रति। पुनःपुन्हां पायिं पडूनि ते किती!॥
“पाहोनि माते! अमुची अवस्थिति। तूं आचरीं जें सुरभव्य संप्रति॥६३
तूं तें करीं जें सुखदायि होइल। राज्य त्यजोनी वनिं राम जाइल!॥
ऐसेंच तूं आचरिं देवि! शारदे। आम्हांसि हें तूं वरदान एक दे!”॥६४
ऐकोनि देववचना करुणार्द्र तैशा। श्रीशारदा हळहळे हृदयीं विशेषा॥
“हा! हाय! देव करती हिमरात्रि मातें। कैसें सरोजविपिनांवरि आज कीं तें!?”
पाहोनि तीस बहु खिन्न, पुन्हांहि देव। ते प्रार्थिती तिजसि हेंचि सभक्तिभाव॥
“माते! न यांत तुजला लवमात्र दोष। श्रीरामरायिंहि नसेचि विषादहर्ष!
रामप्रभाव तुजलागिंहि सर्व ठावा। कर्मेंचि येत सुखदुःख समग्र जीवा॥
तूं जाच देवहितकारण वाणि! देवि! साकेतिं” हें विनविलें तिज सर्व देवीं॥
पुनःपुन्हां जैं सुर तत्पदांबुजें। धरोनियां प्रार्थिति गौरवें निजें॥
संकोचुनी तैं हृदयीं सरस्वती। निघालि जाया, मनिं हेंचि चिंतिती ६८
“विबुधमति किती ही पोंचली नीचतेसी?। जरि निवसति उंचीं, तत्कृती नैव तैसी!
शकति न निरखाया हे विभूती परांची। परि नच कवि मातें चूक ठेवील साची!
करितिल मनिं कीं ते भाविकार्थी विचार। म्हणुनि न कवि मातें सर्वथा निंदिणार!”
दशरथनगरीतें पातली हृष्टचित्त। जणुं असह अशी ती दुर्दशा एक मूर्त!॥
कैकेयीची मंथरा नाम दासी। दुर्बुद्धीची जी म्हणो पूर्ण राशि।
वाग्देवीनें शुनी तन्मतीतें। केलें तीतें दुर्यशःपेटिका तें!॥ ७१॥
पाहोनि तैं नगरिंचा बहु थाटमाट। तैसेच वाद्यरव मंगलपूर्ण दाट॥
लोकां विचारि अणिं कारण मंथरा ती। रामाभिषेक कळतां तिज होत आर्ति!
चित्तीं विचार करिती कुमती कुजाति। नासेल केविं महदुत्सव त्याच रातीं॥
जैशी बघोनि मधपोवळिं कीं किराती। चिंती सुहृष्ट ‘मज लाभति कोण रीतीं?’

भरतजननीपाशीं आली मनांत उदास ती।
प्रमुदित पुसे राणी “कां गे! मनीं कुढशी अती?”॥
परि न वदली कांहीं दासी, उसासत राहिली।
रुदन करि ती, स्त्रीचारित्र्यें अशीं जगतीतलीं!॥ ७४॥

वदलि तिजला कैकेयी तैं हंसोनि " अगे ! तुला ।
निपट बहुधा वाचाळीतें न लक्ष्मण बोलला ? ॥
तव सुजविलें तेणें गाला ? " तरी न वदेचि ती ।
बहु सुसकरी नागी काळी जणों कुटिला अती ॥ ७५ ॥
दचकुनि म्हणे राज्ञी तेव्हां " अगे ! वदसी न कां ? ।
कुशल किं असे रामा, भूपा, तसें भरतादिकां ? ॥
रिपुदमन तो क्षेमी ? तो कीं असे सुखि लक्ष्मण ? " ।
परिसुनि अशीं नामें, कुब्जाहृदीं कळ दारुण ! ॥ ७६ ॥
तैं ती वदे " कवण हो ! मज बोलुं जाणे ? कां जीभही लवलवे उसन्या बळानें ?
भूपाळ ज्यास युवराज करीत आहे । त्या रामचंद्रविण सौख्य तरी कुणा हें ?॥
कौसल्येचें दैव वाटे फळालें । कोणाचे ना गर्व तेणें गळाले ? ॥
शोभा तुम्ही देखिली केविं नाहीं ? क्षोभे माझें चित्त, जी पाहतांही ! ७८
कळेना हो ! तुम्हां निजसुतचि जाईल विलया ।
गमे तुम्हां हें कीं नरपति असे नित्य करि या ॥
रुचे निद्रा तुम्हां सुख मृदुल शय्या स्वहृदयीं ।
कळेना भूपाचे कपट तुमच्या धीस लवही ! " ॥ ७९ ॥
कैकेयी परिसे प्रियोक्त परि ती जाणोनि तद्हृद्गत
बोले कोपुनि मंथरेस " सटवे ! तूं गेह कां फोडित ? ॥
तूं जैसें वदतीस, त्यापरि पुन्हां तूं बोलतां चावटे ! ।
जिह्वा मी तव काढवीन धरुनी, वाचाच जेणें तुटे ! ॥ ८० ॥
लंगडे, कुबडे, काणे, स्वभावें दुष्ट दुर्जन ।
त्यांत स्त्री, त्यात बटकी ! " हांसे कैकेयि बोलुन ॥ ८१ ॥
तदां ती कैकेयी फिरुनि निज दासीस वदली ।
" प्रियोक्ति प्रीतीच्या वदत तव गे ! गोड जिभली ! ॥
तुला रोषें जें मी परुष वदल्यें तें नच खरें ! ।
मम स्वप्नींही मी तुजवरि कशी कोपिन वरें ? ॥ २८ ॥
तो होय मंगल खरा दिन पुण्य मातें । जैं सत्य पाहिन, मला वदलीस जें तें ॥
कीं ज्येष्ठ भाउ नृप, सेवक धाकुटा, हे । रीती भली रविकुलीं पहिलीच आहे॥
रामाभिषेक जरि होइल गे ! उद्यांच । देईन मागशिल तें तुजलागि साच ॥

प्राणाहुनीहि मजला प्रिय एक राम। कोपेन कां? नृपति तो, मम हाच काम!
कौसल्येसम सर्व त्यास जननी पूज्या अति प्रेमला।
माझ्या ठायिं तरी विशेषचि असे तत्स्नेह, ज्या ना तुला॥
त्याचें पारखिलें असे हृदय मीं; वाटे विधाता निकीं।
देई जन्म तरी मिळो सुत-वधू हे रामसीताच कीं!॥ ८५॥
भरतशपथ तूंतें घालित्यें, सत्य बोल। कपट कुटिलतादि त्यागुनी चित्त खोल!
सुखमय असतां, ही कां तुला खंत वाटे? सकल मज कथीं तूं सत्य जें चित्ति दाटे!"
दासी म्हणे "वदुनि आधिंच तृप्ति माझी। सांगों पुन्हां तर हवी मज जीभ दूजी॥
माझें कपाळचि अभागि, फुटोनि जावें। राज्ञीहितें वदत, तेंहि न कां खपावें?
जे बोलती स्तवक सत्य असत्य पाहीं। व्हावेत ते प्रिय तुम्हां; कटु मात्र मी ही॥
मीही वदेन म्हणुनी 'जय देवि!' ऐसें। वा मौन सेविन सदा दिनरातिं खासें!
मातें कुरूप करुनी विधि दास्य देत;। जें पेरिं तेंच भरिं; देत तसेंचि घेत!॥
कोणीहि होउ नृपती मज काय हानि? दासीपणा सुटुनि व्हायचि मी न राणी!
मेला स्वभावचि असा मम हा दुवाड! कैशी हिता तुमचिया करुं दृष्टिआड!
मी बोललें सहजिं गोष्ट मनांत आली; देवि! क्षमा मज कराजि! चुकी जहाली!"
तें ऐकुनी कपटभाषण मंथरेचें। जात्याच नीच ललनामन मूढ साचें॥
विश्वास ठेवि निज वैरिणिच्याहि ठायीं। मायावशें मनिं गणोनि सखी जणों ही
त्या लाघवीं प्रियवचीं अति लुब्ध राज्ञी। कीं ती फसे जणुं मृगी शबरीस्वरांनीं॥
राज्ञीमती तशि फिरे नियती जशी ती। दासी निवांतपणिं योजित घातयुक्ति!
'मातें तुम्ही पुसतसां, परि येत शंका।, कीं मानितां सदन दारित नित्य मी का?'
ऐसें अनेकपरिं सांगुनि गोंवि मोहीं। बोले पुन्हां अवदसा हंसुनीहि कांहीं॥
"अहो! तुम्हांतें प्रिय रामसीता। तुम्हीहि त्यांना प्रिय, सत्य वार्ता।
परी न आतां दिन ते रहाती। काळें, जुने मित्रहि शत्रु होती!॥९४॥
आहे रवी जरिहि पोषण पद्मजातां। जातां सुकोनि जल, तो करि तद्विघाता॥
पाहे तुम्हां सवत ती उखडावयातें। रोधावया तिज करा सदुपाय कीं ते॥
वाटे स्वभाग्यें न तुम्हांस शंका। गमे तुम्हां भूपति आपला का?॥
खोटा मनें, भूप मुखें चखोटा। भोळेपणा मात्र तुम्हांत मोठा!॥ ९६॥
श्रीराममाता चतुरा गभीरा। स्वहेतु ती साधुनि घेत सारा॥
मामाकडे जें भरतासि धाडी। राजा, परी त्यांत तिचीच खोडी!॥९७॥

मातेंच सेवितिल त्या सवती समग्र । ऐसा गमे तिज अतीवचि गर्व उग्र ॥
जें एक शल्य तिज वाटत अंतरीं तें । कीं, 'एकली भरतमाय पुसे न मातें!'
वाटे तिला नृपति अंकित आपला हो । प्रौढी अशी ह्रदयिं ती मिरवी न का हो?
ना दर्शवी प्रकट अंतर राममाता । जात्याच ती सुचतुरा कपटात्मचित्ता ॥९९
राजा तुम्हांवरि धरीत अतीव भाव । ना हें रुचे तिजसि हा सवतीस्वभाव! ॥
तेव्हां तिनें नृपतितें भुलवूनि नेटें । रामाभिषेक विनियुक्त उद्यांच, वाटे १००
हें या कुलीं उचित, कीं नृप रामा व्हावा । सर्वांस हेंचि मत; संमत मत्स्वभावा॥
चिंतूनियां पुढिल मात परी मिळे मी! देवोचि योग्य फल दैव फिरोनि रामीं" १०१
ऐशापरी कुटिल कोटि कथा वदून । राज्ञीमनीं कपट ती करि रूढ पूर्ण ॥
नाना तऱ्हा कथुनियां सवतींवरून । राज्ञी–विरोध दिधला म्हणि वाढवून १०२
राणी पुसे फिरफिरूनि तियेस सारें । होणार त्यापरिच, चित्त भरे विकारें ॥
दासी म्हणे, 'अजि विचारितसां किती तें । नाहीं अजूनहि कसें कळलें तुम्हांतें।
जाणे हिताहित पशूहि भलें स्वकीय । ही सिद्धता करिति पौर समग्र काय? ॥
सप्ताह दोन अजि मग्न समस्त त्यांत । हा कीं कळे मजकडूनि तुम्हांसि हेत? ॥
घ्या सौख्य खूप अजि राज्य तुम्हां करीं हें । बोलेन सत्य मम दोष मुळींच नोहे ॥
खोटें वदेन जर मी, मम होय दोष । भोगेन पाप, मज देव करील रोष॥ १०५॥
उद्यां घडेल जर कां अभिषेक रामा । जाणा विधीच जणु पेरि विपत्ति वामा ॥
मी सांगतें खचित ओढुनि रेघ लेखी । माझीच दुर्गति तशि होय तुम्हां दशा कीं ।
सेवाल कां सवतिला तनयासमेत । राहाल तोंवरिच हो! तुम्हि या गृहांत! ॥
कद्रूसि जेवि विनता छळि तेविं आतां। तुम्हां छळील किति निष्ठुर राममाता!
येईल भालिं भरताप्रति बंदिवास । रामास सौख्यभर आणिक लक्ष्मणास!" ॥
तें ऐकुनी कटुक वाक्य तसें तियेचें । कैकेयिचें वदन हो सुकलेंच साचें॥ १०८॥
ती कांपुं लागलि जणों कदलीच जैसी । आलेहि घर्मजलबिंदु क्षणीं तनूसी ॥
पाहूनि तत्स्थिति तशी निज जीभ चावे । ती मंथरा कुटिल जी मुळची स्वभावें॥
सांगे असंख्य कपटें जुळवूनि गोष्टी । राज्ञीस ती समजवी 'धरिं धैर्य पोटीं!' ।
झाली तयें कठिनवृत्ति अतीव राणी । काठीच शुष्क जशि वांकत ना फिरूनी ॥
सारी चळेचि जणुं कर्मगती तिची ती । चित्तीं तशीच रुचली तिचिया कुनीति ॥
भासे जणों स्तवितसे बगळीस हंसी । कुब्जेसि केकयसुता किति तें प्रशंसी! ।
"हे मंथरे! वदशि तूं मज सत्य भाव । माझा लवे नयन गे! उजवा सदैव ।

स्वप्नेंहि रोज पडती मज दुष्ट सारीं । मीं बोललें न तुज मूढपणीं बिचारी ११२
माझा स्वभाव सरळा अति भाबडा गे ! । कांहीं कळे न मज वाइट वा न चांगें ॥
कोणास मी कधिहि वाइट नाहिं केलें । मत्पाप काय बघुनी छळि दैव मेलें ! ॥
माहेरिं जन्मभरि राहिन जाउनी मी । सेवीन मी न सवतीप्रति रामधामीं ! ॥
जें राहणें विवश होउनि कीं अरीस । वाटे भलें, मरणही मज त्या परीस !" ।
राज्ञी अशापरि वदे बहु दीनवाणी । कुब्जा तिला कथि पुन्हां मृदु भाषणांनीं ॥
"ऐसें कसें वदतसां तुम्हि दीनभावें । सौभाग्य सौख्य तुमचें बहु वृद्ध व्हावें ! ।
जो कीं तुम्हांस करुं पाहिल कांहिं हानि । पावेल तो स्वकृतिचें फल पूर्ण राज्ञि ! ॥
तो दुष्ट बेत पडला मम कर्णि मात्र । ना भूक लेश दिनिं, जागत सर्व रात्र !"॥
राज्ञी म्हणे "वचनिं गे ! तव मी त्यजीन । कूपींहि देह पतिपुत्रविहीन जाण ! ॥
पाहूनि दुःख मम घोर सशोक होसी । माझे हिता कथिसि तें न करीन कैसी ?!"

कैकेयीमान्यता ऐशी कुब्जा घेइ परोपरी ॥
राज्ञीच्या उरिं ती घाशी सहाणीं कपटी सुरी ! ॥ ११८ ॥
स्वताच्या लव ना राज्ञी विघ्ना निकट देखत ॥
चरे यज्ञपशू जैसा हिरव्या तृणिं हर्षित ! ॥ ११९ ॥
आयके गोष्टि ती गोड कठोरान्त परी तशा ॥
कीं मधागधिं घोळोनी पीत ती घोरशा विषा ! ॥१२०॥
कैकेयीसि वदे कुब्जा " अहो ! आठवतें न कीं ? ॥
तुम्हींच कथिली मागें मजला गोष्ट ही निकी—॥१२१॥
वर दोन तुम्हां भूपें दिले; होति तयासवें ॥
घ्या ते मागोनियां आज जेणे इच्छांति संभवे ॥१२२॥
भरता राज्य द्या, तैसें रामातें वनवास द्या ! ॥
सवतींच्या महानंदा लोपवा सकला उद्यां ! ॥१२३॥

घेईल जैं शपथ भूपति रामनामें । प्रार्था तदांच वर हे निज-भव्यकामें ॥
मोडील ना वचन भूप तुम्हां दिलेलें । बोला कुणा वच न हें, मग कार्य झालें !॥
क्रोधागारीं जाउनीयां बसा हो ! कार्यार्थाचा सर्वथा नाश ना हो ! ॥
भूपोक्तीतें ना वळा ! " हें वदोनी । केली क्रूरा घातकीनें स्वराज्ञी !
प्राणाऐसी मानि राज्ञी स्वदासी । वाखाणी ती तन्मतीतेंहि तैसी ॥
सांगे "कोणी मद्धिता त्वत्समा न । जात्यें पूरीं ना तरी मी बुडून ! ॥

होशी मातें तूं तरी आश्रयाची । ज्यां माझें कार्य साधो विरिंचि ! ॥
मत्नेत्रांची बाहुली तूंच होसी । त्वत्कल्याणा मी स्मरें गे ! न कैसी ?"॥
बहुपरि यापरि बटकी देई आदरभर, तैं कैकेयी ।
जाउनि बैसे क्रोधागारीं कोण आवरी तसमयीं ? ! ॥
विपत्तिबीजा, वर्षा दासी, कैकेयीची मति धरणी, ।
कपटवारिनें अंकुर आले वर द्विदल, फल दुःखगणीं ! ॥१२८॥
क्रोधाचा संच साधोनी कैकेयी यापरी निजे ॥
कुधीनें निज ती राज्यापासोनी च्युतता भजे ॥१२९॥
अयोध्या नगरी सारी उत्साहें भरली अति ॥
कैकेयीच्या कुबुद्धीची ना कोणा कल्पनाहि ती ! ॥१३०॥
साकेतवासी नर आणि नारी । प्रहृष्ट चित्तीं सजलींत सारीं ॥
नृपालयीं चाललि थोर जा-ये । अनंत संमर्द तिथें न माये ! ॥१३१॥
श्रीरामशैशवसखे अति हर्षभारें । येती अनेक गण रामसमीप सारे; ॥
तत्प्रेमभाव समजूनि विशेष राम । तत्क्षेम त्यां पुसत पूरितभक्तकाम ! ॥
घेतां निरोप निजगेहि फिरोनि येती । ते मित्र रामगुणगान किती करीती ॥
अन्योन्य बोलति 'जगीं रघुवीरसा न । कोणी सुशील, कनवाळु शरण्य आन ॥
आम्ही कुठेंहि निजकर्मवशें असों कां । देवो जगत्प्रभु अम्हांप्रति पूर्ति एका ।
होवो सदैव रघुनाथ अम्हांस नाथ। यावांचुनी नच दुजा हृदयांत हेत !' ॥
इच्छा अशी सकल नागरिकांत नांदे । कैकेयिच्या हृदिं परी अति ताप कोंदे !
दुःसंगतिस्तव विनाश न कोण पावे ?। चातुर्यही खलमतीं कुठुनी रहावें ? ! ॥
कैकेयीगेहीं ये सायंकाळीं प्रहृष्ट नृपराय ॥
वाटे निष्ठुरतेतें भेटों ये 'स्नेह' देहधर काय ? ॥१३६॥
तो अंतरांत चरके, नामहि तें 'क्रोधभवन' हें कळुन ॥
रायाचें पाउलही पुढें पडेनाचि भीतिनें गळुन ! ॥१३७॥
ज्याच्या बाहुबलावरि इंद्रहि विश्वास ठेवुनि रहात ॥
सारे नृपालगणही मिळवाया यत्कृपालव पहात ॥ १३८ ॥
ऐसा तो दशरथनृप कलत्रकोपें सुकोनियां जाय ॥
कामप्रताप खरतर अवलोका, सकल वर्णवे काय ? ॥ १३९ ॥
खड्ग, त्रिशूल, वज्रहि यांचे नृप जो प्रहार सहज सहे ॥

त्यातें विकल किती करि रतिपति निज सुमशरीं, पहा वश हें ! ॥
आई प्रियेजवळ तो नृप भीत भीत । देखोनियां स्थिति तिची मन आर्त होत॥
राशी दिसे क्षितिवरी पडली सुगात्री । अंगावरी मलिन अंबर, अश्रु नेत्रीं ॥
चोहींकडे तनुवरील अलंकृतींना । फेंकीयलें कुमतिनें निज भाग्यचिह्ना ! ॥
भासे कुवेष तसला बघतां तिचा तो । वैधव्य दारुण भविष्यचि सूचवीतो ! ॥
येऊनि भूप तिजसन्निध गोड वाणी । तीतें विचारि, " दयिता मम तूं शहाणी ॥
प्राणेश्वरि ! प्रणयिनी रुसलीस कां गे ?" ऐसें पुसूनि तिज तो धरुं जात अंग ॥
तों ती पतीस झिडकारित उग्र रोषें । कीं नागिणीच जणुं ती अति रुष्ट भासे ! ॥
तें वासनाद्वय तिच्या रसनाच दोन । तद्वत तेच वर दोन विषारि पूर्ण ! ॥
ती भूपमर्मस्थल भेदुं पाहे । वदे विचित्रा ' तुलसी ' कथा हे ॥
आकृष्ट राजा भवितव्यतेनें । केलें कसे कौतुक पंचबाणें ! ॥ १४५ ॥
बहुपरि तिज राजा आर्जवी हें वदोनी । "सुमुखि ! रुचिरनेत्रे ! कोकिलाकंठि राशि !
कळविं तरि मला गे ! कां तुझा होय रोष । गजगतिललने ! तो मी न ठेवीन लेश
कोणी प्रिये ! अनय गे तव काय केला ? कोणा द्विमग्न शिर ? मृत्यु कुणा भुकेला?
राज्यावरी चढवुं मी कवणा सुदीना ? । राज्यावरूनि निवटूं वद काय कोणा ? ॥
शत्रू तुझा अमरही तरि मी वधीन । नारीनरें मग कशीं मज कीटशीं न ? ॥
रंभोरु ! भाव तव ठायिं मदीय थोर । मच्चित्त हें तव मुखेंदुसि हो चकोर ॥
मी प्राण, पुत्र, मम राज्यहि, दासदासी । सारी प्रजा, धन समर्पिं तुझ्या पदासी
वाटेल कीं तुजसि मी कपटात्म सांगें । मी घेत रामशपथां शतदां प्रिये गे ! ॥
तूं हास सुंदरि! विलासिनि ! भामिनी गे!। तूं इच्छिसी हृदयिं तें मज मागुनी घे
हीं भूषणें चतुर कामिनि ! लेइं अंगीं । टाकीं कुवेष, धरि मंगल या प्रसंगीं" ॥
ऐकोनि तें, शपथही अतिमूल्य तैशी । हांसोनियां उठलि ती कुमती विशेषीं ॥
वाटे किरातिच जणूं बघुनी मृगातें । फांसा करी तशि वरी निज ती नगातें ! ॥
जाणोनियां सुहृदया जणु त्या प्रियेसी । प्रेमार्द्र हृष्टवपु भूप वदे प्रहर्षी ॥
" झालें प्रिये ! तव मनोरथ जेविं होता ! । ओह घरोघर पुरीमधिं हर्ष मोठा ॥
होईल रूढ युवराज्यि उद्यांचि राम । हो सिद्ध त्यास्तव सुलोचनि! तूं निकाम "
तें ऐकतांचि उठली झणि ती कठोरा । कीं टोंचली सुइ जणों करटा उदग्रा ! ॥
ती तीव्र आर्ति परि लोपवि ती हसोनी । 'हूं चूं' जशी नच करि कुलटाच कोणी !
जाणे न तें कपटकौशल भूप तीचें । शिष्यत्व कोटिकुटिला गुरुचेंच साचें ! १५४

होता जरी निपुण तो नृप नीतिशास्त्रीं । त्यातें अगाध चरिताब्धि निदर्शवी स्त्री !
प्रेमें स्वकीय कपटात्मक दावि राणी । मोडोनि नेत्र मुरकोनि वदे स्ववाणी ! ॥
"हो! माग माग म्हणतां दयिता! परी तें । ना देत वा कुणिहि येत खरेंचि हातें !
वाचा दिलेत अवघे वर दोन कीं जे । संदेह तेहि मजला मिळण्यास माजे ! ॥
राजा हंसोनि वदला "कळलें मला हें । वाटे तुम्हांस रुसण्यांतचि सौख्य आहे ॥
ते ठेवसेचि मजपाशिं तुवां दिलेसी । ना मागशी फिरुनि तूंच तयांस कैसी ? ॥
भोळाच मी प्रथमचा, विसरालु त्यांत । मी सर्वथा विसरलों सगळीच मात ! ॥
शाबास ना मजसि दोष तुवां प्रिये ! गे ! कां दोन मात्र ? वर चारहि आज गे ! घे
ही रीति राघवकुळीं रुळली सदाची । जावोहि जीव परि भाक न ती फिरेचि !
नाहीं असत्यसम पुंजहि पातकांचा । हो गुंजकोटि तरि पर्वतसाच कैचा ? ॥
वेदीं पुराणि मुनि सर्वहि हेंचि गाती । कीं सत्यमूल सुकृतें तग त्यांसि कांति ! ॥
मी त्यावरी शपथही दिलि रामनामें । मत्प्रीतिपुण्यचि सुमूर्त अनन्त रामें !" ॥
गोंवोनि वाक्य दृढ यापरि ती नृपातें । अत्यंत दुष्टमति हांसुनि बोलली ते ॥
जे तद्विचार, गमले जणु ते ससाणे । तन्नेत्र ती जणु करी उघडे करानें ? ॥

जणों भूपाचें तें मन गमतसे सुंदर वन ।
जिथें नादे मोदें सुखखग असंख्यात रमुन ! ॥
तिथें ही कैकेयी गमलि जणु भिल्लीण अदया ।
स्ववाक्यांच्या श्येनां खवळवुनि सोडूं बघि तयां ! ॥ १६२ ॥

राणी वदे " प्रियतमा ! परिसा मदुक्त । जें आवडे मम मना, वदतें सुयुक्त
एकें वरें नृप करा भरतासि नाथा ! । जोडोनि हस्त कथितें वर अन्य आतां
माझा मनोरथ तुम्ही अजि पूरवावा । कीं राम तापस बनोनि उदास व्हावा ॥
जावे तयें वनिं चतुर्दशवर्षकाल । द्यावा असा वर दुजा मज, हो नृपाल !"
मृदुवचन परी तें भूपचित्तासि दाही । शशिकर शिवतां हो कोक वैक्लव्यवाही ।
वचन वदुं शकेना धैर्य लोपोनि गेलें ! जणुं परि वनिं लाव्या श्येन दुष्ट स्वलीलें
नृपतिवदन झालें भीतिनें नष्टकांति । पडलिच तरुतालीं भासलें वीज का ती?
करयुग धरि भाळीं भूप झांकोनि नेत्र । जणुं तनुधर तेव्हां तो गमे 'शोक' मात्र
म्हणत मनिं जणों तो "हेतु जो कां मदीय । सुरतरुसम होता पुष्पसंपूर्णकाय ॥
उपटुनि करिणीनें नाशिला तो समूळीं! । आणि सकल अयोध्या रागिनें मग्न केली!
कैकेयीनें सर्व आपत्ति आतां । बोलावुनी आणिल्या कीं अनन्ता ।

हा ! हा ! दैवा ! काय ही वेळ आली ! स्त्रीविश्वासें वंचना पूर्ण झाली !
संन्याश्यातें योगसिद्धी मिळाया । जों लागावी तों करी विघ्न माया । ”
ऐशा रीतीं राय उद्विग्न झाला । तों कैकेयी बोलली उग्र बोलां ।। १६९ ।।
।। इति श्रीरामचरितमानसानुवादे सकलकलिकलुषविध्वंसने अयोध्याकाण्डे

पूर्वार्धे कैकेयीवरयाचनं नाम प्रथमस्तरङ्गः ।।

तरंग २ रा

“सांगा, नसे भरत का तुमचाच पुत्र ?।वेश्याच मोलकरि मी ? नच का कलत्र?
ही बाणशीच जर होय तुम्हांस वाणी । कां बोलला न पहिलेचि तुम्ही जपोनी ?।।
द्या नीट उत्तर, वदा अथवा ‘ न देत ’ । सत्यप्रतिज्ञ तुम्हि ना रघुवंशजात ?
‘ देतों ’ म्हणूनी अजुनीहि भरा नकार । सत्य त्यजून जगि घ्या कुयशें अपार ! २
वाखाणुनी प्रथम आपुलि सत्यसंधा । ‘ देईन दोन वर ’ हे वदलां कितीदा
‘ मागेल ही जणु ’ तुम्हां गमले ‘फराळ ! देईन केवि नच मी नृप सत्यपाळ?’
पुण्यात्म जे शिबि, दधीचि, बली तयांनीं । त्यागून देहधन रक्षियली स्ववाणी”
कैकेयिचें वचन तें अति मर्मभेदी । दग्धांगिं दे लवणसें नृपतीसि आधि !
तेव्हा धार्मिक धीर वीर नृप तो धैर्या धरोनी मनीं ।
नेत्राते उघडी विकंपितशिरा टाकी उसासे क्षणीं ।।
बोले “ मारिसि गे ! असी खुपसुनी मर्मस्थलीं माझिया ! ” ।
क्रोधाची तरवार मूर्त गमली ती कैकयी राजया ! ।। ५ ।।
कुबुद्धि ती मूठ जणों असीची । नैष्ठुर्य ही धार सुतीक्ष्ण साची ।।
हो मंथरा हीच सहाण तीतें । करालतेला नृप भी किती तें? ।। ६ ।।
‘ घेणार ती प्राणचि ’ भूप मानी । धैर्यें परी बोलत नम्रवाणीं ।।
“ प्रिये ! असें कां वदसी अभद्र ? । कोठें तुझी प्रीति सुभाव सान्द्र ?
मी सांगतों शंकरसाक्ष जाण । श्रीराम माझा भरतासमान ।
हे दोन मल्लोचनसेच होत । प्रभातिं त्या पाठवितोंचि दूत ।। ८ ।।”
दोघेहि येतील क्षणींच बंधू । निरोप माझा कळताच साधु ।।
शोधोनियां योग्य मुहूर्त काल । करूं समारंभ महाविशाल ।। ९ ।।
करीन हर्षे भरतासि राजा । श्रीरामही होइल तुष्ट माझा ! ।।
श्रीरामही राज्यि नसे भुकेला । तद्भाव मोठा भरतींच ठेला ! ।। १० ।।

लहानमोठा विवरूनि चित्तीं । ही निश्चिता म्यांच नृपालनीति ॥
रामासही राज्यि नसेचि हांव । तूं जाणसी निर्मल तत्स्वभाव ॥ ११ ॥
घेऊनि रामशपथा शत मी कथीं गे । यामाजि रामजननी नच कांहिं सांगे ॥
केलें तुला न पुसतां सगळेंहि मींच । याकारणें मम मनोरथ नासतीच !! १२
आतां त्यजूनि निज रोष, रचीं स्वभूषा । थोड्या दिनीं भरत राज्यि चढेल खासा॥
ही एक गोष्ट मज केवळ, दुःख देते । मागीतलास.दुसरा वर अश चित्तें !!
अद्यापिही जळतसे मम ऊर तेणें । हा रोष ? कीं तव विनोद ? खरेंचि नेणें !
रामापराध वद टाकुनि राग सारा । सारे प्रशंसिति तदीय गुणप्रकारा ॥१४॥
त्वत्प्रीति रामि किति?तूं स्तविशी न त्या का ! आतांच ऐकुनि तुझें वच येइ शंका !
सद्भाव पाहुनि जयीं अरिही सुतुष्ट । तो राम काय जननीप्रति देइ कष्ट ? ॥
टाकून रोष, परिहास, धरीं विवेक । तूं दूर दृष्टि धरुनी वर माग एक ॥
जेणेंकरून भरता अभिषेक होतां । डोळे भरून तरि मी निरखीन आतां !॥
पाण्याविनाहि कधि काळिं जगेल मीन । किंवा मणीविण फणी जगतील दीन ॥
मी मात्र हें कथितसें तुज सत्यभावें । रामाविना मजसि जीवन नाहिं ठावें !
तूं जाणशील चतुरे ! दयिते! मदीये । रामाविना मजसि ना जगतां कधीं ये! ॥
श्रीरामचंद्रमुखदर्शनिं जे अधीन । मत्प्राण हे असति जाणसि तूं प्रवीण ! ” ॥
ऐकोनि भूपवचनें मृदुलें अतीव । राज्ञी मनांत बहु तापलि कुस्वभाव ॥
जाणों पडे अनलिं आहुति ती घृताची । ती करुद्ध आणखि वदे नृपतीस हेंचि ॥
“ कांहीं वदा, किति करा सदुपायकोटी । चालेल ना मजपुढें अजि गोष्ट खोटी
द्या दोन ते वर,न वा अयशा धनी व्हा। बोला न अन्य बहु वा, दमवा न जिह्वा
श्रीराम साधु, परि साधु तुम्ही शहाणे । तैसीच रामजननी, तिज मीच जाणें ॥
सर्वां तुम्हां वळखितें पहिलेंचि ना मी । हें जाहलें खचित सर्वविचारिं नामीं
कौसल्येनें माझिया जें हितातें । चिंतीयेलें जाणतें सर्वथा तें ॥
त्याचीं तीतें मी फळें चाखवीन । माझी इच्छा मीच साधीन पूर्ण ! २२
होतां प्रभात जर राम वना न सेवी । लेवोनियां तनुवरी मुनिवेष तेवीं ।
जाणा घडेल मम मृत्यु सुनिश्चयें हो। राजन् ! तुम्हांसहि घडेल अकीर्तिलाहो ”
ऐसें वदोनि कुटिला उठलीच राणी । कीं रोषवारिभरिता सरिताच कोणी ! ॥
जीचा असे उगम पापगिरीवरून । क्रोधांबुनें भरलि जी निरखील कोण ? ॥
जे दोन ते वर, तिचे जणुं तीर थोर । जो हट्ट दारुण तिची जणुं धार घोर ।

कुब्जोपदेश गमले जणुं काय भोंरे। उन्मूलि भूपतरुलागिं निजप्रपूरें ! ॥२५॥
ही रोषविषु मिळुं दुःखसमुद्रिं पाही । भूपा कळे न परिहास, कथा खरी ही ! ॥
"हा स्त्रीमिषें मम शिरीं करि मृत्यु नाच" । भूपासि हा समजला परिपाक साच॥
तो नम्र, पाय धरुनी तिज बैसवीत । बोले " न हो रविकुलासि कुऱ्हाड मूर्त
माथाहि माग मम, देइन तो तुला मी। पाहूं नको मज वियोग मदीय रामीं २७
वाटेल तें कर परी गृहिं ठेविं रामा । नाहीं तरी सकल जन्मि न दुःखसीमा !"॥
व्याधी असाध्य गणुनी पडला नृपाळ । क्षोणीतळीं, म्हणत 'राम' असंख्यवेळ !!
'हे राम ! राम ! रघुनाथ !' अशा अनेका । हांका नृपाळमणि मारितसे सशोका ॥
तो व्याकुलांग गळला ! करिणी वणों ती । ओढोनि कल्पतरु पाडित मत्तमूर्ति ! ॥
तैं कंठ जाय सुकुनी, उमटे न वाणी । कीं मीन दीन गमला नच ज्यास पाणी!॥
बोले पुन्हां अति कठोर कटूक्ति राणी । कीं ते व्रणीं भरितसे विष वाक्यबाणीं ! ॥
'कर्तव्य सर्व तुमचें जर हेंचि होतें । 'तूं माग माग' वदलां कवण्या बळें तें ? ! ॥
होतील दोन नृप का कधि एक काळीं ? । थट्टा करूनि हंसलां मज फुल्लगालीं!॥
दातृत्व गर्जवुनि, कां कृपणत्व ऐसें ? । शौर्यासि गाजवुनि सौख्यहि होय कैसें?॥
धैर्या धरा, स्ववचिं वा हरताळ फांसा ! । नारीपरी रडुनि पेंच सुटेल कैसा ? ॥
सत्यप्रतिज्ञ नर मानि तृणप्रकारीं । स्त्रीपुत्रदेहगृहराज्यधनादि सारीं " ॥
ऐकोनि मर्मवच भूप वदे " न दोष। येथें तुझा, वद सुखें रुचलें विशेष ! ॥३३॥
बोलावितो तव मिषें मज काळ मूर्त । तेणेंचि तूं भकसि जेविं पिशाच्च मत्त ! ॥
व्हावेंचि भूप अशि ना भरतींहि हांव । ही दुष्ट आस तव दर्शवि वक्र दैव ! ॥
माझाच हा गमत पापविपाक सारा । होतां कुदैव न कुठेंचि सुखासि थारा ! ॥
साकेति येइल पुन्हां अनिमात्त सौख्य । होईल राम गुणधाम अधीश मुख्य !३५
सारेहि बंधु भजतील तयासि त्याचे । त्रैलोक्यि रामयशही भरणार साचें ! ॥
पस्ताव मात्र मम, हाहि तुझा कलंक । मेल्यावरीहि न निमेल कधींच देख ! ॥
आतां रुचेल तुज तें कर ! चाल वाटे । राहूं नको मजपुढें पळही करंटे ! ।
आहे कुडींत मम जीव न तोंवरी गे ! । कांहींहि बोल, नमुनी तुज हेंचि मागें॥
पस्ताव पावशिल अंतरिं अंतिं तूंहि । तूं तांतिसाठिं चिरिशी कशि गाइतें ही?!"
भूमीं पडे कथुनि हें बहुवार राय । बोलोनि 'अंत बघसी अधमे ! मदीय !' ३८
राहे उगाच कपटात्म तशीच राणी । ती जागवीत जणुं कीं रजनी स्मशानीं ! ।
'श्रीराम ! राम ! ' नृप यापरि आर्त हांका । मारीतसे विकलपक्ष विहंग तो का ! ॥

चित्तीं म्हणे 'नच सकाळ पुन्हां उजाडो। रामाचिया भवनिं हें न कुणीच पाडो
आकाशिं सूर्य नुगवो ! रघुवंशकांत। साकेत पाहुनिहि होइल तोहि आर्त !' ॥
भूपप्रीती त्यापरी दिव्यमूर्ती। कैकेयीची क्रूरता दुःसहा ती– ॥
हीं दोनींही निर्मिण्यातें विधाता। योजी वाटे आत्मकौशल्यजाता ४१
ऐसा करीत नृपशोक, तदा प्रभात। झाली, समग्रनगरीं शुभनाद होत।
वीणा मृदंग मुरलीरव कंबुनाद। राजाचिया सदनिं वाजति सप्रमोद ॥४२॥
गातात भाट बिरुदें, तशिं गायकांनीं। आळापिलीं मधुर मंजुळ रम्य गाणीं।
राजाप्रती न रुचले शुभही ध्वनी ते। जैसें न भूषण रुचे सहगामिनीतें ! ॥
ना त्या निशीं लवहि लाभलि झोप कोणा। श्रीराम पाहुं कधिं यापरि आस त्यांना।
द्वारीं असंख्य जन सेवक आणि मंत्री। होते प्रहर्षिं जमले सरतांच रात्री ४४
ते चिंतिती, म्हणति 'कां अजुनीहि राय। आलेत ना उठुनि ! कारण होय काय?
ब्राह्मीं मुहूर्तिं नृप नित्य असेचि जागा। ना आज कां? बहुत ही नवलास जागा!॥
जा हो सुमंत्र ! करण्या नृपतीस जागे। आदेश घ्या नृपतिचा करुं कार्य वेगें!'।
गेला सुमंत्र नृपमंदिरिं तों गमे या। सारें भयंकर जणों उठलेंचि खाया ! ॥४६॥
भ्याला मनीं, गमत त्यास विपत्ति शोक। पृच्छा करी, कुणिच उत्तर दे न लोक।
गेला शिरोनि मग जेथ नृपाल–राज्ञी। केला प्रणाम 'जय जीव' असें म्हणोनी॥
बैसे जरा तंवर पाहि दशा नृपाची। जेणें मनीं विकलता क्षणिं त्यासि जाची।
देखे नृपाळ धरणीं पडला विवर्ण। कीं तें समूळ कुणि अंबुज दे त्यजून ! ४८
तो भीतचित्त न पुसोंहि शके सुमंत। राज्ञी वदे अशुभपूर्ण अपुण्यवंत—
" निद्रा नसे निशिं नृपाप्रति अल्पही ती॥जाणे न कारण, विना परमेशमूर्ति
'हे राम राम!' म्हणुनी रडती किती तें।झाली सकाळ, न नृपाळ कथीच मातें
रामासि बोलवुनि तांतडिं आणवा जा !। पृच्छा करा मगचि सर्व विशेष काजां"
पाहोनि भूपतिमनींहि तसेंच होत। गेला सुमंत अति होउनि चित्तिं आर्त ॥
चिंतीत ही करि कुकृत्य कुबुद्धि राणी। त्याचा न पाय उचले, मुख दीनवाणी॥
रामासि आणुनि नृपाळ वदेल काय !। चिंतीत यापरि सुमंत निघोन जाय ॥
खिन्नासि त्या पुसति दारिं बघूनि लोक।त्यांना कथूनि धृतिनें करि तो अशोक५२
ये तो जिथें रघुकुलांबुधिचंद्र राम। येतां तया बघित राघव मोदधाम ॥
तो आदरी बहु तया पितृतुल्य लेखी। पाहात राममुखिं भूपनिदेश दे कीं।
घेऊनि संगतिं तया रघुवंशहीरा। येतां तया निरखि लोकसमूह सारा ॥

रामा बघून लव खिन्नमुखद्युतीतें । लोकींहि खेदलहरी मरल्या किती तें !५४
जावोनि पाहि रघुवंशमणी पित्यातें । निस्तेज तों नृप दिसे अतिमात्र त्यातें॥
भासे जणों पतित तो भयभीत साच । सिंहीणिच्या निकट वृद्ध गजेन्द्रसाच!।
सर्वांगिं लाहिच जया, सुकलेत ओठ । कीं दीन तो भुजग यन्मणि होय नष्ट
संक्रुद्ध केकयसुता जवळींच होती । भूपालमृत्युघडि मोजति काळशी ती !
श्रीराम, जो करुणचित्त मृदुस्वभावें ।तें दुःख पाहत, न जें श्रुतिं त्यासि ठावें
तेणें तथापि हृदिं धीर धरूनि युक्त । मातेप्रती पुसियलें मृदुमंजुलोक्त ! ५७
"माते! कथीं मज, कशास्तव दुःखि तात? वारीन मी करुन यत्न तया अनंत"
माता वदे "परिस कारण हेंचि रामा! प्रेमा तुझ्यावरि करी नृप, ज्या न सीमा
भूपें मला वितरिले वर दोन होते । जे मानिले मजसि, मागितले तया ते ॥
जे ऐकतांच नृपचित्त सशोक होय । स्वप्रीति नावरुं शके तुज ठायिं राय !
पुत्रप्रीती कीं वरांची प्रपूर्ति । यांचे योगें भूपचित्तासि आर्ति ॥
आदेशातें मानुनी वंद्य माथां । भूपक्लेशां तूं निवारीं समर्था ! " ६०
कैकेयीनें बैसल्याबैसल्या ती । निर्भीतीनें बोलियेली कटूक्ति ॥
जी ऐकोनी पूर्ण काठिन्यवाणी । व्हावें मूर्त क्रूरतेचेंहि पाणी !! ६१
वाटे तेव्हां मूर्तिमान् क्रौर्य साच । जिह्वाचापें शब्द ते बाणसेच ॥
मोठी विद्या बाणविद्यंत या या । भूपा लक्ष्या कोमला वेधि का या ? ! ६२
सारें रामा सांगुनी स्तब्ध राहे । वाटे मूर्ता क्रूरता बैसली हे ॥
चित्तीं हासे भानुवंशाब्जभानू । स्वानदाचा ठाय जो एक मानू ! ॥६३॥
तो राम बोले वच वाग्विभूषण । मृदू तसें मंजुळ ज्या न दूषण ॥
" तो पुत्र बाई मज माय गे ! भला । पाळावया जो जनकोक्त सज्ज आ ! ६४
आनंदवी जो पितरां असा सुत । संसारिं गे ! दुर्लभसाच भासत ॥
वनींच जाणे मज हो हिताप्रती । लाभेल मातें मुनिवृंदसंगति ! ॥६५॥
आदेश त्यामाजिं तसा करी पिता । तुलाहि आज्ञा अशि आइ ! संमता
प्राणप्रिया भरतलाहि राज्य हो । लाभेल, हें भाग्य मदीय भव्य हो ! ६६
भ्राता मला सन्मुख सर्वदा गमे । गुरूक्तिच्या पालनिं चित्त हें रमे ॥
मी याहि कार्या जर जाय ना वनीं । मूर्खीं मला घेइन मीच गोंवुनी !
त्यजुनि सुरतरूतें जो किं एरंड सेवी । अमृत परिहरोनी जो विषालागिं तेवीं
दचकिल न असाही मूर्ख या पर्वणीतें । जननि ! निज हृदीं तूं घेइं गे ! जाणुनी तें

परि अतिशय मातें एक हें दुःख वाटे। नरपतिहृदयीं कीं शोकवैक्लव्य दाटे!॥
अति लघुकृतिसाठीं कां असें दुःख ताता?। मजसि न समजे हें आइ! चित्तीं पहातां
हे धीरवीर गुणसागर भूपराय। झाला असेल अपराध महान् मदीय॥
माझ्यास्तवें म्हणुनि हें वदती न कांहीं। माझी तुला शपथ, सांग खरेंचि आई!"७०
सहज सरल होती ती जरी रामवाणी। तरि कुटिल तियेतें मानि दुर्बुद्ध राणी॥
सलिल सम असो कां, त्यावरी चालणार। कुटिलगति जळूं ती जातसे नित्य वक्र!
ती स्नेह दावि वर, जाणुनि रामभावा। बोले "मलाहि दुसरा नच हेतु ठावा!
देयें तुझी शपथ, त्या भरतावरूनी। बाळा! नसेचि अपराध तुझ्या ठिकाणीं ७२
तूं बंधु-तात-जननींप्रति सौख्य देशी। तूं बोलशी सकल तें वच सत्यपोषी॥
तू तातमातृ-अर्चनीं रत नित्य भावें। ओवाळिंन तुजसि मीहि मदीय जीवें!
तू नाथचित्त समजासि निजप्रभावें। जेणें न वृद्धपणिं लाछन त्यासि यावें॥
त्या पुण्यसंपदिं असे तव लाभ झाला। ना ती अनादर करूनि गमो लयाला!"
तीं दुष्ट वक्रवचनें शुभ त्यापरींचीं। तीर्थें गयादिक जशीं मगधांतरींचीं॥
रामासि मातृवच पावुनि शोभलेंच। गंगेसि ओहळ मिळूनि सजेचि साच!॥७५॥
मूर्च्छाहि जाय तितुक्यांतचि राजयाची। तो 'राम! राम!' करि घोष सशोकवाची
तेव्हां सुमंत्र नमुनी समजावि त्यानें। "आला असे जवळ राम" असें सदुक्तें
जों राम तातचरणां धरि नम्रशीर्ष। तों भूपही उघडि लोचनपद्मकोष॥
भूपा सुमंत्र बसवी मग सांवरूनी। रामा पदाब्ज धरत्या नृप घे करांनीं!७७
हृदयिं धरित रामा स्नेहविक्लिन्न राय। गत मणि गवसे तो त्या फणीलागिं काय
नृप बघतचि राहे प्रीतिनें रामराया। नयनयुगल लागे अश्रुपूरीं वहाया! ७८
बोलूं शके नृपति शोकभरें न कांहीं। रामा फिरूनि फिरुनी हृदिं घे करांहीं
प्रार्थी त्रिधातृपदिं राय किती स्वचित्तीं। "ना केधवांच रघुनाथ रिघो वनान्तीं!"
प्रार्थी शिवासहि मनिं स्मरुनी सुभावें। "शंभो! सदाशिव! मदुक्तिसि आयकावें
हे आशुतोष भगवन्! नति सर्वदात्या!। दीनार्ति जाणुनि करा क्षणिं नष्ट कीं त्या
हो! प्रेरणा करितसां तुम्हि सर्वचित्तीं। द्या प्रेरणा रघुवरा तुम्हि त्याच रीतीं॥
जेणें त्यजूनि मम भक्ति निदेश शील। श्रीराम नित्य मम गेहिंच कीं वसेल! ८१
हो कीं अकीर्ति जगिं, सद्यश नाश पावो। स्वर्गा मुकून नरकीं मम पात होवो।
साहेन मी सकल दुर्धर दुःखराशि। रामा वियोग न करा मम लोचनांसी!!"
ऐशाविचारिं रत भूप न कांहिं बोले। अश्वत्थपर्णसम चित्त तदीय डोले!॥

त्या प्रीतिमग्न निरखूनि पित्या निकाम । मातेकडेहि निरखी शुचिकाम राम
तों ती वदेल बच काहिं असें गणोनी । तैसेंच देशसमयावसर स्मरोनि ॥
श्रीराम बोलत वचें विनयानुसारी । जीं हृद्य उत्तम अशा भरलीं विचारीं८४
"ताता! वदेन तर धाष्टर्यचि हो मदीय। कीजे क्षमा गणुनि चित्तिं शिशूच होय!
का या अतीव लघु कारणिं शोक ऐसा?। आधींच कां कळविली न मला मनीषा?
टाकोनि शोक, मज हर्षि निदेश द्या हो!" हें बोलतां पुलकशोभित राम तो हो
बोले पुढें "जगतिं धन्यचि ते, जयांनीं। केलें प्रहृष्ट पितया, सुकृतें करोनी"
त्यातें सुलभ्य जगतीं पुरुषार्थ चारी। प्राणांपरीच निज जो पितरां विचारी ॥
आदेश पाळुनि करीन कृतार्थ जन्मा। आज्ञा करा, त्वरित मी परतेन धामा८७
मातेसि मी पुसुनि घेइन तन्निदेश। तैसे पुन्हां नमुनि तातपदांबुजांस ॥
आताच मी निघतसें विपिनास जाया"। श्रीराम जायचि असें वच बोलुनीयां
तेव्हां नृपाळ अति दुःखि न उत्तरा दे। व्यापून दुःखभर तो नगरात कोंदे॥
तें दुःखवृत्त पसरे क्षणिं सर्व लोकीं। व्यापीत सर्व तनु वृश्चिकदंश दुःखीं८९
येतांचि तें श्रवणिं वृत्त बुडालि शोकि। नारीनरें, तरुलता वणव्यामधें कीं॥
ज्या जेथ तें कळत, तेथ पिटोनि माथा। तो होतसे विकळ! धैर्यचि जाय अस्ता!
वदन सुकुनि गेलें, लोचनीं लोट आले। जनहृदय भरूनी शोकपूरीं बुडालें!!
मनि गमत अयोध्येमाजि सैन्यचि आलीं। जणुं करुण रसाचीं ढोल-कल्लोळ-मेळीं!!
म्हणति जन "अहा! हे केविं धाता विनाशी।घडि शुभ घटनेची पातलेली उराशी!'
बहु दिशि जन सारे निंदिती कैकयीतें। अवचित कसले हे डोहळे होत हीतें!
कशि सदनहि जाळी नांदतें अग्निनें ही। नयन निज करांनीं काढुनी देखुं पाही!
दवडुनि अमृतातें, चाखुं पाहे विषासी। कुटिलमति कठोरा पापिणी हीच ऐसी
विमल रघुकुलाच्या वेणुच्या ही वनातें। कशि अकळित जाळी ही अभागी स्वहस्तें
तरुवर कशि कापूं इच्छि बैसोनि शाखीं!।मुखिं जणुं असुमातें कालवी हे खुळी कीं!
सतत हिजसि हो कीं रामहो प्राण जेवीं। कुटिलपण हिचें हें कां बरें त्यासि द्यावी!
कवि म्हणति खरें तें, लोकिं नारीस्वभाव। अकळचि,न तयाचा कोणि जाणेल ठाव!

गवसेल कधीं काळीं प्रतिबिंबहि आपलें ॥
परंतु लोक हो! कोणीं नारीचरित जाणलें? ॥ ९६ ॥

कोणास वही नच आळणार?। कोणास अब्धी न समावणार? ॥
करील नारी प्रबला न काय?। न काळ कोणासि जगांत खाय? ॥ ९७ ॥

पूर्वी विधाता किति मन्त्र ऐकवी । हा ऐकवीतो अजि काय हें कवि ? ॥
आम्हांस सौख्यें किति दर्शवीतसे ! । आता परी हें कटु चाखवी कसें ?" ९८

कोणी बोलति " हाय ! हाय ! नृवरें केलें न कांहीं भलें ! ।
कैकेयीप्रति केविं ते वर दिले ना चिंतितां निर्मलें ? ॥
हट्टें भूपतिनें स्वतांस दिधलें दुःखामधें लोटुन ।
कैसे स्त्रीवशबुद्धिनें दवडिले स्वज्ञानसंपद्गुण ! " ॥ ९९ ॥
कोणी धार्मिकनीतिविज्ञजन जे ते मात्र ना ठेविती ।
भूपीं दोष मुळींहि चिंतुनि मनीं शास्त्रें पुराणादि तीं ॥
ज्यांना ज्ञात दधीचि, तो शिबि तसा, राजा हरिश्चन्द्रहि ।
ते वर्णीति कथा परस्पर अशा आदर्शभूता महीं ॥ १०० ॥

कोणी म्हणे ' हें भरतासि संमत ' । तदा कुणी ऐकुनि मूक राहत ॥
घेती कुणी तें श्रवणासि झांकुनी । जिह्वा रदें चावुनि बोलती कुणीः-१०१
" असे न आम्हां तरि सत्य वाटतें । सन्निंदितें पुण्य टिकेल केविं तें ? ॥
प्राणाहुनीही अधिकाचि हो रति । रामावरी श्रीभरतांतरीं किती ! ॥१०२॥
वर्षेल कीं चंद्रहि अग्निचे कण । विषापरी होय सुधाहि दारुण ! ॥
परीं न केलें भरतें कधींच तें । श्रीरामचंद्रा प्रतिकूल कोणतें ! " १०३

॥ इति अयोध्यावासिविषादवर्णनं नाम द्वितीयस्तरङ्गः ॥

तरंग ३ रा

कोणी विधात्याप्रति दोष देतसे । जेणें सुधा दावुनि ओपिलीं विषें ॥
साऱ्या अयोध्येमधिं शोक संचरे । दुःखें जळे अंतर; हर्ष तो विरे ! ॥१॥
तैं कैकयीच्या कुणि वृद्ध मैत्रिणी । विप्रस्त्रिया आवडत्या तिला मनीं ॥
तच्छील वानूनि कथीति चांगलें । जे शब्द सीतें परि बाण लागले ! ॥२॥
त्या बोलती " तूं म्हटलेंस कैकदां । कीं राममूर्ती तुज होय हर्षदा ॥
त्वदुक्त वानी जगही घडोघडीं । तुझी न तैसी भरतींहि आवडी ! ॥ ३ ॥
अकृत्रिम स्नेह तुझा रघूत्तमीं । कां लोपला गे ? नच जाणतों अम्ही ॥
केला असे तो अपराध कोणता । रामें तुझा गे ! वनवासजोगता ? ॥ ४ ॥
न रोष तूझा सवतीवरीं कधीं । सर्वत्र ही ख्याति असे अगामधीं ॥
श्रीराममाता करि काय गे ! तुझें ? । साऱ्या पुरा हाणिधि घोर वज्र कैं ? ५

सीता पतीच्या विरहासि साहिल ? । गेहीं कसा लक्ष्मणराय राहिल ?
भोगील का तो भरत स्वराज्य गे ! ? । रामाविना भूरतिही कशा जगे ? ६
ऐशा विचारीं क्षणि रोष तूं त्यज । शोका कलंकासि न हेतु हो निज ॥
अवश्य दे तूं भरतासि राज्य गे ! कां रामराया वनिं धाडिशी उगें ? ॥७॥
राज्या नसे रामहि कीं भुकेजला । विरक्त तो धर्मधुरीण साजला ॥
त्यजोनि गेहा गुरुपाशिं राहिला । तूं प्रार्थि भूपा वर गे ! दुजा अशा॥८॥
रुचे न तूंतें जर आमचें वच । लागेल ना हातिं तुझ्याहि कांहिंच ! ॥
असेल कीं हा परिहास गे ! तुझा । तसें खरें सांग; सुखी असो प्रजा ! ॥९॥
श्रीरामसा नंदन आणि त्या वन ! । म्हणेल तूंतें जग काय पेकुन ? ॥
वेगें उठीं काहिं करीं उपाय गे ! । जेणें तुझा शोक कलंकही निघे ! १०

शोक कलंकहि बयें न राही करिं तूं कांहीं; कुल गाळीं ।
निघतां तो वनिं घेचि ठेवुनी हट्टें कर नच दुसरें कीं ! ॥
रविविण दिन जणुं, असुविण जसि तनु, शशिविण ज्यापरि हो रजनी ।
त्यापरि तुलसीदासप्रभुविण होय अयोध्या गे ! राशि ! ” ॥ ११ ॥

असें सख्यांनीं उपदेशिलें तिला । वदोनि कल्याणनिधान सूक्तिला ॥
परंतु तें ऐकियलेंहि ना तिनें । त्या मंथरेच्या कुटिलोक्तिमूर्तिनें ! ॥१२॥
न उत्तरें ती मुळिं त्यासि देउनी । करुद्धा बघे त्या क्षुधिताच वाघिणी !
व्याधी असाध्या अशि जाणुनी तिची । त्या तैं तिचा सोडुनि देति नादचि ! १३
गेल्या तिथोनी मग त्याहि कामिनी । कीं ती अभागी मतिमंद जाणुनी ॥
'अत्युत्तमा राज्यसुखासि भोगितां । दुर्दैव कैसें हिस वेरि सर्वथा?' ॥१४॥
ऐशा विलापीं नगरांतले जन । कैकेयिला देति शिव्या निखंदुन ॥
संतप्त चित्तीं किति ते उसासती । रामाविना जीवनिं कोण आस ती ? १५
सारी प्रजा व्याकुल होउनी म्हणे । “ कैसा महादीर्घ वियोग साहणें ? ”
व्हावें तद्वकीं जल आटतां जसें । मीनादिकां, त्यांसहि तें असह्यसें ! १६
तैं स्त्रीनरां घोर सशोकता वरी । मातेकडे रामहि येइ तोंवरी ॥
प्रसन्नता शोभलि तन्मुखावरी । उत्साहही नांदत चौगुणां उरीं ! ॥१७॥
“ चिंता मिटे; ठेवुनि नैव वेइल । नृपाळ आतां मज शोकविह्वल ”
ऐशा विचारें रघुवीर हर्षित । आनंद त्याऱ्या हृदयांत वर्षत ॥ १८ ॥
श्रीरामचित्त जणु बालगजेन्द्रसेंच । ज्या राज्य वाटत खरोखर शृंखलाच ।

ती ही सुखेनि वनिं जाइन केधवां मी ? । हो हा प्रहर्षभर राघवचित्तधामीं

इति पुरलोकप्रियकैकेय्युपदेशवर्णनं नाम तृतीयस्तरङ्गः ॥

तरंग ४ था

रघुकुलतिलकानें जोडुनी दोनि हातां । पदयुग जननीचें वंदिलें नम्र माथां ॥
वदुनि सुभग आशीर्वाद माता तदा ती, । कवळुनि हृदिं घे ती त्या सती प्रेममूर्ति १
ओवाळुनी त्यजि तयावरुनी कितीक । ती वस्त्रभूषणतती जननी सुरेख ॥
चुंबी तरी कितिकदा मुख राघवाचें । रोमांच देह भरि, लोचनिं अश्रु सांचे ! ॥२॥
आलिंगि त्यासि फिरुनी बसवूनि अंकीं । प्रेमें पयोधर तिचे स्रवती भरें कीं ।
प्रेमप्रहर्ष कुणि पूर्ण तिचा वदावा ? । रंका कुबेरपदवी शुभलाभ तो, वा ! ॥३॥
ती आदरें निरखि सुंदर तन्मुखातें । माधुर्यपूर्ण वचनें वदली तदा ते ॥
" ओवाळिते तुजवरूनि मदीय जीवा । वत्सा ! कधीं मजसि उत्सव होय केव्हां ?
पुण्याइची सुखद शींव मदीय ऐशी । कीं जन्मलाभ परमावधिची घडीशी ! ॥
येणार मंगल मुहूर्त अशा कधीं तो ? ज्याची समग्र जन वाट मनीं पहातो ॥५॥
सोत्कण्ठ जाहलि मनें सकलां जनांचीं । स्वात्यंबुलाभिं जशि चातकचातकींचीं ॥
तृष्णार्त होउनि हृदीं शरदीं प्रतीक्षा । ते वृष्टिची करिति, जाणसि सारसाक्षा ! ६
जा मंगलस्नान करावया क्षणीं । ताता ! हवें तें मधु घेचि खाउनी ॥
पित्याकडे जाइ, उशीर होच न । मी तूज ओंवाळित आत्मजीवन " ! ७

तें आईचें वचन, हृदया पूर्ण जें आवडावें ।
कीं स्नेहाच्या अमरतरुचें पुष्प जैसें पडावे ॥
ज्याच्यामध्यें सुखमय मधु श्रीच उद्देश ज्याची ।
श्रीरामाच्या हृदयमधुपा भूलवीना कदाचि ॥८॥

जाणोनि धर्मपथ धर्मधुरीण राम । मातेसि बोलत वचें मृदु धर्मकाम ॥
" तातें दिलें मजसि काननराज्य आई ! । तेथें अवश्य मम कार्यमहत्त्व होई ९
आज्ञा मला जननि ! दे अति हृष्ट चित्तें । जेणें मिळेल मज मंगल हर्ष तेथें ॥
स्नेहें स्वचित्तिं नच भीतिसि ठाव देई । आशीर्वचें तव मला सुखदें वनींही ! १०
वर्षें वसोनी चवदा वनांत सत्या प्रतिज्ञा करुनी पित्याची ।
येईन गे ! पाय तुझे पहाया आई ! पुन्हां, दुःख करूं नकोचि! " ॥११॥
श्रीरामवाणी मधुरा विनीतही बाणापरी टोंचलि आइच्या उरीं ॥

ती शीतश्लोकी सुकवीन ऐकतां वृष्टी जवासा सुकतीत ज्यापरीं ! ॥१२॥
वर्णील कोण हृदिं हो तिज जो विषाद ? व्याली मृगीच जणुं ऐकुनि सिंहनाद ! ॥
डोळयांत अश्रु भरले, तनु कांपुं लागे, कीं आद्यवृष्टिजल-फेनिंच मीन भागे !
धैर्या धरोनि परि राममुखा बघे ती ! बोले सगद्गदरवें तनयासि उक्ति ॥
" प्राणापरीस पितया तव ठायिं तोष ! बाळा ! तुझें चरित त्या सुख दे विशेष ॥
रायें मुहूर्त धरला तव राज्यदाना ! कांतारिं पाठवि बघोनि कुण्यां चुकांना ?
आहे तरी कवण कारण सांग मातें बा ! कोण सूर्यकुल जाळितसे स्वहस्तें ?"॥१५॥
आणोनि राममन सांगत कारणातें । तीतें अमात्यसुत दुःखद जें जनां तें ॥
तें ऐकतांच जननी अशि मूक होत ! कीं तद्दशा करुण, ना वदवे यथार्थ १६

न कौसल्या रामा वजलि वदुं " बाळा ! गृहिं रहा " ।
" वना जा " ऐसेंही न वदत; भिई रामविरहा ! " ॥
उरीं दोंहीं रीतीं तिज अनल जाळी भयद कीं, ।
लिखायाचा भाळीं शशि, परि विधी राहुचि लिखी !! ॥ १७ ॥
विधात्याच्या लीला जगतिं सकला दुःखद अशा ।
तिला धर्मे स्नेहें मतिसि धरलें भिन्नचि दिशां ? ॥
चिचुन्द्री-सर्पाची अशिच गति झाली जुणुं तिची ।
कळेना कैसें या गतिंतुनि निघावें अचुकचि ? ॥ १८ ॥

घ्यावा जरी ठेवुनि राम तो घरीं । स्त्रीधर्म नासेल, दुही गृहीं भरी ॥
द्यावें वनीं लावुनि तों चुकीच ती । ऐशापरी संकटिं विह्वला सती ! ॥ १९ ॥
स्त्रीधर्म आणुनि मनीं परि ती शहाणी । रामा तसेंचि भरता समता गणोनी ॥
चारुस्वभाव सरला रघुनाथमाता । धैर्या धरूनि हृदिं बोललि शांतचित्ता २०
" केलेंसि बाळ ! अति उत्तम तूं खरेंचि । ओवाळिते तुजवरूनि तनूच साची
हा धर्म उत्तम असा गणतात संत । आदेश तातमुखिंचा करणें यथार्थ २१
'देईन राज्य' वदुनी, वन भूप देई । याचें न दुःखलवही मज चित्तिं होई
वत्सा ! तुझ्याविण परी भरता नृकान्ता । लोकांसही अमित होइल दुःख चिंता
आज्ञा करीत जर केवळ तात तूतें । जाऊं नको विपिनिं मानुनि जास्त मातें ॥
मातापिता उभयहि जर ते कथीती । साकेतकोटि गण तूं वसती वनान्तीं २३
होतील तात-जननी वनदेवदेवी । तेथें मृगें, खग तुझे पदपद्मसेवी ॥
अंतीं नृपास वनवासचि योग्य होत । पाहोनियां वय तुझें मन होत आर्त ! २४

वाटे सुभाग्य वन, ही नगरी करंटी । कीं जी रघूत्तम अशा तुज दूर लोटी ॥
सांगेन मी जर " तुझ्यासह मीहि येतें, । संदेह होइल तयें तवही मनातें ! २५
बाळा ! पवित्र परमप्रिय जो जगासी । सर्वस्व सर्वजनिं, जीवन जीवनासी ॥
तो तूं मला म्हणसि ' आइ ! वनांत जातों?' मी मात्र राहिन इथं हृदिं शोक होतो !
ऐशा विचारिं नच आग्रह दावि मीही । कीं स्नेह वाढवुनि ना फललाभ कांहीं ॥
नातें मनिं स्मरुनि मी जननी त्वदीया । मातें नकोचि विसरूं मम रामराया ! २७
सारेच देव पितर प्रभु पुण्यशील । नेत्रासि पापणि असे तुज रक्षितील ॥
अब्धी अगाध, अवधी वनवास दीर्घ । मीनापरी तळमळे प्रिय आप्तवर्ग !! २८
धर्मज्ञ तूंच करुणाकर योजना ही । चित्तीं विचारुनि करीं सदुपाय कांहीं ॥
जेणें जिवंत असुं तोंवरि तूज भेटूं । ओवाळुनी तुजवरूनि असूहि लोटूं ! २९
जाई सुखें वनिं, करूनि अनाथ सारे । लोकादिकां निजपुरींहि अशा प्रकारे
वाटे बुडालि सुकृतें सकलां जनांचीं । दावीत काल विपरीतचि रीति साची?"
ऐसा करीत बहु शोक, पदां धरीत । जाणोनि दैव अपुलें विपरीतरीत ॥
अत्यंत दारुण असह्य विलापताप । व्यापी तिचें उर, अवर्ण्यचि तो विलाप !॥ ३१
जेव्हां उठोनि कवळी जननीसि राम । तीतें प्रियोक्ति समजावि मनोभिराम ॥
तो त्याच वेळिं परिसोनि कुवृत्त, भीता । ये सासुपाशिं उठुनी अतिखिन्न सीता !
कौसल्येच्या वंदि पादाब्जयुग्मा । बैसे खालीं घालुनी शीर्ष रामा ॥
आशीर्वादां देत ती मंजुलोक्तीं । दीनेतें त्या देखुनी आर्त हो ती ॥ ३२ ॥
अधोमुखी चिंतनशील जानकी । प्रेमें पतीच्या अति जी पुनीत कीं ॥
सौंदर्यराशी म्हणते " वनाप्रति । पुण्यें कशी जाइन कांतसंगतीं ? ॥ ३३ ॥
प्राणांसवें जाउं शकेल का तनू ? । कीं केवल प्राणचि त्यासवें म्हणूं ? ॥
सदेह हा जीव किं, जीव एकला ? । कळे न कोणा विधिहेतु झांकला !" ४
निजचरणनखाग्रीं भूमितें ती विलेखी । मधुररव करीती नूपुरें तैं गमे कीं,
जणुं विनवणि केली प्रेमबद्धांतरांनीं । ' त्यज न कधि अम्हां गे !' यापरी नूपुरांनीं
रुचिरनयनमार्गीं लोटले वारिबिन्दु । वदलि वचन माता राघवा प्रेमसिंधु
" अतिशय सुकुमारी जानकी लाडकी हे । सकल वडिल लोकां प्राणशी वाटताहे
जनक जनक जीचा भूपति श्रेष्ठ ऐसा । रविकुलरवि जीचा सासरा थोर तैसा
रविकुलकुमुदांचा चंद्रमा तूंचि रामा ! । गुणनिधि पति जीचा होसि सौंदर्य…
प्रियतनयतनू ही रूपसौंदर्यराशि । विलसलि गुणशीलें जी अतुल्या पराशी ।

कापत तिजसि मी हे नेत्रिंच्या बाहुलीशी । उरावेन अमुही मी बद्ध सीतापदाशी
केलें लालन हें बिचें बहुविधां म्यां कल्पवल्लीपरी ।
स्नेहें रक्षियली निशिंचुनि जलें हत्प्रीतिचीं जीवरी ॥
होते पुष्पफलांसि योग्य जंव ती तों वैरि होई विधि ।
अंतीं या परिणाम होइल कसा जाणूं शकेनाच धी ! ॥ ४० ॥

[म्यां पाळिली जी जणु कल्पवल्लरी । शिंचोनियां स्नेहजलें तियेवरी
फुलांफलां ये तंव दैव हें रुसे ? । कळे न अंतीं परिणाम कायसे !! ॥ ४० ॥]
जी जायची पीठिं, पलंग सोडुनी । दोल्यावरी मांडिवरूनि नंदिनी ॥
कठोर भूला पदिंही न लागली । म्यां वातही शारं तिला नसे दिली ! ॥ ४१ ॥
मी प्राणसंजीवनशी जपें तिला । ' जातें वनीं ' ती म्हणते सुकोमला ॥
तुझ्यासवें हे रघुवंशसत्तमा ! । आज्ञा तिला दे तव रे ! मनोरमा ! ॥ ४२ ॥
जी चंद्रिकेची रसिका चकोरिका । चंद्रांशुविंना कधुं ती शकेल का ।
वनांतरींचीं अतिघोर संकटें । कीं चिंतुनीही उर केविं ना फुटे ? ॥ ४३ ॥
शार्दूल, मत्तगज, राक्षस, दुष्टजीव । संचारती विपिनिं घोरतमीं अतीव ॥
संजीवनी मृदुल केविं मुळी जगे ती । जी लाविली प्रखरशा विषवाटिकान्तीं ॥ ४४ ॥
निर्मी विरंचि वनिं योग्य रहावयाला । कोळी किरात युवती सुखिं ज्या अलोला
ज्या वाटती कृमिशिलाकठिना स्वभावें । न क्लेश त्यांसि वनिं; त्याहिंवनीं रिघावें !
योग्या तपस्विमहिला विपिनीं निवासा । किंवा तपोऽर्थ सुखभोग जयां नकोसा ॥
रामा ! वनांत वसती कशि योग्य सीते । जी चित्रिल्याहि वनप्रण्यास भिते कपीतें ! ४६
जी योग्य मानससरीं कमलीं रमाया । ती केविं राहि डबक्यामधिं हंसजाया ? ॥
ऐसा विचार करुनी म्हणशील तू जें । सीतेसि मी कथिन तें समया विराजे" ॥ ४७ ॥
माता म्हणे " जर घरीं मम राहि सीता । आधार थोर मम होइल तोच चित्ता"
तें आइचें वचन गोड सुधाच जैसी । स्नेहार्द्रशीलमय वाटलि राघवासी ॥ ४८ ॥
मातमही प्रिय वदे सुविवेकशाली । श्रीराम, जें परिसुनी मनिं तीहि धाली ॥
तो जानकीसि मग बोधुनियां निवेदी । जे काननांत गुणदोष; विशिष्ट आधि

॥ इति श्रीकौसल्याविरहवर्णनं नाम चतुर्थस्तरङ्गः ॥

तरंग ५ वा

मातसमीप वदण्या दयितेसि, राम । लाजे परी वदत जाणुनि योग्य याम ॥

"गे ! ऐक राजतनये । मम वाक्यसार । ना आण किंचित दयिते! भलता विचार
तूं इच्छिसी निज मनें ममही जरी गे ! राहीं घरींच; तुज मी हित तेंचि सांगें
सेवा कराविस तुवां निज सासवांची । आज्ञा तुला कथितसें मम हीच साची !
सद्गीच भामिनि ! हितें सकलप्रकारीं ! सद्धर्म हाच तुज होइल भव्यकारी ।।
श्वश्रू तसे श्वशुर यां भजणें सुभावीं । याहून धर्म न दुजा जगतांत देवि ! ३
जेव्हां जेव्हां स्मरुनि मजला आठवीतील माता ।
मत्प्रेमानें हृदय भरुनी चित्तिं होतील आर्ता ।।
तेव्हा तेव्हां कथन करुनी सत्कथा त्यां पुराणी ।
त्यांच्या चित्ता समजवित जा बोलुनी गोड वाणी ! ।।४।।
सांगें मीही शपथ शतदा घेउनी सत्यगोष्टी ।
ठेवीतों हें तुजसि सदनीं मीहि आईचसाठीं ।।
सद्धर्माचे श्रुतिगुरुमतें सार तें लीलया घे
हट्टें काहीं पतन नहुषा, गालवा ये प्रसंगें ।। ५ ।।
करुनियां सार्थक तातवाणी । येईन गेहा झणि मी फिरूनी ।।
हें ध्यानिं घे सुंदरि ! तूं शहाणी । काला न लागे उशिर प्रयाणी ! ।।६।।
मी सांगतों ते मनिं मान सीते ! । न हट्ट कांहीं धर मानसीं ते ।।
प्रेमामुळें मद्वच नायकोनी । येशी वनीं; तो परिणामिं हानि !! ।। ७ ।।
अरण्य भारी कठिनात्म भीषण । अत्युष्णता ,शैत्य, जलें, समीरण ।।
वाटेंत कांटे, गवतें, शिला, कडे, । तें चालणेंही अनवाणि गे ! पडे ! ।। ८ ।।
तुझीं पदाब्जें सुकुमार साजरीं । अगम्य वाटा खडकाळ डोंगरी ।।
नाले, नद्या, ते नद, खोरिं कंदर ।अगाध; ना देखवती हि दुस्तर ।। ९ ।।
ते व्याघ्रसिंहादिक, भालु, लांडगे । ज्याचे ध्वनी ऐकुनि धैर्य ना तगे ।।
भूमीच शय्या, वसनास वल्कलें । खाणें पडे कंदमुळे, क्वचित् फलें ।।१०।।
न लाभ त्यांचाहि सदैव निश्चित । दैवानुकूल्यें वनिं तेंहि लाभत ।।
संचारती राक्षस मानवाशन । अनेकवेषी, गणवेहि ज्यासि न ! ।। ११ ।।
पाणी कुठें डोंगरि जीवघातक । अरण्यविघ्नें किति वर्णु आणिक ! ।।
कराल ते व्याल, विहंग दारुण । नारीनरां चोखते राक्षसी गण ! ।। १२ ।।
स्मृती तयांची पळवीत धीरता । मृगाक्षि ! तूं भीरुच कीं स्वभावतां ।।
वनीं अयोग्या अधि हंसगामिनी । नेतां तुला सद्यश राहि कोठुनी ! ।।१३।।

की मानसींच्या सलिलामृतें जगे । हंसी अशी क्षारसमुद्रिं राहि गे ?
की रंगली आम्रवनांत कोकिला । साजेल ती कंटकिं काय कोमला ? १४
विचार ऐसा करुनी मनामधीं । सोडूनि दे काननकांक्षिणी सधी ॥
चंद्रानने ! सुंदरि! जानकि ! प्रिये ! अरण्यदुःखांबधि जाणतां न ये ! ॥१५॥
घेवोनि सादर शिरीं उपदिष्ट साचें । जो नायके वच सुहृद्गुरुनाथ यांचें ॥
त्यातें पुढें कळुनि येइ चुकी स्वकीय । होवोनि हानि मग दुःख करी अमेय!"
॥इति श्रीरामोत्तरं–श्रीजानकीप्रतिवर्णनं नाम पंचमस्तरङ्गः॥

तरंग ६ वा

ऐकोनि मंजुतम सुंदर तें प्रियाचें । सीताविलोल नयनांबुजिं अश्रु साचे ! ।
त्या शीतलोक्ति परि दाह करीति सीते । कीं शारदेंदु निशिं चक्रखगांगनेतें १
झाली अतीव हृदिं दुःखित जानकी ती । कीं नाथ टाकिल मला प्रभु पुण्यमूर्ति
ना बोलवे तिज, परी निज अश्रु वारी । धैर्या धरी उरिं मनोज्ञ धराकुमारी २
श्वश्रूपदिं नमुनि जोडुनि हात बोले । "देवि ! क्षमा; अविनयि क्षण चित्त झालें ।।
केला मला सदुपदेशचि जीवितेशें । माझें अतीव हित यांत वसे विशेषें ॥३॥
मी जों विचारुनि पुन्हां बघतें मनांत । वाटे वियोग पतिचा जगिं दुःख मूर्त ॥
नाहींच दुःख दुसरें जगिं त्यासमान । कारुण्यसागर ! करा विनतीस मान॥४॥
हे प्राणनाथ ! करुणायतना ! सुजाणा । हे सुंदरा ! सुखकरा मनिं हेंचि आणा ॥
हे भानुवंशकुमुदेन्दुनिभा त्रिलोका । तुम्हांविना नरक मानिन इंद्रलोका ॥५॥
माता पिता बहिण भाउ सखे सुखाचे । सारे असे दयित जे परिवार साचे ॥
श्वश्रू तसे श्वशुर साधु गुरु प्रसिद्ध । अत्यंत आवडि जयीं सुत ते विशुद्ध ६
सारेच सौख्यद परी पतिच्या अभावीं । नातेंहि विस्मरति, रीति जगीं पहावी !
जीतें नसे पति अशा अबला स्त्रियेतें । होतात तापद समस्त रवीचसे ते!! ७
जीतें नसे पति अशीस तनूधनादि । गेहें पुरें धरणि होति मनासि, आधि ॥
होतात रोगसम भोग, नगादि भार । संसार सर्व यमयातन दुःखपूर ! ॥८॥
प्राणप्रिया ! जगतिं सौख्य तुम्हां बिना न । कोठेंचि तें मजसि अल्पहि ज्या प्रमाण ॥
जीवाविना तनु, जलाविन कीं नदी ती । तैशीच नाथ ! पतिवांचुनि दारमूर्ति ॥९॥
तुम्हांकडेचि सगळी मम सौख्यधारा । त्वच्छारदेन्दुवदना बघतां उदारा !
स्वर्गंगतील मृगपक्षि गणीन आप्त । कांतारही नगरसेंचि म्हणेन मूर्त ॥१०॥

तीं वल्कलेंहि मज होतिल हो ! दुकूलें ।। स्वर्गीय सौख्य जणु पर्णकुटींत आलें ॥
श्वशुर तसे श्वश्रु ते वनदेव–देवी । आनन्द सन्मति यकील तयांस तेवीं ।। ११ ॥
वाटेल अंथरुण तें कुशपल्लवांचें । शय्येपरी मृदुल जेविं मनोभवाचें !
तें कंद मूल फल भोजन कीं सुधाच । साकेतसौधशत सौख्यद अद्रि तेच !।। १२ ।।
मी त्या क्षणोक्षणिं पदाब्जयुगा बघोन । कीं चक्रवाकयुवती रविदीप्ति पूर्ण ।।
होईन मी मुदित अंतरिं दीननाथा ! । कां काननांतिल असौख्यभरा पहातां ? १३
जी वर्णिली विपिनिंची तुम्हि दुःखपंक्ति । चित्तास शोक, परिताप अनन्त भीति ।।
तें सर्व दुःख गणुनीहि सुसह्य वाटे । तुम्हां विना क्षणहि जीवन, दुःख मोठें ! १४
सर्वज्ञ हे प्रभुवरा ! करुणांबुराशि जाणोनि हें मजसि ध्याचि सवें वनासी ।।
मी प्रार्थना कशि करावि तुम्हासि आतां ? जी जाणतां सकलही हृदयाधिनाथा ! १५
साकेतिं याल तंवरी जर भी जगेन । ऐसे गमे जर तुम्हां तर जा निघून ! ।।
हे सुंदरा ! प्रभुवरा ! प्रणतार्तबंधो ! हे सौख्यदायि दयिता ! गुणशीलसिंधो ! १६

क्षणक्षणिं पदांबुजें निरखुनी अशीं आपलीं ।
अरण्यि पथ चालतां कधिं न होय मी तापली ।।
अनेकपरिं सेवुनि प्रियतमा ! तुम्हां भावतां ।
प्रवासि दवडीन मी शिणहि आपला सर्वथा ! ।। १७ ।।
बसोनि तरुच्या तळीं चरण आपुले क्षाळिन ।
अति प्रमुदितें मनें पवन आपणा ढाळिन ! ।।
सुनील तनु आपुली श्रमजलांकिता पाहतां ।
तुम्ही मजसि देखतां, मज शिवेल कैशी व्यथा ? ।। १८ ।।

करोनियां मी अवनीप्रती सम । तियेवरी अंथरुनी मृदूत्तम ।।
तृणादि वा पल्लव कोंवळे अती । चुरीन रात्रीं तुमच्या पदांप्रती ।। १९ ।।
घडोघडीं कोमलमूर्ति साजरी । बघेन मी सेवनिं आपली जरी ।।
दासीस लागेल न या कधीं उन । किंवा न वाराहि कदापि दारुण ! ।। २० ।।
असेन मी जों प्रभुसंगतीमधीं । बघेल मातें न कुणीच दुष्टधी ।।
न सिंहिणीतें निरखूं शके जसा । वनामधें क्षुद्रशृगाल वा ससा ! ।। २१ ।।
मी कोंवळी, आपण कां वनोचित ? । मी सौख्यभोगा तुम्हि का तपःस्थित ? ।।
ऐकोनिही निष्ठुर बोल आपले । न ऊर माझें लवही दुभंगलें ! ।। २२ ।।
गमे तुम्हां कीं प्रभुच्या वियोगही । साहील माझी कुडि नीचशील ही ! ”

वदोनि ऐसें अति आर्त जाहली। 'वियोग' शब्दाहि न साहि मैथिली! २३
पाहोनि ती स्थिति तिची रघुराय चिंती। कीं ठेवितां हिस न ठेविल जीवही ती ॥
बोले रघूत्तम "करीं नच शोक मार्ये! तूं येइं गे! मजसवें विपिनास आर्ये! २४
ना तूं विषाद लवही हृदयांत ठेवीं। याया वनासि झणि सज्जचि होइं देवि!"
बोलोनि या प्रियवचा समजावि कांते। वंदूनि मातृपदिं आशिस घे स्वतांतें
माता वदे "त्वरित ये; जनदुःख नाशीं। ना आइतें विसरु तूं मज निष्ठुरेसी
माझी फिरेल कधि का कुदशा फिरूनी। ही रम्य जोडि निरखीन किं लोचनांनीं
ये लाडक्या! सुदिन सुक्षण तो कदा मी जेव्हां मुखेन्दु तव पाहिन याच जन्मीं?"
संबोधि आठवुनि ती वचनीं किती या। "हे वत्स! हे रघुपते! प्रिय रामराया!"
"तुम्हांसि बोलावुनि सादर आत्मवक्षीं। प्रेमें धरून कवळून दृढ प्रहर्षीं ॥
केव्हां बरें बघिन मी निज डोळिशांनीं। या प्रेममूर्ति तुमच्या अतिरम्य दोनी!"
वचन मुखिं निघेना व्याकुळा होय माता। निरखुनि जननी तें त्यापरी विह्वलार्ता
समजवि तिज तेव्हां राम नाना परींनीं। करुण हृदयपूरा त्यांचिया कोण वर्णी?
नमुनि जनकजा तैं सासुपायीं वदे हें। "जननि! खचित वाटे मी अभागीच आहें
जंवर समय दैवीं येत सेवा कराया। तंवर विपिनिं जात्यें, होउनी हेतु वाया!
मजवरि न करावा रोष हो! त्याजसाठीं। सतत मजसि लाभो आपुली लोभदृष्टि
खचित कुटिल माझें कर्म जन्मान्तरींचें!। लवहि न मम येथें भासती दोष साचे"
सीतावचा ऐकुनि होइ आकुला। सासू, न ये वर्णनही तिचें मला! ॥
घेऊनि सीतेसि पुनःपुन्हा उरीं। धरूनि धीरा शुभ आशि दे खरी॥ ३२॥
करी तिला ती उपदेश ही किती। आशीर्वचे हीं तिजलागिं देत ती
"सौभाग्य नांदो तव गे! अनन्तसें। त्रैलोक्यिं गंगायमुनाप्रवाहसें!!" ३३
कौसल्या दे यापरी योग्य आशी। नाना रीतीं गौरवोनी निदेशीं ॥
वारंवार प्रीतिभावें नमोनी। सासूतेंही; जाय सीता तिथोनी ॥ ३४ ॥
इति श्रीरामचरितमानसानुवादकाव्ये सकलकलिकलुषविध्वंसने अयोध्याकाण्डे श्वश्रूसकाशात्सीताया विसर्जनं नाम षष्ठस्तरङ्गः ॥

तरंग ७ वा

घडकलें श्रवणीं जंव वृत्त तें। विकळ होउनि लक्ष्मण ये तिथें ॥
हरपली क्षणिं तद्वदनच्छवी। पुलकित स्थिति तत्तनु कांपवी ॥ १ ॥

रुपुनि धीर, त्रिलोचनिं नीर ये । कवळि रामपदां भरला भयें ॥
नच तया वदवे, नुसता बघे । सलिलमीनचि बाहिर तो निघे ! ॥ २ ॥
व्यथित दीन मनें भवितव्यता । हृदयिं चिंतित तो पथ कोणता !
सुकृत सौख्य मदीय समापतसें । रघुपती मज सांगिल कायसें ? ॥ ३ ॥
भवनिं ठेवुनियां मज तो वनीं। निघुनि जाइल कीं मज घेउनी ? ॥
बघत राम तशा दयिता अति । कर जुडून उभ्या अनुजाप्रति ॥ ४ ॥
तृण तसें तनु गेहहि तोडल्या । वदत राम तशा अनुजास त्या ॥
रघुपती नयसागर नागर । सरलचित्त सुखाब्धि दयाकर ॥ ५ ॥
सकळशीलनिधान वदे वच । " हृदयिं लक्ष्मण रे ! भय घे नच ! ॥
खचित हो परिणाम सुखावह । गणुनि हें धृतिनें सगळें सह ॥ ६ ॥
माता पिता गुरु धनी इतुक्या जनांचें । जो मानितो वचन सादरचित्त साचें ॥
तेणेंचि धन्य जगतीं निजजन्म केला । नाहीं तरी जगिं निरर्थक तो जहाला ७
हें जाणुनी वचन तूं मम ऐक बंधो ! मातापित्यांसि सुखवीं गुणरत्नसिंधो !
गेहीं नसे भरत, ना रिपुनाशकारी । वार्द्धक्यि तात, हृदिं दुःखहि त्यास भारी
नेईन मी जर सवें तुजही वनासी । साकेत होउनि अनाथ रिघेल नाशीं ॥
मातापिता गुरुजनादि समस्त लोकां । होईल लोटुनि दिलें अति दुःखि ना का ?
तूं राहुनी करिं सुखी निज सर्व लोक । नाहीं तरी अमित दोष घडेल देख ॥
ज्याची प्रजा तळमळे अति दुःखवेगें । त्या भूपतीस नरकीं पडणेंच लागे ! ॥
यासाठि गेहिंच रहा करुनी विचार" । तें वाक्य लक्ष्मणमना दुखवी अपार ॥
त्या शीतलेंहि वचने मन शुष्क केलें । स्पर्शेंहि जेविं हिम पद्म करी सुकेलें ११
तो प्रेमविक्लव वदूं न शकेचि उक्ति । श्रीरामपादयुगला कवळी सभक्ति ॥
उद्गारि " नाथ तुम्हि; मी तुमचाच दास । टाकाल हो ! तर कुठें वसुं वा कशास ?
जें सांगतां मजसि नाथ ! असे खरें तें । वाटे अशक्य करणें अधृतीस मातें
जे धैर्यशील अतिधर्मधुरीण मोठे । त्यांनाचि नीति कथिली तुम्हि, योग्य वाटे
मी लेंकरूं तुमचिया बळिं पोसलेलें । मंदारमेरुसि कसें वहणें मरालें ? ॥
मी ओळखीं न मुळिंही गुरु-तात-माता । माझा स्वभावचि तुम्हां कथिला जि नाथा!
ज्यासाठिं लोकिं गणिलीं गणगोतनातीं । संसारिचीं निगमिं वर्णित वा किती तीं
तीं सर्व होति मम एक तुम्हांत नाथा ! । हे दीनबंधु हृदयान्तरिंच्या वसन्ता ! १५
ज्यां आवडी सुगति-कीर्ति-धनादिकांची । त्यां धर्मनीति कथणें अति योग्य होचि ॥

वाक्चित्तदेहिं म तुम्हांविण अन्य ज्यांसी। त्या त्यागणें उचित केविं दयांबुराशी!"
नम्रत्वशालि निजबंधुवचें मृदूशीं। तीं आयकोनि कवळी उरिं राम त्याशी॥
त्या सांगुनी समजवीत किती प्रकारीं। जाणोनि तद्हृदयींची गुरुभक्ति सारी१७
श्रीराम सांगति "गड्या! क्षणिं जाइं माते। घेउनि ये शुभ निरोप तिचा वनातें"॥
ऐकेनि ती रघुवरोक्ति अतीव तोषे। होतां सुलाभ, टळुनी अति हानि जैसें १८
तो हृष्टचित्त जननीजवळींच येत। अंधासि लाभलि जणों नयनें सुकांत!॥
लावीत मस्तक क्षणीं जननीपदासी। तद्देह तेथ परि अंतर रामवासी!॥१९॥
त्या म्लानचित्त तनया बघुनी सुमित्रा। 'हे लक्ष्मणा! कथिं मला सगळें सुपुत्रा!'
ऐसें पुसे; वदत तो तिज वृत्त सारें। जेणें दवावृत मृगी तशि ती थरारे!॥२०॥
तैं लक्ष्मणास गमला नव तो अनर्थ!। गुतून ठेविल मला ममता घरांत!
रामासवें मजसि देइल नैव जाया। या भीतिनें घजत तो न निरोप घ्याया!

सीतारामगुण स्वरूपहृदयीं आणी सुमित्रा तदा।
त्यांचा सुंदर तो स्वभाव, नृपतिप्रीती महा संपदा॥
राशी होउन शोकविह्वल निजा शीर्षासि ती हालवी।
बोले "पापिणि! साधिलास किं उभा दावा कसा गे! भवीं!"२२

धरोनी धैर्यातें अवसरहि जाणोनि कठिन।
सुमित्रा तैं बोले सरल मृदुल स्वादुवचन॥
"तुझी माता बाळा! समज मनिं सीता सहृदय।
तसे मानीं रामा सकलपरिंनीं तात सदय!"॥ २३॥

अयोध्या ती सत्या समज, जिकडे रामवसति।
दिनाची तैं ख्याती तळपत जिथें की दिनपति॥
वनामध्यें जाती जर खचित सीतारघुपती।
अयोध्येमध्यें या लवहि तव कार्येंचि नसती!॥ २४॥

तया रामा जे जे प्रिय परम ते ते तुजहि रे!।
जणों रामाऐसें समज मनिं अत्यादरभरें॥
असा चित्तीं वत्सा! करुनि बरवा निग्रह, निघें।
वना तूं त्यासंगें, निजजनि कृतार्था करुनि घे!॥ २५॥

तव मनिं जर रामप्रीति अन्याज आहे। जर तव मति रामीं रंगली नित्य राहे

तर तुजवरुनी मी जीव ओवाळितें ही। तव ममहि सुभाग्या नाहिं सीमा कदाही!

इति श्रीरामवनगमनाय लक्ष्मणस्य मातरंप्रति आज्ञायाचनं नाम सप्तमस्तरङ्गः॥

तरंग ८ वा

हो तीच मात्र युवती जगिं पुत्रवंत। आला कुशीस जिचिया सुत रामभक्त!॥

हो, ना तरी, भलिच वांझ; फुका विणे तें। हानीच रामविमुखें तनयें तियेतें

भाग्यें तुझ्याच गमतें वनिं जाइ राम। आहे तुजं कवण त्यास वनांत काम?

वाटे महत्फल असे सुकृतास हेंचि। प्रीती जडावि हृदिं राघवजानकींची॥२॥

तूं प्रीति रोष मद कामविमोह यांस। स्वप्नांतरींहि निज पाश करूं नयेस॥

सर्व प्रकारिं विकृति त्यजुनी करावी। सेवा तुवां रघुवरा तनुवाक्स्वभावीं ३

मातापित्यांपरि जयासह रामसीता। त्या तूंस हो वनिं परोपरिं सौख्य चित्ता॥

जेणेंकरून वनिं ताप न होय रामा। ऐसेंचि वाग, उपदेशिन सौख्यधामा! ४

शीक हेंचि तव गमनिं जानकीराम सुखी मनिं वनिं व्हावे।
मातापितयां प्रियपरिवारा, पुरा सुखस्मृति विसरावे"॥
तुलसि कथी, ती सुताशि शिकवी आशी देई पुनःपुन्हां।
"आवडि वाढो नित्य नवी दृढ रामजानकीशुभचरणां"॥ ५॥
वंदोनी जननीपदांशि विनयें, तो ये क्षणीं मागुतीं।
आशंकी मन केविं सोडि जननी जाया अरण्याप्रती॥
वाटे दैवबळें भयंकर असे जाळें तुटोनी पळे।
एकादा मृगसाच तो! प्रभुपदा येवोनियां आकळे!॥ ६॥

॥इति श्रीरामआज्ञासुमित्रादेश लक्ष्मणवनगमनसमीपवर्णनं नामाष्टमस्तरङ्गः॥

तरंग ९ वा

श्रीरामसंग मिळतां मन लक्ष्मणाचें। होवोनि हर्ष-परिपूर्ण सुखांत नाचे॥

सीतारघूत्तमपदां नमि लीनचित्तें। ये तो तयासहित भूपतिमंदिरातें॥ १॥

तेव्हां अयोध्येतिल पौर सर्वही। परस्परांतें घटना कथीति ही॥

"कैसी विधीनें शुभमंगलक्षणीं। केली विचित्रा भवदा उभारणी!"॥२॥

तनू कृशा म्लानमुखें विषण्णलीं। पोळ्याहुनी हांकिलि मक्षिकावली!॥

चोळीति हातां पिटिती स्वमस्तकें। तुटोनि पंखें खग दीनसे निके!॥ ३॥

असंख्य लोटे जन भूपमंदिरीं। आक्रोश त्यांचा नच वर्ण्य वैखरी॥

सुमंत भूपा उठवूनि बैसवी! 'श्रीराम ये' हें हळु त्या निवेदवी॥ ४॥

सीतेसवें दोनहि पुत्र पाहुनी । अत्यंत दुःखाकुल भूप हो मनीं ॥
पुन्हां पुन्हां स्नेहभरें तयांप्रती । लावी उरी त्यां कवळूनि भूपति ॥ ५ ॥
बोलूं शकेना नरनाथ विह्वल । जाळी तया शोक भयंकरानल ॥
उठोनि तैं प्रीतिभरें नमूनियां । मागे तया राम निरोप जावया ॥ ६ ॥
"ताता ! मला द्या जि ! निरोप आवडीं । आशीर्वचांहीं सुखवोनि तांतडीं
हर्षक्षणीं केविं विलाप हा असा ? प्रमाद मोहो नच आजि मानसा ॥ ७ ॥
लोपोनियां सद्यश लोक ना हंसो ! । जगांत सत्कीर्ति सदा अम्हां असो !
ऐकोनि तें स्नेहभरें उठोनियां । धरोनि रामा नृप बैसवी तया ॥ ८ ॥
बोले "अहा राम ! मुनीश्वरीं तुला । चराचरांचा अधिनाथ वानिला ॥
शुभाशुभा कर्मसमुच्चयाप्रति । योग्यें फलें देत असे जगत्पति ॥ ९ ॥
करीत जो कर्म, तयास तें फल । नीति श्रुती ही कथिली विनिर्मल ॥
एकापराधें दुसऱ्यास दंड हा । विचित्र हे ईशगती कशी पहा ! ॥ १० ॥
लीला प्रभूची कवणा कळूं शके ? " । असें किती बोलत राय तें निकें ॥
परोपरींनीं कथुनी बघे तया । रामासि गेहांतचि राहवावया ॥ ११ ॥
श्रीराम सुज्ञवर, धर्मधुरीण धीर । त्याचा सुनिश्चय नृपा कळतां समग्र ॥
सीतेसि तैं उचलुनी कवळूनि पोटीं । सांगे परोपरिं तिला नृप वाक्यकोटी !
दुःखें तिला कथियलीं वनिंचीं समस्त । माहेर-सासर-सुखें कथिलीं अनन्त !
सीतामना परि रघूत्तमपादलीना । गेहीं सुखासि, वनिं आर्तिहि वाटली ना !
सांगोनि पाहति तिला जन अन्यही ते । पाडूं पहाति समजूत तिची स्वचित्तें ॥
आपत्ति सर्व कथिती वनिंच्या तियेला । साऱ्या स्त्रिया सुमति, सद्गति धर्मशीला
आत्मा वसिष्ठमहिला सचिवांगनादि । स्नेहें तियेसि कथिती किति गोड शब्दीं
"सीते ! नसे तुज दिला वनवास कोणीं । तूं एक जें कथियलें श्वशुरादिकांनीं"
ती शांत शीतल हितप्रद गोड वाणी । सीतेसि ना रुचलि बोलति त्या स्त्रियांनीं
ज्योत्स्ना शरच्छशिभवा मधुरा जरी कीं । तीमाजिंही तळमळे कशि चक्रवाकी !
॥ इति श्रीराम० समष्टिविरहविषादवर्णनं नामनवमस्तरङ्गः ॥

तरंग १० वा

संकोचोनी मनिं लव कांहिंच उत्तर न देत जों सीता ॥
कैकेयी तों उठुनी आणित वनवासि वस्तु ज्या उचिता ! ॥ १ ॥

मुनियोग्य वल्कलांतें भस्मातें आणि ती कमंडलुतें ॥
ठेवुनि समोर त्यांच्या बोले केवल रवेंचि मृदुलें तें ! ॥ २ ॥
" हे रघुवीरा ! तुम्ही प्राणप्रिय भूपतीस वाटतसां ॥
यास्तव शीलस्नेहां तुमच्या त्यांना न टाकवे सहसा ॥ ३ ॥
निजसुकृत सुयश, उत्तम लोक जरी जाइले सकलष्ट ॥
तरि ' तुम्हीं वनिं जावें ' ऐसें कधिं नृपमुखें न ये स्पष्ट ! ॥ ४ ॥
म्हणुनि तुम्ही निजमानसिं करुनि विचारासि योग्य तेंचि करा ! "
जननीच्या यां वचनें सुख झालें राघवा सुनीति–करा ॥ ५ ॥
परि हें कैकेयीवच शरसम भूपाचिया हृदीं शिरलें ॥
तो हो मूर्च्छित कीं हे दुर्भागी प्राण कां अजुनि उरले ! ॥ ६ ॥
जनता सर्व विकल हो झाला मूर्च्छित नराधिपति साच ॥
काय करावें हें त्यां कोणासहि कांहिंही कळेनाच ! ॥ ७ ॥
त्वरितचि मुनिवेषातें लेई रघुराय योग्य वनवासा ।
नमुनी दशरथराया जननीतेंही नमीत नतशीर्षा ॥ ८ ॥
केले लक्ष्मणमैथिलींसह तयें आरण्यदीक्षाविधि ।
वदी तो गुरुविप्रपूज्यचरणा श्रीराम पुण्यावधि ॥
जाऊं लागत काननार्थ बघतां ऐशा प्रभूतें जन ॥
झालें दुःखित अंतरीं करपलें शोकाग्निनें तन्मन ॥ ९ ॥
तदा जातां थांबे रघुवर वसिष्ठांगणिं लव ! ।
बघे लोकां साऱ्यां निज विरह जाळी जणुं दव ! ॥
समस्तांना बोले प्रियवचन सांत्वी, समजवी
निमंत्री मित्रां दे गुरुकथित दानेंहि बरवीं ॥ १० ॥
वर्षासनें द्विजजनां दिधलीं किती तीं । अत्यंत सादरमनें विनयें सुरीतीं ॥
तो दानमानिं बहु तोषवि याचकांसी । प्रेमें स्वमित्रवर तो सुखवोनि पोषी ॥ ११ ॥
बोलावि सर्वहि पुन्हां निजदासदासी । बद्धांजली गुरुकरीं निरवी तयांसी ॥
बोले " विभो ! शरण या सकलां तुम्हीच । मातापित्यांपरि तुम्हीच तयांसि साच ! "
जोडोनि पाणियुगपद्म पुनःपुन्हां ते । प्रार्थीत राम सकलांसि विनीत चित्तें ॥
" होईल तोच मजला सुखभव्यदाता । देईल जो दुख अतीव नृपालचित्ता ॥ १२ ॥
जेणें मदीयजननी विरहार्तदीना । होतीच नैव कधिंही अतिदुःखमग्ना ॥

ऐसा उपाय तुम्हि सज्जन हो ! करावा । जो होय अंतरिं तुम्हां चतुरांसि ठावा" १४
ऐशा प्रकारिं समजावुनि लोकचित्तां । लावोनि सद्गुरुपदांबुजिं नम्र माथा ॥
गौरीमहेश गणराज मनीं स्मरोनी । आशीसि घेत विभु जात वना निघोनी १५
श्रीराम जात असतां, अति शोक होय । लोकार्तिदीनरव ऐकवला न जाय ! ॥
साकेति हें; कुशकुनीं भयभीत लंका । आनंद शोकहि तसा भरि देवलोका ! १६

सरोनी मूर्च्छा ये नृपदशरथा जाग इकडे ।
सुमन्त्रा बोलावी, वदत वच त्यातें नृप पुढें ॥
" वना जातो राम प्रिय मम परि प्राण न निघे !
कशाच्या आशेनें सुख अजुनि जीवास मिळे !! ॥ १७ ॥
व्यथा याच्याहूनी कवण अधिका दुःखद अशी ।
जिच्या योगें प्राण त्यजित तनुनें हे झटदिशीं ! " ॥
परी तो धैर्यातें धरुनि हृदयीं भूप वदला ।
" सुमंता ! तूं जा रे ! रथसहित रामासह भला !! ॥ १८ ॥

माझे सुचारु, सुकुमार कुमार दोन । तैशीच ती जनकजा सुकुमार पूर्ण ॥
याना रथीं बसवुनी फिरवूनि आण । दावोनि चार दिनमात्र अरण्य रान !! १९
ते धीर वीरवर राघव सत्यप्रतिज्ञ । दोघे गृहा जर न येतिल बंधुरत्न ॥
तू प्रार्थि त्यांसि कर जोडुनि नम्र भावें । कीं ' जानकीस तरि लावुनि गेहिं द्यावें ! '
जै केधवां वन बघून भिईल सीता । तेव्हां निरोप मम सांग; बळीव चित्ता ॥
" सागू तसे श्वशुर हे तुज सांगतात । बाळे ! घरीं परत; आर्ति वनीं अनंत !
राहीं कधीं पितृगृहीं, कधिं सासरीं तूं । वाटेल तेथ वस, जा न वनीं परंतु !"
ऐशा अनेक परिनीं करुनी उपायां । येईल ती तरिच शक्य मला जगाया ! २२
हें ना तरी मरण निश्चित हो मदीय ! होतांच दैव उलटें, न चले उपाय ।
सीता तसे मजसि लक्ष्मण राम दाव "। ऐसें वदोनि क्षणिं मूर्च्छित होय राव!
होतांच तो नृपनिदेश लवूनि माथां । घेई सुमंत रथ जोडुनि शीघ्र जाता ॥
बाहेर ये नगरिच्या क्षणिं जेथ होती । श्रीरामलक्ष्मणसवें जनकात्मजा ती २४
तेव्हां तयां कथि सुमंत, नृपोक्त सारें । त्यां बैसवीत विनयें रथिं सत्प्रकारें ॥
सीतेसवें उभय ते बसतां रथांत । वंदीति आत्मनगरीसि मनीं विनीत ॥२५॥
जातांच राम दिसली नगरी अनाथा । सारी प्रजा निघत त्यासह आर्तचित्ता ॥
लोकांसि राम समजावि दयांबुराशि । ते जाति, भक्तिवश येति फिरोनि त्याशी ! २६

दिसे अयोध्या नगरी भयानका । ती काळरात्री अति कृष्ण मानु का ?
पशू जसे हिंस्र तसेच पौर ते । परस्परां पाहुनि भीति धारिते ॥ २७ ॥
गेहें स्मशानपरि, लोक समस्त भूतें । आप्तेष्टमित्र सुत कीं यमदूतसे ते !
कोमेजलीं तरुलतोपवनें पुरीचीं । वापी तडाग सरिदोघ जणूं तुरेचि ! ! ॥२८॥
तेव्हां तुरंग–गज, केलिकुरंग कोटी । पाळीव सर्व पशु, तेथिल पक्षिसृष्टि
ते चक्रवाक, पिक, सारस, हंस, मोर त्या सारिका शुकहि चातक ते चकोर॥२९॥
निस्तब्ध दुःखवश रामवियोगिं झाले। जेथें तिथें जणु चितारुनि काढलेले! ॥
साकेत सर्व घनदाट अरण्य भासे । तेथील लोक, मृगपक्षि असंख्य तैसें! ३०
तैं कैकयी विधिनियोजित कीं किराती। दावानला दशदिशां करिते जिथें ती! ॥
तैं लोक रामविरहानलिं पोळलेले। होवोनियां विकल सर्व दिशां पळाले!॥३१॥
सर्वांसि वाटत मनीं, जर नाहिं सीता–श्रीराम, लक्ष्मण, तरी सुख केविं चित्ता?
हो राम तेथचि समस्त समाज राहे । साकेतिं रामविन, कांहिंच कार्य नोहे!
या निश्चयें निघति ते रघुनाथसंगें । सोडोनि गेह सुरदुर्लभ सौख्य मार्गें ॥
श्रीरामपादकमलीं रमल्या मनासी । नाकर्पिती विषयभोग कधीं स्वपाशीं! ३३
आबालवृद्ध सगळे निघती त्यजोनी । गेहादिकां, रघुवरासह जाति रानीं ॥
केला निवास तमसेवरि जानकीशें । सर्वांसवें प्रथमच्या दिनिं भक्ततोषें ३४
रघुपति निजलोकप्रीति पाहोनि थोर । हृदयिं गहिंवरोनी होय दुःखार्त फार
अमित करुणराशी तो प्रभू रामराय। कळवळि परदुःखें, त्याजला वेळ काय?
प्रेमें रसाळ वचनें मृदुलें वदोनी । श्रीराम त्यांसि समजावि बहुप्रयत्नीं ॥
सांगे तयांसि उपदेशुनि धर्मनीति । सांगूनही परत जात नच प्रजा ती! ३६
स्वस्नेह शील निज तोडुं शके न राम । झालाच पेंच बहु राममना निकाम॥
शोकें श्रमें सकल निद्रित लोक होती । मायाहि मोहि लव त्यां सुरनिर्मिता ती!
तैं यामिनी प्रहर दोन निघूनि जातां । श्रीराम सांगि अति आर्जवुनी सुमंता
"ताता! कळेल न कुणां, रथ हांक ऐसा, त्यावीण हेतु अपुला जुळणार कैसा!"
सीता रघूत्तम सलक्ष्मण रूढ होती । तेव्हां रथीं नमुनि शंभुपदां सभक्ति ॥
वेगें सुमंत रथ युक्ति करोनि हांकी। जेणें कळेल गतिमार्ग कुणाहि ना कीं!३९

॥ इति श्रीराम० जनविरहश्रीरामवनगमनवर्णनं नाम दशमस्तरङ्गः ॥

तरंग ११ वा

होतां प्रभात सकलांप्रति जाग आली । 'बोले रघूत्तम!' विरावति सर्व मेळीं

ना देखती लव खुणा रथमार्गदृष्टीं। आक्रोश 'राम' मुखिं; जाति बहू दिशांसी
वाटे तदा जणुं समुद्रिं बुडे जहाज ! । झाला असाह्य अति दीन वणिक्समाज ! ॥
ते बोलती विकळ होउनि एकमेकां । जाऊनि जाय रघुनाथ अम्हांसि हा कां ?
मीना प्रशंसिति निखंदुनि आपणांसी । हे धिक् जिणें रघुवराविण दुःखराशि
"आम्हां प्रियासह वियोग करीत धाता । ना मागतां मरण कां नच दे समस्तां?"
ऐसा विलाप करिती विरहार्त लोक । साकेतिं येति भरुनी उरिं थोर शोक ॥
तें तीव्र दुःख कवणा कथवेल वाणीं ? । प्राणांसि ठेविति वनावधितें गणोनी !
निजनयनि मिळावी देखण्या राममूर्ति । व्रतनियम करीती लोक सारे तदर्थीं॥
गमत तरणि जातां अस्तमाना दिनान्तीं । विरहिं कमल कोकी चक्रवाकादि कातीं
श्रीरामलक्ष्मण सुमंत समेत सीता । ते शृंगवेरपुरिं पोंचति मार्गिं जातां ॥
देखोनि देवसरिता उतरोनि राम । आनंदभक्तिभरिं तीस करी प्रणाम ! ॥६॥
सीता तसे सचिव लक्ष्मण ही नमीती । सर्वासवें मुदित राघव होइ चित्तीं ॥
आनंद मंगल समग्र विनिर्मि गंगा । सर्वांसि सौख्यद, करी सलकार्तिभंगा ॥
सांगे रघूत्तम अनेक कथाप्रसंग । वीची विलोल बघुनी विमलांतरंग ॥
वर्णोनि एकवि तिचा महिमा कवी तो । सीता-सुमंत सहलक्ष्मण हर्षवीतो ॥८॥
ते मज्जनें करुनि घालविति श्रमार्तें । प्राशूनि पुण्यजल तोषुनि जाति चित्तें
ज्यातें स्मरोनि विगतश्रम होति लोक । तो श्रांत हो, कथन हें व्यवहार एक !
श्रीसच्चिदानन्द विशुद्ध राघव । जो सूर्यवंशाग्रणि पुण्यसंभव ॥
त्याचीं चरित्रें नरजन्मिचीं भवीं । तरावया सेतुपरी अम्हां हवीं ॥ १० ॥
जेव्हां कळे सकलवृत्त गुहा निषादा । श्रोलांत्रि तो प्रिय निजास धरोनि मोदा
भेटीस घेउनि सवें फलमूलभार । अत्यंत हर्षभरिं ये; उरिं भक्तिपूर ! ॥११॥
अर्पूनि भेट पुढतीं करि तो प्रणाम । सप्रेम, राममुख पाहत सौख्यधाम ॥
ती प्रेमभक्ति बघुनी रघुराय तोषे । क्षेमा पुसूनि बसवी जवळींच तैसें ॥१२॥
"देवा !" वदे गुह, "पदांबुजदर्शनानें । आहेंच मी कुशलु; भाग्य नसेचि सानें
सर्वस्व भूमि धनधाम तुम्हां निवेदीं । मी दास होय तुमचा सहबांधवादि १३
देवा ! कृपा करुनि या नगरीं मदीयीं । माना स्वदास मजला निज सर्वकार्यीं
बोले रघूत्तम "सख्या ! वदसी खरें तें । आज्ञा असे मज दिली दुसरीच तातें
'वर्षे चतुर्दश वनामधिं घालवीणें । आहारवेषनियमादि मुनिप्रमाणें-'
न ग्रामधामिं वसती मज योग्य आहे ! " अत्यंत दुःखितमना गुह ऐकुनी हें

सीतालक्ष्मणरामरूप बघुनी ग्रामीण नारीनर ।
जाती प्रेमभरें भरोनि, वदती उद्गार चेतोहर ॥
"बायांनो ! जगिं आइबाप कसले त्यांना म्हणावें तरी ? ।
ज्यांनीं हीं पिटिलीं घरातुनि दुरीं बाळें अशीं गोजिरीं !" ॥ १६ ॥

कोणी म्हणों लागति त्यांत लोक । "केलें अहो ! भूपतिने सुरेख ! ।
देतो गमे लाभ अम्हां विधाता । करूनि नेत्रां अमुच्या कृतार्था" ॥ १७ ॥
तेव्हां निषदपति जाणुनिया मनांत । कीं शिंशुपातरु मनोहर हो नितांत ।
दावीत तें स्थल विभूत्तम राघवासी । होई बघूनि रघुरायहि तें सुतोषी ॥ १८ ॥
तेव्हां निषादपति सुंदर दे रचोनी । शय्या तया मृदुलशां तृणपल्लवांनीं १९

फळें मूळें शुद्धें मृदु मधुर जाणोनि किति क ।
भरोनी द्रोणातें गुह रघुवरा दे सुरसिक ॥
तदा सीते भ्रात्यासहित सचिवातें वितरुनी ।
तया सेवी राम प्रभुवर सुतोषें निजमनीं ॥ २० ॥

श्रीराम सेवोनि फलादि झोंपत । सवाहि तैं लक्ष्मण, तत्पदाप्रत ॥
बघोनिया राघव झोंपला असें । उठोनि सांगे सचिवा हळूचसें ! ॥२१॥
झोंपावया त्यासहि लावि लक्ष्मण । बसे दुरीं घेउनि चापमार्गण ॥
वीरासना घालुनि वीर ठाकला । करी पहारा प्रभुरक्षणा भला ! ॥ २२ ॥
गुहेंहि तै बोलवुनि स्वसैनिक । विश्वासयोग्य प्रतिभागिं आणिक ॥
स्थापीयले आपणही तसा बसे । तो लक्ष्मणासन्निध, शस्त्र घे तसे ॥ २३ ॥
भाते शराचे कटिलागिं बांधिले । हातामधे चाप सुसज्ज, ना ढिले ॥
तैं निद्रिता पाहुनि राघवाप्रति । निषादचित्तांत विषाद ये अति ! ॥२४ ॥
हृदंतरिं प्रेमहि दाट संचलें । हृष्टा तनू लोचनिं अश्रु सिंचले ! ॥
बोले तदा भक्तिभरेंचि लक्ष्मणा । वर्णावया येइल भाव तो कुणा ? ॥ २५ ॥
"दशरथभवनाची प्रेक्षणीयाच कांति । सुरपतिसदनाची प्रौढि ना त्यापुढें ती
मणिखचित सुरम्यें तीं गवाक्षें तयासी। जणु रतिपति त्यातें निर्मि सौंदर्यराशि !
जेथें पलंक अतिरम्य सुवस्त्रशोभी । शय्यादि शुभ्रवसनावृत चित्तलोभी २७
त्या दुग्धफेनधवला मृदुला उशाही । ऐशी समृद्धि परिपूरित जेथ बाही ॥
तोषीं अशा निशिं रघूत्तम आणि सीता । जे झोंपती रति मनोज गमोनि चित्ता

ते हे अशा शयनिं आजि बघून सुप्त। श्रांतस्थितींत, मम हो मन दुःखतप्त॥
ना लोचनां विवशना बघवे दशा ही। संपन्नता तशि इथें लवमात्र नाहीं! २९
मातापिता परिजनादिक दासदासी। उत्कृष्ट मित्र परिवार जपेहि ज्यासी॥
प्राणांसमान सकलांहिं निषेवियेला। तो राम विश्वविभु भूतलि झोंपि गेला! ३०
जीचा पिता जगतिं कीर्तित तत्त्वनिष्ठ। जीचा असे श्वशुर इंद्रसुहृद् वरिष्ठ
भर्ता जिचा रघुकुलांबुधिचंद्र राम। ती जानकी निजत भूवरि; दैव वाम!! ३१
योग्या असे का वनवाससेवना। सीता, तसे रामहि काय कानना?॥
खरेंचि जें कीं जगिं लोक सांगती। सर्वप्रभावी भवि कर्मसंगति!॥ ३२॥
कुटिलकृति गमे ती कैकयी मंदधीच। कठिनहृदय नारी हें करी कर्म नीच॥
सुखसमय जयां ये जानकीरामरायां। अकलित वनिं लोटी दुःख त्यां भोगवाया।
दिनकरकुलवृक्षां जाहली जी कुऱ्हाड। कुमति सकलविश्वा देतसे दुःख-जोड!"
हृदयिं बहु निषादा वाटला हा विषाद। बघुनि अवनिशायी रामसीता सखेद
मृदु मधुर वचांहीं लक्ष्मणें बोलियेले। जयिं मधुरस भक्तिज्ञान वैराग्य ठेले॥
"नच कुणि सुखदाता, ना कुणी दुःखदाता। सकलहि निजकर्मे भोगवीतात ताता!
जगतिं भोग अनंत भले बुरे। मिळति योगवियोगहि जे खरे॥
मिळति आत्महिताहित मध्यम। हृदयि जाण सख्या! सकल भ्रम! ३६
संसारींचें सर्व हें कूटजाल। कर्में, जन्में, मृत्यु, तैसाचि काल॥
भूमी, धामें, द्रव्य, आप्तादि लोक। स्वर्गास्वर्ग, श्राव्यदृश्याद्यनेक ३७
जें जें सारें ज्ञेय सपद् विपत्ति। तत्त्वार्थानें मोहमाया असे ती॥
नोहे नेणें मोक्षसंपर्क साच। अज्ञानाचा भ्रांतिचा सर्व नाच!॥ ३८॥
स्वप्नांत कोणी नृप हो भिकारी। भिकारि वा इंद्रपदाधिकारी॥
जागेपणीं त्या नच लाभहानि। प्रपंच हा त्यापरि सर्व मानीं॥ ३९॥
ऐशा विचारें नच रोष पावणें। न निंदणें वा वदणें कुणा उणें॥
हें मोहनिद्रेमधिं विश्व घोरतें। स्वप्नांतले त्या सगळे प्रकार ते॥ ४०॥
जगन्निशेमाजिं सदैव जागती। योगीच ते ज्यां परमार्थ—सन्मति॥
विरक्ति ज्यांच्या हृदयांत नांदते। ते मात्र जागे जगतांत जागते!॥४१॥
न ज्यांस कोठें विषयादि मोहती। विवेकयोगें भ्रम राहिना मतीं॥
तेव्हांच होई रति राघवाकडे। न मोह त्यांचें करतील वांकडें॥ ४२॥
सख्या गुहा! तूं परमार्थ जाण हा। सर्वस्व रामीं तनुवाङ्मनें वहा॥

श्रीराम सद्ब्रह्म अनादि नांदत । अलक्ष्य अज्ञेय अमेय शाश्वत ॥ ४३ ॥
अभेद तैसें अविकार सार तें । ज्या ' नेति नेति ' श्रुति नित्य वानिते ॥
त्या रामपादांबुजिं चित्त ठेवणें । तूं हेंचि मानीं परमार्थ पावणें ॥ ४४ ॥
भक्त, भूमि, अमर, द्विज, धेनू । यांचियास्तवचि ये जगिं विष्णु ॥
घेउनी नरतनू करि लीला । ऐकतां नुरविती भवजाला ! ॥ ४५ ॥
॥ इति श्रीराम० निषादमोहलक्ष्मणोपदेशवर्णनं नामैकादशस्तरङ्गः ॥

तरंग १२ वा

जाणोनि हें हृदयिंचा त्यज मोह सारा । सीतारघूत्तमपदांबुजिं घेइं थारा " ॥
त्यां हो रघूत्तमगुण स्तवितां प्रभात । तैं विश्वमंगलविभूवहि जाग येत ॥ १ ॥
स्नानादि सारोनि विशुद्ध राघव । घेई वटक्षीर विचारुनी नव ॥
तेणें स्वबंधूसह मस्तकीं जटा । विनिर्मियेल्या अतिचारु उत्कटा ! ॥ २ ॥
तें देखतां होइ सुमंत दुःखित । शोकें जळे, म्लानमुखाब्ज शोचत ॥
जोडोनि हा अंजलि राघवा वदे । " हे नाथ ! ऐका नृप जो निदेश दे ॥
नृपोक्त कीं, " ने रथ रामसंगतीं दावीं वना, दाखविं जाह्नवीहि ती ! ।
नाहावुनी त्यां म्हणिं आण मागुतीं । करोनियां संशय दूर तन्मतीं ॥ ४ ॥
तूं आण सीतारघुनाथलक्ष्मणां" ।म्यां हे नृपाज्ञा कथियेलि आपणां ॥
प्रमाण आज्ञा तुमचीच यावरी । बळें मला ती करणेंचि सत्वरी " ॥ ५ ॥
प्रार्थोनि हें करित रामपदीं प्रणामा । आक्रोश तोकपरि तो करि ज्या न सीमा
बोले "प्रभो ! सकृप होउनि नें कराहो।साकेत जेविं न अनाथ सशोक तें हो !"
उठवुनि सचिवातें रामराया प्रबोधी । " सकलहि तुम्हि धर्मा जाणतां तात! आधीं
शिबिनृपति, दधीचि, श्रीहरिश्चन्द्रराय । जपुनिच निजधर्मा क्लेशवीति स्वकाय ॥
गुणखनि बलिराजा रंतिदेवादिकांनीं । अति काठिनहि कष्टीं केलि ना धर्महानि
विदित सकल तुम्हां तीं पवित्रें चरित्रें । स्मरुनि भविं पहावीं अंतरीं चित्तनेत्रें ॥ ८
नाहींच सत्यसम अन्य उदात्त धर्म । वेदीं पुराणिं कथिती मुनि हेंचि वर्म ॥
तो थोर धर्म मजला सहजीं मिळोनी । त्या टाकितां अपयशा चुकवूं कुठोनी ? ९
संमाविताच जर कां अपकीर्ति येई । तें कोटिमृत्यपरिं दुःसह त्यास होई ॥
मी आपणां अधिक, काय वदेन ताता ! मी बोलतां अधिक, दोष घडेल आतां ॥
प्रार्थी पित्यापदिं धरून विनम्रभावें । कोटिप्रणाम मम सांजलि हे वदावे ॥

"ताता ! नका करुं मुळींच मदीय चिंता ।" आहां तुम्हीहि पितृतुल्य मला सुमंता !
ही प्रार्थना मम तुम्हांसहि बद्धपाणि । तें आचरा तुम्हिहि संतत सर्वयत्नीं ॥
जेणेंकरून पितया मम दुःख ना हो।हा आमुचा विरह अंतरिं त्यास साहो !"१२
संवाद रामसचिवांमधिं चाललेला । ऐकोनि दुःखित गुहादि समूह झाला ॥
तेव्हां वदे कटुक लक्ष्मण कांहिं वाणी । ती ना बरी म्हणुनि थांबविला प्रभूंनीं !
संकोचुनि रघुपती शपथें सुमंता । सांगे "नका वदुं तसें अनुजोक्त ताता !"
तेव्हां सुमंतहि निवेदि पुन्हां नृपोक्ति । "सीते अरण्यवसती सहणार का ती ?
जेणें फिरोनि नगरा परतेल सीता । तें राघवा ! तुम्हिच येथ करा जि ! नाथा
मी, ना तरी, निरवलंब असा सुदीन । वांचेन नैव जणुं मीन जलाविहीन ! १५
माहेरिं सासरिं तुला सगळीं सुखेंचि । जेथें रुचेल तुज राहिं मुली ! तिथेंचि ॥
होई विपत्तिलय तोंवरि याप्रकारें । सांगीतलें नृपवरें हृदयार्तिपूरें ॥ १६ ॥
ती आर्ति, तो कळवळा नच वानितां ये । त्यावीण हीं कथित मी वचनें तदीयें!"
ऐकोनि तो नृपनिदेश, कृपानिवास । श्रीरामही कथि कितीपरि जानकीस ॥१७॥
"श्वशुरूजन श्वशुर, आप्त गुरु स्वकीय । साऱ्यांहि दुःखलय होइल, वेळ काय?॥
सावे ज़ि तू परत मात्र!" असें वदोनी । सीतेसि सांगि, परि ती वदली स्ववाणी
"प्राणेश्वरा! परमवल्लभ! आयका कीं । आहाच सुज्ञ करुणायुत सद्विवेकी ॥
कैशी प्रभो! तनुविना जगिं सावली हो? ! कैशी प्रभा त्यजुनियां रविलागिं, राहो ?
टाकोनियां शशिस जाइल चंद्रिका का ?" प्रेमें पतीस विनवी अशि निष्कलंका
बोलेहि सौम्यवचनीं रुचिरा सुमंता । "आहांत हो ! श्वशुर, तातचि मद्धितार्थी
देईन उत्तर तुम्हां तर योग्य कैसें ? । आपत्ति थोर म्हणुनीच वदे विशेषें ॥
तेणें विषाद न धरा; कथतें खरें तें । मी ना पतीविण गणीं कसलेंच नातें !२१
मी तातवैभवविलास अनन्त पाहीं । भूपालरत्नमुकुटीं पदपीठ न्हाई ॥
ऐसें मदीय पितृसद्म सुखैकसार । मी ते पतीविण मनांतहि नाणणार ! ॥२२॥
माझे तसे श्वशुर जे नृपचक्रवर्ती । विश्वांतरीं प्रथित कोसलरायमूर्ति ॥
ज्यांतें सुरेन्द्र निज आसन देइ मानें । साकेतवासिजनतारति मीच जाणें ! २३
मातेसमान ममता मज ठायिं ज्यांची । त्या सासवांहि जपती सदया मलाचि ॥
हें सर्व सत्य, परि रामपदांबुजांचे-। वांचून जीवनिं मला सुख होय कैचें ? २४
वाटा सुदुर्गम, वनें गिरिकंदरें तीं । तैशा अपार सरिता, तळि, सिंह, हत्ती ॥
कोळी किरात मृगपक्षि सखे मला हे । देतील सौख्य, जर मी पतिसंग लाहें!२५

श्वशुरजनां मम तसें श्वशुरां नमोनी। माझी करा विदित त्यांसि विनम्र वाणी ।।
माझी नकाच करं काळजि अल्पही ती। आहे सुखीच पतिसंगति मी वनांतीं
भावोजि तेविं मम वल्लभ जीवनाथ। वीराग्रणी शरनिषंगधनुष्यहस्त ।।
मत्संगतीस असतां भ्रम खेद चिंता। स्पर्शेल ना मजसि, काळजि कां वहातां?"
परिसुनि मृदुला ती मैथिलीवाक्यमाला। अतिशयचि सुमंता शोक चित्तांत झाला।।
मणिविण अहि तैसा होत तो दीनवाणी। नयनिं न बघवे त्या ऐकवेनाहि कानीं
वचन मुखिं निघेना व्याकुला त्या सुमंता। करि रघुवर वाक्यीं त्याचिया बोध चित्ता
तरिहि न हृदयींचा राहिला दाह त्याचा। बहुपरिं करि यत्ना रामसंगार्थ साचा
परि उचित वचांनीं राम तद्वाक्य खोडी। सचिवहि मनिं जाणे कर्म कोणा न सोडी
नमुनि रघुपतीतें लक्ष्मणा-जानकीतें। निघत परत याया कीं वणिक् शून्य-चित्तें।
तैं हांकितां रथ बघोनि रघूत्तमाते। खिंकाळती हय किती अति आर्त चित्तें ।।
थें पाहुनी बहुविषाद निषादलोकीं। होऊनि दुःखित शिरां बडवीति ते कीं!
'ज्याच्या वियोगिं पशुचित्तिहि आर्ति ऐशी।त्याची प्रजा,जनक,माय,जगेल कैशी'
हट्टेंचि राम पुरिं पाठवि तैं सुमंता गंगातटाकिं रघुवीरहि होय येता ।। ३१ ।।
तो नाव मागवि परी गुह आणि ना ती। " आलें कळोन तुमचें मज वर्म हातीं
हें बोलती रघुपते! तुमच्या पदाब्जीं। आहे रजांत किलि, मानुषकारिणी जी ३२
तें स्पर्शतां रज शिला बनली सुनारी। हें काष्ठ तों मृदु शिलेहुनि हीन भारी ।।
नौका मदीय जर हो गृहिणी मुनींची। मातें उरेल न तरी उपजीविकाचि!।।
ही नाव पोषि परिवार मदीय सारा। उद्योग ना हिजविना मजला बिचारा
जाणें असेल जर का प्रभुजी! पल्याड। द्यावें पदांबुज धुण्या, मग यें न आड।

धुइन पदाब्जें तरी बैसिजे नाथ! नको मज आतर तें ।।
अपुल्या शपथीं खरेंचि मी कथिं, दशरथ नृपति स्मरुनि मतें ।।
मारो लक्ष्मण मज शरिं विंधुन परि मी, जंवर न चरण धुई ।।
तंवर न, तुलसी म्हणत, नाथ हो! उतरुन तुम्हां कधि नेईं!!" ३६

ती ऐकोनी स्निग्धभक्ती गुहोक्ती। लाडी गोडी अद्वितीयाच कीं ती!
पाहोनीयां जानकीलक्ष्मणांतें। कारुण्याब्धी हांसला राम चित्तें ।। ३७ ।।
बोले सुहास विभु त्या समयीं गुहास। " राहील नांव तव तेंचि करीं प्रयास
वेगेंचि आण जल आणिक धू पदां या।आम्हां उशीर नच हो परतीरिं जाया!"
ज्ञानमहि स्मरुनियां हृदिं एकवार। जावें तरून भवसिंधुहि हा अपार ।।

केलें जंय जग थिटें स्वपदत्रयांत। तो कौतुकें सुखविता गुहकाधि होत! ॥१९॥
पदनख निरखोनी हर्षली चित्ति गंगा। प्रभुवच परिसोनी घालवी मोहसंगा।
गुहहि रघुवराचा आयकोनी निदेश। जल भरुनि कठोरा आणि, मावे न तोष!
अतिशय अनुरागें तो धुवायासि लागे। रघुवरपदकंजें भारल्या अंतरंगें ॥
सुरवरि सुमवष्टी त्या प्रशंसोनि केली। "जगति अतुल पुण्यें कीं गुहाचींच झालीं!"
प्रभुपदकमलातें तो धुई घेइ तीर्थ। सहित निजजनांच्या होउनीयां कृतार्थ ॥
गुह करि पितरातें आपुल्या पार आधीं। प्रभुसि मग उतारी पार, कल्याण साधी॥

❀ इतिश्रीराम० श्रीअयोध्याकाण्डे श्रीरामकृपानिषादानुरागवर्णन नाम द्वादशस्तरङ्गः ❀

तरंग १३ वा

गंगा उतारुनि उभे प्रभु वाळवंटीं। सीतेसमेत गुहलक्ष्मण त्याजपाठीं॥
नावाडि रामपदिं दंडवतें नमीत। संकोचि राम न दिलें लव यास वित्त !१
सीता क्षणीं दयितहृद्गत जाणणारी। रत्नांगुलीय निज काढित हृष्ट भारी॥
लागे कृपाळु रघुवीर गुहास द्याया। तो राघवा पडत आकुलचित्त पायां! २
हे नाथ! आज मज काय न लब्ध लोकीं? गेलीं लयासि अघ, दुःख, दरिद्रता कीं!
म्यां आचरीत बहुकाल मदीय काम। दैवें दिलें फल मला अजि पुण्यधाम!
मातें नकोच लवही उतराइ आजीं। राहो दया मजवरी हितभव्यदा जी!॥
हो! जधवां परत याल तुम्हीच देवा!। तैं द्याल तो मज कृपाकर थोर ठेवा"
सांगीतलें जरिहि लक्ष्मणजानकींनीं। अत्याग्रहें, तरि न घे गुह त्यांकडोनी॥
तेव्हां दयानिधि तया वर देइ राम। जेणें विशुद्ध हृदयीं करि भक्तिधाम ५
मग निरोप गुहाप्रति देउन। करिति गांग जलामधिं मज्जन॥
रघुवरादिक सर्वहि पावन। करित राघव पार्थिवपूजन॥ ६॥
जोडोनि अंजलि वदे विनयें सभक्ति। भागीरथीप्रति वचें जनकात्मजा ती॥
प्रार्थी, " मनोरथ करीं मम पूर्ण माते!। कल्याण तूं कर पतिप्रति देवरातें७
येतां अम्ही परतुनी सुखरूप गेहीं। पूजा करीन तव मी सुभगप्रवाहीं "॥
तें जानकीवचन ऐकुनि भक्तिपूर्ण। ये वाक् मनोहर गभीर जलामधून! ८
"वैदेहि! रामदयिते! मम ऐक वाणी। जाणे प्रभाव तव कोण न लोकिं तीनी!
होतात लोकपतिही तव दृष्टिपातें। येतात सिद्धि सकला तव सेवकातें॥९॥

तूं लीनता धरुनि जें विनवीसि मातें । मी मानितें मजवरील कृपाच कीं तें
आशीर्वचें परि तुला वदुनी करीन । वाढ्वेवतेस मम मी सुफलाढ्य पूर्ण ! ॥११॥
तूं प्राणनाथसह देवरयुक्त ऐशी । साकेतिं येशिल पुन्हां कुशला गृहासी ॥
जातील सर्व तव मानस सिद्धिला गे ! । त्रैलोक्य सद्यश तुझें धवळील चांगें !"
गंगोक्त तें सकलमंगलमूल साच । सीतामना गमत हर्षकरी कृपाच ॥
तेव्हां गुहा प्रभु वदे "स्वगृहासि जा गा!" । ऐकोनि तें मुख सुके, मनिं दाह जागा
जोडोनि अंजलि वदे गुह दीनवाणी । "ऐका प्रभो ! रघुवरा ! मम लीन वाणी
हे नाथ ! राहुनि सवें पथ दाखवीन । सेवीन चार दिन मी चरणाब्ज दीन
जेथें रिघाल रघुनाथ ! वनांत तेथें । देईन सुंदरकुटी रचुनी स्वहस्तें ॥
सांगाल तेंच जगदीश ! करीन सारें । मी आपुल्या शपथ देत पदाब्जसारें "
देखोनि भाव सरळया गुहमानसाचे । त्या घेत संगतिं, गुहांतरिं मोद सांचे ॥
तैं घेतसे निजजनां गुह बोलवून । सर्वां दिलें रघुवरें मग बोळवून ॥१५॥
तदा गणाधीश महेश्वरांप्रति । स्मरोनि वंदोनि सुरापगादि ती ॥
वनीं रिघे राघव घेउनी सह । श्रीजानकी, लक्ष्मण, मित्रही गुह ॥१६॥
तो काढला दिवस वृक्षतळींच त्यांनीं । आराम देति गुहलक्ष्मण त्या करोनी ॥
होतां प्रभात सगळे शुचि होउनीयां । ते तीर्थराजसुषमा निघती बघाया १७
ज्या राजया सचिव सत्य विशुद्ध होय । श्रद्धाख्य ज्यास महिषी अभिनंदनीय
ज्याचा सखा अतुल माधव भव्यकारी । भांडार ज्या अमित तें पुरुषार्थ चारी १८
पुण्यप्रदेश अवघा अधिराज्य ज्याचें । ठाणें अगम्य गड गाढ सुरम्य साचें ॥
स्वप्नींहि शत्रु नच ज्या कधिं जिंकणारे । तीर्थें जया प्रबल सैनिक वीर सारे १९
जे नाशितात अघसैन्यसमूह मोठे । सिंहासनोत्तमचि संगम ज्यास, वाटे ॥
ज्या छत्र अक्षय वटें जणु निर्मियेलें । जेणें मनास मुनिच्याहि विमोहियेलें! २१
जे गांग-यामुन तरंग शुभांग चौऱ्या । दारिद्र्य दुःख बघतांक्षणिं भंगणाऱ्या
सेवूनि ज्यासि सुकृती शुचि साधु भक्त । साधूनि घेति निज काम समग्र पूत
बंदी जया स्तविति वेदपुराणसंघ । गाऊन पावन मनोहर यद्गुणौघ ॥
शक्य प्रयाग-गुणगान यथार्थ कोणा ? । जो तीर्थराज अघकुंजरसिंहराणा !२२
ऐसा बघोनि अति सुंदर तीर्थराय । होई सुखांब्धि रघुनायक हृष्टकाय ॥
तैं तीर्थराजगुण वर्णुनि सांगि राम । सीतेसि लक्ष्मणगुहांसि मनोऽभिराम
आराम सुंदर वनें बघुनी सभोंतीं । त्यातें करी प्रणति राघव भक्तिमूर्ति ॥२३

ऐशा प्रकारिं पथिं येत रघूत्तमांनीं । ती पाहिली स्मृतहि मंगलदा त्रिवेणी !२४
सानद तेथ शुभ मज्जन तीर्थि केलें । तीर्थादिदेव, गिरिशादिक पूजियेले ॥
ऐसे यथाविधि समर्चुनि तीर्थराजा । संतुष्ट होय रघुनायक तो महौजा ! २५
आले भरद्वाजमुनीकडे पुढें । श्रीराम साष्टांग पदीं तया पडे ॥
आलिंगिला राम ऋषीश्वरें उरीं । भरोनि गेला मुनि हर्षनिर्भरीं ॥ २६ ॥
ब्रह्मानन्दें पूर्णशी काय रास । वाटे त्यातें लाभली आपणास ॥
मूर्तीभूतें कीं तपाचीं फळेंच । धाता दावी लोचनां आज साच ! ॥२७॥
आशीर्वादां देइ रामा मुनीश । पावोनीयां अंतरीं थोर हर्ष ॥
क्षेमप्रश्नां त्या पुसे आसना दे । पूजूनी त्या तो भरे प्रीतिमोदें ॥ २८ ॥
कंदमूल फल, अंकुर साच । त्यांस जे गमति गोड सुधाच ॥
राम-लक्ष्मण-गुहांसह सीता । सर्व आवडुनि खाति, न चिंता ॥ २९ ॥
खेद जाय, सुखित प्रभुराय । तैं वदे मुनि वचें मृदु काय— ॥
" त्याग, तीर्थ, तप आज फळालें ! । आज सत्फल विरक्तिस आलें ! ३०
योग मंत्र जप सिद्धि मिळाली ! । साधनें शुभकरें अजि झालीं ॥
राम ! लोचनिं तुम्हां बघताहें । लाभ सत्तम सुखोत्तम लाहें ! ॥ ३१ ॥
दर्शनें पुरविल्या सकलाशा । हेतु एक पुरवा मम ऐसा ॥
द्या कृपा करुनि हे वरदान । त्वत्पदीं सहज हो मन लीन ! ॥ ३२ ॥
कर्म वाङ्मन अकृत्रिम भावें । जोंवरी स्थिर तुम्हात न व्हावें ॥
स्वप्निंही कुठुनि तोंवरि हर्ष । यत्न अन्य करुनीहि कुणास ? "
परिसुनि मुनिवाक्यें राम संकोच पावे । अतिशय मनिं धाला भक्तिभावें प्रभावें
सुयश मुनिवरांचें राघवें वानियेलें । श्रवण करुनि सारे अंतरीं तुष्ट झाले ३४
सकल गुणगणांचें सद्म तो श्रेष्ठ एक ।स्तवुनि मुनिवरांनीं गौरवीला सुरेख ॥
रघुवर मुनि ऐसे वंदिती एकमेकां । अनुपम सुखसारा सेविती निष्कलंका !
विदित सकलिं होतां, जे प्रयागाधिवासी । बटु, मुनि, तपणारे, सिद्ध तैसे उदासी
त्वरित मुनिवराच्या आश्रमामाजिं येती । दशरथतनयांच्या पाहण्या रम्यमूर्ती
सविनय करि सार्‍यां राम त्यांना प्रणाम । प्रमुदित नयनांना लाभलें सौख्यधाम
परम सुखिं तयांना देति आशीर्वचें ते । परत फिरति त्याच्या वानुनी रम्यतेतें
निवसुनि मग तेथें रात्र सारी सुखांत । सकल शुभ सकाळीं ते प्रयागीं नहात

करुनि नमन राम श्रीभरद्वाजपायां । निघति सगुहसीता लक्ष्मणा घेउनीयां
इति श्रीराम० श्रीअयोध्या० श्रीरामस्य तीर्थराजप्राप्तिभरद्वाजमीलन–
वर्णनं नाम त्रयोदशस्तरङ्गः

तरंग १४ वा

सप्रेम राम वदती मुनितें "अम्हांस । सांगा सुयोग्य पथ यापुढतीं मुनीश !"॥
हांसोनि अंतरिं मुनी वदले प्रभूतें। "सारेच मार्ग सुगम प्रभुजी ! तुम्हां ते!"॥१॥
बोलावि शिष्य अपुले मुनि सोबतीस । येती तिथें मुदित ते क्षणिं वीस तीस ।
प्रीती रघूत्तमिं तयां सगळ्यां अपारा। सारेचि सांगति ' अम्ही पथ दाउं सारा!'
त्यांतूनि चार बटु देइ सर्वे मुनीश । ज्यां पूर्वजन्मकृत संचित पुण्य रास!॥
वंदोनि देत मुनिवर्य निरोप त्यांना । आनंदला निघत तैं रघुवंशराणा ॥३॥
ते ग्रामसन्निध पथें जर जाति केव्हां । देखावया सकल धांवत येति तेव्हां ॥
नारीनरां गमत जन्मफले मिळालीं । येती सुदुःखित; मनें सह पाठवीलीं ! ॥ ४
देती निरोप मग ते विनयें बटूनें । तैं पूर्णकाम निज आश्रमिं होति जाते ॥
श्रीराम मज्जन करी मग नीलरंगीं । सुश्यामि आत्मसम त्या यमुनातरंगीं ५
तैं ऐकतां त्यजुनि कार्य, तटाधिवासी । सारे स्त्रिया पुरुष धांवति दर्शनासी॥
सौंदर्य लक्ष्मणरघूत्तम-जानकींचें । पाहोनि भाग्य निज वानिति धन्यवाचें ६
चित्तांत लालस जरी सगळेच होते । त्यां नांव गांव पुसण्या मनिं लाजती ते
जे त्यांत वृद्ध जन सुज्ञ असे विशेष । ते युक्तिनें उमगती परि राघवास ! ७
सारी कथा कथिति ते मग सर्व लोकां ।आले वनीं सकल तातनिदेशिं हे कां
तैं ऐकतां सकलचित्तिं विषाद होय । ' राणी भलें करि न, वा नच भूपराय
मातापिता तरि म्हणूं कसले अशांना । जे बालकांस असल्या दवडीति रानां !
तैं रूप लक्ष्मण रघूत्तम मैथिलीय पाहोनि लोकहृदिं शोक भरे असह्य ॥ ९ ॥
बहुपरिं मग बोधुनी गुहातें । रघुवर त्यास निरोप दे किती तें ? ॥
शिरिं धरुनि निदेश तो तदीय । निजभवना परते निषदराय ॥ १० ॥
इति श्रीराम० श्रीअयोध्या० तपस्विमीलन–निषादनिर्गमनवर्णनं
नाम चतुर्दशस्तरङ्गः ॥

तरंग १५ वा

मग लक्ष्मणरामजानकींनीं । यमुना सादर भाक्तिनें नमूनी ॥

अति हर्षित दोहि बंधु होती । सहसीते रविकन्यकेसी गाती ॥ १ ॥

तदा मार्गी जातां पथिकगण त्यां कैक मिळती ।
बघोनी हे बंधुद्वय कळवळा ये तर्हि किती ! ॥
"अहो ! तुम्हां अंगीं दिसति नृपचिन्हें" म्हणति ते ।
अशां तुह्मां, ऐसें बघुनि हृदयीं आर्ति खणते ! ॥ २ ॥
तुम्ही पायांनीं हे अत्रनि अनवाणीच गमतां ।
गमे आलें खोटेपण खचित कीं ज्योतिषमतां ॥
अगम्या त्या वाटा त्रिकट विपिनीं अद्रिकुहरीं ।
असे त्यांतूनी ही सुतनु सुकुमारी सहचरी ! ! ॥ ३ ॥
जिथें हत्ती, सिंह, प्रमुख वन तें केविं बघवे ? ।
वना देखायाही नयनिं हृदयीं धैर्यचि हवें ! ॥
तुम्हां संगें येऊं जर कथितसां आह्मि सकळ; ।
जिथें जातां तुह्मी तिथवर तरी राहुं जवळ ! ॥ ४ ॥
नको होतां आह्मी परत फिरुं तुह्मांस नमुनी ! " ।
असे आर्द्र चित्तें किति कथियलें त्यांप्रति जनीं ॥
तयां अश्रू नेत्रीं, पुलक तनुगात्रीं, गहिंवर ।
अशां साऱ्यां मागें फिरवि विनयोक्तीं रघुवर ॥ ५ ॥
पुरें, ग्रामें मार्गी प्रभुवर जिथें काहिं वसती ।
तयां वाखाणीती अहि-सुर-पुरें शंसुनि किती ! ॥
कुणी पुण्यात्म्यांनीं वसविलि अशीं ग्रामनगरें ।
किती पुण्यें त्यांचीं, रघुकुलमणी जेथ विचरे !! ॥ ६ ॥
रघुवरपदें जेथें जेथ महीवर चालतीं ।
गुणगणिं तयां स्थानांऐशी न हो अमरावती ॥
निकट वसते त्या मार्गाच्या सुपुण्यगिरीच कीं ।
जिहिं निरखिले मेघश्यामा सलक्ष्मणजानकी ॥ ७ ॥

सुरनगरनिवासी वानिती भाग्य त्यांचें । नयनकमळिं ज्यांच्या राघवी मूर्ति सांचे
करि सरिं वरितीं ज्या स्नान तो मेघनील।सुरसर, तशि गंगा कां न त्यां वानितील
तरुतळिं बसती ज्या राम त्या पादपांला।स्तविति अमरशाखी थोर त्यांच्या तपांला
रघुवरपदपंका लागतां अंगिं धूळी । अतिशय निजभाग्या वानुनी भूमि धाली ।

गिरि, वन, मृगपक्षी मार्गि पाहात जातां । घन करि गगनीं त्यां सांवली शांत शीत
'जय जय ! रघुराया ! रामराया !!' म्हणोनी । करिति अमर वृष्टी कल्पवृक्षप्रसूनीं
सीतारघूत्तम सलक्ष्मण आज येत । ग्रामाचिया निकट हें कळतां समस्त ॥
आबालवृद्ध जनता नर आणि नारी । कामें समग्र विसरूनचि येति सारीं ! ॥
आलोचतां अतुल सुंदर रूप त्यांचें । सौख्यें गमे नयनसार्थक होय साचें ॥
ये नीर लोचनिं, तनूवरि रोमहर्ष, । तें वीरयुग्म करि तन्मय तन्मनांस ॥१२॥
त्यांची मनःस्थिति कुणांहि न वर्णु यावी । दीना कुबेरधनिता जणुं लब्ध व्हावी!
एकास एक कथिती सुचवूनि 'घ्या हो ! । या सुक्षणींच नयनां निजसौख्यलाहो' !
रामास कोणि बघुनी अनुरागभावें । संगें तयासहचि मागुनि चालु जावे ॥
कोणी स्वनेत्रपथि तच्छवि वक्षि आणी । होवोनियां शिथिल तें तनुवाङ्मनांनीं !
कोणी बघोनि वटसांवलि दाट ऐसी । शय्या रचीति तृणपल्लविं चारु त्यांसी ॥
त्यां प्रार्थिती ' परिहरोनि निजश्रमांतें । राहोनि येथ निघणें मग, वा प्रभातें '
आणोनि देति कलशें जल त्यांस कोणी । 'घ्यावें जि ! आचमन' हें विनयें कथोनी
तत्प्रेमभक्तिमय ऐकुनि तें प्रियोक्त । कारुण्यसिंधु रघुनायक आर्द्र होत ॥१६॥
आणोनि चित्ति ' दमली अतिमात्र सीता' । छायेंत थांबत रघूत्तम सौख्य देता
नारीनरां हृदयिं हो परमप्रमोद । त्यांचीं मनें सनयनें प्रभुरूपिं लुब्ध ॥१७॥
श्रीरामचंद्रसुषमा उपमानशून्या । पाहाति लोक निज लोचनिं जी अनन्या ॥
तें वाटलें जणुं चकोर मिळोनि भोंतीं । श्रीरामचंद्रमुखचंद्रविभा पहाती ! ॥१८॥
श्रीरामचंद्रतनुवर्ण तमालसार । सौंदर्य कोटिमदनांसहि मोहणार ॥
सौदामिनीद्युति अनुत्तम लक्ष्मणाभा । आपादमस्तक, विनिर्मि शिवास लोभा ॥
ती वल्कलावृततनू, कटितें निषंग । केला धनुष्यशरिं चारु कराब्जसंग ॥
माथां जटामुकुट उत्तम बाहु वक्ष । शोभे सुरम्यसुषमा सरसीरुहाक्ष ॥ २० ॥
हो पौर्णिमेंदुवदनच्छवि शारदींची । ज्या घर्मबिंदु वरि निर्मिति चारुताचि ॥
तें युग्म सुंदर यथार्थ न वर्णु येत । शोभा अनन्त, परि धी मम अल्प होत !
सीतारघूत्तमसलक्ष्मणचारुता ती । योजूनि चित्त, मन, बुद्धि जरी पहाती ॥
नारीनर प्रबल भक्तिभरें रमोनी । जाती थकोनि हरिणीमृग कीं दिपोनी ! ॥२२॥
ग्रामस्त्रिया सुकुतुकादरयुक्त येती । सीतेसमीप परि त्या पुसुं लाजताती ॥
पायां तिच्या पडति सादर भक्तिभावें । तीतें विचारिति मृदू ऋजु सुस्वभावें ॥
"आम्ही तुला नृपकुमारि ! विचारुं कांहीं । लज्जा परी पुसुं न दे सहजा पहा ही

धाष्टर्य क्षमा कर अम्हां परि देवि ! आज । आहोंत खेडवळ अज्ञ असा समाज !
हे राजपुत्र युग सुंदर जन्मजात । यांची छवी मरकता, कनकासि जात ! ॥
हे श्याम, गौर, तनु कोष सुरम्यतेचे । वक्त्रेन्दुतेज जणुं शारदपौर्णिमेचें ! ॥
त्यांची विलोचनविभा शरदंबुजांची । कीं कामकोटिसहि लाजविणार हेचि ! ॥
आहेत कोण तव हे वद गे! अम्हांला" । ऐशा विचारिति विनीत तियेसि बाला ॥
ती प्रीतिमंजुल वचें परिसोनि सीता । संकोचुनी मनिं, करि स्मित तुष्टचित्ता ॥
पाहोनि त्यांसि फिरुनी अवनी विलोकी । संकोच दोंहिं परि तीस विशेष रोखी

सप्रेम सीता मृगशावलोचना । सलज्ज बोले मधुकोकिलस्वना ॥
"ते गौरकांती मधुर स्वभावतां । हो धाकटे देवर लक्ष्मण स्वतां !" ॥२८॥
वस्त्रांचलें आननचद्र झांकुनी । प्रियाकडे पाहत वक्रलोचनीं ॥
वक्रभ्रु ती खंजनमंजु सूचवी । 'स्वकांत हे' त्यां निज नेत्रपल्लवीं ! ॥२९॥
ग्रामस्त्रिया सर्वहि हर्षल्या तदा । कीं लूटिल्या रंकि नृपालसंपदा ! ॥
सीतापदां वंदित भक्तिनें किती । आशी दिल्या त्यांहिं अशा तयांप्रती ॥३०॥
" सौभाग्यिनी तूं वस येथ संतत । शेषावरि जोंवरि भूमि वर्तत ! ॥
तूं पार्वतीच्या सम हो पतिप्रिया । अम्हांवरी देवि ! करा सदा दया" ॥३१॥
पुनः पुन्हां त्या विनवीति सांजलि । "येतां तुम्हां ही जर वाट लागली ॥
दासींसि या द्या निज पुण्य दर्शन" । सीता गणी त्यांप्रति भक्तिभाजन ॥
बोलेनि त्यांतें मधुवाक्यिं तोषवी । ज्योत्स्ना जणों ती कुमुदांसि पोषवी ॥
तों रामचित्ता समजूनि लक्ष्मण । लोकां पुसे तो पथ मंजुभाषण ॥३३॥
ऐकोनि नारीनर आर्त होउनी । रोमांचती, अश्रु भरे विलोचनीं ॥
आनंद लोपे भरि खिन्नता मनीं । "देऊनि धाता निधि घेत काढुनी ! ॥३४॥

जाणोनि कर्मगति, धैर्य हृदीं धरूनी । शोधूनि वाट सुगमा कथिली तयांनीं
तेव्हां निरोप दिधला मग त्या जनांना । बोलून त्यां रघुवरें मधुरोक्ति नाना
जाती रघूत्तम सलक्ष्मणजानकी ते । घेऊनि संगिं अपुल्या प्रिय लोकचित्तें
माघारिं तें रिघति, निंदति देवजात । नारीनर व्यथित फाराचि अंतरांत ३६
ते एकमेक कथिती अति दुःखिं ऐसें । "धाता करीत विपरीतचि सर्व कैसें !
निःशंक, निष्ठुर, निरंकुश हा विधाता । केला सरोग, सकलंक शशी पहातां
कल्पद्रुमा करित वृक्ष, समुद्र खारा । तो पाठवीत वनिं भूपतिच्या कुमारां !
धाता अशांस जर का वनवास देतो । वायां करीत जगिं भोगविलास कीं तो ॥

जातात मार्गिं जर हे अनवाणि ऐसे । यानें अनेक विधि निर्मि उगाचि मार्गे !
यांचें महीशयनही तृणपर्णि हो या । धाता सृजीत तरि कां मृदु रम्य शय्या ! ॥ ४१
धाता तयां तरुतळीं वसती अशी दे । कां हा रची स्फटिकधाम उगाच खेदें ?
हो कंद मूल फल हें जर यांस खाद्य । विश्रांत निर्मि विधि कां अशनें सुखाद्य ?
हे वल्कलें जर निषेविति चारुगात्र । होवोनियां जटिल, यापरि राजपुत्र ॥
वाटे, अनेकविध वस्त्रविभूषणादि । वायांचि निर्मुनि जगीं विधि काय साधी!"
कोणी असें वदति, "हे सहजीं सुकांत । झाले स्वयें प्रकट, यां न विधी सृजीत
श्रुत्युक्त सृष्टि विधिनिर्मित होय लोकीं । नेत्र श्रुती, मन अशांस सुगम्य हो कीं ४२
देखा चतुर्दश जरी भुवनेंहि सारीं । ऐसे कुठें नर कुठें अशि होय नारी ?
पाहूनि यांस, विधि तन्मय होय चित्तीं । ऐशाच तो घडवुं पाहि सुरम्यमूर्ति
केले बहु श्रम परी घडवूं शकेना । ईर्ष्येमुळें विपिनिं ने; दडवीत यांना ! ! "
कोणी असें म्हणति " आम्हि विशेष नेणूं । आम्ही परी परमधन्य अम्हांस मानूं ! ४४
ते पुण्यपुंज समजूं अम्हि मात्र चित्तीं । यां पाहिलें जिंहिं, पहातिल जे पहाती"
ऐशा प्रियोक्ति वदतां वदतां अनेक । नेत्रें तदीय करिती किति अश्रुसेक ! ४५
उद्गारिती "कठिण मार्ग किती अगम्य ! यांच्या तनू तर किती सुकुमाररम्य !"
प्रेमामुळें विकल होति समस्त नारी । कीं चक्रवाकललना निशिं आर्त भारी ! ४६
इति श्रीराम० अयोध्या. ग्रामनिवासिनीप्रेमलक्षणाभक्तिवर्णनं नाम पञ्चदशस्तरङ्गः

तरंग १६ वा

चिंतूनि चित्तिं मृदुसत्तम पादकंजें । रानांतले कठिण मार्ग अगम्य कीं जे ॥
त्यांचीं उरें गहिंवरें भरुनी वियोगें । त्या बोलती कळवळोनि निजांतरंगें ॥१॥
" हीं स्पर्शिलीं मृदुमृदू चरणोत्पलांहीं । संकोचते क्षिति, उरें जशि आमुचीं हीं
जो यांसि देइ जगदीश वनाधिवास । तो मार्गिं कां न पसरी मृदु पुष्पराश ?
जं प्रार्थिलें जर करीत असेल धाता । नेत्रांत यांस अमुच्या सखि ! ठेवुं आतां !"
जं कोणि त्या समयिं आधिं न तेथ आले । सीतारघूत्तम न त्यां बघण्या मिळाले
त्यांचें सुरूप कळतां पुसतात सार्ते । "आतां अहो ! कुठवरी असतील जात ?"
तैं पाहण्या पळत जाति समर्थ त्यांत । लाभोनि जन्मफल इष्ट फिरोनि येत !
पस्तावती कर जुडूनि अतीव चित्तीं । म्हातारि आणि अबला तशि बालकें तीं
श्रीराम जात सुखकारण जेथ जेथ । प्रेमास पूर जनिं ये अति तेथ तेथ ! ५

प्रत्येक गांवि अतिहर्ष असाच होय । पाहोनि भानुकुल-कैरव-चंद्रराय ! ॥
तद्वृत्त ज्यां मिळतसें श्रवण्यास कर्णी । त्यांनीं सदोष गणिले नृप आणि राणी
कोणी म्हणे "नरपती अति चांगला हो । आम्हां तयें वितरला नयनांस लाहो!"
कोणी स्त्रियापुरुष बोलति एकमेकीं । सौहार्दयुक्त सरलें वचनें अशीं कीं– ७
" ते धन्य तात–जननी, सुत हे जयांचे ! । तें धन्य हो नगर जेथुन येति साचे
तो देश, शैल, वन धन्य! सुधन्य गांव! ज्या जागिं जाति जगिं ते अति धन्य ठाव
हे होति मित्र जगिं ज्यांप्रति, तेहि धान्य!। त्यां निर्मिणार विधि धन्य तसा वदान्य"
श्रीरामलक्ष्मणकथा अति रम्यसारा । आच्छादुनी भरित तो वनमार्ग सारा ! ९
रघुकुलकमलाचा भानु तो या सुरीतीं । सुख नितरित लोकां चालला राममूर्ति
निरखित विपिनांतें संगिं सौमित्रि सीता । अतिशय सकलांना अंतरीं तोषवीता,
श्रीराम हो पुढतिं, लक्ष्मण मागुतीं हो । त्यां वेष तापसहि शोभत तो किती हो !
दोघांमधें कशि विराजत रामजाया ? । ती ब्रह्म–जीवयुगलामधिं काय माया !११
सांगूं पुन्हां कशि दिसे छवि मन्मनासी । जाणो वसंत-मदनांमधिं ती रतीशी !
वाटे मना फिरुनियां, उपमा बरी हे । कीं रोहिणी विधु-बुधांमधिं शोभताहे !
टाकीत रामपदचिह्नित ठायिं पाय । सीता सभीति धरणीवर मार्गिं जाय ॥
सीतारघूत्तमपदांकित वर्जुनी ते । सौमित्र चालत पथीं उजवें तयांतें ! ॥१३॥

सीता, लक्ष्मण, राम यांमधिल ती प्रीती अती उज्ज्वला ।
वाचाऽगोचर जी कदापि नच ये वर्णावया निर्मला ॥
त्यांच्या सुंदर मूर्ति पाहुनि मनीं तल्लीन पक्षी मृगें ।
जाणों राम वनामधें विचरतां चित्तेंचि चोरूनि घे ! ॥ १४ ॥

ज्यांनीं ज्यांनीं देखिले ते प्रवासी । दोघे बंधू जानकी संगिं ज्यांसी ॥
आनंदें ते अश्रमें संपवीती । संसारींची दुर्गमा मार्गपंक्ति ! ॥ १५ ॥
स्वप्नींही ज्यां आजही पुण्यचित्तां । राहों आले रामसौमित्रसीता ॥
त्यांना लाभे रामनामीं निवास । कष्टें केव्हां लभ्य जो योगियांस ॥१६॥
जाणोनीयां जाहली श्रांत सीता । शीतच्छायाही वटाची नितान्ता ॥
पाणी तेथें स्वच्छ पाहूनि राही । घ्यायासाठीं तेथ विश्रांति कांहीं ॥१७॥
सेवोनीयां कंदमूलें फलें ते । जाती मार्गे स्नान होतां प्रभातें ॥
वाटे देखे तैं तळीं शैलरानें । रम्यें सारीं पाहती आदरानें ॥ १८ ॥
वाल्मीकींच्या आश्रमा राम येती । त्याची शोभा वर्णण्या केविं ये ती ? ॥

पुण्यें तीर्थें काननें शैलराजि । रम्यें पद्में भूषवीती सरां जीं ॥ १९ ॥
पुष्पें शोभा देति वृक्षां वनांत । भृंगालीही दंग ज्या गुंजनांत ॥
आस्वादीती रम्यगंधा मरंदा । लोभोनीयां लोभनीयारविंदां ॥ २० ॥
खगमृग अतिहर्षें आश्रमीं संचरीती । कलमधुररवांनीं त्या स्थलातें भरीती॥
मुदित मन तयांचें, वैर ना अंतरांत । रघुवर निरखी त्या आश्रमा हृष्टचित्त
पाहूनि त्या पावन रम्य आश्रमा । राजीवनेत्रा सुख हो रघूत्तमा ॥
ऐकोनि रामागमनासि ते मुनि । तत्स्वागता बाहिर येति हर्षुनी ॥ २२॥
साष्टांग रामें नमिलें मुनींप्रति । आशीर्वचें विप्रवरें दिलीं किती ! ॥
रामा बघूनी मुनिचीं विलोचनें । निवालिं; त्यां मानुनि आश्रमांत ने २३
प्राणप्रियां त्या अतिथींस पावुनी । त्यां बैसवी आसन योग्य देउनी ॥
तो मागवी गोड फलाशनें मुनी । सीतेसवें सेविलि रामलक्ष्मणीं ॥ २४ ॥
बघूनि ती मंगलमूर्ति लोचनीं । वाल्मीकितें हर्ष भरे अती मनीं ॥
श्रीराम जोडूनि करांबुजें वदे । जी गोड वाणी श्रवणांस सौख्य दे:–२५
" त्रिकालदर्शी मुनिवर्य सत्तमा ! । हें विश्व बोरांपरि हातिंचि तुम्हां ! "
ऐसें वदोनी कथि सर्व राघव । राज्ञी कसें दे वन आपणास्तव ! ॥२६॥
" आज्ञा पित्याची, जननीसही हित । राज्यासि बंधू भरतासमीं स्थित॥
मलाहि हा दर्शनलाभ आपला । पुण्यप्रभावा नच माझिया तुला ! २७
मुनिवर ! पदकंजें देखिलीं आपुलीं हीं । सुकृत सकल माझें पावलें सत्फलाही
प्रभु मज तुम्हि आज्ञा द्याल तेथें वसेन । मुळिंहि मुनिजनांना कांहिं उद्वेग हो न
जे क्लेशवीति नृपती मुनितापसांतें । अग्नीविनाहि नृप भस्मचि व्हायचे ते ॥
आधार विप्रपरितोषचि मंगलांचा । विप्रप्रकोप कुलकोटिस जाळि साचा ! २९
आणोनि हें मनि कथा मज ठाव ऐसा । सौमित्रिजानकिसवें चलुं तेथ वासा
तेथें रचूं रुचिर पर्णकुटी तृणांनीं । काढूं तिथें समय कांहिं तुम्हां स्मरोनी" ३०
श्रीराघवोक्ति सरला सहजा रसाला । ती 'साधु साधु' म्हणुनी मुनि शंसि भाला
बोले " रघूत्तम ! कसें न असें वदाल ? । तुम्हांविना नच दुजा श्रुतिसेतुपाल

श्रुतिसेतुप्रतिपालक राघव, माया प्रभुची जानकी, ।
निर्मी, पाळी, नाशी जग जी दयाघना ! तव मतें निकी ! ॥
सहस्रशीर्षी अहीश भूधर लक्ष्मण नायक चराचरा, ।
धृतनृपतनु सुरकार्यां चलतां खलरक्षोबलसंहारा ॥ ३२ ॥

रामा ! तुझें रूप वचा अगोचर । अगम्य धीतें, न कळे परात्पर ॥
अपार गातीं श्रुति ' नेति नेति ' जें । द्रष्टा प्रभो ! तूं जग दृश्य हें तुझें!
इति श्रीरामचन्द्रवाल्मीकिमीलनपरस्परयथार्थवार्तावर्णनं नाम षोडशस्तरङ्गः

तरंग १७ वा

तूं नाचवीशी विधि-विष्णु-शंभुतें । त्यांही तुझें मर्म कळेहि ना च तें ! ॥
जाणेल तुम्हां मग कोण दूसरा ! । ते जाणती, प्रेरण ज्यां तुम्ही करां ! १
जाणोनि तुम्हां तुमच्यांत लीन ते । होती त्वदाकार तुम्हांस जाणते ॥
भक्तांचिया हृन्नभिंच्या निशाकरा । त्वत्प्रेरणेनें तव भक्त हो खरा ! ॥२॥

चिदानंदमया रूपा अविकार्या अशा तुम्हां ॥
जाणती अधिकारीच भक्त ते पुरुषोत्तमा ! ॥ ३ ॥
घेतली नरता तुम्हीं देव—सज्जन पाळतां ॥
सामान्य नृपसे येथें चालतां आणि बोलतां ॥ ४ ॥

लीला बघून तुमच्या जडजीव मोहे । ज्ञाता परी हृदयिं सौख्य अतीव लाहे!॥
उक्ती कृती जगिं खऱ्या तुमच्याच होती । साऱ्या क्रिया प्रभुवरा ! तुमच्याच हातीं
' राहूं कुठें ?' पुसतसां मज रामराया ! । संकोचतों परि तुम्हांप्रति मी पुसाया॥
नाहीं कुठें ? तुम्हि वदा मज ठाव ऐसा । दावीन मी मग तुम्हां स्थल योग्य वासा !६

* ॥ इति श्रीरामचन्द्रवाल्मीकिसंवादवर्णनं नाम सप्तदशस्तरङ्गः ॥ *

तरंग १८ वा

परिसुनि मुनिवाक्यें प्रेमपूर्णें रसार्द्रें । स्मित सविनय केलें अंतरीं रामचंद्रें ॥
पुनरपि वदुं लागे उक्ति वाल्मीकि मोदें । अमृतमधुर गोडी जींत अत्यंत नांदे!
" रामा ! तुम्हां कथिन मी परिसा निकेत । राहाल लक्ष्मणसमेत, ससीत जेथ
तो आवडेलचि निवास तुम्हां सदैव । राहाल तेथ सुखसागर देवदेव ! ॥२॥
ज्यांचे शुचि श्रवण अब्धिसमान होत । ज्यांतें नद्या,–शुभकथा तुमच्या अनंत
येती निरंतर परी, परिपूर्ण ना हो । त्यांचे हृदीं रघुवरा ! तुम्हि हे रहा हो! ३

ज्यांचे लोचन चातकांसम तुम्हां मेघास आकांक्षती ।
मानोनी सरिता, सरें जलधिही सारींच तुच्छें क्षितीं ॥
होती जे सुखमग्न लाभुनि विभो ! त्वद्रूपबिंदू, पहा,—
त्यांच्या सौख्यमयीं हृदीं जनकजासौमित्रिसंगीं रहा ! ॥ ४ ॥

तुमच्या यशःसरोवर-मानसिं जिह्वामरालिका ज्यांची ॥
वेंची गुणगण-मुक्ता रामा ! तन्मनिं तुम्हीं रहावेंचि ! ॥ ५ ॥
आमोद सुंदर शुचि प्रभुचा प्रसाद । यन्नासिका सतत सेवुनि घे प्रमोद ॥
ज्यां सेव्य भोजन निवेदुनि आधिं तुम्हां। त्यांच्या असो मनिं निवास तुम्हांस रामा!
ज्यां वस्त्रभूषण असे प्रभुच्या प्रसादीं । यच्छीर्ष देव-गुरु-विप्र सभक्ति वंदी ॥
त्यांच्यासि वर्तन जयां नित नम्रभावें। त्यांच्या हृदब्जिं रघुनाथ ! तुम्हीं रहावें
ज्यांच्या करीं घडत रामपदाब्जपूजा । विश्वास रामचरणांबुजि अंतरीं ज्यां ॥
ज्यांचीं पदें चलति आवडिं रामतीर्था। त्यांच्या मनीं वसति राम ! तुम्हां यथार्था
जे नाम राम ! जपती तुमचें अखंड । जाणोनि मंत्रवर तो शुभ दे उदंड ॥
जे पूजितीहि परिवारसमेत तुम्हा। त्यांच्या हृदीं वसति योग्य तुम्हांस रामा! ९
नानाविधा करिति तर्पण–होम कर्मे । विप्रादि भोजविति देउनि दान धर्मे
तुम्हांहुनीहि बहु मानिति जे गुरूंतें । संमानिती, करिति सेवन भक्तिचित्तें
जे कर्मजात करिती, फल एक लाभो । कीं चित्त रामचरणांवरि नित्य लोभो !
त्यांच्या मनःसदनि लक्ष्मण आणि सीता। यांच्या समेत वसती प्रभुलागिं युक्ता
ना काम कोप मद मान, न मोहलोभ । न क्षोभराग नच मत्सर शाठ्यदंभ ॥
मायाहि ना लवहि वास करीत ज्यांत। त्यांच्या हृदीं वसति राम ! तुम्हांस युक्त!
सर्वांस आवडति, सर्वहिता करीती । दुःखें सुखें सम जयां, स्तुति-निंदनें तीं
ज्यांची प्रियोक्ति सुविचारयथार्थसारा। त्यांच्या मनीं प्रभु ! सुयोग्य तुम्हांस थारा!
झोंपेंत जागृतितही नच अन्य कांहीं । तुम्हांविना शरण ज्यांप्रति अन्य नाहीं
तुम्हांविना नच गतीहि जयांस दूजी। त्यांच्या मनांत करणें वसती तुम्ही जी! १४
मातेसमान गणती परकीयनारी । अन्यस्व मानिति विषाहुनि जे विषारी ॥
त्यांच्या विशुद्ध हृदयांतरिं रामराया ! आहे सुवास अपुल्यास सुखें रहाया १५
हो हर्ष ज्यांस बघुनी परसंपदेतें । ज्यां तीव्रदुःख मनिं अन्यविपत्ति देते ॥
ज्यां प्राणसे प्रिय, तुम्हीच अनन्य रामा !। त्यांचें असो मन शुभंकरसद्म तुम्हां
स्वामी, सखा, गुरु, पिता जननी जयांस। आहांत एक तुम्हि राघव कीं अशेष
तच्चित्तमंदिरिं करा प्रभुजी ! निवास । सीतेसमेत तुम्हि बंधुयुग स्वतांस १७
जे अन्यदोष वगळीति गुणांस घेती । जे विप्रधेनुहितिं संकटही सहाती ॥
ज्यां नीतिधर्मचरितां जग साक्ष मानी । त्यांच्या मनीं तुम्हि रहा सुखसन्निधानीं
जे, दोष ते समजती अपुलेच सारे । जे जाणती गुण तसे तुमचे बिचारे ॥

विश्वास सर्वपरिं ज्यां तुमचाच होय । त्यांच्या मनीं तुम्हि वसा प्रभु रामराय!
ज्यां जातपात, धन, केतन, धर्म, मान । तैसा प्रियाप्तपरिवार सुख त्यजून॥
हो चित्तवृत्ति तुमच्यांत विलीन रामा ! । त्यांच्या करा जि! निजमंदिर चित्तधामा
जे स्वर्गमुक्ति नरका गणुनी समान । जेथें तिथें बघति रूप भवनिधान ॥
जे कायवाङ्मनसिं सेवक होति तुम्हां । हो तन्मनीं सुखनिवास तुम्हांस रामा!
केव्हांच ज्यांस नच आस अशी कशाची । तुम्हांवरी अति रती सहजाच ज्यांची
ज्यां रामभक्त असती प्रिय सर्वभावें । सीतेसवें तुम्हि तदंतरिं हो! रहावें!"२२
इति श्रीराम.अयोध्याकाण्डे श्रीवाल्मीक्युक्तिवेदसिद्धान्तवर्णनंनामाष्टादशस्तरङ्गः

तरंग १९ वा

ऐशापरीं मुनिवरें कथिले सुवास । त्या प्रेमलोक्ति रुचल्या अति राघवास ॥
बोले पुन्हां मुनि "विभो! रघुराय! ऐका। सांगेन आश्रम सुखात्मक आज जो कां
हो चित्रकूट गिरि, ज्यामधिं वास तुम्हां । होईल सर्व सुखकारि सुयोग्य रामा!॥
अद्री मनोहर, अरण्य सुचारु ज्यांत । संचारती करि-हरी, मृग, पक्षिजात ॥२॥
अत्रिप्रियेनें अपुल्या तपोबलें । मंदाकिनीस्रोत जिथें विनिर्मिलें ॥
सुरापगा पातकपोतकांप्रति । जी डाकिनीचेपरि काय नाशिती ! ॥ ३ ॥
मुनींद्र अत्र्यादिक भूरि जे तिथें । जपीं, तपीं, योगि तनूसि वंचितें ॥
त्यांच्या श्रमा सार्थ करावया चला । तिथें प्रभो! गौरव द्या वराचला ॥४॥
चित्रकूटमहिमा ऋषिवर्यें । गाइला अमित तो न वदों ये ॥
येउनी मग तिथें सरितेंत । न्हात राघव स-लक्ष्मणसीत ॥ ५ ॥
श्रीराम सांगे " बघ घाट, लक्ष्मणा । येथें रहाया कर ठाय आपणां " ॥
तैं "पश्चिमे शैल दिसे कडा भला । सभोंतिं चापाकृति ओघ लाभला! ६
त्या चापाची हे नदी ज्या-समाना । बाणस्थानें शांतिदानां दमांना ॥
अद्री वाटे पारधी चित्रकूट । ज्याच्या नेमा ये न केव्हांच तूट ! " ॥७॥
बोलोनी हें लक्ष्मणें दाखवीतां । स्थानें, होई राम संतुष्टचेता ॥
रामा झाला मोद जाणोनि तेथें । इंद्रादी तैं जाहले देव येते ॥ ८ ॥
वेषें होती देव कोळीकिरात । बांधोनीयां पर्णशालादि देत ॥
त्यांची शोभा निर्मिती नेत्रलोभा। गाभा ज्यांचा वास हो श्यामलाभा! ॥९॥
अवर्ण्य त्या दोनहि पर्णशाला । लहान एका दुसरी विशाला ॥

किरातवेषीं सुर भक्तिभावें । रचूनि देती, प्रभु कीं वसावे ॥१०॥
रघूत्तमें लक्ष्मण-जानकींसवें । निवासिलीं तीं सदनें स्ववैभवें ॥
तदा गमे कीं मुनिवेषिं राहती । ते पुष्पधन्वा, मधु आणखी रति!॥११॥
॥ इति श्रीराम० ब्रह्मादिदेवकैङ्कर्यवर्णनं नामैकोनविंशस्तरङ्गः ॥

तरंग २० वा

दिक्पाल नाग सुर किन्नर चित्रकूटीं । आले तया समयिं राघवरायभेटी ॥
सर्वांसि त्यां नमन आचरि रामराय । हृष्टां सुरां गमत लोचन धन्य होय !॥१॥
तैं पुष्पवृष्टि करुनी म्हटलें सुरांनीं । "झालों सनाथ अजि नाथ ! तुम्हां बघोनी"॥
रामा कथोनि विनयें निजदुःखराशि । गेले स्वलोकिं सुर अंतरिं पूर्ण हर्षी ॥२॥
ये चित्रकूटिं रघुराय रहावयातें । ऐकोनि येति मुनि त्या बघण्यास तेथें ॥
श्रीराम दंडवत त्या करि नम्र भावें । रामा उरीं मुनिजनीं अपुल्या धरावें ॥३॥
आशीर्वचें वितरती मुनि राघवातें । वाणी निजा सुफल कीं करुं पाहती ते !॥
सौमित्रि राम सहजानकि यां बघोनी । ते मानिती सुफलता दिलि साधनांनीं॥४
सन्मानुनी मुनिगणां मग दे निरोप । त्यांतें रघूत्तम करूनि तयां अताप ॥
ते स्वाश्रमीं परतुनी जप, याग, योग, । पुण्यें तपें करिति सर्व मुदंतरंग ॥५॥
— + इति सर्वमुनिकृपाप्रेमवर्णनं नाम विंशस्तरङ्गः + —

तरंग २१ वा

कोळी-किरातां जंव वृत्त तें कळे । गमे निधींचा नवकोष त्यां मिळे ! ॥
येवोनियां चालत आपुल्या घरीं । प्रहृष्टता सेवित त्यां तयापरी ॥१॥
द्रोणांत कंदफलमूल भरोनि त्यांनीं । आणीयलें रघुवराप्रति हर्षपूर्णी ॥
ते येति धांवत समुत्सुक रामराया । रंकें जणों कनककोष लुटून न्याया ! ॥२॥
आलोकिले प्रथम दोनहि बंधु ज्यांनीं । त्यांना दुजे पुसति त्यांत पथीं मिळोनी ॥
वानीत सेवित कथामृत राघवाचें । सारेच्चि येति जन ते प्रभुपाशिं साचे !॥३॥
जोहार ते करित, भेटि पुढें धरीत । न्याहाळितां प्रभुसि भक्तिभरें भरीत ॥
होती तटस्थ जणुं चित्रित ते अनेक !। रोमांच देहभरिं, नेत्रिं मुदश्रुसेक॥४॥
श्रीराम जाणत तयां अति भक्तिपूर्ण । सन्मानि त्यां प्रिय सदुक्ति मुखें वदून ॥
ते लोकही अमित आदरिं त्या नमीती । जोडोनि अंजलि विनीत करीति उक्ति ॥

"हे नाथ! आज अम्हि धन्य सनाथ झालों। कीं देखुनी प्रभुपदांसि अतीव धालों !
हें आमुचें अतुल भाग्य विशेष होय। आलांत येथ रघुनायक रामराय ! ।।६।।
तें धन्य भूमि, वन, पंथ, गिरि प्रदेश। जेथें जिथें प्रभुपदांबुज लग्न लेश !
ते धन्य काननविहंग, मृगादि वन्य। पाहूनियां प्रभुसि जन्म तदीय धन्य !।।७।।
हें आम्हि सर्व परिवारसमेत धन्य। जे पाहतों नयनिं विश्वविभू अनन्य ।।
केला निवास तुम्हि योग्य विचारिं येथ। सारे ऋतू प्रभुजि ! येथ वसा सुखांत।।८।।
होऊं तुम्हांस अम्हि सेवक सर्वरीतीं। व्याघ्रादि सिंह गज वारुनियां वनान्तीं।।
हीं उंचनीच गिरिकंदर, खोरिं रानें। आम्हीच जाणत असूं सगळीं क्रमानें ।।९।।
जेथें तिथें प्रभुवरा ! मृगयाविहारा। नेऊनि दाउं सर निर्झर भाग सारा ।।
सेवूं तुम्हांस परिवारसमेत आम्ही। संकोच सोडुनि नियुक्त करा जि ! कामीं" १०
ज्याचीं वचें निगम, जो करुणानिवास। जो नाकळे मुनिमनासहि अप्रयास
तो आयके प्रभु किरातवचें सभक्ति। जैसा पिता परिसतो मृदुबालकोक्ति ! ११
प्रीतीच केवळ रुचे प्रभुला विशुद्धा। जाणूं पहाति, हृदिं घेउत याच बोधा ।।
श्रीराम त्या वनचरांप्रति तोषवीत। बोलूनि गोड वचनें करुणार्द्रचित्त ।।१२।।
देतां निरोप, विभुतें नमुनी किरात। जाती गृहा प्रभुगुणां कथित अवीत ।।
ते दोन बंधु सहजानकि या सुरीतीं। रानीं वसोनि सुख देव-मुनींसि देती १३
जेथून वास करि राघव त्या वनांत। तेथून सर्व वन मंगलदायि होत ।।
पुष्पीं फलीं बहरले तरु वैभवानें। वेष्टूनि वल्लरिगणीं बनलीं वितानें ।।१४।।
त्यांची विभा बघुनि कल्पतरूसमान। ते तेथ येत जणुं नंदनही त्यजून ! ।।
गुंजारवा करिति मंजुल भृंगपंक्ति। वायूहि मंद मधुगंधभरें वहाती ।।१५।।
तेथें मयूर कलकोकिल चक्रवाक। पक्षी चकोर शुक चातक हे अनेक ।।
गाती मनोज्ञ मधुर श्रुतिरम्य नादीं। आधी तुरेचि; भरती हृदयें प्रमोदीं १६
सोडून वैर वनिं संचरती सुसंग। शार्दूल कुंजर वराह कपी कुरंग ।।
श्रीरामराय मृगयेस्तव जाय रानीं। सानंद होय मृगवृंद तया बघोनी ! ।।१७।।
विश्वांत देवविपिनें जितुकीं तयांनीं। पाहूनि रामवन गाइयलें स्तवोनी ।।
श्रीरामवास वितरी सुषमा वनास। ना नंदनासहि तशी मिळणार लेश ! १८
सुरापगा, भानुसुता, सरस्वती, । गोदावरी, मेकलजा, शुभा अति ।।
सारीं वनें, सिंधु नदीनदादि ते। मंदाकिनीभाग्यचि थोर वानितें ।।१९।।
कैलास शैल उदयास्तगिरी महा जे। ते मेरु-मंदर जिथें सुरवास साजे ।।

तैसे हिमाचल असे गिरिराज सारे । ते चित्रकूटयश गाति बहुप्रकारें ! ॥ २० ॥
हो विंध्य पर्वत अतीव सुखांत मग्न । त्याच्या उरीं अमित हर्ष समावला न ॥
त्याला श्रमांविण महत्त्व अनंत आलें । कीं चित्रकूटिं रघुराय निवास झाले ! २१
'जे चित्रकूटिं असते मृगपक्षिजात । वेली, तरू, तृण, रजःकणही अनन्त ॥
ते पुण्यपुंज, अति धन्य' अशी प्रशंसा । रात्रंदिनीं करिति देव मुदें सुघोषा २२
जे नेत्रवंत बघती रघुवंशनाथा । त्यां जन्म सार्थ गमला, नच दुःखवार्ता ॥
ज्या स्पर्शले चरणरेणु रघूत्तमाचे । त्यां स्थावरांहि पदसत्तम लभ्य साचें ! ॥२३॥
तें चित्रकूटवन रम्यचि जें विशेषीं । हो मंगलायतन पावन पावनांसी ॥
कैशापरी सकल तन्महिमा वदावा । जेथें सुखाब्धि रघुनाथनिवास व्हावा ? । २४
क्षीराब्धि टाकुनि तशी त्यजुनी अयोध्या । श्रीराम लक्ष्मण ससीत वनांत बुद्ध्या ॥
ज्या राहती, कशि तया वनिंची वदावी । शोभा सहस्रशत शेषिंहि सार्थ भावीं !२५
तेथें शकेन किति मी करुं वर्णनातें । कीं क्षुद्रकूर्म शकतें धरुं मंदरातें ? !
वाक्चित्तकर्मिं करि लक्ष्मण रामसेवा । तत्प्रेमशील महिमा कुणि सर्व गावा ?! २६

क्षणोक्षणिं विलोकुनी सदयरामसीतापदें ।
बघोनि अति आपुल्यावरिल भाव त्यांचा मुदें,– ॥
कधीं न निज मानसिं स्मरण लक्ष्मणा स्वप्निंही ।
स्वगेह, निजतात, वा स्वजननी असें हो मही ! ! ॥ २७ ॥

श्रीरामसंगिं सुखिता अतिमात्र सीता । गेहा, पुरा परिजना लव नाठवीतां;
आलोचतां प्रियतमाननचंद्रमूर्ति । जाणों चकोरयुवती अति हर्षिता ती ! २८
प्रीति प्रियांतरिं बघे निज वृद्ध जी कीं । देखोनि हृष्ट दिवसां जशि चक्रवाकी ॥
सीतामनींहि रति रामपदाब्जि ऐसी । साकेतकोटिपरि मानि मनीं वनासी ! २९
तीतें प्रिया दयितसंगतिं पर्णशाला । तैसा कुरंगमृग सत्परिवार झाला !
श्वशुरू मुनीन्द्रगृहिणी, मुनि सासरेसे ! । तें कंदमूलफल तीस सुधाच भासे !३०
नाथासवें गमलि सुंदर पर्णशय्या । कीं कामकोटिशयनोपम सौख्य द्याया ! ॥
जीचा कृपानयन निर्मित लोकपाळां । मोहावया विषय शक्य न हो तियेला !
रामासचि स्मरुनि देति जन त्यजून । सार्‍यां विलासविषयांसि तृणांसमान !
सीताहि विश्वजननी दयिता प्रभूची । टाकी तयां, नवल यांत मुळीं नसेचि !!

॥इति श्रीराम० सेवकसेव्यभाव-चित्रकूटयथार्थपल्लवर्णनं नामैकविंशस्तरङ्गः॥

तरंग २२ वा

होतील हृष्ट जरि लक्ष्मण आणि सीता। तैसेंचि राम करि, बोलत त्याच वृत्ता॥
सांगे पुरातन कथा रघुनाथ त्यांना। सीता सलक्ष्मण सुखावत ऐकतांना १

जेव्हां अयोध्यास्मृति होइ रामीं। अश्रू भरे तन्नयनाब्जधामीं॥
मातापिता सानुज आत्मलोक। त्या आठवोनी हृदिं होत शोक!॥ २॥
स्मरे तयातें भरतांतरींची। सद्वृत्ति सेवान्वित भक्ति साची॥
भरूनि येई जरि राघवोर। वेळा न ती चिंतुनि सेवि धीर!॥ ३॥
रामासि पाहोनि सशोकचित्ता। होती तसें लक्ष्मण आणि सीता॥
वैक्लव्य लागे हृदिं त्यांहि याया। नरानुसारी जणु काय छाया?॥ ४॥

सीतालक्ष्मणचित्तवृत्ति बघुनी श्रीराम ज्याचें मन।
कारुण्यें भरलें, सदा निववि जें भक्तोर कीं चंदन॥
सांगे पुण्यकथा पुरातन, नव्या, ज्या आवडाव्या बुधा
सीतालक्ष्मण तोषती पिउनियां त्या श्रोत्रपेया सुधा!॥ ५॥
सीतालक्ष्मणरामचंद्रसहिता अत्यंत शोभा धरी।
पुण्या पर्णकुटी मनोहरतमा श्रीचित्रकूटावरी॥
स्वर्गीच्या अमरावतींत वसती ती नंदनासन्निध
जेथें राहि शची-जयंतसह कीं देवेन्द्र रामाभिध!॥ ६॥
सीतालक्ष्मणरक्षणीं जपतसे श्रीराम कैसा सदा!
जैशा लोचनगोलकांसि जपती त्या पापण्या सर्वदा॥
सेवी लक्ष्मण, जानकी-रघुवरां तैसेंचि, जैसा कुणी—
शुश्रूषा तनुची करी पुरुष, जो नोहे विवेकी मनीं!॥ ७॥

ऐसा करीत सुखवास वनास राम। पक्ष्यां, मृगां, मुनिसुरां करि सौख्यधाम॥
आर्णे वनांत विभुचें शुभ गाइलें हें। आतां सुमंत परते पुरिं केविं पाहें!॥८॥
रामासि पोंचवुनि जों गुह येत मागें। तों त्या सुमंत्र दिसला, रथ त्याजसंगें॥
पाहे निषाद सचिवा अतिशोकधामा। यातें विषाद भरला नच ज्यास सीमा!
'हे राम! राम! अयि लक्ष्मण! देवि सीते!'। हें कोशुनी सचिव लोळण घे क्षितीतें!
पाहोनि दक्षिणदिशीं, हय खिंकळीती। पंखाविना विकळ कीं खग दीन चित्तीं।
चारा न खाति, जलपानहि ना करीती। नेत्रांतुनी स्रवत अश्रुजलें किती तीं।

ऐशा हयां बघुनियां प्रिय राघवींयां । वृत्ती निषादमनिं हो अनुकंपनीया ! १९

॥ इति श्रीराम० श्रीअयोध्याकांडे सव्यसेवकभाव श्रीअयोध्यावासि-
मार्गवासिविरहोत्पन्नश्रीरामबनवासपूर्वार्धसमाप्तिवर्णनं नाम द्वाविंशस्तरङ्गः॥

(अयोध्याकांड पूर्वार्ध समाप्त.)

अयोध्याकांड उत्तरार्ध प्रारंभ

तरंग १ ला

धैर्या धरूनि वदला मग तो निषाद । "आतां सुमंत सचिवा ! न करीं विषाद
आहांत पंडित तुम्ही परमार्थवेत्ते । धैर्या धराचि हृदिं, दैवचि वाम हो तें!" १
त्यातें कथा विविध सांगुनि मंजुलोक्तीं । तो त्यास बैसवि रथांत धरूनि हस्तीं ॥
शोकाकुला, रथहि त्याप्रति हांकवे न । चित्तास रामविरहार्ति करीत दीन ! २
घोडेहि ते चरफडोनि न मार्गिं जाती । कीं वुंपिलीं वनमृगेंचि नवीं रथा तीं !
व चालतां पडति, पाहतिही वळोनी । ना साहिला मुळिंहि रामवियोग त्यांनीं !
जो नाम 'लक्ष्मण' 'रघूत्तम' 'जानकी' घे । खिंकाळुनी हय तया बघती सुरागें
अश्वस्थिती प्रभुवियोगिं कशी वदावी ?। जैशी मणीविण फणिस्थिति दीन व्हावी
पाहोनि ते सचिववाजि, निषादचित्त । होई विषादयुत जें नच वर्णु येत ॥
बोलावि चार निजसेवक साह्यकर्ते । देऊनि सारथिहि संगतिं देत त्यातें ५
सर्वांसि पोंचवुनियां गुह येइ मागें । त्याचा विषादभर वर्णुनि कोण सांगे ?
गेले सुमंतसह जे सगळे निषाद । त्यांना क्षणोक्षणिं भरे हृदयीं विषाद ॥६॥
चिंती सुमंत अतिदुःखित शोकदीन । "धिग् जीव हा रघुपतीविण सौख्यहीन।
हा नीच देह नच अंतिंहि राहणारा। कां घे न कीर्ति ? तुटतां रघुवीर थारा!
हे प्राणहो! तुम्हि न कां करतां प्रयाण ?। कां व्हां अघास, अयशास धनी, अजाण?
धिग् धिङ् मना! चुकशि मंदपणें सुसंग !! अद्यापि हे हृदय! होशि न कां दुभंग?
चोळी करां, बडवि शीर्ष, रडे सुमंत । वाटे गमावुनि बसे कृपण स्वचित्त !॥
कीं शूरवीर बिरुदीं अति गाजलेला । माघार घेऊनि रणांतुनि काय आला !
कोणीं विवेकयुत साधु, सुवंशजात । वेदज्ञ विप्रवर मद्य बळेंचि पीत ॥
त्यातें जसा हृदयिं शोक, तसा सुमंत । श्रीराघवादिक विना स्वपुरासि येत १०
जैसी कुलीन, ललना, बुध, साधुशीला । बाक्कर्मचित्तिं पति दैवत हो जियेला

देवें तयें त्यजिलि राहि अशह्य शोकीं । तैसा सुमंत अति दुःखित होत तो कीं !
डोळ्यांत अश्रुभरिं अंधुक दृष्टि होई। ना ऐकवे श्रवणिं, हो मति मूढ कायी!
हो शुष्क ओष्ठ, मुखशक्ति पळेचि दूर। न प्राण जाति ! अवधी हृदिं रोधि दार! !
झाली विवर्ण मुख-भा, बघवे न त्यातें,। मातापिता जणुं तयें वधिलेचि घातें!
व्यापी अतीवचि तयामनिं हानि, शोक। पापी जसा यमपुरीपथिं वाहि धाक !
त्या बोलवे न हृदिं पोळत यातनांनीं। चिंती मनीं, "नगरिं काय बघू रिघूनी !
जो कोण रामविण हा रथ पाहणार । साशंक तो बघिल कीं मजलाचि फार!
येवूनि पौर मज धांवत आर्तचित्त । नारीनर व्यथित जैं पुसतील वृत्त ॥
वज्रापरी करुनि निष्ठुर मन्मनातें । देणें पडेल मज उत्तर त्यास कीं तें !१५
मातें विचारतिल सर्वहि राममाता । शोकार्त त्यांसि वदुं काय जि ! मी सुवार्ता?
जेव्हां पुसेल जननी मज लक्ष्मणाची । हा देव ! सांगुं सुखवृत्ति तिला कुणाची ?
कौसल्या जैं धांवुनी ये पुसाया । वत्सासाठीं गाय जैसी स्वकीया ॥
तीतें सांगू काय मी "गे ! वनान्ता । गेले ! गेले ! राम सौमित्र सीता !!"? १७
जो जो पृच्छा तेथ मातें करील। त्यातें त्यानें मी वदूं हेचि बोल ? ॥
जावोनीयां त्या अयोध्येंत आतां । कचीं सौख्यें लाभणें या अनाथा ? ॥१८॥
शोकार्त जैं मज पुसेल नृपाळ दीन । ज्याचे असू असति रामपदां अधीन ॥
सांगू तयास कवण्या उसण्या मुखानें ?–'आलों कुमार वनिं पोंचवुनी सुखानें!'
ऐकेल जैं नृपति सर्व निरोप साचे। सौमित्र-राम-मिथिलाधिपकन्यकांचे ॥
प्राणांस सोडिल तृणांपरि भूपराय । हा हाय ! हाय ! करुं काय ! नंस उपाय!!
जातां सुकोनिहि जल प्रिय रामरूपी । ना पंकसें मदुर भंगतसे तथापि ॥
धाटे दिली मज तनू अशनिप्रमाणें । या यातनांसि सहण्यासचि धातयानें "२१

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादकाव्ये कलिकलुषविध्वंसने श्रीअयोध्याकाण्ड उत्तरार्धे सुमन्तविरहवर्णनं नाम प्रथमस्तरङ्गः ॥

तरंग २ रा

ऐसा करीत हृदिं शोक सरोनि पंथा । ये तो रथें त्वरित कीं तमसातटान्ता ॥
तेणें निरोप दिधले विनयें निषादां । गेले करूनि नमनें, धरुनी विषादां १
संकोच वाटत पुरीं शिरण्या सुमंता । कीं धेनुविप्र गुरु यांप्रति तो निहन्ता !!
बैसोनि वृक्षतळिं घालवि तो दिनातें। संध्यावधी तंवर पातलि त्यास तेथें २

साकेतिं तो प्रविशला तिमिरांत मंत्री। द्वारींच ठेवुनि रथा, गृहिं यत रात्रीं ॥
ज्यां येत ते कळुन वृत्त समग्र, येत। ते पाहण्यास रथ वेशिवरी क्षणांत ! ॥
ते ओळखीति रथ, अश्व गळून गेले। तैं लोकही विकळ घर्मजलें नहाले ! ॥
नारीनर व्यथित पौर समस्त तैसे। कीं मीन ते सलिल आटुनि होति जैसे !
'आला सुमंत' पडलें जव वृत्त कानीं। अंतःपुरीं विकलता अति ये भरोनी !
तीं मंदिरे गमलिं भीषण कीं स्मशानें। दुःखार्तिशोक विकलत्वभरें सुदीनें ॥५॥
राज्ञी तयासि पुसती अतिदुःखदीन। विक्लिन्नवाक् सचिव उत्तर कांहिं दे ना!
तत्क्षणें नायकति, नेत्रीहि शून्यदृष्टि। ज्या त्या पुसे 'नृप कुठें ?' अतिमात्र कष्टीं
पाहोनी त्या दुःखिता तेवि, दासी। कौसल्येच्या मंदिरीं नेति त्यासी ॥
तेथें त्याने पाहिला भूपराय। निष्पीयूषी जो गमे, चंद्र काय ? ! ॥ ७ ॥
नोहे शय्या, नासनी, ना विभूषी। भूमीपृष्ठीं लोळतां म्लानवेषी ॥
जो सुस्कारे टाकितो दुःखमूर्ति। स्वर्गाहूनी भ्रशला की ययाति ! ॥ ८ ॥
दुःखावेगीं वक्ष गेले भरून। कीं सपाती दग्ध पंखीं विकीर्ण।
आक्रंदी तो " राम, सप्रेम राम ! । हे वैदेही ! लक्ष्मणा ! राम ! राम ! " ॥९॥
भूपा बघोनि सचिवें ' जय जीव ' उक्तीं बोलोनि दडवतिं त्या नमिलें सभक्ति
तेव्हा उठोनि नृप बोलत आर्तचेता। "रे सांग, राम मम होय कुठें ? सुमंता !"
भूपें सुमंत्रा धरिलें तदा उरीं। आधार तो त्या बुडत्या कसा तरी-॥
वाटेनि, त्या बैसवि आत्मसन्निधीं। प्रेमें पुसे भूप उदश्रु दीनधी ॥ ११ ॥
" आहे सखा राम मदीय कीं सुखीं ? । कोठें वदें लक्ष्मण-राम-जानकी ? ॥
त्वां आणिले मागुनि कीं वनीं गत ?" । सुमंत तैं लोचनवारिपूरित ! ॥१२॥
पुन्हां पुसे भूप विलापनिर्भर। " निरोप त्याचे वद रे ! मला बरें ! ॥
जे जानकी लक्ष्मण राम सांगती। उक्ती तदीया मज वेगिं सांग ती " ॥१३॥
श्रीरामरूपगुणशीलसुभाव सारे। चित्तीं स्मरे नृपतिसत्तम शोकभारें ॥
"सांगून राज्य वनवास दिला" म्हणे तो। "ना हर्ष खेद मनिं राम परी करी तो
ऐशा मदीय तनया घडता वियोग। हे प्राण ना त्यजति केविं मदीय संग ?
वाटे मला, बघुनि हें नच कोणि पापी। माझ्या समान दुसरा जगतीं कदापि !
जेथें सख्या ! असति लक्ष्मण राम सीता। तेथेंच पोंचवि मला क्षणिं तूं सुमंता!
नाहीं तरी वदतसें तुज सत्यभावें। कीं प्राण हे म्हणति तूर्ण निघूनि जावें!"
पुनः पुन्हां राय विचारि आग्रहें। मंत्र्या सुमंताप्रति " सांग साग्र हें—

जे बोलले मत्प्रियपुत्र काननीं । संदेश ते सांग सख्या ! मला क्षणीं ॥१७॥
करीं सख्या ! तेच उपाय र ! तरी । बचेन जेणें मम नेत्रि सत्वरीं ॥
मदीय सीता, रघुनाथलक्ष्मणां–जाऊं पहाती असु हे क्षणक्षणां ! ” ॥ १८ ॥
धैर्या धरूनि मृदुशब्दिं वदे सुमंत । “ज्ञानी तुम्ही प्रभुजि ! जाणतसां समस्त ॥
आहां धुरंधर पराक्रमि वीर धीर । सत्सेवनीं गमियलें तुम्हि जीवसार ॥१९॥
हे जन्ममृत्यु सगळे सुखदुःख भोग । वा लाभहानि, सुखमीलन वा वियोग,॥
हे काळकर्मवश होति सदैव नाथा !। जैसे निशादिवस येति अखंडसत्तां ॥२०॥
ते अज्ञ हर्षति सुखें, खिजतात दुःखें । दोनी समान मनिं मानुनि धीर ठाके
धैर्या धरूनि सुविचारयुता विवेका । सर्वांप्रती हित करा; त्यजुनि स्वशोका २१
श्रीराम राहि तमसातटिं आद्यवासीं । गंगातटीं वसति हो दुसरी तयांसी ॥
सीतेसमेत रघुनायक-लक्ष्मणानीं । गंगेंत केलिं अपुलीं जलपान, न्हाणीं ! २२
सेवीतसे बहु निषादपती तयांसी । ते शृंगवेरपुरसन्निध रात्रिवासी ॥
होतां प्रभात वटवृक्षज मागवोनी । घे क्षीर राम, शिर भूषवि तो जटांनीं २३
श्रीराममित्र मग मागवि आत्मनौका । सीतेसि तींत चढवी, प्रभुही वनौका
तोही बसे चढुनि लक्ष्मण सज्जचाप । ठाके उभा करित रक्षण सुप्रताप ॥२४॥
त्यातें निदेश मिळतां प्रभुचा, चढोनी, । नौकेत येत मग लक्ष्मण चापपाणि॥
दुःखार्त पाहुनि मला प्रभु धैर्यशील । हे बोलले मजसि मंजुल गोड बोलः—२५
“ हे तात ! मत्प्रणति तातपदीं निवेदा । त्याच्या धरूनि बहुवार पदारविंदां
अत्यंत नम्रपणि तत्पदिं मी पडोनी । हें प्रार्थितों नच करा मम दुःख कोणी !
‘चिंता करा न हृदिं मद्विषयीं जराही । राहूं अम्हीहि वनिं हे कुशलप्रवाहीं ॥
होईल मंगल अम्हांस वनांत सारें । पुण्यप्रसादिं तुमच्या करुणाविचारें २७
ताता ! तुमच्या कृपें वनींही मिळतिल आम्हां सर्व सुखें ।
आज्ञा पाळुनि अपुली येऊं फिरुनि देखण्या चरण निकें ’
‘ सुखवा माता पदीं नमूनी सकलां कळवा विनती ही— ।
तुलसि वदे विभु, ‘ तेंच करा हो ! जेणें भूपति सुखि राही ” • २८
संदेश सांगत रघूत्तम हा गुरूंतें । तत्पादकंज नमुनी बहुवार चित्तें ॥
कीं ‘ तोच आपण करा उपदेश युक्त । जेणें न मोहवश होतिल लोकनाथ ’
पौरादिकां परिजनां विनती मदीय । ही प्रार्थना करुनि तात ! वदाल काय ?
कीं ‘ तोच सर्वपरिं मी हितकारि मानीं । जेणें नराधिपति हर्षविला कृतींनीं’

सांगा निरोप मम हा भरतासि येतां । ' नीती नको त्यजुंस पावुनि राजसत्ता
तूं कर्मचित्तवचिं रक्षित जा प्रजेतें । माता समान गणुनी परिषेव चित्तें ३१
बंधो ! समृद्ध करिं तूं निजबंधुभक्ति । माता, पिता, सुजन सेवित जा सुरीतीं ।
ताता ! पित्यासि सुखि राख अशाप्रकारें । जेणें न मद्विपयिं शोक घडो तया रे !'
तें लक्ष्मणें वचन कांहिं कठोर केलें । तें राम खोडुनि, मला विनवीत बोले ।।
घालोनि नामशपथा अपुल्या कितीदा।'ताता ! न लक्ष्मणशिशूक्ति तुम्ही निवेदा!'
सीता प्रणाम कथि, आणखि बोलुं लागे । यत्नें, परी गहिंवरे हृदिं शोकवेगें
स्नेहें न शब्द उमटे, दशिं अश्रु लोटे । रोमांचपल्लव उठे, तिज कंठ दाटे!३४
जाणून त्या क्षणिंच राघवरायभाव । तो वल्हवीत गुह चालवि पार नाव ।।
ऐशापरी प्रभु रघूत्तम दूर जातां । मी राहिं पाहत, उरीं सहिं वज्रघातां! ३५
ते क्लेश आपणचि मी वदुं कासयास ? । मी हा जिवंत फिरतों अजुनी विशेष
संदेश राममुखिंचा कथितों तुम्हांतें । दुःखी स्वतांस म्हणवूं तरि केविं चित्तें?"
बोलूनि हें वचन मौनिं पडे सुमंत । हो ग्लानिहानिवश, चित्त तदीय आर्त ।।
तें ऐकतांच सचिवोक्त, नराधिराय । शोकाग्निदग्ध धरणीस पडे असह्य ! ३७
तो होय आकुल मनामधिं मोहपूर्ण । कीं फेनपंकिं नवघूर्णित मीन दीन ! ।।
राज्ञीहि सर्व बुडल्या करुणाविलापीं । आपत्ति थोर कथवेल न ती कदापि !
तो शोक आयकुनि दुःखहि दुःखि झालें ! प्रत्यक्ष धैर्यहि जणों गतधैर्य ठेलें!
आक्रांत तो पसरला सगळ्या पुरांत । शोकाब्धिया सकलही बुडले पुरांत।।३९।।
तें वाटलें घडवि कीं निशिं वज्रपात । पक्ष्यांचिया विपुलसंधिं महाकृतान्त ।।
साकेत सर्व भरलें जनशोकरावें । कोलाहला गगनही नच तें पुरावें ! ।।४०।।
दशरथनृपतीचा प्राण हो कंठिं गोळा। गलितमणि अहीसा भूप वैक्लव्य त्याला!
विकळ सकळ झालीं इंद्रियें शक्तिहीन । जल सरिं सरतां कीं जावि पद्में सुकून
कौसल्या तैं म्लान भूपा बघूनी । जातो अस्ता सूर्यवंशार्क मानी ।।
धैर्या घेई अंतरीं राममाता । बोले वाणी योग्य जी त्या क्षणान्ता ।। ४२ ।।
" हे नाथ ! अंतरिं करा जि ! जरा विवेक । अब्धी अपार रघुनाथवियोगशोक।।
साकेत हें गमत त्यांत महाजहाज । त्या कर्णधार तुम्हि होय नराधिराज !!।।४३।।
आहे प्रजा सकल त्यां चढली प्रवासी । प्राणांहुनीहि अधिक प्रिय जी तुम्हांसी ।।
धैर्या धराल तर सर्व तराल पार । नाहीं तरी सपरिवार विनाशणार! ।।४४।।
ऐका जि ! ही विनवणी मम नम्रतेची । हे प्राणनाथ ! दयिताप्रति केलि साची

ही ध्याळ कीं हृदिं मदुक्ति विनीत, कांता ! । होतील हो फिरुनि लक्ष्मणरामसीता!"
तें एकेतांच दयितोक्त मृदू अतीव । भूपाळनेत्र उघडून बघे सुजीव ॥
आसन्नमृत्यु जणुं मीन जलाविहीन । ये त्यावरी सलिलसिंचन कीं घडून ! ४६
धैर्या धरून बसला मग तो नृपाळ । बोले, "सुमंत ! मम राम कुठें दयाळ ?
श्रीरामभक्त मम लक्ष्मण होय कोठें ? । सीता प्रियात्मजवधू मम सांग कोठें ?"
ऐसा विलाप करि भूप अनेकरीतीं । झाली युगासरिस रात, न जी सरे ती !॥
जो अंधतापस तयाप्रति देत शाप । तें आठवी सकळ मागिल वृत्त भूप ॥४८॥
कौसल्येतें तें कथी भूपराय । वर्णोनीयां, वृत्त जें सर्व होय ॥
होई दुःखें भूप अत्यंत आर्त । चिंती 'रामावीण धिग् जीवनार्थ ! ॥४९॥
ती ही माझी राखुनी काय ? काया । मत्प्रेमाशा हो जिनें केलि वाया ! ॥
हे श्रीरामा ! प्राणशा लाडक्या रे ! । तूझ्या वीणें वांचलों फार कीं रे ! ५०
हे सीते ! हे लक्ष्मणा ! रामराया ! । मच्चित्ताच्या चातकांभोधरा ! या ॥
हे कल्याणा ! माझिया सौख्यधामा ! । हे श्रीरामा राघवा ! पूर्णकामा ! ५१
श्रीराम राम ! मम राम ! मदीय राम ! हे राम राम ! सुखसागर राम ! राम !"
ह्या घोषघोषिं तनु टाकित भूपराय । रामाचिया विरहिं तो सुरधामिं जाय !
॥ इति श्रीराम० श्रीअयो० नृपस्वर्गगमनं नाम द्वितीयोऽध्यायः ॥

तरंग ३ रा

सजन्ममृत्युफल पावत रामतात ! । ब्रह्माण्डि तद्यश विशुद्ध भरे अनन्त ॥
श्रीरामचंद्रवदना बघि जीवमानीं । मृत्यूसि रामविरहें सुषमाच्च आणी ! ! ॥१॥
शोकाकुला रडति त्या सगळयाच राणी । तद्रूप-शील बल तेज अति स्तवोनी ।
नाना प्रकारिं करुणायुत तद्विलाप । भूमीवरी पडति त्या कितिदा सकंप ! ॥२॥
झाले सशोक अति सर्वहि दास दासी । आक्रंदिती गृहिं गृहीं पुरिंचे निवासी ॥
"अस्तास जाय अजि भास्करवंशभानू । रूपीं गुणीं अतुल धर्मनिधान मानूं!"
कैकेयितें सकलिंही दिधल्या शिव्याच, । केलें जिनें सकल विश्वहि अंध साच !
ऐशापरीं बिलपतां रजनी सरे ती । ज्ञानी महामुनि तिथें सगळेहि येती ॥४॥
तेव्हां वसिष्ठमुनिनीं समयानुरूप । पुण्येतिहास कथिले सकला अमूप ॥
शोकांधकार सगळ्या मनिंचा दुरन्त । विज्ञानदीपिं करिती मुनिवर्य लुप्त ! ५
तैं ठेविती नृपतनू झणिं तैलनावे । दूतांसि बोलवुनि सांगति जें करावें ॥

"'जाऊनि वेगिं भरतासि तुम्ही मिळावें । ना भूपवृत्त कवणा तुम्हि तेथ यावें ६
सांगा तुम्ही भरत सन्निध एवढेंच । 'बंधुद्वया गुरु तुम्हांस निमंत्रि साच!'
तो ऐकतां मुनिनिदेश निघूनि जाती । ते दूत धावत, हयां रयिं लाजवीती ७
साकेतिं ज्या क्षणिं अनर्थ सुरू वहाला । तेथोनि होवि भरतासि कुचिह्नमाला ॥
स्वप्नें बघे निशिं भयंकर दुष्टराशि । येतांचि जाग अशुभाशय जाचि त्यासी
तो त्यास्तव द्विजहि भोजवि, देइ दानें । अर्चीत तो बहु हरा अभिषेचनानें ॥
प्रार्थी महेशपदिं चिंतुनि भक्तिभावें । 'माता, पिता, अनुज, आप्त, सुखी रहावे'
चिंतीत हें भरत, तोंवरि दूत येती । वेगेंचि धांवत निदेशहि सांगताती ॥
तो ऐकतां गुरुनिदेश गणेशपाद । चिंतोनियां भरत ही निघि तो अमंद॥१०॥
हाकीत तो पवनवेगिं तुरंग जाई । लंघीत दुर्गम नदी वनशैल, राई ॥
त्या शोक होय उरिं, कांहिं न गोड वाटे।येई मनीं, उडुनि संपवुं काय वाटे?! ११
वर्षापरी गमत त्यास निमेष एक । सोत्कंठ तो नगरसन्निध ये सशोक ॥
होती तया शकुन दुष्ट, पुरीप्रदेशीं । कुक्षेत्रिं काक करिती अशुभ ध्वनींसी १२
आक्रंदती खर शृगाल भयाण रावें । ते शब्द कर्णिं भरतां मनिं शूल व्हावे ॥
निःश्रीक वाटति नदी सर बाग रान । वाटे पुरी तर विशेषचि ती भयाण! १३
ना पाहवे खगमृगां, तुरगां, मतंगां । ना दुर्धरा सहति रामवियोगरोगा ॥
पौरस्त्रिया पुरुष भासति अत्युदास । संपत्ति हारवुनि सर्व गमे विनाश!!॥१४॥
त्या भेटले नगरिं पौर, परी न कोण । बोलेचि कांहिं; रिघती नमना करून ॥
न क्षेम त्या भरतही शकला पुसाया । कीं तन्मनीं भयविषाद करीत छाया! १५
ते हाटवाट नच पाहवलेहि जाती । लागे पुरा दशदिशीं जणुं आग कीं ती!
तैं कैकयी, 'भरत ये' कळतांचि, देखा । हर्षे मनीं, रविकुलांबुजचंद्रलेखा! १६
ती आरती करुनि सिद्ध उठून धांवे । भेटूनि दारिं भरतासह मोहिं पावे ॥
तो पाहि तेथ परिवार समस्त शोकीं । जाणों तुषारहत पद्मसमूह तो कीं! १७
तैं कैकयी गमलि हर्षित त्यापरी ती । कीं हृष्टली वनदवा बघुनी किराती!॥
चित्तांत आर्त बघुनी तनया विचारी । "माहेरिंचीं असति ना कुशलांत सारीं?!"
"आहेत सर्व कुशली." भरतें कथून । तोही पुसे "स्वकुलिं सर्व सुखांत कां न?"
कोठें पिता? सकलही जननी कुठें? गे!। सीता कुठें? मम कुठें प्रियबंधु दोघे?
स्नेहार्द्र पुत्रवच ऐकुनि कैकयीनें । नेत्रें करूनि अपुलीं कपटाश्रपूर्णें ॥
हें पापिणी वदलि जें भरतासि झालें । कीं विंधिलें कुणि मनःश्रवणांसि शूलें!

" मी सर्व गोष्ट अजि सांवरलीच होती । झाली विचारि मज साह्यद मंथरा ती॥
बाळा ! परी भिडवी मधि कांहि घाता । घेती नरेन्द्र अमरेन्द्रपुरीय पन्था !"२१
तें ऐकतांच भरतीं भरली विषाद । भीतीहि, हस्तिमनि ऐकुनि सिंहनाद ॥
'हा! तात! तात!' म्हणुनी मुखि फोडि टाहो।दुःखार्ति त्याप्रति हृदीं अति उत्कटा हो
शोकें पडे धरणि आर्त अतीव चित्तीं । बोले " न तात ! मज भेटे दिलीत अंतीं !
मातें हि रामकरिं सोंपविले न तात !" । ऐसा करी भरत शोक जया न अंत २३
धैर्यें पुन्हां उठुनि सावरुनी निजांगें । बोले " कसें मरण ये पितयासि, सांगें " ॥
तें आयकोनि कथिलें आणि कैकयीनें । साद्यन्त वृत्त सगळें घडल्याप्रमाणें २४
ती पापिणी मुदितचित्त समग्न वर्णी । आर्द्रव्रणा धुवुनि कीं भरि ती विषांनीं ! ॥
तें ऐकतां गमन काननिं राघवाचें । तो तातमृत्युसहि विस्मरलाच साचें ! २५
मानोनि आपणचि कारण सर्व विघ्ना । तो स्तब्ध राहि अतिखिन्न, धरूनि मौनां ॥
शोकार्त पाहुनि तया समजावि माय । कीं दग्ध अंगिं जणु लावित मीठ काय ?! २६
" बाळा ! नृपात्मज तुझा नच योग्य शोक । सेवीयला नृपवरें निजपुण्यपाक ॥
केलें तयें सुचरितीं निजजन्म सार्थ । अंतीं गती मिळविली सुरमंदिरात ॥२७॥
मानूनि हें त्यज सख्या! निज शोक पूर्ण । साकेतराज्य परिपाळ सुखे करून!"॥
हें वाक्य राजतनया भय वेदना दे । पक्व क्षतीं जळत कोलित कोणि कोंदे ! २८
निःश्वास टाकुनि सुदीर्घ धरूनि धीर । रागें वदे भरत " पापिणि ! तू अघोर!
केला तुवां स्वकुलनाश अनकरीतीं । ना वर्णवे तव रुची करिती अकीर्ति २९
कां जन्मतांच मज तू वधलेस गे ! न ? । सिंचीसि पल्लव, करूनि मुळा विदीर्ण!
संपूर्ण पाणि उपसूनि कशीं पहासी । मीनासि जीवन सुखावह व्हावयासी?! ॥३०॥

रविसम कुल, दशरथसम तात, मला बधु रामलक्ष्मणसे ॥
आई ! तूं जननी ही !! विधिवरि सत्ता कधींच चलत नसे ! ॥३१॥

दुष्टे ! तुझ्या हृदयिं ती कुमती उदेली । तेव्हांच कां फुटुनि तच्छकले न झालीं?
ते मागतां वर न वाटलि चित्ति खत ? । जिह्वा झडून पडले न किडे मुखांत ? ३२
विश्वासुनी तुजवरी नृप राहि कसा ? । तन्मृत्युकालिं घडवी विधि बुद्धिनाशा !
नारीमना विधिहि आकलु तो शकेना । भारा स्त्रिया अवगुणां, कपटां, अघांना
राजा सुशील ऋजु धार्मिक सुस्वभाव । स्त्रीचा कसा उमगणार तयास डाव ? ॥
हो जीव जंतु तरि कोण असा जगांत ? । चित्तांत ज्या प्रिय न राम असे यथार्थ ?
श्रीराम, ज्या तुजसि वाटतसे अरी गे ! । ती तूं अशी असशि तें तरि कोण, सांगें ॥
तूं ऐस ऐसशिल ती, परि तोंड काळें । येथूनि तू करुनि बैस दुरीं निराळें !! ॥३५॥

रामा विरोधिहृदया तुझिया कुशींचा । केलों असें विधिकरें हतभागि ज्याचा ॥
त्या माझिया सम नसे नच अन्य पापी।आतां वदून उपयोग नसे, तथापि!" ३६

पाहोनीयां आइची शाठ्यवृत्ती । शत्रुघ्नातें रोष ये फार चित्तीं ॥
क्रोधाग्नीनें अंग संतप्त झालें । त्याचें तेथें मात्र कांहीं न चाले ! ॥३७॥

कुब्जा तयाक्षणिंच आलि तया समोरीं । भूषा सुवासिं नटली विविध प्रकारीं
तैं लक्ष्मणानुज अतीवचि रुष्ट झाला । लाभे घृताहुतिच काय हुताशनाला !
संक्रुद्ध हाणि तिज तो कुबडांत लाथ । ती आरडे पडत तोंडवरीं भयार्त॥
तीचें तुटे कुबड, खोक पडे कपाळीं । दन्तावली पडलि वाहत रक्त खालीं!३९
ती ओरडे रडत "हाय ! नशीब माझें!।माझ्या भल्या कृतिस हें फल काय साजे?
या काय घात करिं मी ? मम चूक काय ?। राज्ञीस सेवन रुजूं मम नित्य होय!"
शत्रघ्न तें परिसुनी, शठ तीस मानी । ओढी तिला फरफरां कवळून वेणी! ॥
तैं सोडवी भरत दीनदयाळ तीतें । जाती पुढें उभय बंधुहि राममाते ४१

दिसे तै कौसल्या मलिनवसना म्लानवदना ।
हृदीं जी दुःखार्ता अतिकृशतनू शोकसदना ॥
सुवर्णाची जाणों गमलि वनिं ती कल्पलतिका ।
तुषारांच्या वर्षे अतिशय भरें झोडियलि कां ! ॥४२॥

कौसल्या तैं बघुनि भरता त्याकडे धांवु लागे ।
तों मूर्च्छेनें पडलि अवनी घेरि येवोनि भागे ॥
ते पाहोनी भरतहि मनीं आर्त होऊनि भारी ।
लोळे तीच्या पदिं, विसरुनी देहमानादि सारीं ! ॥ ४३ ॥

बोले "कोठे मम जनक गे? दाखवीं वेगिं माते ! ॥
कोठें सीता ? बघु तरि कुठें राघवा लक्ष्मणातें ? ॥
कैकेयी ही उपजलि तरी 'कासया ह्या जगांत ?
जन्मोनी ही कशि नच बरें जाहली वांझ येथ ? ॥ ४४ ॥

हा मी जन्में उदरिं जिच्चिया सूर्यवंशा कलंक ।
द्रोही झालों प्रिय मम जना दुर्यशा राशि एक ॥
माझ्या ऐसा त्रिभुवनिं दुजा कोण दुर्भागि आहे ? ॥
ज्याच्या योगें उग्र गति अशी जाहली माय गे ! हे ॥ ४५ ॥

स्वर्गा धाडीं, प्रिय मम पित्या, कानना रामराया

सर्वानर्थां सकलपरिंनीं हेतु मी एकला या ॥
धिग् धिक्कारें ! दहन घडवीं वेणुच्या मी वनाशी ।
दुःखा, तापा, असह अयशां जाहलों पात्र दोषी ! " ॥ ४६ ॥
कौसल्येच्या श्रवणिं पडतां दीनवाण्या मृदूक्ति ।
संभाळोनी उठुनि भरता घे उरीं प्रेममूर्ति ॥
आलिंगोनी करि शिरिं तया सेक ती आसवांनीं ।
हृष्टा झाली, जणुं वनिंहुनी राम आलाचि मानी ! ॥ ४७ ॥
कौसल्येतें सरलहृदयें स्निग्ध शत्रुघ्न भेटे ।
तेव्हां तीच्या हृदयिं अमित प्रीति शोकादि दाटे ॥
ती पाहोनी ऋजुमति तिची बोलिलें सर्व लोकीं–
" श्रीरामाची सदय जननी उत्तमा व्हायची कीं ! " ॥ ४८ ॥
माता अंकीं तनय–भरता आपल्या बैसवोनी ।
डोळे त्याचे पुसुनि वदली कोमला चारुवाणी ॥
" वत्सा ! धैर्या हृदिं धर अजीं, शोक टाकूनि देई ।
दुष्टा वेळा समजुनि मनीं ना गणीं हानि कांहीं ! ॥ ४९ ॥
ही कर्मकालगति आकळली न जाय । देऊनि दोष दुसऱ्याप्रति होय काय ? ॥
सर्वोपरीं मजवरी अतिरुष्ट धाता । ठेवी जिवंत; न कळेचि भविष्य चित्ता ॥
पितृनिदेश तो ऐकतांक्षणीं । वसनभूषणें सर्व टाकुनी ॥
त्यजुनि हर्ष वा शोक अंतरीं । चीरवल्कलें राम पेहरी ॥ ५१ ॥
हृदयिं अल्प ना लोभ राग वा । मुखिं विराजला हर्ष राघवा ॥
सकल तोषवी सर्व रीतिंनीं । समजवी जनां गोड बोलुनी ॥ ५२ ॥
विपिनिं चालले नाथ जाणुनी । जनकजा चले संगिं काननीं ॥
प्रभुपदाब्जिंची रागिणी प्रिया । कशि रहावि ती सोडुनी तया ? ॥ ५३ ॥
परिसतांच तें लक्ष्मणें भलें । रघुवरासवें रान सेविलें ॥
समजवूं बघे त्यासि राघव । परि न घेचि तो अंतरीं लव ॥ ५४ ॥
नमुनियां पदीं सर्वही जनां । त्वरित चालले राम कानना ॥
सहित जानकी, बंधुलक्ष्मण । प्रविशती वनीं सत्यभाषण ॥ ५५ ॥
बघुनियां वनोद्देशिं जातयां । रघुपजानकीलक्ष्मणां तयां ॥
गमन त्यांसवें मी न आचरीं । असुहि राहती हे मदंतरीं ! ॥ ५६ ॥

सकल देखिलें म्यां विलोचनीं । परि जगेंचि ही मी अभागिनी ! ॥
मजसि खंत न, प्रीति ती कुठें ! । तनय रामसा, मी प्रसू कुठें !
जनन तेविं तें प्राण टाकणें । नृपवरें बरें जाणलें गुणें ॥
मदुर मात्र हें शतगुणें दिसे । कठिणतेमधें इंद्रवज्रसें ! ! " ५८
कौसल्योक्ती भरत परिसे, तेविं अंतःपुरीय ।
नारी सान्या परिसति, मनीं शोक त्यांचा अमेय ! ॥
नोहे त्यांच्या करुणरुदना व्याकुलत्वा तुलाही ।
शोका एका सदन गमला राजवाडा तदांहीं ! ॥ ५९ ॥
इति श्रीराम० श्रीअयो० भरतशोकवर्णनं नाम तृतीयस्तरङ्गः —

तरंग ४ था

तेव्हां विलाप करिती भ्राते ते विकल भरतशत्रुघ्न ॥
कौसल्येनें त्यांतें धरिलें कवळूनि हृदयसंलग्न ! ॥ १ ॥
समजवि अनेकपरिंनीं भरता ती सांगुनी विवेककथा ॥
इतरहि शांतविति माता कथुनि कथा श्रुतिपुराणिंच्या उचिता ॥२॥
तैं बोलला भरत जोडुनि आत्मपाणि । वाक्यें मनोज्ञ ऋजु निष्कपटात्मवाणी ॥
" माते ! असेल जर यामधिं अंग माझें । माझ्या पदोचि शिरिं पातकपूर्ण ओझें! ३
जें पाप तातजननीसुतघातक्यासी । जें धेनुगोष्ठ करि दग्ध अशा नरासी ॥
जें विप्रसद्मपुर जाळतया सुदुष्टा । स्त्रीबाल यांसि वधित्या अघ जे विनष्टा ४
जें मित्रभूप—गरदांप्रति पाप लागे । जीं पातकें लघुगुरू श्रुतिशास्त्र सांगे ॥
जीं देहवाक्प्रतिं अशेष घडूनि येतीं। माझ्या पदोत अजि मस्तकिं पातकें तीं !
हरिहरचरणांतें सोडुनी भूतखेतां । भजति जन तयां ये दुर्गती जी समस्तां ॥
मजसि जननि येवो ! दुर्गती ती अघोरा। जर मम कर कांहीं लागला या प्रकारा !
जे वेदां विकिती, स्वधर्म त्यजिती, स्वार्थार्थ जे दुर्मति ।
लोकां सांगति अन्यपापकुकृती दुष्कीर्ति संचारिती ॥
क्रोधी वक्रगती, जगासि छळिती, ज्या अन्यदारा मतीं ।
त्यांची पापतती असो मजसि ती, माझी जरी हे कृति ! ॥७॥
वेदां दूषति लुब्ध लंपट अती पापां न ज्यांच्या मिति ।
ज्यांतें ना परमार्थि आवडि, रुचे ज्यांतें न सत्संगति ॥

सेवीती यश जे न शंभु-हरिचें मानव्य आलें तरी ।
त्यांचें पाप मदीय मस्तकिं पडो मी दुष्टकार्यी जरी ! ॥८॥
श्रुत्युक्ता सुपथा प्रति त्यजुनियां ज्यां वाममार्गी रुचि ।
वेषानेंच जगास जे फसविती जे दुष्टधी फारचि ॥
ऐशांना गति जी मिळे, मजसिही देवोत ती शंकर ।
कैकेयीकृतिवृत्त संमत असे मातें जराही जर!" ॥९॥
ऐकें माता भरतवचनें प्रांजलें सत्यसारें ।
बोले " वत्सा ! तनुमनिं वचें रामिं तूं रंगशी रे ! " ॥
प्राणाचाही भसत तुझिया प्राणमा रामराय ।
रामा प्राणाहुनि दयित कीं तूंचि अत्यंत होय ! ॥१०॥
वर्षेल चंद्रहि विषं, हिम अग्निदाहां । पाण्यासि बारिचर मानिल शत्रुगेहा ॥
शानेंहि राहिल कधीं तरि मोह चित्तीं । रामासि तूं कधिं न होशिल शत्रुमूर्ति
आहे तुझा कर कुकार्यि म्हणेल जो कीं। स्वप्नींहि त्यास सुख सद्गति नैव लोकीं"
बोलूनि हें धरि तया हृदयाशिं आई । पान्हा फुटे तिजसि, लोचनिं अश्रु वाही!
ऐसा अतीव करतां करतां विलाप । रात्री सरे तशिच वैसुनियां समीप ! ॥
आले तिथें मग वसिष्ठ सवामदेव । आमंत्रिती सचिव थोर जनादि सर्व॥१३॥
तेव्हां ऋषी बहुपरीं भरता कथीती । योग्या मनोज्ञ परमार्थकथा सुरीतीं ॥
ते सांगती " धरिं हृदीं भरता! सुधीर । जें योग्य आज करणें कर तेंचि साग्र
आला प्रसंग अनिवार्य असाच सारा । सत्त्वाढ्य तूं विसरशील न सद्विचारा॥"
त्या ऐकतां मुनिवचां भरतें उठोनी । केलें यथाविधि समादिशलें गुरूंनीं १५
श्रुतिकथित विधींनीं न्हाणुनी भूपदेहा । अतिसुभगविमाना निर्मिलें देहवाहा॥
पर्दि भरत नमूनी राहवी सर्व माता । रघुवर बधु ऐसा हेतु त्यां राहवीता !
आणीवले अगरुचंदनभार मोठे । वस्तू अनंत अतिसुंदर गंधसाठे ॥
केली चिता सरयुकांठि महाविशाला । सोपान कीं, सुरपुरासि चढावयाला !
ऐशी सशास्त्र करुनी दहनक्रिया ती । स्नाना करून विधियुक्त अतीवभक्ति॥
देती तिलांजलि, विलोकुनि वेदमार्ग । केलें विधान भरतें, दशगात्र सांग१८
जेव्हां जसे मुनिवरें कथिले निदेश । तेव्हां तसे करि सहस्रपटीं विशेष ! !
झाला विशुद्ध वितरूनि अनंत दानें । धेन्वश्वहस्ति-वरवाहनसन्निधानें १९
दान दिलीं भरतानें सिंहासन-वसन-भूषणाद्यघनें ॥

भूदानें गृहदानें विप्रांचीं पूर्णकाम केलिं मनें ! ॥ २० ॥
जनकहितास्तव भरतें केली जी अमित पुण्यकर करणी ॥
लक्षमुखांनींही ती वर्णायातें अशक्य हो धरणीं ॥ २१ ॥
पाहूनि नंतर मुहूर्त वसिष्ठ येत । आमंत्रिती सुजन, मंत्रि समग्र तेथ ॥
एकत्र भव्यमति राजसभा मिळाली । आमन्त्रिले भरत, बंधुहि एकमेळीं॥२२॥
वसिष्ठ भरताप्रती बसवि आपणासन्निध ।
सुनीतिमय धार्मिकीं वचनिं बोलला तो बुध ॥
कथी प्रथम वर्णुनी कुटिल कैकयीची कृति ।
प्रशंसि अति सत्यता, नृपतिची सुधर्मीं रति ॥ २३ ॥
तयास्तव कसे असु त्यजियले नृपानें वदे - ।
प्रशंसि गुणधाम तो रघुवरस्वभावा मुदें ॥
भरे सलिल लोचनीं पुलकितांग हो तो मुनि ।
रघूत्तमगुणस्तवीं गहिंवरें भरे वानुनी ॥ २४ ॥
श्रीरामचंद्रपदिं लक्ष्मण आणि सीता । जे प्रीतिनें रमति ते मुनि वर्णु जातां—
ज्ञानी मूनीन्द्रहि वसिष्ठ निमग्न होई । हृत्प्रीतिभक्तिरसिं, शोकभरीं अमेयीं॥२५
अत्यार्त बोलत मुनी " भरता ! पहा हे ! अत्यंत रे ! प्रबलसें भवितव्य आहे॥
आहे विधातृकरिं सर्वहि लाभहानि । हे प्राण वा मरण, कीर्ति अकीर्ति दोनी !॥२६
ऐशाविचारिं मग दोष कुणास द्यावा ? । कां व्यर्थ रोष दुसऱ्यावरतीं करावा ? ॥
वत्सा ! विचार करुनी बघ तू मनात नोहेचि शोच्य नृपती तव पूज्य, तात !२७
हो शोच्य विप्र विषयामधिं जो निमग्न । जो वेदशून्य निजधर्महि दे त्यजून, ॥
तो भूप शोच्य, न जया कळते सुनीति।नोहे प्रजा प्रिय जया निजजीवशी ती२८
श्रीमतही कृपण शोच्यचि वैश्य तो कीं। जो याचकीं विमुख भक्ति न ज्या नृपांकीं
विप्रापमानकर शोच्यचि होय शूद्र । जो ज्ञानगर्वि अतिमानि, बढाइखोर २९
तो ब्रह्मचारि बहु शोच्यचि सर्वकाळीं। आत्मव्रतां, गुरुनिदेशहि जो न पाळी३०
अज्ञानमोहवश जो त्यजि कर्ममार्ग । तैसा गृहस्थहि गमे मज शोच्यवर्ग ॥
ना ज्या विरक्ति, न विवेक असा यतीही ।जो हो प्रपंचि रत तो अतिशोच्य पाहीं
तो शोच्य वैखानस जो तपातें । टाकूनि भोगांस रमे स्वचित्तें ॥
तोही दुरात्मा अतिशोच्य वाटे । अकारण क्रोधि करील तंटे ॥ ३१ ॥
परापकारीअति शोच्य तोही । जो द्रोहि मातापितरांसि होई ॥

गुरूंसि बंधूसिहि जो विरोधी । तोही तसा शोच्यचि दुष्टबुद्धि ॥३३॥
स्वपिंडपोषी करुणाविहीन । अत्यंत तो शोच्य खलोपमान ॥
सर्वां परी शोच्यचि तोहि भारी । निर्दंभ जो भावितना मुरारी॥३४॥
अशोच्य तो कोसलराजमूर्ति । व्यापीत चौदा भुवनें स्वकीर्ती ॥
त्वत्ाततसा ना भरता ! क्षितीश । झाला, न होणार, नसेचि लेश ।३५
ब्रह्मा महेश, हरि, इंद्र दिशाधिनाथ । सारेहि ते दशरथाप्रति शंसितात ॥
ते वर्णिती सुगुण कीर्ति तदीय भावें । वाटे तयां दशरथोत्तमपुण्य गावें ३६
श्रीरामलक्ष्मण, तद्यापरि तूं, अरिघ्न । हे ज्यास पुत्रवर सत्तम पुण्यमग्न ॥
भूपोत्तमा, दशरथाप्रति त्या विशेष । वर्णावया कवण शक्य असे कवीश? ॥
त्यान्या प्रकारिं नृपकौस्तुभ तो सुभागी । ना शोक याग्ये तुज होइल त्याजलागीं ॥
मी सांगतों परिस तें त्यजुनी विषाद । आज्ञा नृपोक्त करुनी अर्जि पुण्य साद ३८
भूपें दिलें तुजसि राज्य वराप्रमाणें । तूं सत्य तो कर निदेश दिला पित्यानें ॥
रामा त्यजी वचन सार्थ करावयास । त्याच्या वियोगदहनीं करि देहनाश ३९
प्राणाहुनीहि अधिक प्रिय ज्यास स्ववाणी । त्याच्या प्रमाण भरता! सरलोक्ति मानीं
तूं शीर्षवंद्य समजें नृपसत्तमोक्ति । कल्याणकारि सगळ्यापरिं हे सुयुक्ति ४०
आज्ञापिलें परशुराम करी पित्याचें । मातेसही वधित तो, जग साक्षि त्याचें ॥
दे आत्मयौवनहि पूरु ययातिराया । ना पाप ना अयश तातनिदेशिं ये यां॥
जे पाळिती पितृनिदेश अयोग्य योग्य। शंका त्यजून, यश सौख्य तयांच भोग्य॥
त्यांनाच वास अमरेन्द्रनिवासिं लाभे। सत्पुत्र तातवचना करुनीच शोभे। ४२
भूपोक्त सर्व करणें तुज योग्य आतां । पाळीं प्रजा मुळिं न लावुनि शोक चित्ता
स्वर्गात भूपतिहि होइल तुष्ट तेणें । तूंतेहि पुण्यवश हो; नच दोष येणें । ४३
हें सर्व संमत तसें स्वर्तिनाहि मान्य । कीं त्यास राज्य, नृप ज्याप्रति दे वदान्य
मानि त्यजून भरता ! कर राज्य तूंच । आज्ञा मदीय गण ही हितकारि साच।
ऐकोनियां सुखित होतिल रामसीता । कोणी न पंडितहि हो तुज दोषदाता
मातादि सर्व तुमच्या सुख पावतील । त्यांतें प्रजासुखचि हो निजसौख्यमूळ
प्रीती रघूत्तमिं तुझी सकलांस ठावी । त्यांनींहि सर्वपरिं तूज भलाइ द्यावी ॥
वेतांच राम, कर सादर राज्य त्यास । सेवीं तयास करुनी निजभक्तिपोष ! ”
मंत्री तदा म्हणति जोडुनि अंजलीतें । “ नाथा ! अवश्य करणें गुरु सांगती तें॥

श्रीराम येतिल, तदा तुमच्या मना जें । येईल तें मग करा, समयास साजे "
॥ इति श्रीराम॰ श्रीअयोध्या॰ श्रीवशिष्ठोपदेशवर्णनं नाम चतुर्थस्तरङ्गः ॥

तरंग ५ वा

कौसल्या तैं धर्मसंपन्न बोले । " पथ्या आज्ञा श्रीगुरूंचीच मोलें ॥
मानोनीयां आदरें ती हिताची । शोका टाकीं; जाण ही वेळ कैंची ! १
श्रीरामराय वनिं, भूपति जाय नाकीं,। वत्सा ! अशापरि तुझी तर भीरुता कीं
मंत्री, प्रजा, परिजनादि, समस्त माता । आधार त्यांस भरता ! तव एक आता
जाणोनि दैव उलटें विकराल काळ । ओंवाळिं मी असु तुझ्यावरुनी सलील ॥
घे धैर्य; आचरिं निदेशियलें गुरूंनीं । पाळीं प्रजा सकल पौर सुखी करूनी "
तैशी गुरूक्ति, सचिवोक्तिहि हर्षवाची । झाली जणों भरतिं कीं उटि चंदनाची
त्यांहीवरी मृदुलवाग् जननीमुखींची । हृत्प्रीतिशील–करुणासरला सुखाची ॥
मातेची ती ऋजु करुणोक्ती ऐकुनि गहिंवरिं भरत भरे ।
नयनपद्मिंच्या बिंदुसिंचनें विरहांकुर उरिं नव स्फुरे ! ॥
पाहुनि भरतस्थिती तशी ती सकल विसरती निजभान ।
तुलसि म्हणे, ते वाखाणिति कीं, सत्प्रीतिस या उपमा न ! ॥५॥
धैर्या धरूनि हृदिं धर्मधुरंधरानें । जोडोनि युग्म करकंज निजांजलीनें ॥
सान्यांसि उत्तर सुयुक्तिक वाक्प्रवाहें । पीयूषभारभरितें भरतें दिलें हें ॥६॥
" देती मला गुरुवसिष्ठ शुभोपदेश । जो मान्य सर्व सचिवां सगळ्याजनांस ॥
माताहि दे उचित मानुनि तेच आज्ञा । मीही शिरीं धरित ती, न करीं अवज्ञा ॥
मातापिता गुरु मम प्रभु हे कथीती । सोत्साह हर्ष मज ती वितरी हितोक्ति ॥
तेथें धरून उचितानुचितत्व शंका । लोपेल धर्म; शिरिं येइन पापपंका ! ! ॥८॥
केला तुम्ही मजसि योग्यचि तो निदेश । तो आचरूनि मज उत्तम हो अशेष ॥
हें सर्व मी हृदयिं जाणतसें तरीही । अत्यंत तोष मज यामधिं होत नाहीं ! ॥९॥
आतां तुम्ही विनवणी मम आयकावी । द्यावा मला मग निदेश तुम्हीं क्षमावीं ॥
कीजे क्षमा, वितरतों जरि उत्तरातें । ना आर्तदोष-गुण मानिति साधु कीं ते ! ॥
स्वर्गी पिता, वनिं रघूत्तम आणि सीता । हें राज्य तूं करिं असें मजही कथीतां ॥
हें मानतां मम हितास्तव वस्त सारें ! । कीं साधितां निजहितां तुम्ही सुप्रकारें ! ॥
श्रीरामचंद्रपदसेवन मद्धितार्थें । तें अंतरे मजसि मातृशठत्वि सार्थें ! ॥

मी पाहतों बहुविचार करूनि चित्तीं। माझ्या हितास्तव दिसे मज नान्य युक्ति।
सीता-लक्ष्मण-रामपादकमळां आलोकिल्या वांचुनी।
शोकागार असें मला रुचतसे ना राज्य कांहीं मनीं। ॥
वस्त्रावांचुनियां अलंकृतिभरें शोभा कशाची बरें ?।
कैंचा ब्रह्मविचार तो ? जर नसे वैराग्य चित्तीं खरें। ॥१३॥
रोगाक्रांत तनूस केविं रुचणें भोगादिकांचें सुख ?।
कैंचें योगजपादि ? ना जर हृदीं भक्ती हरीची निक! ॥
कैंचा देह मनोज्ञ चारु म्हणणें ? निष्प्राण झाल्यावर।
मातें व्यर्थचि सर्वही गमत हें श्रीराम नोहे जर! ॥ १४ ॥
रामासन्निध जावयाचि मजला आज्ञा तुम्ही द्या भली।
कल्याणप्रद एक हेंचि मजला होईल या भूतलीं ॥
राज्यीं बैसविण्या मला झटतसां ते आपुलाल्या हिता।
नोहे यांत विवेक; मात्र दिसते स्नेहार्द्रता, अज्ञता! ॥१५॥
निर्लज्ज दुष्टमति नंदन कैकयीचा। रामासि जो विमुख त्या मज हर्ति कैंचा ॥
आकांक्षिता रुचिरलाभ तुम्ही सुखाचा। देऊन राज्यपद हें मज या सुनीचा!॥
मी सांगतो मनिं धरा अजि सत्य जाणा। कीं धर्मशीलचि हवा जगिं लोकराणा! ॥
हें राज्यदान जर द्याल इथेंचि मातें। जाईल तत्क्षणिं रसातळिंच क्षमा ते! ॥१७॥
माझ्या समान जगिं अन्य न पापकर्ता। जाती यदर्थ वनि लक्ष्मण रामसीता ॥
रायें जरी वितरला वनवास रामा। गेला असह्य विरहें नृप देवधामा! ॥१८॥
मी मात्र हा सकल कारण या अनर्था। येथें जिवंत परिसें सकलाहि वार्ता! ॥
देखोनिही रघुपतीविण मंदिरा या। निंदा सहात जगतों जगिं या असह्या! ॥१९॥
पुण्यात्म राम, विषयीं सगळ्या विरागी। भोगास लोलुप नृपाळ विलाससंगीं ॥
काठिन्य मद्‌हृदयिं हें मज वर्णवे न। जें वज्रगर्वहि हरीत तया हसून! ॥२०॥
हो कारणाहुनिहि कार्य कठोर साच। यामाजिं दोषहि मदीय असा नसेच ॥
अस्थीहुनी कुलिश होय कराल फार। तैसेंच लोह उपलाहुनि हो कठोर! ॥२१॥
कैकेयीनें जन्म ज्यातें दिलासे। त्या मत्प्राणां देह माझा विशेषें ॥
दुर्भागीही पामरां टाकवेना। अत्यासक्ती एकमेकां समाना ॥ २२ ॥
श्रीरामाचा होउनीही वियोग। प्राणांऐसा वाटतो तो प्रियांग ॥
तेव्हां वाटे श्राव्य वा दर्शनीय। या प्राणांचें फार आश्चर्य होय! ॥२३॥

सीताराघवलक्ष्मणां दवडिलें कांतारिं भर्त्यासही ।
स्वर्गातें हितकारणें, निज हितें वैधव्य केलें मही ! ॥
दुष्कीर्ती मिळवूनि शोकदहनीं सारी प्रजा पोळुनी ।
कैकेयी मज राज्यसौख्य सुयशें देई सुधन्या जनीं ! ॥ २४ ॥
ऐसें हें मजसाठिं सर्व घडलें आहे भलें, त्यावरी ।
देतां राज्य मला तुम्ही, मज गमे ही मात हो साजरी ॥
कैकेयीजठरांतुनी निपजलों त्या हें नसे वाउगें ।
धाता साधत हें समस्त जन हो ! कां यत्न ? राहा उगे ! ! ॥२५॥
आधीं ग्रहग्रसित त्यावरि वात झाला । विंचू तयांत डसला असल्या जनाला ॥
त्यातें पुन्हां पिववली मदिरा विशेष । याहून काय उरला उपचारशेष ? २६
कैकेयीतें विशेषत्वें शोभावा मीच नंदन ॥
योजना चातुरीपूर्ण साधी ही चतुरानन ! ॥ २७ ॥
राजा दशरथाचा मी पुत्र ही थोरवी मला ॥
रामानुज अशीही तो घ्यावया व्यर्थ शीणला ! ॥ २८ ॥
राज्याभिषेक मज मी करवून घ्यावा । आदेशही नृपतिचा हितकारि ठावा ॥
ऐसें वदा तुम्हि किती हि; तुम्हांस कैसें । मी देउ उत्तर परोपरिनें विशेषें ? ॥२९॥
मी आणखी खलमती जननी मदीया । यावांचुनी करिल कोण कृती 'भल्या' या ?॥
माझ्याविना जगिं चराचरिं कोण वर्ते ?।सीतारघूत्तम न ज्या प्रियजीवसे ते ! ॥
हानी अती म्हणतसां तुम्हि लाभ साचा।माझा कुकाल! न तुम्हाप्रति दोष याचा ॥
जें बोलतां उचित तें सगळें गणावें । हृत्प्रेम संशयहिं, कारण त्या म्हणावें ! ३१
श्रीराममाता सरलस्वभाव । माझ्यावरी प्रीति तिची अतीव ॥
बघून माझी स्थिति दीनवाणी । असेल ती बोललि तेविं वाणी ! ३२
ज्ञानी जगद्विदित जाणति विश्व सारें । जे हातिंच्या बदरसें गुरु ते विचारें ॥
झालेत सिद्ध मम राज्यपदाभिषेकीं । होतीच सर्व उलटे ! विधि वाम जों कीं!३३
सीतारघूत्तमविना न दुजें कुणीही । बोलेल यांत मम अंग मुळींच नाहीं ! ॥
ऐकुन तद्वच सुखें मग मी सहीन । पाणी तिथें चिखल हो; न तयाविहीन !
मातें न भीति जग नीच म्हणेल ऐशी । चित्तीहि मी न परलोकसुखाभिलाषी॥
जाळीत दुःसह दवाग्निहि हाच चिंता । माझ्यामुळें विपिनिं दुःखितरामसीता !
केलें कृतार्थ निजजीवन लक्ष्मणेंच । सर्व त्यजून धरि रामपदाब्ज साच ! ॥

मज्जन्म मात्र रघुनाथवनार्थ होतां । दुर्भाग्य मी उगिच दर्शवि दुःखचिंता !!
सर्वांस मी विनतशीर्ष नमूनि बोलें । जें तीव्र दुःख मम आंतरमार्गि पोळे ॥
श्रीरामचंद्रपद पाहियल्याविना न । जाणार दाह मम हा कधिंही शमून! ॥३७॥
कांहींच ना सुचतसे दुसरा उपाय । जाणे रघूत्तमचि--मन्मन चिंति काय? ॥
ही एक आस मम अंतरिं वासकर्ती । जावें प्रभातिं बघण्या प्रभुराममूर्ति ३८
आहें जरी खचित मी अपराधि दुष्ट । माझ्यामुळें रघुवरा जरि सर्व कष्ट ॥
प्रत्यक्ष पाहुनि मला शरणागतासी । प्रेमें क्षमा करिल राघव दुःखनाशी ! ॥३९॥
संकोचशील ऋजुसुंदरभाव राम । सत्प्रीतिमूर्ति करुणावरुणैकधाम ॥
शत्रूसही अहितकारि न रामराय । मी वामही तरि न सेवक बाल काय? ॥४०॥
हो श्रेष्ठ पंच ! तुम्हि मद्धित जाणुनीयां । आज्ञा अभीष्ट मज चिंतुनि द्या स्वकीया ॥
कीं ऐकुनी विनवणी मम, राम येथ । यावेत या नगरितें सकलां समेत !॥४१॥
दुष्टेचिया उदरिं यद्यपि जन्मजात । आहेंच मी शठ सदूषण, पापमूर्त ॥
मातें गणून अपुला, मज रामराय । त्यागील ना; भरंवसा मज साच होय !" ४२

❀ ॥ इति भरतस्योत्तरवचनवर्णनं नाम पञ्चमस्तरङ्गः ॥ ❀

तरंग ६ वा

सर्वांतें हीं भरतवचनें वाटलीं भक्तिशालीं ।
रामप्रेमामृतशुचिरसें पूर्ण ओथंबलेलीं ॥
श्रीरामाच्या विरहविषमें दुर्विषें दग्ध झाली ।
ती सन्मंत्रें जणु जिवविली बीजयुक्तें जनाली ! ॥१॥
माता साऱ्या गुरुसचिव ते पौर नारीनरादि ।
सारे स्नेहें विकलहृदयीं जाहले त्या सुशब्दीं ॥
त्यांनीं तेव्हां बहुत भरता वानिलें बोलुनीयां ।
कीं, " तूं मूर्ता अतुल भरता ! रामभक्ती अमेया ! ॥२॥
तूं ऐसें कां न वदशिल रे ! प्राणसा राघवाचा? ।
होशी तूंचि प्रियतम तया त्वन्मनीं दोष कैंचा ? ॥
जो कैकेयीकुटिलपण तें लावुं पाहेल तूंतें ।
तो ठीचात्मा ढकलि नरकीं पूर्वजांतें स्वहस्तें ! ॥३॥
तैसें तोही नरकपतना कल्पपर्यंत भोगी ।

निंदोनीयां तुजसि कुटिला ककयीच्या प्रसंगीं ॥
ना सर्पाच्या अवगुणगणां घे मणी तच्छिरींचा ।
दुःखा दैन्या हरनि मणि तो तद्विषा नाशि साचा ! ॥४॥
श्रीरामातें सकलहि अम्ही जाउंया काननान्तीं ।
वाटे योग्या अतुल भरता ! त्वां दिली कल्पना ती ! ॥
जे हे आम्ही विकल बुडतों शोकसिंधूंत सारे ।
ताराया हे अनुपम दिली त्वांचि नौका तयां रे ! " ॥ ५ ॥

सर्वांस तैं हृदयिं हर्ष अतीव झाला । कीं एकि मेघरव चातकबर्हिमाला ॥
'उद्यां प्रभातिं निघुं' या शुभनिश्चयानें । प्राणांपरी भरत हो प्रिय त्यांसि तेणें ॥
वंदी मुनीधि भरतासहि नम्रशीर्ष । घेतां निरोप, जन जात गृहां अशेष ॥
'संसारिं हो भरतजीवन धन्य धन्य !'। वानीत ते भरतशीलरती अनन्य ॥७॥
अन्योन्य ते वदति थोरचि कार्य झालें । सारे सुसज्ज गमनास्तव होउं गेले !
जे गेहिं राहवियले गृहरक्षणार्थ । त्यांना गमे, चिरित कंठ कुणी कृतान्त ! ८
कोणी तदा म्हणत उत्सुक रामभेटीं । 'कां ठेवणें उगिच कोण गृहांत पाठीं ? ॥
कोणास वाटत नसे जगतीतलांत । व्हावें कृतार्थ निजजीवन पुण्यवंत ! ॥९॥
"तीं हो जळोत धन वैभव सौख्य आप्त।माता, पिता, स्वजन, बंधु जगीं समस्त ॥
जीं रामचंद्रपदलाभ घडावयातें । होतीं न साह्यकर उत्सवयुक्तचित्तें ? ॥१०॥
सर्वांघरीं करिति सज्ज अनेकयानें । साऱ्यां प्रहर्ष किं उद्यांच सकाळि जाणें !
जाऊनि गेहिं भरता मनि ये विचार। संपत्तिचा प्रभु रघूत्तम एक वीर ॥११॥
भांडार, सद्म, गज, वाजि-पुरादिकांसी । संभाळ योग्य करुनी निघणें प्रवासीं
ना रक्षितां जर निघूं, परिणाम वाम । पापिष्ठ मी प्रभुसि शत्रु ठरें असीम !॥
जो स्वामिचें हित करीं शुचि तोच दास । कोटीहि कोणि दिधले जरि दोष त्यास ॥
ऐशा विचारिं गुणि सेवक बोलवी तो। स्वप्नींहि ज्यां न निजधर्म असेव्य होतो ॥
त्यांना कथी सकलकार्यमहत्त्व साच । जो ज्या सुयोग्य कथि त्याप्रति कार्य तेंच ॥
संरक्षणार्थ विनियोजुनि लोक ते ते । भेटावया भरत ये झणि राममातें ॥१४॥

कौसल्यादी सकलजननी क्षीण दुःखार्ततेनें ।
आणोनीयां चतुरभरतें उत्तमें केलिं यानें ॥
सौख्यें त्यांना गमन करण्या पालख्या सांगवी तो ।
स्नेहाचा तो भर भरतिंचा वर्णण्या केविं येतो ? ॥ १५ ॥

पौरांगना आणिक पौर लोक । कीं चक्रवाकी खगचक्रवाक !
पहांट केव्हां उजडेल वेगें । सोत्कंठ ते वाट पहात जागे ! ॥ १६ ॥
प्रभात होतां भरत स्वमंत्री । सुजाण सारे जण तो निमंत्री ॥
आज्ञा करी त्यांप्रति वस्तु घ्याया । राज्याभिषेकास्तव योजनीया ॥ १७ ॥
" वसिष्ठ रामा अभिषेचतील । वनींच राज्यावरि पुण्यशील " ॥
मंत्री तदा वेगिं नमस्करोनी । सुसज्ज अश्वगजीं रथांनीं ! ॥१८॥
अरुन्धती आणिक अग्निहोत्र तें । वसिष्ठ घेती पहिल्याच सद्रथें ॥
तैं घेतले विप्र अनेक वाहनीं । तपोद्युतीनें भरले तनूमनीं ॥१९॥
समग्र ते वाहनिं पौर बैसुनी । श्रीचित्रकूटाप्रति चालले वनीं ॥
राज्ञी निघाल्या शिबिकामधूनी । ज्या दर्शनीया नयनांसि तोषणी ॥२०॥
तैं सोंपवोनी नगरा सुसेवकीं । घालोनि सारीं अपुल्यापुढें निकीं ॥
स्मरोनि सीतारघुनाथ संयुत । शत्रुघ्नसंगें भरत क्रमी पथ ! ॥२१॥
ते सर्व नारीनर रामदर्शना । जाती समुत्कंठितचित्त कानना ॥
वाटे जणों कीं करिणी करीच ते । जलाशयातें निरखूनि चालते ! ! ॥२२॥
श्रीराम सीता वनिं पायिं चालले । वाटोनियां अंतरिं भावलेल ते ॥
शत्रुघ्न तैसे भरत स्वमार्ग ही । पायींच ते आक्रमुं लागले मही ! ॥२३॥
भक्ती तशी ती अवलोकुनी जन । गेले मनीं ते अनुरक्त होउन ॥
ते चालती त्यागुनि आत्मवाहनें । रथादिकें वाजिगजादि भक्तिनें ! ॥२४॥

कौसल्या तैं भरतजवळीं पालखी थांबवोनी ।
त्यातें सांगे निकट रिघुनी बोलुनी मंजुवाणी ॥
" ओवाळीं मी ननु तुजवरीं; बैस वत्सा ! रथांत ।
होती दुःखी प्रियजन तुझे चालतांना पथांत ! ॥ २५ ॥

पाहूनि तूंतें निजपायिं चालतां । हे लोकही चालति तेविं गा ! पथा ।
परंतु ते शोकभरें कृशांगसे । चालावया शक्त न होति साहसें " २६ ॥
आज्ञा शिरीं धरि तदा नमुनी पदातें । मातेचिया भरत सानुज भक्तिचित्तें ॥
ते दोन बंधु चढुनी बसती रथांत । ऐशापरीं सकल तो पथ आक्रमीत ! २७ ॥
केला निवास पहिला तमसातटासी । होती दुज्या दिवसिं गोमतितीरवासी ॥
श्रीरामकारणिं कुणीं व्रत नेम केले । त्यागोनि भोग, निजभूषणजात त्यालें २८
आहार घेति पय वा फलमात्र कोणी । रात्रींच केवळ कुणी नियमव्रतांनीं ॥

तेथून ते शरयुच्या तटिं येति वासा । राहोनि रात्र निघती पुढतीं प्रवासा॥२९॥
ते शृंगवेरपुरसन्निध सर्व आले । येतांच ते, सकलवृत्त गुहा कळालें ॥
तेव्हां निषादहृदयीं भरला विषाद । झाला सचिंत मनिं तो गुह गूढबोध ! ३०
" हा कासया भरत येत असे वनासी ? । व्हावेंच कांहिं कपटात्मक चित्तवासी
होतें न कांहिं कुटिलत्व तयांत लेश । कां पाहिजे कटक संगतिं हें तयास ! १
त्या वाटतें वधुन लक्ष्मणराम यांना । निष्कंटकें मिळवुं राज्यसुखादि नाना ॥
ध्यानीं न घे भरत जाणुति राजनीति । तेव्हां कलंक, अजि जीवनहानि होती !
सारे सुरासुर मिळूनहि झुंज द्याया । रामासि येति तरि शक्य नसे जिणाया ॥
आश्चर्य ना भरत हें करि, यांत कांहीं । पीयूषपूर्ण फल दे विषवल्लि कायी ? "
ऐसें म्हणून गुह सांगत आप्तलोकां।"व्हा सज्ज सर्वजण हो! अजि शत्रु रोखा!
वल्ह्यांसवेंचि बुडवा सगळ्याहि नौका। घाटांवरी उतरुं द्या न कुणाच, देखा!
व्हा सावधान अणि रोधुनि सर्व घाट । व्हा सिद्ध नीट मरण्या रणरंगिं धीट!
घ्या शस्त्र ! द्या न भरता उतरूंच गंगा । आम्हीं जिवंत तंवरीं करुं शत्रुभंगा
मृत्यू रणीं, सुरसरित्तटिं त्यावरीं हा । श्रीरामकार्यिं विलय क्षणभंगि देहा ! ॥
श्रीरामबंधु भरत प्रभु, नीच मी तों । ऐसा सुयोग शुभदैविंच पाविजेतो ! ३६
जें स्वामिकार्य करण्यास्तव युद्ध घोर । चौदाहि त्या भुवनिं सद्यश फांकणार !
श्रीराघवास्तव मम त्यजुनी असूनें । आनंदमोदक करद्वयि माझिया ते ! ॥३७॥
ज्यातें नसे रुचिरसाधुसमाजिं मान । श्रीरामभक्त अशिही महती जया न ॥
तो हो जिवंतपणिं भारचि कीं क्षितीचा । तो मातृयौवनतरूसि कुठार साचा ! "
टाकी विषाद मग सर्व निषादराय । उत्साह वाढवि जनांतरिंचा, अमेय ! ॥
चित्तामधें स्मरुनि रामपदांबुजातें । तो वर्म मागवि तसे शरचापमाते ॥३९॥
सांगे सुसज्ज अणि व्हा ! न फिराचि मागें । आज्ञा तुम्हां करित मी हृदिं ध्या जि वेगें
तेव्हां समस्त म्हणती 'जय नाथ!' हर्षें । उत्साह वृद्ध करिती सगळ्यांत घोषें ४०
ते शूर वीर निवडे रणरंगिं हौशी । वंदोनियां गुरुपदां निघती प्रहर्षीं ॥
चित्तीं रघूत्तमपदांबुजपादुकांतें । ध्याऊन घेति तनुवर्म सुबद्ध भाते ॥ ४१॥
कोदंड बाण करिं मस्तकिं टोप ल्याले । घेती सुतीक्ष्ण परशू किति एक भाले ! ॥
कोणी अतीव पटु घे करिं खड्गढाल । उड्डाणशौंड नभि कीं त्यजि भूमिगोल!
आपापले करुनि सैनिक संघ घेती । सेनानितें करिति सादर वंदना ती ॥
देखोनि ते निपुण वीर गुहा सुतोष । नामें पुकारुनि तयां करि हर्षघोष ! ॥

सांगे "करा नच अशीं तुम्हि कार्यघात । हे बंधुनो ! सकल व्हा दृढ एकचित्त
तें ऐकतांच वदती भट रोपदीसीं । "वीरा ! अधीर नच हो ! इतुका स्वचित्तीं
रामप्रतापिं अपुल्या बळिं आजि ठीक । ना शत्रुसैन्यिं उरवूं भट अश्व एक ॥
जीवांत जीव तंवरी परतूं न मागें । ही रुंडमुंडमय भू करुं लागवेगें ! ॥४५॥
आज्ञापि तें गुह तयां करण्या सुघोष । भेरी तुतारि रणवाद्यभरीं विशेष ॥
तों येत वामदिशि त्यांत कुणास शिंक! तो वानिती शकुनतज्ज्ञ 'शुभें अनेक !'
तेव्हां वदे शकुनजाणक एक वृद्ध । "होईल मैत्र भरता, न मुळींच युद्ध !
तो जातसे रघुवरा समजाविशीस । हें दर्शवी शकुन युद्ध न होचि लेश ! ॥
ऐकोनि तें गुह म्हणे "बुध वृद्ध जाणे । कां मूर्खसे करुन साहस, दुःखि जाणें !
केल्याविना भरतभावपरीक्षणातें । हो युद्ध जें, अहितकारिच आपणां तें ४८
"हे वीर हो ! तुम्हि असा निक एक ठायीं।रक्षून घाट, भरता जंव मीच जाई
जाणेन मित्र, अरि, मध्यम वा तयासी।हो ! आचरूं मग जशी स्थिति होय तैसी !
जाणेन मी भरतशीलसुभाव सारा । न प्रीति ये लपवितां, नच तेविं वैरा"॥
बोलेनि हें गुह करी बहु वस्तु गोळा । भेटीस कंद फळमूळ खगां मृगांला५०
मोठे मोठे मत्स्य वा स्वादुमीन । कोळ्यांपाटीं कावड्या ने भरून ॥
ऐशारीतीं घेउनी सर्व भेटी । जातां त्यातें मंगलें येतिं दृष्टीं ! ॥ ५१ ॥
दूरूनि देखुनि कथी गुह आत्मनाम । केला वसिष्ठपदिं दंडसमप्रणाम ॥
आशी मुनी वितरि जाणुनि रामभक्त । दावोनियां भरत, ओळख त्या करीत!
तो राममित्र कळतां भरत स्वयान । सोडूनि चालत पदीं, अति भक्तिपूर्ण ॥
त्यातें नमीत गुह लावुनि भूमि शीर्ष । तो नांव गांव कथि जातहि जे विशेष
त्या घालतां बघुनि दंडवता गुहासी । घेई तदा भरत आकळुनी उराशीं ॥
त्या वाटलें हृदयिं लक्ष्मण भेटला तो । आनंदनिर्भर हृदीं नच मावजेतो !!

—: इति निषादभरतमीलनवर्णनं नाम षष्ठस्तरङ्गः :—

तरंग ७ वा

त्या भेटतां भरत तैं अति भक्तिपूरीं । तीं प्रीतिरीति किति वानिति लोक सारी !
तैं 'धन्य धन्य' अशि मंगलफूल वाणी । घोषूनि त्यां अमर वर्षति सत्प्रसूनीं
लोकांत वेदिंहि जयाप्रति नीचमान । छायाहि तत्तनुगता अपवित्र, हीन ॥
त्या या गुहासि लघुबंधु रघूत्तमाचा । आलिंगुनी पुलकपूरित होत साचा ॥२॥

जे देति जांभइहि बोलत राम ! राम !। तत्पापपर्वतहि पाविजती विराम ॥
यातें स्वतां उरिं धरी, परि राम, देखा । तो हा करी कुलसमेत पवित्र लोकां ॥
गंगाजलांतरिं मिळे जर कर्मनाशा । तैं त्याजला कवण घे नच आत्मशीर्षा ? ॥
वाल्मीकिही जपुनियां उलटेंहि नाम । ब्रह्मासमान बनले जगिं पुण्यधाम ॥

चांडाल, शबर, कोळी, यवन, कसाई, किरात नीच जन ॥
श्रीरामनाम घेतां झाले पावन यशें भरति भुवन ! ॥ ५ ॥
आश्चर्य हें न; युगिं युगिं चालत आलें असेंचि आजवरीं ॥
श्रीरामचंद्र रघुवर भजकां कवणां महत्त्व ना वितरी ? ॥ ६ ॥
श्रीरामनाममहिमा वानिति सुर एकमेक सादर ते ॥
ऐकोनि तें सुखाचें येइ अयोध्यानिवासियां भरतें ! ॥ ७ ॥
श्रीरामसख म्हणोनी भरत गुहा कवळुनी निववि हृदय ॥
क्षेम कुशल मंगल त्या पुसता झाला अनेकपरि सदय ॥ ८ ॥

त्या स्नेहपूर्ण भरतीं शुचिता बघोनी । झाला निषाद जणु लुप्तचि देहमानीं !
संकोच मोद अति भक्ति मनांत वाहे । पाहात एक टक तो भरतास राहे ॥
प्रेमें तया विनवि अंजलिपद्मबंधीं । धैर्या धरूनि बहुवार तयासि वंदी ॥
“ देखें पदाब्ज तुमचें अति पुण्यकारी। कल्याण शाश्वत गमे मज बाजु चारीं ॥
देवा ! कृपा परम ही तुमची अनन्य । हो आज कोटि कुल हें मम धन्य धन्य
याती, मदीय कुल, कार्य कुठें सुदीन ? । कोठें अगाध महिमा तुमचा प्रपूर्ण ?
श्रीरामचंद्रपदपंकज जो न सेवी । तो या गमे मज जगांत खरा अदैवी ॥
माझ्यासमान कपटी कुमती कुजाती । जो वेदबाह्य गमला सगळ्यांच रीतीं ॥
श्रीराम त्या मज म्हणे अपुला जिथून । मी विश्वभूषण यशा मिळवीं तिथून ॥
श्रीरामपादकमलीं रमल्या गुहाला । वानोनि हर्षभर सन्मतितें जहाला ! ॥
पाहूनि भक्तिविनयादि गुहांतरींचें । शत्रुघ्नही हृदयिं भेटत त्यास साचें ॥
सांगे विषाद निजनाम मनोज्ञवाणी । राशींचिया पदिं नमी विनयें लवोनी ॥
त्यांनींहि त्या लक्ष्मणसेंच मानुनी । आशीर्वचें त्या दिधलीं सुतोषणीं ॥
“ हो तूं चिरंजीव गुहा ! सुखी रहा” । निदेश त्यांहीं दिधला अभीष्ट हा ॥
तैं सर्व पौर जनता, बघुनी निषादा । त्या मानि लक्ष्मणचि भेटुनि दे प्रमोदा
उद्गारती ‘गुहचि जन्मुनि धन्य झाला ! । कीं राघवें कवळिलें हृदयीं तयाला !’
ऐके स्वभाग्यवरवर्णन चाललें तें । अत्यंत हृष्ट गुह जाइ वनांसमेतें ॥

तैं सूचवी गुह जना अपुल्या खुणेंचि । तेही तदा करिति उत्तम सोय त्यांची
गेहीं वनीं, उपवनीं, सरिं, वृक्षवाटीं । केले निवास तधिं सत्वर त्यांजसाठीं
ये शृंगबेर पुर जैं भरता दिसेन । स्नेहार्द्र तो शिथिलितांगचि होत पूर्ण!॥
तैं शोभला भरत टेकुनियां निषादिं । प्रेमा तसा विनय हे धृतदेहबंधीं ॥
ऐशापरीं भरत सैन्यसमेत जात । देखावया सुरसरी जगिं पुण्यजात ॥१९॥
पाहोनि तेथ तटिनीतटिं रामघाट । तल्लीन हो भरत मानुनि रामभेट !
त्या ब्रम्हरूपसुभगा बघुनी प्रवाहा । सारीच पौर जनता नमि नम्रदेहा ॥२०॥
स्नानें करूनि विनवीति जुडून पाणी। कीं रामचंद्रपदिं भक्ति असो न सानी
भागीरथीस भरतें म्हटलें "तुझे गे ! आहेत रेणु सुखदायक चारु गंगे ! ॥२१॥
भक्तासि होत सुरधेनुपरी अभीष्टा" । जोडूनि अंजलि म्हणे ' वर देसि तुष्टा ॥
मी प्रार्थितों तव पदीं नत हेंचि एक । सीतारघूत्तमपदीं रति हो सुरेख !' ॥
ऐसें करी भरत मज्जन शुद्ध चित्तीं । माताहि सर्व अति पूतजलीं नहाती ॥
तेव्हां निदेश मिळतां गुरुचा तिथूनी । जाती पुढें सकळही तळ हालवोनी ॥
ते जेथ जेथ वसती जन तेथ तेथ । जाऊनियां भरत तत्कुशलां पहात ॥
अर्चूनि देवगुरु पावुनि तन्मतातें । तें बंधुयुग्म मग ये प्रिय राममातें ॥ २४
संवाहती मृदु वदोनि पदां तदीयां ! सन्मानि त्यां भरत संतत वंदनीयां ॥
शात्रुघ्नि सोपवित तो मग मातृसेवा । घेई गुहा भरत बोलवुनी सुभावा ॥ २५
चाले करीं कर धरूनि तदा गुहाचा। स्नेहार्द्र तो भरत कीं शिथिलांग साचा॥
यातें पुसे "मज सख्या! क्षणिं दाव जेथ । सीतारघूत्तम सलक्ष्मण रात्रिं सुप्त॥
पाहूनि तें स्थल मदीय निवेल चित्त। डोळेहि होतिल सुखी मम हे नितान्त॥"
हैं त्या गुहा विनवितां मन भावि न्हालें। प्रेमाश्रुनीं भरतनेत्र भरोनि गेले!! २७
ऐकोनि तैं भरतवाक्य सशोक होत । नेई निषाद भरता क्षणिं त्या स्थलांत ॥
ज्या शिंशपातरुतळीं प्रभु सुप्त होते । प्रेमें अतीव भरतें नमिलें तयातें ॥२८॥
पाहूनि ती तृणमयी मृदुचारुशय्या । जाई प्रदक्षिण तिला नमि तो अमेया ॥
तेथील भूमिरज रामपदांकितें तो । लावी स्वनेत्रिं, नच भाव सुवर्ण्य हो तो! २९
तो प्रीतिपूर कवणें परि हो वदावा? । सौवर्ण कांहिं कण पाहुनि तेथ तेव्हां॥
सीतेसमान अति मानुनि पूज्य त्यांतें । तो वे शिरीं निज नमस्करुनी स्वहस्तें
डोळे भरून हृदयींहि गहींवरून । तो बोलला वच गुहाप्रति भक्तिपूर्ण ॥
" हे देख हेमकण रे ! द्युतिहीन जैसे । सीतावियोग जणुं त्यांप्रति नैत्र सोसे !

साकेतवासिजनता बहु शोकखिन्न । सीतावियोग करि त्यां सुषमाविहीन ॥
जीचा पिता जनक उत्तम योगि भोगी । ज्यातें अलभ्य नच कांहिंच सौख्यसंगीं ३२
जीचा महाश्वशुर भानुकुलैकभानु । ज्याचा प्रताप सुरनाथहि पाहि वानूं ।
भर्ता जिचा प्रभु रघूत्तम राम होय । ज्याच्या कृपेंच्वि जगिं थोरवि होय लभ्य ।३३
शय्या तिची बघुनियां पतिदेवतेची । क्षीरत्न जी निखिलवंद्य जगांत प्राची
होशी न भग्न मम या हृदया ! कसें रे ! ? । यावें तुला शरण कीं कठिनें हि वज्रें ।३४
लावण्यधाम लघुलक्ष्मण लालनीय । झाला न बंधु असला, न असे, न होय ॥
पौरां अति प्रिय तसा प्रिय मायबापां । सीतारघूत्तमजना प्रिय सानुकंपा ३५
जो कोंवळा मृदुलगात्र ऋजू मनोज्ञ । ज्यालागिं आजवरि वायु हि लागला न ॥
तो सेवि आज विपिनांत विपत्ति सर्व । नाशील कीं मदुर वज्रसमूहगर्व । ३६
कौसल्येनें ज्यास देऊनि जन्म । विश्वा केलें एकलें पुण्यसद्म ॥
रूपा शीला सर्व सौख्या गुणांना । जो शोभावा एक सांठा; दुजा ना ! ३७
रामस्वभाव सकलासहि सौख्यदायी । वैरीहि ज्या गुणिवरा स्तवणार होई ॥
पौरादिकां परिजना जननी-पित्यांसी । सौख्यें गुरूसि वितरी प्रभु हर्षवर्षी ३८
भेटींत, भाषणि मनोरम, नम्र राम । त्याचें गुणस्तवन शक्य न हो निकाम ॥
त्याच्या गुणाब्धिसि जरि स्तविती विशेष।कोटीहि शेष,तरि सर्व अशक्य त्यांस३९
जो सौख्यरूप जगिं मंगळ सौख्यसद्म । सद्रत्न राघवकुलोत्तम शक्तिधाम ॥
तो राम हा निजत भूतलिं आज ऐसा । हा ठाव कर्मगतिचा कळणार कैसा !४०
ज्या 'दुःख' शब्दहि कधीं पडला न कानीं।ज्यातें स्वजीवतरुसे नृप रक्षि,मानी
डोळ्यास पापणि, मणीप्रति नागिणीशा । माता जया जपति रात्रदिनीं स्वतोषा४१
ते आज पायिं फिरती अनवाणि रानीं । आहार कंद फल फूल मुळें करूनी ॥
प्राणाहुनी प्रियतमा प्रतिकूल रामा । धिक् कैकयी अशि अमंगलमूल सीमा४२
धिग् धिग् मलाहि अघसागर भाग्यहीना । सारे अनर्थ मजकारणिं ज्या प्रभूंना
धाता मला कुलकलंक असा सृजीत । ही स्वामिशत्रु मज माय कुशी करीत।"४३
ऐकोनि तें समजवी गुह त्या सुभावें । "नाथा ! न दुःख तुम्हि हो हृदयीं करावें
श्रीराम हो प्रिय तुम्हां, तुम्हि त्याहि तैसे । नोहेचि दोष तुमचा, विधि दुष्ट भासे
वामविधीची कठिण करणि ही सन्मति बिघडवि जननीची ।
त्या रात्रीं प्रभु फिरुनि फिरुनिही प्रशंसि तुम्हां किति सुवचीं ! " ॥
तुलसि वदे, गुह शपथपुरस्सर भरता सांगे यमममनं ।

" रामप्रिय बुद्धि एक, धैर्य घ्या ! हो परिणामीं कल्याण ! ॥ ४५ ॥
अंतर्यामीं राय सुप्रेममूर्ती । लज्जाशाली जो कृपापूर्ण चित्तीं ॥
जाणोनी हें थोर विश्वासभावें । विश्रामातें आपुल्या हो ! चलावें ! "॥४६॥
ऐकोनी तें वाक्य धैर्या धरोनी । जाई वासा, चित्तिं रामा स्मरोनी ॥
पौरांना हें वृत्त येतांचि कानीं । औत्सुक्यें तें पाहिलें स्थान त्यांनीं ॥४७॥
प्रदक्षिणा घालुनि त्या नमीती । कैकेयितें दोषहि देति उक्तीं ॥
अश्रू तयांच्या नयनांत वाहे । देती विधात्याप्रति दोष मोहें ! ॥ ४८॥
कोणी प्रशंसिति रती भरतांतरींची । कोणी वदे दशरथांतरि भक्ति साची !
निंदी स्वतास कुणि वानुनियां निषादा।वर्णू शके कवण त्या हृदयस्थ,विषादा !
ऐशापरी भरत जागुनि रात्र सारी । होतां प्रभात निघु लागति पैलतीरीं ॥
ते बैसवीति गुरुतें अतिचारु नावें । मातांसही नव तरींमधिं सर्व भावें ५०
ते सर्व पैल रिघती घटकांत चार । तेव्हां पुसे भरत त्यां कुशलोक्तिसार ॥
प्रातःक्रिया करुनि वंदुनियां गुरूतें । मातांसही लवुनि वंदिति भक्तिचित्तें ५१
केले निषादादि पुढें समग्र । मागोनि चाले सहसैन्य वीर ॥
सान्यांपुढें ठेवि निषादनाथा । तें चालल्या पालखितूनि माता ५२

— इति श्रीराम० भरतनिषादमीलनवर्णनं नाम सप्तमस्तरङ्गः —

तरंग ८ वा

शत्रुघ्न दे त्यांसह सोबतीतें । गुरूंसि विप्रांसह पाठवी तें ॥
चाले स्वतां वंदुनि जाह्नवीला । स्मरोनि सीतेसह राघवाला ॥१॥
पायींच चाले भरत स्वतां पथीं । हया करीं चालवि दास संगतीं ॥
अनेक तैं सेवक योग्य सांगती । तयीं बसाया भरतास ते किती ! ॥२॥
परी तयांतें भरतें निवेदिलें । "श्रीराम कीं काननिं पायिं चालले॥
माझ्याचसाठीं रथ वाजिकुंजर ! । हो योग्य मातें शिरिं चालणें तर !! ३
सर्वांहुनी 'सेवकधर्म' थोर हा"। आकार्णिली ही भरतोक्ति पापहा ॥
सुकोमला प्रेमल भक्ति बंधुरा । ये सेवकां पूर उरीं गहींवरा ॥४॥
वेई तिज्या प्रहरिं तो भरत प्रयागीं । अत्यंत होत पथि तैं भजनानुरागी ॥
ते प्रेमपूरिं म्हणती ' प्रभु राम सीता । सीता रघूत्तम, विभूत्तम राम ! नाथा !' ५
तैं शोभले चमकुनी पदिं फोड तैसे । कीं बिंदु ते दंव सरोरुहकोषिं जैसे ! ॥

पायींच आज भरतें पथ आक्रमीला । ऐकोनि हें सकल लोक विषण्ण झाला ! ६
स्नानें समाचरिलिं सर्व जनीं कळोनी । येवोनियां भरत वंदितसे त्रिवेणी ॥
तो स्नान आचरि सितासित सत्प्रवाहीं । दानें दिलीं सुविधि पूजुनियां द्विजांही ७
त्या श्यामशुभ्रलहरी बघुनी जलौघा । वंदीत त्या भरत हृष्टतनू प्रयागा; ॥
बद्धांजली विनवि "कामद तीर्थराया !। आहे प्रभाव जगिं वेदहि तुष्ट गाया ! ८
धर्म त्यजून निज मीं विनवीत भीक । दुःखार्तता उरविते कवणीं विवेक ? ॥
जाणोनि हें जगतिं सुज्ञ उदार दाते । संप्रार्थिलें पुरविती झणिं याचकांतें ॥९॥
प्रार्थीं न अर्थ, नच धर्म, न कामि काम । मागें न मोक्षपदही मजला निकाम॥
माझी असो रति सदोदित रामपायीं । दे जन्मि जन्मि वरपूर्ति, न अन्य कांहीं!! १०
श्रीराम हे मजसि दुष्टहि कीं म्हणोत । द्रोही प्रभूशिं, गुरुशीं जनही गणोत ! ॥
सीता रघूत्तमपदांबुजिं भक्ति माझी । वाढो दिसंदिस कृपा तव ऐशि हो जी ! ११
अंभोद जन्म भरि कां विसरून जाय । वज्राश्म हाणि जरि याचियलाहि तोय ! ॥
-सारे विराव शमले जरि चातकाचे । प्रेमा परी सतत वाढुनि चिर्थि सांचे ! १२
सौवर्णवर्णगुण वाढत अग्निदाहें । मत्प्रेमही प्रभुपदांवरि तेविं हो हें ॥ "
ऐकोनि आर्त भरतोक्ति तशी, सुवाणी । झाली त्रिवेणितुनि उद्गत पुण्यखाणी ! १३
" तूं साधु होसि भरता ! अजि विश्वधन्या !। त्वद्भक्ति रामचरणांबुजिं हो अनन्या॥
वत्सा ! विषाद न धरीं शुभशीलधामा !। नाहींच कीं प्रिय तुझ्यासम अन्य रामा!!"
परिसुनि रुचिरोक्ती, बोलली जी त्रिवेणी । भरतहृदयवृत्ती गेलि हर्षें भरोनी ॥
भरतिं पुलकितांगीं वर्षल्या पुष्पराशि।अमरि "भरत ! होशी धन्यरे ! धन्य !" घोषीं

— इति श्रीराम० श्रीअयोध्याकांडोत्तरार्धे भरतस्य प्रयागप्रवेशत्रिवेणी-
वरदानं नामाष्टमस्तरङ्गः —

तरंग ९ वा

प्रमुदित जन झाले तैं प्रयागाधिवासी । मुनिबटु गृहिवानप्रस्थ वैराग्यराशि ॥
मिळुनि मिळुनि मेळीं ते दहा पांच ऐसे । विमल भरतशीलप्रीति वानीति हर्षें ! १
आला भरद्वाजमुनीश्वराश्रमा । ऐकोनियां रामगुणां मनोरमां ॥
दंडप्रणामें भरतें नमीयलें । मानी मुनी त्या निज भाग्य मूर्तलें ! ॥ २ ॥
धांवोनी, उठवोनि, लावुनि - उरीं आलिंगुनी सादर ।
आशीर्वाद वदोनि चारु भरता केलें कृतार्थांतर ॥

त्यातें आसन अर्पिलें मुनिवरें, तेव्हां लवोनी बसे ।
भासे, पाहतसे धिरूं, भरत तो संकोचगेहींचसे ! ॥ ३ ॥

चिंता तयास 'मुनि' कांहिं विचारतील ! । बोले मुनी बघुनि त्यासि सलज्जशील ॥
"ऐकें, अम्हां समजलें भरता ! समग्र । नाहीं उपाय, विधि जैं करि वाम उग्र ॥
कांहींच तूं करुं नकोस विषाद ताता ! । मानूनि सर्व करणी करि आत्ममाता ॥
कैकेयिचाहि नच दोष असे तयांत । श्रीशारदा कलुष तन्मतितें करीत ! ॥५॥
हे उक्तिही कुणि म्हणेल न होय युक्ता । लोकोक्ति, वेदहि सुसंमत बुद्धिमंता ॥
गाऊनियां परि जगीं तव पुण्यकीर्ति । होतील दोनि, जन-वेदहि धन्यमूर्ति ! ६
हो लोक-वेद-मत कीं, जगिं राज्य ज्यास । दे तात, त्यास मिळणेंचि तमें अशेष ॥
सत्यव्रती, नरपती, तुज बोलवून । देताच राज्य, सुख, धर्म, महत्त्व पूर्ण ! ७
सारा अनर्थ रघुनाथ वनांत जात । जें ऐकता विकळ सर्वहि विश्व होत ॥
हें सर्व भाविवश येत असे घडून । राज्ञी अजाण, निज कृत्यिं असेचि खिन्न ! ८
यामाजिं अल्पहि तुझा अपराध मानी । तो दुष्ट, नीचमति, होय अती अज्ञानी
स्वीकारतास भरता ! जर राज्यभार । संतोषता, परिसता मनिं राम फार ! ९
आतां परतु भरता ! करतोस चारु । तूं हे अतीव, हृदिं घेउनि सद्विचारु !
की सर्व मंगलनिधाननिदान हेचि । श्रीरामचंद्रपदपंकजिं भक्ति साची !
तव हृदयिं वसे ती प्राणसर्वस्व एगी । तुजसम जगिं नान्या एवढी भाग्यराशि
नच तव नवलाची गोष्ट ही एवढीशी । दशरथसुत होशी, बंधुही राघवाची!११
[ती प्राणजीवनधनापरि होय तूतें । आहे न भाग्य तुजसें कवणासही तें
आश्चर्य गोष्ट तव ही मज होय कैशी? । तू कोसलेशसुत, राघवबंधु होशी ॥ ११]
भरत ! परिस हें कीं रामचित्तीं न अन्य । तुजसम कुणि त्याचा प्रीतिसत्पात्र धन्य
स्तवनिंच तुझिया रे ! राम सौमित्रसीता । क्षण सकल निशींचे तोषवीती स्वचित्ता !

प्रयागतीर्थी करितां निमज्जन । या रम्यमर्मा विसरे न तन्मन ॥
ते प्रेमतीर्थी तुझिया निरंतरीं । निमग्न होती भरता ! खरोखरीं ! ॥ १३ ॥
श्रीरामचित्तीं तुझियावरी रति । स्वप्राणिं सामान्यजनीं जशी अति ॥
माहात्म्य हें ना रघुनाथचित्तिचें । भक्तावर प्रेमळ राघवा रुचे ! १४ ॥
मानें तरी हें भरता ! असें मत । कीं रामचित्ता मधि तूंच राहत !
मूर्ती जणों राघवभक्तिची निकी । रूपें तुझ्या ये मजला दिसोनि कीं !
जो तूं कलंक म्हणसी अपुल्यास लागे । तो आमुच्या मनिं मला उपदेश वागे

श्रीरामभक्तिरससिद्धि करावयाला । तो 'श्रीगणेश' शुभकारि अम्हांस झाला ॥
इंदू भवाद्भुत तुझें यश निष्कलंक । ज्याचे चकोर–कुमुद प्रभुभक्त नीक ! ॥
भांदे सदोदित, नसे क्षय, ज्या न अस्त । वाढे दिनानुदिन विश्व नभोंगणांत
त्रैलोक्यकोक अति ज्या अनुरक्तभाव । रामप्रतापरवि हारवि तेज नैव ! ॥
रात्रंदिनीं सुखद तो सकलांस होय । राहू जया ग्रसि न कैकयिचें कुकार्य ।१८
श्रीरामभक्तिच सुधा भरि ज्यास पूर्ण । ज्यालागि दोष, गुरुचा अपमान हा, न
ज्याची सुधा करित राघवभक्ततृप्ति । केली सुलभ्य वसुधातलिं तूं सुधा ती१९
राजा भगीरथचि भूवरि आणि गंगा । जी सर्व मंगलखनी स्मृतपापभंगा ॥
ना वानवे दशरथोत्तमशीलराशि । नोहेच्चि तत्सम, कसा असणें विशेषीं ?।
यद्भक्तिभाव बघुनि प्रभुराम जन्म । घेऊनियां प्रकटला पुरवीत काम ॥
श्रीशंभु हृन्नयनिं आपुलिया जयासी । पाही कितीहि परि तृप्ति न ज्यासि कैसी।
हा कीर्तिचंद्र तव सर्वपरीं अमूप । हो प्रेमरूप मृगराम तयीं दुराप ! ॥
ऐसें असून करिसी मनिं खेद कां रे !। दारिद्र्यभी परिस लाभुनि केविं थारे ?॥

' ऐकें गा ! भरता ! कधीं नच अम्ही खोटें वदूं अल्पही ।
आम्ही काननवासि तापसि अम्हां व्हावी विरक्ती मही ॥
आलें कीं फल सर्व साधनतपां आम्हांस अत्युत्तम ।
सीतालक्ष्मणरामदर्शन अम्हां जें होय पुण्यागम ॥ २३ ॥

त्या पुण्याचें फल म्हणुनियां पाहतों आज तूंतें ।
क्षेत्रस्थाचे सकल इथल्या भाग्य मोठेंच कीं तें ! ॥
विश्रामध्यें सुभग भरता ! धन्य तूं भक्तिपूर्ण ! " ।
बोलोनी हे मुनि गहिंवरे जाय चित्तीं भरून ! ॥ २४ ॥
हर्षे तेव्हां हृदयिं भरले सर्व तेथील लोक ।
वृष्टी केली अमरिं सुमनीं गर्जुनी ' धन्य' भाक ॥
राहे व्योमीं ध्वनि भरुनियां 'धन्य ! धन्य !' प्रयागीं ।
ऐकोनी ज्या भरत भरत प्रेमभावानुरागीं ! ॥ २५ ॥

रोमांचली तनु, हृदीं जणुं रामसीता । उद्भूत होति जल लोचनपद्मिं येतां ॥
वंदोनियां भरत त्या मुनिमंडळींना । वाणी अशी वदत गद्गदकंठपूर्णा ॥२६॥
"ऐशा तपस्वि जनिं, त्यांतुनि तीर्थरायीं । सत्यासही शपथ, हें नच योग्य कांहीं ॥
कोणीहि येथ कथतां कपटें रचून । नीचत्व त्याहुन नसे, अघही तसें न ! ॥२७॥

आहांत सर्वज्ञ तुम्ही मुनीश्वर । मी सत्य तें सांगतसें मदंतर ॥
असेचि सर्वांतरवासि राघव । न मातृकृत्यीं मम शोकही लव ! २८ ॥
वाटे न दुःख मज निन्दक विश्व होई । भीती न कीं मज मुके परलोक हीही ॥
ना तात मृत्युहि मला बहुशोकदायी । ब्रह्माण्डही भरुनि तद्यश पुण्य राही ॥२९॥
श्रीरामलक्ष्मण असे सुत ज्यास होत । त्यांच्या वियोगिं तनु भंगुर जो त्यजीत ॥
ऐसा नृपालमणि शोच्य गमेल केवीं ? । मत्तात पूज्यतम धन्ययशासि सेवी ! ॥
सीतालक्ष्मणराम हे वनिं वनीं संचारती पाउलीं ।
चालोनी अनवाणि वेष मुनिचा स्वीकारुनी वल्कलीं ॥
खाती कंदफलें, महीशयन हो पर्णी, तरूखालतीं ।
साहोनी नित राहती हिम, उन्हें, पर्जन्यवातादि तीं ॥३१॥
हें दुःख जाळित सदा हृदया मदीया । नाहींच भूक दिनिं, रात्रि न झोंपही या ॥
लाभे न औषधहि या मम दुष्ट रोगीं । साऱ्या जगीं बघत शोधुनि अंतरंगीं ! ॥
मन्मातृधी कुटिल होउनियां सुतार । माझ्या हिता करुन वाकस एक शीघ्र ॥
घेई कुकाष्ठ कलिचें, बनवी कुयंत्र । वर्षें चतुर्दश पुरीं पठुनी कुमंत्र ! ॥३३॥
माझ्याच साठिं रचि ती सगळा उठाव । झालें परी जगतिं नाशक कुप्रभाव ॥
येईल राम तर सर्व कुयोग जाय । साकेतभव्य करण्या न दुजा उपाय" ॥
परिसुनि भरतोक्ती हो भरद्वाज हृष्ट । सकलहि भरतातें वानिती पुण्य दृष्ट ! ॥
"नच कर सुकुमारा ! तू मनीं रे ! विषादा । बघुनि रघुवराला ना उरे दुःखबाधा"
ऐसा करूनि उपदेश वदे मुनीश । "होशी मदीय अतिथी प्रिय तूं विशेष ॥
हे कंद मूल फल पुष्प समर्पु तूंतें । स्वीकारिं रे ! करुनियां स्वकृपा अम्हां तें ३६

॥ इतिश्रीराम० श्रीभरद्वाजभरतसंवादो नाम नवमस्तरङ्गः ॥

तरंग १० वा

ऐकोनियां मुनिवरोदित आग्रहोक्ति । संकोचला भरत अंतरिं भक्तिमूर्ति ॥
वाटे तयास जणुं संकट तें कुवेळीं । आज्ञा प्रमाण गुरुची परि घे स्वमौळीं ॥१॥
जोडोनि हात वदला नमुनी पदांसी । "आदेश सर्व गुरुचे मम धर्मराशि ॥
तेव्हां सुतुष्ट हृदयीं मुनिवर्य होय । बोलावि तो निकट शिष्य शुचि स्वकीय ॥२॥
सांगे "करूं भरतिं पाहुणचार भावें । जा, कंदमूलफल वेडनि तूर्ण यावें" ॥
"हो नाथ !" हें म्हणुनि ते सगळे नमूनी । सानंद सर्व करण्या निघती क्रमांनीं

वाटे मुनीसहि मनीं अशि काळजी कीं। 'हो पाहुणा अति महान् तुलना न लोकीं ॥
हो देवता जशि, तशी करणें सपर्या'। तों ऋद्धि सिद्धि अणिमादिक येति कार्या॥
त्या प्रार्थिती प्रणतिपूर्वक "हे गुणज्ञा ! तैसें प्रभो ! करुं जशी भवदीय आज्ञा ॥
आहोंत उत्सुक अम्ही प्रभुसेवनास। आज्ञापिलें मुनिवरें करुं जी ! अशेष ! " ॥
" भरत सानुज सर्व जनांसह। प्रभुचिया विरहें अति दुःसह ॥
करुनि पाहुणचार तयांप्रती। सुखविणें " वदला मुनि सन्मति ॥ ६ ॥
तैं ऋद्धि सिद्धि मुनिवाक्य शिरीं धरूनी। मानूनि घेति निजभाग्य अतिप्रमाणीं ॥
संवादिनी प्रमुदिता हृदिं एकमेकां। कीं हा अतुल्य अतिथि प्रभुबंधु देखा ! ॥७॥
ऐसें करूं मुनिकृपागुणिं सर्व आज। होईल सर्व सुखभाङ् नृपसत्समाज ॥
बोलोनि हें रचिलिं चारुगृहें तयांनीं। ज्यां पाहतां खिजलिं देवगृहें विमानीं ॥
भोगादि वैभव तयांत समस्त पूर्ण। जें पाहतां अमर कांक्षिति त्यासमान ॥
सारे सुसिद्ध सुखदायक दासदासी। सर्वांतरीं शिरुनि सेविति त्यां विशेषीं ॥९॥
सिद्धि क्षणांतचि करीति समग्र सिद्ध। जीं वैभवें सुरगणांसहि नैव लब्ध ! ॥
सर्वांस आधिं दिधले अतिरम्यवास। ज्यांच्या जसे रुचिस येतिल ते तयांस ॥
तैसेंचि तैं मुनिवरें भरतादि लोकां। केले निवास वसतीस सुरम्य जे कां ॥
निर्मी मुनीश सुख वैभव एवढें कीं। धाताहि जें अति मनःकुतुकीं विलोकी ! ११
पाहे जधां भरत तो मुनिचा प्रभाव। त्या स्वर्ग लोकहि लघू गमले अतीव ॥
ना वर्णवे तिथलिया सुखसंपदेतें। ज्ञानीहि तैं विसरती स्वविरक्तितें ते ! ॥१२॥
शय्यासनें, सुवसनें, विपुलें वितानें। नानासुमें उपवनें मृगपक्षि रानें, ॥
नानाफलें सुमधुरें अमृतासमानें। वापी तटाकसर केलिविहारपूर्णें ॥१३॥
अन्नें सुधामधुर तेथिल चारुपेयें। संकोच, पाहुनिच ज्यां, यतिसा जनां ये ! ॥
स्रक्चन्दनादि वनितायुत भोग तेथें। पाहोनियांच जन विस्मित हर्षले ते ! १४

तेथें कल्पतरू तशा सुरभिही सर्वांचिया केतनीं।
पाहोनी अभिलाष ज्यांस, निपजे इंद्रा-शचींच्या मनीं ॥
वाहे मंद सुगंध सौख्यद असा वायू तिथें शीतल।
सर्वांतें चतुरर्थ लाभति तिथें अन्यत्र जे दुर्भिळ ! ॥ १५ ॥

संपाती ती निर्मुनि चक्रवाकी। त्या चक्रवाका भरता, मुनी कीं
तो गाढडी आश्रमपंजरांत। ठेवी जणों जोंवरि हो प्रभात ! ॥१६॥

इति श्रीराम०ब्रह्मर्षिराजर्षीणां परस्परभक्तिपरीक्षानन्दमयवर्णनं नाम दशमस्तरङ्गः

तरंग ११ वा

केलें निमज्जन तयें मग तीर्थराजीं । सान्यांसमेत नमि तो मुनिच्या पदाब्जीं ॥
आशी दिल्या मुनिवरें धरि आत्मशीर्षीं । साष्टांग वंदि विनयें वदुनी मुनीसी ॥
येई समेत पथ उत्तम दाखवीते । तो चित्रकूटिं मन ठेवुनि जाइ पंथें ॥
हातांत हात धरुनी चलतां गुहाशीं । ते दोन भासति रघूत्तमभक्तिराशि ! ॥२॥
ना छत्र मस्तकिं, तसे अनवाणि दोघे । श्रीरामभक्तिनियमव्रतिं चित्त रंगे ॥
संवादिती वनपथागम गोड वाचा । श्रीरामलक्ष्मणकथा, जनकात्मजेच्या ॥३॥
पाहोनि रामवसतिस्थलवृक्ष चित्तीं । ये प्रेमवीचि उसळोनि न आवरे ती !
ती हृद्दशा बघुनि वर्षति देव पुष्पें । होई मही मृदुल मंगल मार्गरूपें !॥४॥
छाया करीति घन त्या सुखदा अतीव । वायूहि वाहत सुखावह सत्प्रभाव ॥
झाला जसा सुखद तो भरतास पंथा । रामासही नच तसा सुखदायि होता ५
जे मार्गवासि जडचेतन जीव सारे । रामास जे बघति, ज्या बघि राम नेत्रें ॥
ते सर्व योग्य जरि का परमा पदासी । पाहोनियां भरत, तद्भवरोग नाशी !६
नोहे विशेष बहु हा भरतप्रभाव । ज्या रामही स्वहृदयीं धरि याम सर्व !
जो रामनाम जगिं आठवि एकवार । संसारिं तो तरुनि विश्वहि तारणार! ७

“ रामाचा प्रिय जो असे भरत कीं तद्बंधुही धाकटा ।
वाटा मंगलदायिनी नच कशा व्हाव्यात त्या उत्कटा ? ॥ ”
ऐसें सांगति सिद्ध साधु मुनिही पाहोनि वर्णोनियां ।
मोठा हर्ष भरे बघोनि भरता, चित्तामध्यें त्यांचिया ॥ ८ ॥

भरतप्रभाव चिंतुनि चित्तीं चिंता करी सुरेश्वर तो ॥
जग हें भले भल्यातें दिसतें दुष्टास दुष्टगुण वरतो ! ॥ ९ ॥
प्रार्थुनि बृहस्पतीतें इंद्र म्हणे “ हे प्रभो ! करा तेंचि ॥
जेणें न भेट होवो भरताची आणि रामचंद्राची ! ॥ १० ॥

संकोचशील विभु राघवराय होय । सत्प्रेम अंकित तया करते अमेय ॥
प्रेमाब्धि हो भरत; हो न विनाश आतां। आली जुळून घडि; युक्ति करा जि! नाथा!

— इति श्रीराम० इन्द्रबृहस्पतिसंवादो नामैकादशस्तरङ्गः —

तरंग १२ वा

ऐकोन तें सुरगुरु स्मितचित्त चिंती । कीं, ‘ इंद्र अंध, जरि नेत्रसहस्रमूर्ति ! ?

इंद्रा वदे " कपट सोडिं, सकोप हो न । येथें छलें विचरतां फसशील पूर्ण ! १
ऐकें सुरेश्वर ! असा प्रभुचा विशेष । न स्वापराधहि तया करि चित्तरोष ॥
भक्तापराध करि त्याप्रति मात्र साचा । क्रोधाग्नि जाळित असे रघुनायकाचा ! २
लोकांत वेदिंहि असे इतिहास ठावा । दुर्वास जाणत असे प्रभुच्या प्रभावा ! ॥
हो रामभक्त न दुजा भरतासमान । ज्यातें जगद् जपत, तो जपि त्या सुजाण ! ३
ऐकें सुरेश्वर ! भला उपदेश माझा । रामा स्वभक्ति निज जीव गमे, न दूजा ॥
रामास तोष निजसेवकसेवनानें । भक्तास वैर करतां, प्रभु वैरि होणें ! ॥४॥
श्रीराम हो सम, न त्याप्रति रागरोष । ना पापपुण्य, गुणदोष शिवे न त्यास ॥
विश्वांत कर्मचि तसें रचिलें प्रधान । जो ज्यापरी करित त्याप्रति तेवि मान ! ५
दावीत तोच सम वा विषम स्वरीनी। ज्याच्या जशी हृदयिं भक्ति अभक्ति वा ती॥
निर्मान, निर्गुण, अलक्ष्य, रसैकधाम । तो भक्तभक्तिवश घे सगुणत्व राम ६
श्रीराम सेवकमना अति दक्ष रक्षी । या संत देव निगमागम होत साक्षी ! ॥
जाणोनि हें त्यज मनःकुटिलत्व सारें । सप्रेम देख भरताङ्घ्रियुगाबुजा रे ! ७
परहितरत सारे भक्त ते राघवाचे । सहति न परदुःखें अब्धि जे कीं दयेचे ॥
भरत तरि असे हा तच्छिरोरत्न साचा । मुळिच न धरिं इंद्रा ! लेशही घोर त्याचा॥
प्रभु सुरहितकारी राम हो सत्यसंघ । भरत रघुवराचा पाळि आदेशबंध ।
विकळ तुम्हि जहालां, स्वार्थदृष्टी मनानें।भरत न अपराधी, दोष तुम्हींच घेणे !"
परिसुनि गुरुवाक्यें सुंदरें सत्यसारें । सुरपति मनिं हर्षें भीतिचें जाय वारें ॥
सुरतरुसुमनाना वर्षि तो हर्षुनीयां । स्तवि अति भरताची भक्ति तो शंसनीया
ऐशापरी भरत जाय पथ क्रमीत । त्या 'धन्य धन्य' म्हणती मुनि सिद्धिमंत ॥
तो 'राम राम !' म्हणुनी जधिं दे उसासे । सर्वत्र उल्लसत भक्तिरसाब्धि भासे॥
उद्गार ते द्रववितीं कुलिशां, शिलांना । सत्प्रेम पौरमनिंचें शुचि वर्णवेना ॥
मध्यें वसून दिन तो यमुनेसि येत । पाहूनि नीर, भरि नेत्र जलें नितान्त ! १२
श्रीरामअंगसमवारि तसें बघून । झाले समग्रजन ते विरहाब्धिमग्न ॥
लाभे तयांस परि चारु विवेकनौका । वेगें समस्त चढले तिजमाजिं देखा! १३

—: इति श्रीराम० भरतस्य चित्रकूटगमनं नाम द्वादशस्तरङ्गः :—

तरंग १३ वा

विश्रांति घेति दिन तो यमुनातटीं ते । झाले समस्त पुरवासि वसून तेथें ॥
रात्रींत सर्व मिळल्या तटवासि नौका । ना वर्णवेहि गणना इतुक्या अनेका !

जाती प्रभातिं मग पारहि एकलेपीं। श्रीरामसेवकगुहा स्तुति लोक अर्पी ॥
स्नानें करून यमुनेंत नमून तीरें। जाई गुहासहित बंधुयुग प्रभातें ॥ २ ॥
केलें पुढें मुनिवरोत्तमवाहनातें। मागोनि होति पथिं राजसमाज जाते ॥
त्यामागुनी उभय बंधुहि जाति पायीं। अंगांवरी वसन–भूषण अल्प होई॥३॥
ते मित्र, मंत्रिसुत, सेवक संगिं जाती। सीतारघूत्तमसलक्ष्मण यांसि गाती ॥
श्रीरामवास घडला स्थलिं जेथजेथ। सप्रेम ते प्रणमती जन तेथतेथ ॥ ४ ॥
ऐकोन तें, निकटचे नर आणि नारी। येतीं तिथें पळत टाकुनि काम, सारीं॥
पाहूनि भक्तिभरिं तें भरतस्वरूप। वाटे कृतार्थ जनु त्यां सुख हो अमूप॰ ५
सप्रेम तैं वदति त्या अपुल्यांत नारी। उद्गारि एक "सखि! वाटत हेंचि भारी–
कीं रामलक्ष्मणचि हे असतील काय?। यांचें स्वरूप, वय, कांति तसेच काय!
तें प्रेम, शील, तनु, चाल, समग्र तीच। सीता नसे जवळिं, वेषहि भिन्न साच!
यांचेपुढें चलतसे चतुरंगसेना। नोहे प्रसन्न मुखभा, हृदिं खेद यांना! ७
शंका अशास्तवचि येत सखे! मनास"। ऐकोन तें, म्हणति त्या इतरां संहर्ष
"गे! योग्य तर्क तव, तूं किति गे! शहाणी।आहे तुझी अतुल सत्यमनोज्ञवाणी"
लागे दुजी मधुवचें रमणी कथाया। 'राज्याभिषेकसमयस्थिति ये पथा या'॥
साकेतिं केविं सगळा रसभंग झाला। श्रीरामराज्यसुखिं संकटकाल आला! ९
वाखाणिती भरतशील चरित्रभक्ति। जो त्यागि राज्य पितृदत्तहि पुण्यमूर्ति ॥
आहारकंदफल, जो अनवाणिजात। रामा स्वराज्यिं वसवूं वळवूं पहात॥१०॥
"आहे दुजा कवण? या भरतासमान। ज्याची रती रघुपतीवरि नित्य पूर्ण॥
तत्प्रीति बंधुवरतीं जगतीं अमेया। पुण्यामृताब्धि भरताचरणें जगीं या ११
गातां तसें परिसतां यश साधु त्याचें। निःशेष होय जगिं दूषण दुःख साचें!॥
जें कांहिं तद्यश वदूं जगिं थोडकें तें। हा रामबंधु मग केविं असा न चित्तें?
आत्यासवें बघितलें भरता अम्ही हो!।सान्या स्त्रियांत अम्हि आजि सुधन्य आहों
पाहोनि रूप, गुण ऐकुनि त्या कथीती।"ना योग्य यास जननी मुळिं कैकयी ती!"
कोणी सांगति " कैकयीप्रति न द्या हो दूषणें अल्पही ॥
धाता हें जुळवूनि आणि; अमुचीं भाग्यें खरीं श्रेष्ठ हीं! ॥
कोठें आम्हि अजाण शास्त्रविधिनें, हीन स्त्रिया पामर ॥
कुग्रामीं वसत्या अशांप्रति कुठें हें पुण्य हो! गोचर? ॥ १४ ॥
कोठें कुदेश अमुचा? कसल्या अम्ही या? आचारहीन मलिना कुलहीन बाया!

हा पुण्यपाक गमतो अमुचा विशेष । जे आम्हि देखत असूं भरतादिकांस !"

गांवोंगांवीं अशि ये आश्चर्यानन्दसागरा भरती ।
वाटे कल्पद्रुम ये उगवुनि मरुदेशभूस्थलावरती ! ॥ ॥ १६ ॥
भरता विलोकतांना मार्गस्थलवासिभाग्य उल्लसलें !
कीं सिंहलवासिजनां दैवें तीर्थप्रयाग ते दिसलें !! ॥ १७ ॥
निजगुणगानांसहिनचि रामाचें सुगुणगान आयकत ॥
स्मरत श्रीरघुनाथा चाले मार्गीं महामना भरत ॥ १८ ॥
वाटेंत त्यास तीर्थें, मुनिवर्याश्रम पवित्र सुरमवनें ॥
दिसतां करी निमज्जन, वंदन भरत स्वकीयदेहमनें ॥ १९ ॥
प्रार्थी विनम्रभावें त्यातें वर भरतराय हा एक ॥
" सीतारामपदाब्जि रति हृदयाची सदा जडो नीक ! " ॥ २० ॥
कोठें मिळती त्या जर किरात कोळी अरण्यिचे वासी ॥
तापसजन, बटुवर, यति संसाराचे तपोनिधि उदासी ॥ २१ ॥
करुनि प्रणाम त्यानें भक्तिभरें ज्यास त्यास भरत पुसे ॥
' कवण्या वनांत लक्ष्मण वैदेहीरामसहित वसत असे ? ' ॥ २२ ॥
तैं ते सांगत त्यातें प्रभुचा सारा भला समाचार
भरता बघोनि लोचनिं वाटे त्यां ये स्वजन्मफल थोर ॥ २३ ॥
जीं कोण त्या निवेदिति कीं आम्हीं देखिले तिघे कुशली ॥
श्रीराम-लक्ष्मण अशीं हृदयप्रिय तीं तया जनें दिसलीं ! ॥ २४ ॥
राघववनवासांच्या गोष्टी त्यानें जनांप्रति पुसाव्या ॥
त्यानेंहि त्याच फिरुनी कितिदा तरि गोड ऐकत असाव्या ! ॥२५॥
वसति करोनी रात्रीं निघति सकाळीं स्मरोनि रघुनाथा ॥
श्रीरामदर्शनाची भरतासम लालसा तयां चित्तां ॥ २६ ॥

सर्वत्र तैं शकुनमंगल होति त्यांस । होई सुखस्फुरण नेत्रभुजीं विशेष ! ॥
उत्साह सर्व हृदिं हा भरतासमान । ' दुःखानला शमवि राम कधीं मिळून ?! '
ज्याचा मनोरथ जसा तशि त्या प्रवृत्ति । स्नेहाख्य मद्य करि त्यां प्रति मत्तमूर्ति
झाल्या तनू शिथिल पाउलिं लोलता ये । ते प्रेमगद्गदवचें वदती अमेयें ! २८
श्रीराममित्र गुह दाखवि त्याच वेळीं । तो रम्य शैलवर ज्या तटिनीहि मेळीं ॥
श्रीरामलक्ष्मण जिथें वसती प्रवीर । सीतेसमेत युगबंधु तपस्विहीर ! ॥२९॥

साष्टांग सर्व नमती बघतांच त्यास । उच्चारती 'जय रघूत्तम जानकीश !'
प्रेमातिमग्न अति राजसमाज झाला । श्रीराम कीं निजपुरा परतोनि आला !!
भरतहृदयिं तेव्हां प्रेम ये जें भरून । उचित वचनिं गाया शेषही शक्त तें न ॥
कविमति तरि कैशी त्यास वानूं शकेल !॥ अहमिति मलिना धी ब्रह्मसौख्या चकेल ॥
॥ इति श्रीराम० श्रीअयोध्या० भरतचित्रकूटप्राप्त्यखण्डप्रेमभावनिं नाम त्रयोदशस्तरङ्गः ॥

तरंग १४ वा

प्रेमान्तरंग जन तो शिथिलांग होता । ते दोन कोस रिघतां दिन जात अस्ता ॥
पाहोनि ठाव जल, राहति ते निशीथीं । होतां प्रभात निघती रघुनाथभक्ति ॥ १ ॥
तों चित्रकूटिं विभु रात्रिच होय जागा । स्वप्नीं बघे जनकजाहि अशा प्रसंगा ॥
कीं येतसे भरत सर्वजनांसमेत । श्रीरामचंद्रविरहाग्नित देह तप्त ॥ २ ॥
सारेच तीस गमले अतिदुःखितान्त । माताहि सर्व दिसल्या हृदयांत आर्त ॥
तें स्वप्न आयकुनि रामहि साश्रु होय । तो शोकनाशनहि शोकिं बुडोनि जाय !! ३
श्रीराम बोलत "भलें नच लक्ष्मणा रे ! हें स्वप्न ऐकविल अश्रवणीय सारें"
बोलोनि हें करित बंधुसमेत राम । सत्स्नान, पूजि शिवसाधुंसि साधुकाम ! ४

> पूजुनि देवा, मुनिंसि वंदुनी बसतां उत्तर दिशिं दिसले ।
> रामार्ते नभ धूळीं भरलें खगमृग आश्रमिं भयिं घुसले ! ॥
> तुलसि वदे, अवलोकुनि कारण होई राघव चकितमना ॥
> तंवर येउनी किरात कोळी कळविति सकल प्रभुचरणां ॥ ५ ॥

वाणी अतीव शुभ ती परिसोनि राम । होई प्रसन्न; पुलकांकित हर्षधाम ॥
तें शारदांबुरुहलोचनिं अश्रु आले । स्नेहें भरे उर मुदें तुलसीहि डोले ! ॥ ६ ॥
हो काय कारण परी भरतास याया । श्रीजानकीरमण आकुल चिंतनीं या ॥
येवोनि कोणि कथि त्याप्रति हेंहि नीकें । आहेत कीं भरतसंगतिं तीं अनीकें ॥ ७ ॥
ऐकोनि तें प्रभुमनीं अति होय पेंच । तातोक्ति एकिं, अनुजार्ति समान साच
चिंतोनियां भरतभाव परी मनांत । अस्वस्थ होइ रघुराय अनाथनाथ ॥ ८ ॥

> होई समाधान परी विचिंतुनी । आशेंत वागे भरत स्ववर्तनीं ।
> पाहोनि रामासि सचिंत लक्ष्मण । सांगे प्रसंगें लव रीतिलक्षण ॥ ९ ॥
> " प्रभो ! वदें मी अविचारितांही । हें दासकर्तव्य; न हो धिटाई ! ॥
> आहांच सर्वज्ञ-शिरोमणी तुम्ही । परी मला वाटत तें वदेन मी ॥ १० ॥

आहांत सद्‍हृदयशीलनिधान नाथ! । सुष्ठुस्वभाव सगळ्यांसचि गोड शांत ॥
प्रीती समर्पि, सकलीं तुमचाच साच । विश्वास, यास्तव जगा म्हणतां तसेंच॥
येतां प्रभुत्व जगतीं विषयान्धजीवा । तो मोहपाशवश जाचक होइ सर्वा ॥
आहे परी भरत साधु, सुधी, सुनीति । विख्यात तद्‍हृदयिंची दृढ रामभक्ति
ऐसें असून मिळतांक्षणिं राज्य त्यास । तो धर्मनीति मनिं मानित ना विशेष॥
हा आमची, कुटिल बंधु, कुवेळ पाही । मानीत राम वनवासि असाह्य राही
ये दुष्टहेतु बहुसैनिक मेळवूनी । राज्या अकंटक करूं बघतो कृतीनीं ॥
कोटिप्रकारिं कुटिलत्व रचोनि दोनी । हे बंधु येति बहुसैन्यबळेंकरूनी ॥१४॥
यांच्या मनांत नसता जर घातपात । कां संगतीं हयरथादिकदंति होत? ॥
द्यावा कशास भरतासचि यांत दोष?। येतांच राज्यपद ये मद, ना कुणांस?
शशि हो गुरुपत्नीरत, लावी नहुष स्वयानिं विप्रांसी ॥
लोकश्रुतिविमुख असा वेनासम अधम कोण अघराशि? ॥ १६ ॥
सुरपति महस्रलोचन, सहस्रबाहु, त्रिशंकु यांमाजीं ॥
राज्यमदें नच दिधले अयशस्कर दुष्कलंक कवणा जी! ॥ १७ ॥
शत्रू तसें ऋण न अल्पहि शेष राहो । यातें उपाय भरतें जरि युक्त हा हो! ॥
त्यानें परी मुळिं न नीट विचार केला । कीं मानिलें वनिं असाह्य रघूत्तमाला
त्यातें कळेल परि युद्धि विशेष आज । संरुद्ध राममुखिंचें बघुनी सुतेज ॥"
नीतीस विस्मरत लक्ष्मण बोलतां हें । हो भास वीररसवृक्ष फुलोनि राहे! १९
लावोनि रामपदिं आत्मशिरोंऽबुजातें । सांगे स्वशक्ति सहजा ऋजु निश्चयोक्तें ॥
"माझे प्रभो! वच गणा न अयोग्य हें कीं । आम्हां छळी भरत दुष्टपरीं अनेकीं
व्हावेत केवीं अपमान सह्य? । मनांत हे राखुनि योग्य काय? ॥
होतां प्रभू हे मज पाठिराखे । धनुष्यही मत्करिं सुष्ठु ठाके ॥ २१ ॥
मी क्षत्रजाति, रघुवंशज रामबंधु । विख्यात सर्व जगतीतलिं शौर्यसिंधु! ॥
धूलीसमान जगिं कोण असेल नीच? । तीही शिरावरि चढे पदिं ताडितांच॥"
उठोनी तो मागे कर जुडुनि आज्ञा रघुवरा ।
गमे झाला जागा रस खडबडां वीरचि खरा! ॥
जटा बांधी शीर्षी, कसि कटिसि भाते बळकट ।
सजे हस्तीं त्याच्या खरशर धनुर्दंड विकट! ॥ २३ ॥
लक्ष्मण म्हणे " रणांगणिं भरतातें आज शिकवुं दोन धडे ॥

'श्रीरामाचा सेवक' यश हें माझें जगांत हो उघडें ! ॥ २४ ॥
रामापमानफल मी वितरुनि अजि त्यासि संगरामाजीं ।
निजविन दोनिहि बधू रणशयनीं, सत्य संगरा माजी ! ॥ २५ ॥
झालें भलें, भरत लोकसमेत आला । मागील रोष सगळा प्रकटूं तयाला ! ॥
निर्दालितो मृगपती बहु कुंजरांना । लाव्यांसि जेविं झपटीत असे ससाणा ॥
सैन्यासमेत भरतासहि तेविं आज । त्या सानुजास रणिं पाडुनि दावुं तेज ! ॥
झाले सहाय जरि त्यासि पिनाकपाणि । मारीन त्यांसि तुमच्या शपथप्रमाणीं!"
तें क्रोधयुक्त अभिभाषण लक्ष्मणोक्त । ऐकोनियां शपथही जशि तो करीत ॥
लोकेश, लोकहि भयाकुल सर्व होती । जाया पळून सगळे जण ते पहाती !
झालें भयार्त जग तों नभिं होय वाणी । जी होय लक्ष्मणबलस्तुतिचीच खाणी ॥
"हे लक्ष्मणा ! कवण जाणि तुझ्या प्रतापा? कीर्तिप्रभाव तव रे ! वदण्या न सोपा!
जो सवकार्यिं उचितानुचितत्व जाणे । तो साधु होय करि जो उचिताप्रमाणें॥
जो आचरीत सहसा, मग दुःखि होत । त्यातें न मानिति भला कधिं वेद संत"
ऐकोनी तें सुरवच मनीं लक्ष्मणा लाज वाटे ।
सीतारामां नमित विनयें भक्ति चित्तांत दाटे ॥
बोले राम प्रभु "मजसि तूं वर्णिली चारु नीति ।
बंधो ! सर्वांमधिं कटु अती राज्यगर्वान्धता ती ॥ ३१ ॥
साधो ! ज्यांनीं नच कधिं सभा वंदिली सज्जनांची ।
सत्सेवा ना घडलिहि जयां त्यां नृपां गर्व जाची ॥
नाहीं वत्सा ! भरतसम गा ! साधु लोकत्रयांत ।
नाहीं तैसा कुणि परिसिला, पाहिला पुण्यवंत ! ॥ ३२ ॥
होईल नैव भरता कधिं राज्यगर्व । ब्रह्मेशविष्णुपद त्या जरि लब्ध सर्व ॥
कीं क्षीरसिंधुमधि सांडुनि बिंदु कांजी । नासेल शुद्ध कधिं दुग्ध तदीय का जी!
अंधारही गिळुं शकेल दुपारिं सूर्या । होईलही नभ निमग्न घनांत आर्या ! ॥
केव्हां बुडेल जलिं गोष्पदिंही अगस्ति।क्षोणीहि सांडिल कधीं सहज क्षमा ती३४
मेरूसि फुंकुनिच कीं उडवील माशी । ग्रासील नैव भरता मदपूर्णराशि ! ॥
ताताचिया शपथिं मी वदतों तुझ्याही । सद्बंधु साधु भरतासम लोकिं नाहीं !
संमिश्र दुग्धजल सद्गुणदुर्गुणांचें । धाता असें रचित संसृतिविश्व सांच ! ॥
या सूर्यवंशसरिं हंसचि जो जहाला । घे सद्गुणां भरत टाकुनि दुर्गुणांला !

हा हंस दिव्य, गुणदोषविभाग जाणे । तत्कीर्तिराशि उजळी जग सद्‌द्युतीनें"
गातां असें भरतसद्‌गुणशीलधाम । प्रेमाब्धिमग्न हृदयांतरिं होय राम ॥३७॥
श्रीरामवाणी परिसोनि कानीं । प्रीती बघोनी भरताभिमानी ॥
स्तुती करीती सुर सर्वरीतीं । " न रामसा नाथ दयाळुमूर्ति ! ॥३८॥
होता जरी भरतजन्म न या जगांत । ऐसा सुधर्मनिधि कोण जगांत होत ? ॥
कैसे कवी भरतसद्‌गुणगानिं शक्त । रामा ! तुम्हांविण तसा न दुजा समर्थ"
ठेवी सरित्तटिं तदा निज सर्व लोक । माता गुरू सचिव यांस पुसूनि नीक॥
शत्रुघ्न तेविं गुह यांसह भक्तिचेता । तो जाय तेथुनि, जिंथ रघुनाथसीता४०
जाणूनि मातृकृति अंतरिं खंत ज्यास । शंका कुतर्क भरतीं भरती अशेष ॥
"मन्नाम ऐकुनिच लक्ष्मण रामसीता ।जातील येथुनि दुज्यास्थलिं काय आतां ?
श्रीरामचित्तिं जर मी जननीमतीच । जें बोलतील बहुही मज अल्प साच !
ते मानितील जर कीं मज आपुलासा । माझ्या मला सदय ते क्षमितील दोषां
मातें गणोनि मलिना जरि ते त्यजोत । देवोत मान मज मानुनि दास भक्त॥
होवो कसेंहि तरि राघवपादुकांना । जाईन मी शरण सेवकतारकांना ॥ ४३ ॥
सुस्वामिराम, मम दोष न मानितील । त्यांनाच मी शरण जाइन भक्तिलोल ॥
लोकीं यशें अतुल चातक, मीन यांचीं । तत्प्रीति नीति शुचि नित्यनवीन साची "
ऐसें मनीं म्हणत चालत जात पंथें । संकोच भक्तिहि करी शिथिलांग त्यातें॥
त्याच्या मना फिरवि मातृकृता कुरीति । त्याचीं पदें चलति भक्तिभरें परी तीं!
सद्‌भाव राघवमनांतिल जाणुनीयां । वेगेंचि तो उचलि पाउल शीघ्र जाया
तेव्हां दशा भरतमानसिंची अशी कीं । वारिप्रवाहिं जशि दावितसे जलौकी
प्रीती तशी भरतिं पाहुनि आर्तता ती । झालें निषादमन पूर्ण विदेहवृत्ति ! ॥
होती तदा शकुन मंगलपूर्ण त्यातें । ऐकोनि जें गुह वदे फळ जें मिळे तें४७
' जाऊन शोक भरणार समग्र हर्ष । लोपोनि तोष, परि अंतिं विषादपोष !'॥
मानीतसे भरत सत्यचि तें गुहोक्त ! तो पातला तंवर आश्रम जेथ होत ४८
जें तो बघे विपिनशैलमनोज्ञराजि । पक्वान्नशी जणुं गमे क्षुधितांतरा जी ! ॥
जैसी प्रजा हृदयिं दारुण ईतिभीता । दुष्टग्रहीं, त्रिविधतापिहि जी सुतप्ता४९
जातां सुराज्यिं, सुखदेशिं, सुखावते ती । तैशीच होय भरतस्थिति सौख्यमूर्ति
श्रीरामवासिं अतिहर्ष वनश्रियेतें । जैशी प्रजा सुनृप पावुनि हृष्ट होते ! ५०
त्या राज्यिं हो सचिव मूर्त विराग हाच । राजा विवेक, वन पुण्य सुदेश साच ॥

यद्दीर ते नियमनिग्रहयोग धीट । ज्या राजधानि गिरिसुंदर चित्रकूट ॥५१॥
ज्या शांति सन्मति अशा शुचि रम्य राशी । संपन्न सर्वपरिं सन्नृप वैभवांनीं॥
श्रीरामचंद्रचरणाश्रित भक्तिभावें । तो भाग्यवान् नृपति वास्तव सौख्य पावे ५२
सकलदलसमेता मोहभूपा जिणोनी । नरपति सुविवेकें राज्य केलें सुखांनीं ॥
निखिलसुखसमेता वैभवा पूर लोटे । लवहि न उरले तैं संकटां स्थान कोठें ।
तेथें प्रदेश वनिंचे, मुनिसन्निवास । गांवें पुरें, नगरि, खेडि अशीं जयास
नानापरी मृग विहग विचित्र सारे । हेंच प्रजागण तयामधिं नांदणारे ! ॥५४॥
गेंडे वराह, गज, सिंह, तसेच वाघ । देखोनियां महिषधेनुवृषादिवर्ग ॥
सोडूनि वैर फिरती वनिं संगतींत। सेनाच ती नृपतिची चतुरंगि होत ! ॥५५॥
वारिप्रवाह नदती, ध्वनतात दंती । वाद्ये निषाणरव त्यामधिं वाजताती॥
रावे, चकोर पिक, चातक, चक्रवाक, सानंद कूजति मराळहि ते सुरेख ॥५६॥
भृंगालि गाति करितात सुनृत्य मोर। वाहे सुगंधि जणुं मंगल हर्षपूर !॥
वेली तरू तृण फलाढ्य सुपुष्पशाली । आनंदमंगल समाजिं भरे विशालीं !
रघुवरगिरिशोभा पाहुनी तो अतीव । अमित भरतचित्तीं लोटला प्रेमभाव ॥
व्रतनियमतपाचे अंतिं जैशी सुखाप्ति। सुफलित करि वृत्ती सन्मुनीची मुदें ती !

— इति श्रीराम० भरतस्य चित्रकूटदर्शनं नाम चतुर्दशस्तरङ्गः —

तरंग १५ वा

उंचावरी पळत जाउनि तो निषाद । सांगे उभारुनि भुजा भरता सुशब्द ॥
"हे नाथ ! वृक्ष निरखा, किति हे विशाल!हे आम्र, जंबुतरु, पाकळ, हे तमाल
या वृक्षमध्यि वटवृक्ष विराजताहे । उत्तुंग सुंदर असा मन मोहिताहे ॥
तो नीलपल्लविं भरे, फलिं लाल शोभा। छायाहि सान्द्र सुखदा मनिं निर्मि लोभा२
हो भास कीं तिमिर आणिक रक्तकांति। राशी अशा विधि रची अतिरम्यमूर्ति
हे वृक्ष होति विभुवर्य ! सरित्तटासी । छायेत हो रघुपपर्णकुटी दिसेशी !॥३॥
तीचे समीप तुलसीतरुराजि नाना । सीता किती करित, लक्ष्मणही जयाना ॥
वेदीहि उंच वटवृक्षतळीं विराजे । सीताकरांबुजिं शुभा रचली असे जे ॥४॥
जेथे बसून मुनिसंघसमेत राम । सीतासवें परिसती नित पुण्यधाम ॥
नानापुराणनिगमागम सेतिहास । नाना कथा मधुर भक्तिविरक्तिपोष "॥५॥
भिल्लोक्त तें परिसुनी बघतां तरूंतें । अश्रू विलोचनिं भरे भरता किती तें ! ॥

वंदोनि त्यांसि चलती मग बंधु दोंही ! तद्भक्तिवर्णनिं पुरे नच शारदाही ! ६
हर्षोनि रामपदचिह्नित भू बघोनी । वाटे तया परिसलाभचि होय कोणी ! ॥
माथां धरूनि रज, लाविति वक्षि नेत्रीं । होती सुखी, जणुं मिळे प्रभुराम गात्रीं
पाहोनि तेविं भरतस्थिति मूर्तभक्ति । प्रेमीं निमग्न जडजीव मृगादि होती ॥
मार्गा चुके गुहहि तैं अतिभक्तिपूरीं ! । सांगोनि वाट, सुर वर्षति पुष्पभारीं ! ८
तैं सिद्धसाधकहि भक्ति बघोनि तैशी । तीतें प्रशंसिति अकृत्रिम भावहर्षी ॥
" होता न भूतलिं जरी भरतप्रभाव । येतीं न जाड्यिं चरता, चरिं जाड्यभाव!"

विरहमंदरिं तो भरतांबुधि । मथि रघूत्तम राम कृपानिधि ॥
अमरसाधुहितास्तव सत्सुधा । सृजुनि भक्तिमयी निववी बुधा! १०

गुहासंगे तैशा अमितसुषमा बंधुयुगला ।
तरुच्छन्ना तेव्हां नच निरखुं सौमित्रि शकला ! ॥
निधी तो पुण्याचा भरत बघि रामाश्रम तिथें ।
जगीं मांगल्याचें सकल उगमस्थान जणुं तें ! ॥ ११ ॥

नाशे, प्रवेश करतांक्षणिं, दुःखदाव । योग्यांस लाभत जणों परमार्थठाव ॥
रामापुढें भरत पाहत लक्ष्मणाला । माथां जटाभर, कटीं तरुवल्क त्याला १२
भाते कसून शर हस्तिं धनुष्य खांदीं । रामा विचारित, वदे प्रभुही प्रमोदीं ॥
वेदीवरी विलसले रघुरायसीता । संतोषवीत मुनिसाधुसमाजचित्ता ॥ १३ ॥
सुश्यामवर्ण जटि वल्कलधारि राम । वेषें मुनीच गमले रति आणि काम ! ॥
हस्तांबुजीं फिरवितां शरकार्मुकांसी । हास्यावलोकिं क्षणिं जीवभवार्ति नाशी

श्रीराम सीतेसह शोभतात । रम्यस्वरूपें मुनिमंडळांत ॥
ज्ञानादिसंघीं जणुं ते सुमूर्त । श्रीसच्चिदानंदचि भक्तियुक्त ! ॥ १५ ॥

[सीता रघूत्तमयुता मुनिमंडळींत । अत्यंत शोभत मनोहर ती नितान्त ॥
ज्ञानादिमेळिं जणुं साजति मूर्त का ती । आनंदसच्चिदमिरूपसमेत भक्ति १५]
तल्लीन हो भरत बंधुयुगासमेत । ना हर्ष शोकसुखदुःख मन स्मरीत ॥
"मां पाहि, पाहि विभुवर्य !" रटोनि ऐसें । तो लोटला भरत भूतलिं काष्ठ जैसें ॥
तें प्रेमयुक्त वच लक्ष्मण ओळखोनी । जाणें मनीं भरत तो नमि आर्तवाणी ॥
सप्रेम बंधुवरलें उरिं ओढि त्यासी । तें स्वामिसेवनहि त्या धरित स्वपाशीं ॥ १७ ॥
भेटूं शके न भरता, त्यजुंही शकेना ! । वर्णीत सत्कवि मनःस्थिति सोपमाना ॥
खेंचूनि उंच चढवी कुणि वावडीतें । सेवेंत राहि निज लक्ष्मण तेविं चित्तें ॥ १८ ॥

सप्रेम तो वदत नम्र करूनि माथा । "वंदी तुम्हां भरत हा निरखा जि ! नाथा" ।।
प्रेमें अधीर अति रामहि ऐकतां तें । भाता कुठें ? शर कुठें ? धनुवल्क वा तें ? ।।
त्या ऊचलोनि भरतासि बळेंकरूनी । घेई कृपानिधि उरीं कवळी करांनीं ।।
पाहोनि त्या भरत रामसुमीलनातें । सारेच विस्मरति कीं तनुतें मनातें ! ।।२०।।
ती प्रीति रीति, मिळणी कशि कोण वर्णी ! । होती अगम्य कविंना मनिं, कर्मि, वाणीं
सप्रेम ज्ञाति ऋजु सन्मति बंधु दोनी । तैं चित्त, धी, मन, अहंकृति विस्मरोनी ।।
सांगा, कोण बरें तें प्रकटूं शकणार उत्तम प्रेम ?
छायेचीही छाया त्या प्रेमाची अगम्य हा नेम ! ।।२२।।
कविचा समग्र अर्थहि अवलंबुनि राहि अक्षरांवरती ।।
नर्तकनाच तरी ते तालाच्या गतिस सर्व अनुसरती ! ।।२३।।
रघुवर-भरतप्रेमा सर्वपरीं हो अगम्य सकलांना ।।
तेथें प्रवेश नाहीं चित्ता हरिहरविधींचिया जाणा ! ।।२४।।
तें मी मंदमति कसा वर्णू शकणार उत्तम प्रेम ? ।।
निर्मील पिंजणीची तार कधीं का सुराग रसधाम ? ।।२५।।
पाहोनि रामभरतां मिळणी अशी ती । चित्तामधें धडकि देवकुलें वहाती ।।
त्यांची बृहस्पतिमतीं समजूत होतां । वानोनि वृष्टि करिती सुमि मुक्तहस्ता ।।२६।।
शत्रुघ्नाला प्रथम मिळुनी राम भेटे गुहाला ।
हृत्प्रेमाला अतिशय तया अंतरीं पूर आला ।।
भेटे प्रेमें भरतहि उरीं लक्ष्मणा आकळोनी ।
सौमित्रें तैं भरत नमिला पादपद्मीं मिळोनी ।।२७।।
शत्रुघ्नातें कडकडुनियां लक्ष्मणें आकळीलें ।
वक्षोभागीं उचलुनि गुहा प्रेमिं आलिंगियेलें ।।
दोनी बंधू मुनिगणपदीं वंदुनी भक्तिभावें ।
आशीर्वादां मिळविति मुदा सौख्यदा त्या प्रभावें ।।२८।।
भक्तिप्रेमें हृदयिं भरुनी जानकीपादपद्म ।
धूली शीर्षी धरिलि भरतें सानुजें पुण्यसद्म ।।
वारंवार प्रणमिति तिला बंधु ते तैं तयांतें ।
सी हस्ताब्जीं उठवुनि तयां मस्तकीं स्पर्शि हस्तें ।।२९।।
चित्तीं सीता वितरित तयां प्रेमकाशी अनन्त ।

प्रीतीमध्यें स्मरत न तिचें देहभानाहि चित्त ॥
सर्वांरीतीं हृदयिं मुदिता जानकीतें बघोनी ।
चिंता भीति त्यजुनि वरिला थोर संतोष त्यांनीं ॥३०॥
कोणी कांहीं वदत न, न वा कोणि कांहीं विचारी ।
प्रेमांभोधीमधिं बुडुनियां जाय तद्वृत्ति सारी ! ॥
तैं नावाडी गुह निजहृदीं धैर्य मोठें धरूनी ।
जोडोनीयां करयुग तयां बोलला नम्रवाणी !–॥३१॥

"प्रभो! सर्व माता मुनीशांसमेत । अयोध्यानिवासी जनादीहि येत ॥
प्रधानादि सेनाधिपां घेउनीयां । इथें येत आहेत तुम्हा मिळाया " ॥३२॥
'येती गुरु' श्रवण हें करि शीलसिंधु । सीतेसमीप निज ठेवि कनिष्ठबंधु ॥
वेगेंचि जाय तयिं राघव धर्मधीर । दीनावरील करुणा हृदिं ज्या उदग्र॥३३॥
पाहोनियां गुरुसि सादरभक्तिपूर्ण । दंडप्रणाम करि राम तयांसि तूर्ण ॥
घेती वसिष्ठ मुनिही कवळीत वक्षीं । सप्रेम त्यां उभय राघवलक्ष्मणांसी॥३४॥
तैं प्रेमहृष्ट तनु सागुनि आत्मनाम । साष्टांग वंदि दुरुनी गुह भक्तिधाम ॥
भेटे बळें मुनिहि रामसखा गणोनी । कीं स्नेह घेत भुइला लुठतें करांनीं!३५
'श्रीरामभक्ति जगिं मंगलमूल सारी' । ऐसें स्तवोनि सुर वर्षिति पुष्पसारीं ॥
'याचेपरी कवण होय खरें मुनीच ? आहे वसिष्ठसम कोण महान् तसाच ? ३६
जे भेटले मुनि गुहा बहु मानुनीया । त्या लक्ष्मणाहुनिहि थोर गुणीं अमेया ॥
हा जानकीरमणभक्तिभरप्रभाव । हो हाच कीं उघड सिद्ध मनोज्ञभाव ॥३७॥
हृद्भाव जाणुनिच रामजनांतरींचा । कारुण्यराशि भगवान् सकलज्ञ साचा ॥
ज्याचा जसा हृदयिंचा अभिलाष होय । त्याचा तसा पुरवि तो प्रभु रामराय'
श्रीराम त्यां सानुज भेट दे क्षणीं । प्रचण्ड तद्दु:ख निवारि वीक्षणीं ॥
प्रौढी न ही रामगुणीं विशेषशी । कोटीघटीं एक रवि-च्छवी जशी ॥ ३९ ॥
तैं लोकहृत्प्रेम उचंबळोनियां । गुहाप्रती भेटति वानुनी तथा ॥
स्वभाग्यही वर्णिति शंसनीय कीं । अनन्यभक्ती गुह जाणतो निकी ॥ ४० ॥

पाहि राम अपुल्या जननींना । वल्लरी हिमहता जणु दीना ॥
कैकयीस विभु भेटत आधीं । प्रेमला सरल अंतरिं ज्या धी ॥ ४१ ॥
कैकयी नमित रामपदाब्जीं । दु:खिता हृदयिं लोळण घे जी ॥
रामराय तिजला समजावी । दोष काल-विधि-कर्मिंच लावी ! ॥ ४२ ॥

सर्वांहि मातांप्रति राम भेटुनी । प्रबोधुनी त्यां परितोष दे मनीं ॥
" हें ईश्वराधीन समग्र विश्व हो । याचा न कोणासहि दोष आइ हो ! ॥"
अरुन्धती वंदिलि दोंहि बंधुनीं । विप्रस्त्रियाही सह येति ज्या वनीं ॥
गंगा-भवानीसम त्यांसि मानिलें । त्यांनींहि आशीर्वचिं त्यांसि वानिलें ॥४४॥
केलें सुमित्रापदिं त्यांहिं वन्दन । भुजीं तदंकांप्रति देति बंधन ।
रंका जणों लाभलि थोर संपदा । प्रहर्ष त्यांचा नच वर्णवे कदा ! ॥ ४५ ॥
कौसल्येतें वंदिती दोंहि बंधू । तीही झाली व्याकुळा प्रेमसिंधु ॥
घेई त्यांसी ती उरीं आकळोनी । न्हाऊं घाली लोचनीं अश्रुपूर्णीं ॥ ४६ ॥
त्या वेळेचा हर्ष, तैसा विषाद । वर्णायातें ना कवींतेंहि शब्द ! ॥
कैसा याचा स्वाद मूकां वदाया ? । याची साक्षा सर्वदा शारदा या ! ॥४७॥
भ्रातेसि भेटुनि सलक्ष्मण रामराय।प्रार्थी गुरूंसि 'अजि आश्रमिं याजि ! पाय'
पौरादि सर्व मग ते मुनिच्या निदेशीं।जागा, जला बघुनि लागति राहण्यासी

ब्राह्मण, मंत्री, माता गुरु तैसें काहिं लोक सांगातीं ॥
घेउनि हर्षें आश्रमिं लक्ष्मणरघुनाथ भरत हे जाती ॥ ४९ ॥
तेव्हां सीता मुनिवरपदां भक्तिभावें धरीत ।
आशीर्वादां मिळवि मुदिता इष्ट कल्याणयुक्त ॥
पत्नीलागीं मिळत गुरुच्या ती मुनिस्त्रीसमेत ।
त्या प्रेमाचें कथन करण्या कोण व्हावे समर्थ ? ॥ ५० ॥

वंदी पदाब्जिं सकलांप्रति नम्र सीता । आशीर्वचें मिळवि जीं सुखवीति चित्ता
ती जों बघे सकलही निज सासवांना । भीता, मिटी नयन, दृष्टिस साहवेना! ५१
त्यांधाञ्चिया पडलि पाशिं जणों मराली । बोले 'विधे ! किति करें तव दुष्ट केलि !'
सीते बघूनि अति दुःखित त्याहि होती।दुःखें विधी वितरि, लागति साहणें तीं
तैं जानकी हृदयिं धैर्य धरूनि कांहीं । नीलांबुजोपमविलोचनिं अश्रु वाही ॥
श्वश्रूजनांजवळिं जाउनि त्यांसि भेटे । कारुण्यपूर अवनीवरि फार लोटे ! ५३
श्वश्रू तिनीहि नमिल्या जनकात्मजेनें । प्रत्येकिच्या चरणिं लागुनि आदरानें॥
प्रेमाधिमग्न हृदिं चिंतिति त्याहि आशी।'सौभाग्य हो तव अनन्तचि सौख्यराशि!'
प्रेमाकुला जनकजा सकलाहि राशी । पाहोनि त्यांसि बसण्या कथिलें गुरूंनीं॥
ते सांगती सकल संसृति मायिका ही । बोधूनि सांगतिहि ते परमार्थ कांहीं ५५
भूपालमृत्यु कथिला मग जों मुनींनीं । दुःखीं असह्य बुडला प्रभु तें भवोनी ! ॥

तन्मृत्युहेतु गणुनी अपुल्यानरील। प्रीती असी विकल हो प्रभु धैर्यशील ॥५६॥
वज्रापरी कठिण ती कटुवाक् श्रवोनी। सीता सशोक तांश लक्ष्मण आणि राणी॥
सारेहि लोक अति शोकिं बुडोनि गेले। रायें जणों मरण आजचि सेवियेलें। ५७
रामा मुनी बहुपरीं समजावि चित्ता। मंदाकिनीजलिं नहाति सर्वें समस्तां-
तो निर्जल व्रत करी दिनिं त्यांत राम। सांगे गुरू तरिहि लोक तसे निकाम ५८

दुसऱ्या दिवशीं राघव मुनिवर्यांचा निदेश आयकुनी॥
श्रद्धाभक्तिसमन्वित सादर करि सर्व, जें निवेदि मुनि ॥ ५९॥
पितृक्रिया तो करि वेदसंमत। हो शुद्ध तो पापतमोऽर्क कीर्तित॥
यन्नाम वह्नी अघतूलराशित। होतें जगन्मंगलमूल चिंतित ॥ ६० ॥

तो साधुसंमत असा प्रभु शुद्ध झाला। गंगौघ कीं सकल तीर्थिं समर्चियेला!॥
जावोनि त्यावरि पुन्हां दिन दोन काल। बोले गुरूंप्रति रघूत्तम भक्तिलोल ६१
"हो नाथ! सर्व जन दुःख अतीव सोसी। ज्या कंदमूल फल वारिच सेवनासी॥
मंत्री, तसा भरत सानुज, आणि माता। पाहोनि हो क्षण मला युगसाच चित्ता! ६२
सर्वांसमेत रिघणें मुनिंनीं पुरासी। येथें अम्ही, नृपति इंद्रपुरीनिवासी॥
वारिष्ट होय मम हें वदणें तुम्हांतें। जे योग्य वाटत असे करणें स्वचित्तें" ६३
तें बोलती मुनि "विभो! करुणानिधाना!। तूं धर्मसेतु वच हें वदशील कां ना?
हे श्रांत आर्त जन विश्रम पावुं देत। लाभोनि दर्शन तुझें दिन दोन येथ" ६४
रामोक्ति ऐकुनि भयाकुल सर्व होत। नौका जणों जलनिधीमधिं वादळांत!॥
ऐकोनियां मुनिवरोक्ति परी शुभा ती। वाटे तयां पवन कीं अनुकूल होती! ६५
पुण्यौघिं, ज्या निरखितांचि शमे अघाली। त्या स्नान ते करिति सर्व तिनीहि कालीं
आतृप्ति ते बघति मंगलमूर्ति डोळां। सानंद दंडवत घालिति कैकवेळां! ६६
श्रीरामशैलवनिं पाहति हिंडुनी ते। जेथें सुखें सकळ, दुःख नसेचि जेथें॥
पीयूषतुल्य जलिं निर्झर वाहतात। वायु त्रितापहर मंद सुगंधि शीत ॥६७॥
वेली तृणें द्रुमसमूह अनंतजाति। पुष्पीं फलीं किसलयीं अति शोभताती॥
छायेंत शोभति शिला सुखदा नितान्त। शोभा वनोद्भव अशी कशि वर्णुं येत! ६८
तेथें सरें सरसिजें, सलिलें मनोज्ञें। कूजन्मरालगण, गुंजति भृंग गानें॥
सोडूनि वैर विपिनीं मृग संचरीती। नाना विहंग बहुरंग न वर्णिजेती ६९
कोळी किरातजन भिल्ल वनाधिवासी। घेऊनि गोड शुचि सुंदर जीं सुधासीं॥
द्रोणीं भरून भरुनी रचुनी मनोज्ञ। सत्कंद मूलफल अंकुर हीं जुडून ॥७०॥

सान्यांसि देति विनयें करुनी प्रणाम । सांगोनि भेद, गुण, गोडि, तदीय नाम
ऐं देति लोक बहुमोलहि ते न घेती । घालोनि रामशपथा परतोनि देती॥७१
स्नेहें भरूनि मृदुभाषणिं ते कथीत । "जाणोनि भक्ति हृदिंची बुध मानतात
आहां तुम्ही सुकृति, नीच अम्ही निषाद । रामप्रसादिं तुमचे दिसलेत पाद ॥
आम्हांस लभ्य कुठुनी तुम्हि लोचनांसी ?।भागीरथी कुठुनि यावि मरुस्थलासी?
पाळी कृपाळ विभु राम अम्हां निषादां।राजा जसा, जन तसाच तदीय साधा
जाणोनि हें गणुनि भक्ति हृदंतरींची । संकोच सोडुनि अम्हां करुणा कराचि !
आम्हां कृतार्थ करण्यास्तव, अल्प घ्या जी।।जे आणिले फलतृणांकुर आम्हि आजी
हो पाहुणे प्रिय तुम्ही वनिं येउनीयां । सेवेस योग्य नच भाग्य असे अम्हां या
देणार काय ? अम्हि दीन तुम्हां महंतां।श्री काष्ठपल्लवचि हो अमुची अनन्ता!
सेवा अम्हांकरि तुम्ही प्रभु हीच माना । ना चोरितों तुमचिया वसनादिकांना!
आम्ही अजाण खल घातक जीवजातां। दुर्बुद्धि, योजित दुराचरणांत हातां!
रात्रंदिसीं करितसूं जरि पापराशि । पोटीं न अन्न, पटवास न वा कटींसी ! ॥
स्वप्नींहि धर्ममति नाहिं जरी अम्हांला । आम्हांस रामपददर्शनलाभ झाला !
श्रीरामचंद्रपदपद्म विलोकितांच । ना दुःखदोष अमुचे उरलेहि साच!" ॥
त्या प्रेमलोक्ति सुखवीति समग्र पौरां । त्यां धन्यता स्तवनिं अर्पिति ते अपारा

ऐकुनि त्यांच्या प्रीतिभाषणा भाग्या त्यांच्या ते स्तविती !
सुखित होति जन बघुनि ऐकुनी सीताराघवचरणरति ॥
निजभक्तिहि त्यां तुच्छ वाटली ऐकुनि वन्य किरातवचें !।
तुलसि म्हणे, तरि लोहहि घेउनि तरते, यश हें रघुपतिचें ! ॥७९॥

सान्या वनीं विहरती अति हृष्ट चित्तें । चारी दिशां प्रतिदिनीं जन सर्वही ते
येतां जशी प्रथमवृष्टि, तिमेंत हृष्ट । ते मोर दर्दुर जणों रमतात पुष्ट ! ८०
—इति श्रीरघुनाथवसिष्ठसंवादपुरवासिवनविरहवर्णनं नाम पञ्चदशस्तरङ्गः—

तरंग १६ वा

प्रीतींत मग्न सगळे पुरलोक-नारी । जाती क्षणासमचि त्यां दिन याप्रकारीं ॥
प्रत्येक सासुसि पृथक् तनुवेषरूपें । सेवीतसे जनकजा विनयें अमूपें ॥ १ ॥
हें राघवाविण कुणास न मर्म ठावें । मायापतीच रघुनाथ असे स्वभावें ॥
सीता प्रसन्न करि सेवुनि सासवांना । आशी दिल्या तयिं तिला उपदेश नाना

सीतेसमेत ऋजु देखुनि भाउ दोही । पस्तावली कुटिल राणिहि कैकयी ही ॥
ती प्रार्थि आर्तपणिं भूमि, तसें यमातें । "स्वीकारतां अजुनि कां उदरीं न मातें ?
लोकांत वेदिंहि तसें म्हणती कवीही । जागा न रामविमुखां नरकींहि कांहीं !"
शंका अशी सकललोकमनीं उदेली, । साकेतिं राम परतेल न कीं, स्वमेळीं ? ४
रात्रीं न नीज, नच भूक दिनीं सुचेना । चिंतार्त हो भरत कांहिंच त्या रुचेना
पंकांत मीन रुतला जल आटतांना । तैसाच तो तळमळे उपमा दुजी ना ॥५॥
" मातेचिया जणुं मिषें करि दैवघात । वृष्टी विनष्ट करि कापणियोग्य भात
रामाभिषेक तरि होइल केविं रीतीं । यातें उपाय न " म्हणे भरत स्वचित्तीं ६
" आज्ञापितील गुरु तोंच फिरेल राम । ते बोलणार परि जाणुनि रामकाम ! ॥
माता कथील, तरि तो परतेल खास । ती केविं रामजननी परि घे हटास ? ७
माझ्यापरी अनुचरें वदणें कशाला ? । ना वेळ चांगलि मला विधि वाम झाला !
हट्टा धरीन तर होइल तें कुकर्म । कैलासतुल्य गुरु सेवकधर्ममर्म ! " ॥ ८ ॥
युक्ती न एकहि ठरे मनिं त्याचिया ती । चिंतेमधेंच सरली सगळीहि राती ॥
स्नाना करून नमि तो प्रभुतें प्रभातें । बैसूं बघे, तंवर त्या गुरु बोलवी तें ९
वंदोनिया गुरुपदाम्बुजिं, तन्निदेशीं । तो बैसला तंवर येति तिथें सभेसी ॥
सारेच विप्र सचिवादिक सर्व लोक । बोले तयांस गुरुवर्य वसिष्ठ नीक ॥१०॥

॥ इति भरत-विषाद–विचारवर्णनं नाम षोडशस्तरङ्गः ॥

तरंग १७ वा

" ऐका सभासद अहो ! भरता ! सुजाणा ! । श्रीरामराय रविवंशरवीच माना
धर्मेशधुर्य भगवान् प्रभु हा स्वतंत्र । हो सत्यसंध भवि रक्षक वेदमंत्र ॥ १ ॥
हा रामजन्म जगिं मंगलहेतु हो कीं । मातापिता गुरु कथी, करि तें विवेकी ॥
निर्दाळुनी खळगणा, प्रतिपाळि देवां । त्या संत मानिति अनन्य सुधन्य ठेवा !
सत्प्रीति, नीति, परमार्थ, निजार्थ सार्थ । जाणे यथार्थपणिं रामचि त्यां समर्थ
सत्ता असे सकल लोकिं रघूत्तमाची । ब्रह्मा रमेश, हर, सूर्य, शशांक हाचि !
दिक्पाळ सर्व, कळिकाळ, अहीश, शेष । पृथ्वीपती जगिं जयां प्रभुता विशेष
जी योग, सिद्धि, कृति, जीव, अशेष माया । जी वेदशास्त्रिं कथिली, प्रभुशक्ति कीं या
चित्तीं विचार करतां सकलांहि यांना । श्रीराम चालक खरा, यश तें दुजा ना !
यासाठिं सर्वहित, रामनिदेश आम्हां । तेंच आचरूं असें मत होय रामा ५

रामाभिषेक सकलांप्रति सौख्यदाता । तो एक मार्ग जगिं मंगलहर्षकर्ता ॥
साकेतिं येइल कसा रघुनाथ आतां । शोधून त्यास सदुपाय तुम्हीच चिंता!"
ती आदरें श्रुत जनें मुनिवर्यवाणी । जीमाजिं नीति परमार्थ निजार्थ तीनी ॥
लोकीं न उत्तर दिलें मनिं गोंधळूनी । तेव्हां वदे भरत वंदुनी बद्धपाणि ॥७
" झाले कितीक नृपसत्तम भानुवंशीं । एकाहुनीहि गुरु एक असे विशेषीं ॥
माता, पिता, जरि तयांप्रति जन्महेतु । धाता शुभाशुभ कुनी करवी परंतु ॥
दुःखें विनाशुनि समग्र सुभव्य दावी । आशीर्वचोबल असे मुखिं ज्या प्रभावी
जे धातृलेखहि पुसूं शकती प्रसादें । आज्ञा तदीय विभु आचरित प्रमोदें ॥
त्यांनीं उपाय गजला पुसणें, गमे हें । माझेंचि दुर्भग खरोखर सर्व आहे !"॥
ऐकोनि भक्तिमय त्या भरतोक्ति गोड । प्रेमा उचंबळुनि ये गुरुचा अजोड !॥
बोले वसिष्ठ " तव भाषण सत्य ताता ! । सारी कृपा समज तूं परि, रामसत्ता!
स्वप्नींहि रामविमुखा नच सिद्धि येई । आशीर्वचें सफळ, रामकृपेंचि पाहीं ॥
संकोच वाटत परी सुचवीन एक । सर्वस्वनाशिं बुध टाकित अर्ध देख !
भ्राते तुम्ही उभय जाउनि काननातें । द्या पाठवूनि गृहिं लक्ष्मण-राम-सीते!"
झाले प्रहृष्ट सुवचें द्वय तेहि बंधू । गात्रीं उरीं भरत त्यांमधिं हर्षसिंधु ! ॥
झाले प्रसन्न मन, तेज मुखीं विराजे । झाले, जणों गमत त्यांप्रति राम राजे !

लोकां गमे तैं बहुलाभ झाला । लघूच हानी जरि सोसण्याला !
राज्ञी परी शोक करीति भारी । दुःखें सुखें तुल्यचि तद्विचारीं ! ॥ १४ ॥

बोले तदा भरत " हें घडतां गुरूक्त । लाभेल सर्व जगतास अभीष्ट त्यांत ॥
राहेन काननिंच मी मम जन्म सारा । त्याहून सौख्यकर नाहिंच मद्विचारा !॥
श्रीजानकी-रघुपती हृदयाधिवासी । सर्वज्ञ सुज्ञमति आपणही महर्षि ॥
मी बोलतों सकळ हें जर सत्य होत । दावोत सत्य करुनी मुनिही निजोक्त"॥
ऐकोनि तीं भरतसद्वचनें सुभक्ति । झाली सभेसह विदेह मुनीशमूर्ति ! ॥
प्रेमाब्धिला सकलमानसिं पूर आला । यावी स्थिती सकल ती कशि वर्णण्याला !

भरतमहिमा वाटे मोठा अगाध रसांबुधि ।
तरुनि रिघण्या तीरीं आली गमे मुनिवर्य-धी ॥
हृदयिं अबला धैर्या नेघे, न पार रिघूं शके ।
नच तिज मिळे होडी, नौका, जहाजहि जें टिके ! ॥ १८ ॥

भरताचा महिमा मग कवण्या मतिनें समग्र वानावा ? ॥

शिंपलिमधें तळ्याच्या, अगाध जलधिधु केविं सामावा ? ! ॥ १९ ॥
भरतांचें मन तेव्हां वसिष्ठमुनिच्या हृदीं करि निवास ॥
आले सर्व जनांसह उभयहि ते विमल राघवापास ॥ २० ॥
श्रीराम नमुनि मुनितें आसन त्यांतें निवेदि बैसाया ।
आज्ञापितां मुनींनीं बैसति मग सकल आपुल्या ठायां ॥ २१ ॥

तेव्हां विचार करुनी वदले मुनीश । चिंतोनि मानसिं यथोचित कालदेश
" हो ज्ञाननीतिगुणधर्मनिधान रामा ! । ऐका जि ! सुज्ञ ! परिपूरितभक्तकामा !
सर्वांचिया हृदिं तुम्ही वसतां सदैव । त्यांचा तुम्हां कळतसे सदसत्स्वभाव ॥
हो भव्य जेविं भरता, जननींस, पौरा । ऐसाच उत्तम उपाय वदा जि ! सारा
ना आर्तभाषणिं असे स्थल सद्विचारा।जाणे जुगारि जन केवळ कीं जुगारा!"
ऐकोनि वाक्य मुनिचें रघुराय बोले।"स्वामिन्! समस्त तुमच्याच करांत ठेलें !
सर्वांस होइल सुखा भगवन्निदेश । तो पाळितील जनही सगळे सहर्ष ॥
आदेश जो प्रथम द्याल मला मुनीश । मानीन मी अखिल तो लववूनि शीर्ष
तैसेच द्याल इतरांप्रति जे निदेश । त्यातें यथार्थ करितील विभो ! अशेष "
बोले मुनी " वदसि राघव ! सत्य तेंचि । प्रीती परी न गणिशी भरतातरींची
यासाठि मी वदत राम ! पुनःपुन्हां हें । हो मन्मती भरतभक्तिमयीच पाहें
माझ्या मतें शुभद शंकरसाक्ष हेचि । जें इष्ट होय भरता, कर तूंहि तेंचि ! ॥
भरतविनति आधीं आदरें आयकावी । मनन करुनि चित्तीं ती विचारें पहावी
सकळ मग करावें योग्य जें साधुचित्तें।जनमति, नृपनीती, सच्छ्रुती सांगती तें"
सत्प्रीति ती गुरुहृदीं भरतावरील । पाहोनि रामहृदयीं मुदिं येइ डोल ॥
जाणे प्रभू भरत हो शुचि धर्मलोल । तो आत्मदास तनुवाङ्मनिं भक्तिशील
बोले रघूत्तम मनोहर मंजु वाणी । सन्मंगला, गुरुनिदेश मनीं धरूनी —
" बोलेन तातशपथें गुरुच्याहि तेंसें । बंधु त्रिलोकिं भरतासम नान्य भासे ॥
ज्यांची असे गुरुपदांबुजिं भावभक्ति । ते भाग्यशालि जनिं शास्त्रिंहि वर्णिजेती
ज्याच्यावरी गुरुहृदंतरिं भक्ति ऐशी । तद्भाग्यराशि कथवेल तरी कुणासी ? ॥
भ्राता लघू म्हणुनि भीड मनासि वाटे । तोंडावर स्तवन त्या भरता न मोठें
सांगेल जें भरत तें करणें, भलें हें"। श्रीराम सांगुनि असें उगलाच राहे! ॥ २
तेव्हां वसिष्ठ वदती भरतासि उक्ति । " संकोच सोड सगळा तव जो हृदंतीं॥

श्रीराम बंधु तव, अंबुधि जो दयेचा।वत्सा! तयास कथिं तूं तव भाव साचा"

— इति श्रीराम०वशिष्ठरामसंवादो नाम सप्तदशस्तरङ्गः —

तरंग १८ वा

तसें ऐकोनी तें मुनिवचन रामानुमति ही ।
मनीं जाणोनीयां प्रभु गुरु विरोधी न लवही ॥
स्वशीर्षीं, तैं मानी, सकल पडला भार, भरत ।
वदूं कांहीं नेणे अतिशय विचारांत निरत ॥ १ ॥

उठोनी तो राहे, पुलकहि उभे तत्तनुवरी ।
तया प्रेमें अश्रू नयनयुगलांभोरुहिं भरी ॥
वदे "माझे हेतू मुनिवरमतीं संमत अति ।
स्थिती आहे ऐशी तर अधिक मी बोलिन किती ! ॥ २ ॥

प्रभूचा मी जाणें सरल ऋजु सद्भाव हृदयीं ।
नसे तो केव्हांही कुपित, अपराध्यांवरतिंही ॥
कृपास्नेहप्रीती प्रभुमनिं विशेषा मजवरी ।
न खेळामध्येंही चिरड दिसली कीं रघुवरीं ! ॥ ३ ॥

न बाल्यापासोनी त्यजुनि मम संग प्रभु रिघे ।
कधींही माच्चित्ता लव न दिधलें दुःख अनघें ॥
कृपारीती जाणें प्रभुदहृयिंची मी अतुलिता ।
हरें मी खेळीं तों प्रभु करि जयें मीच जितता !! ॥ ४ ॥

संकोचुनि स्नेहिं न मीहि कांहीं । समोर त्यांच्या वदण्या शकेंही ।
अजूनि तद्दर्शनलालसांनीं । न सेविली तृप्ति विलोचनांनीं ! ॥ ५ ॥

प्रभुप्रेमा माझ्यावरिल विधिही साहुं न शके ।
मधें केलें नीचें उदित जननीचें मिष निकें ॥
परी ही मद्भाषा मम वदनिं ना आज सजतें ।
स्वतां सांगोनी कां शुचिपण कुणाचें समजतें ? ॥ ६ ॥

आतां म्हणेन जर मी मम मंद माता । मी मात्र साधु सुमगाचरणीं पहातां ॥
होईल ती कुटिलता मम सर्वरीतीं । कुईचिया कणसिं तांदुळ काय होती ? ७
मोतीं कधीं बनति पल्वलशुक्तिमाजीं?।माझाच दोष, नच मी कवणाहि दें थि !

स्वप्नींहि हें नच असे म्हणणें मदीय । दुर्दैवसिंधु मम सत्य अगाध होय ! ८
ना आत्मपापपरिपाक कळोनि साच । मातेसि दोषि म्हणणें, तिज मानणेंच !
चिंतोनि चित्ति बहुही सगळी निराशा । सन्मार्गे एकचि गमे करि सौख्यपोषा
स्वामी महर्षि विभु राघव आणि सीता।यांच्या निदेशिं परिणाम भला समस्तां
आहे मदुक्ति ऋजु वा कुटिला कशी ती।श्रीराम, सद्गुरुचि जाणति साधु चित्तीं
हा साधुसंगम, सुतीर्थ, विभू समोर, । यांच्यापुढें वदतसें वच मी विनम्र ॥
पाळीयला मरणनिश्चय भूपरायें । माता मदीय कुमती जगता कळों ये ११
दृष्टीं न देखवति आर्त मदीय माता । नारीनरां नगरिंच्या अतिदुःख चित्तां
हा मीच कारण असे सगळ्या अनर्थां । जाणोनि हें सहत मी सकला स्वघाता
गेले वनांत मुनिवेष धरूनि राम । सीतेसमेत सहलक्ष्मण हर्षधाम ॥
पायींच संचरति ते अनवाणि, यास । आहेत साक्ष भगवान् गिरिजामहेश !
साहोनि घावहि असा, अजुनी जगें मी।राहोनि, भक्ति करि जो गुह धन्य रामीं
सप्रेम ते बघुनिही गुहमानसींचें । भंगे न हें मदुर वज्रकठोर साचें ! १४
येवोनि मी बघतसें अजि सर्व डोळां । मी हा जिवंतपणिं साहत मंद गोळा !
ज्यांना बघोनि पथिं टाकिति दुष्ट दर्प । सारा तमोगुण विषादिहि विंचु, सर्प १५
ते राम लक्ष्मण तशी जनकात्मजा ती । ज्या कैकयीस गमती जणु शत्रुमूर्ती॥
पुत्रा त्यजून तिचिया, कवणास द्यावें । सोसावयास अतिदुःसह दुःख दैवें ?" १६

ऐकोनी ती भरतमुखिची सूक्ति अत्यंत आर्ता ।
भक्तिप्रेमें सुनयविनयें पूर्ण कारुण्ययुक्ता ॥
शोकामध्यें सकलहि सभा क्षुब्ध होवोनि मग्ना ।
वृष्टी हेमी सरसिजवना कीं करीते विदीर्णा ! ॥ १७ ॥

प्राचीन सुंदर कथा कथुनी अनेक । ज्ञानी वसिष्ठ करिती भरतीं विवेक ॥
श्रीराम, चंद्र रविच्या कुलकैरवाचा । बोले सुयोग्य वचनीं भरतास साचा १८
" वत्सा ! नको करुं मुळींच मनांत खंत । जाणोनि जीवगति चालविता अनंत ॥
माझ्या मतें त्रिभुवनांत तिनीहि कालीं । पुण्यात्मलोक तरण्या तव भक्ति झाली !१९
जो कोण मानिल तुला कुटिलात्म त्यास।व्हावा न लोक इह वा पर वा विशेष॥
ज्यांना मुळीं न घडली गुरु-साधु-सेवा । त्यांनींच मात्र जननीप्रति दोष द्यावा !२०
होऊन नष्ट सगळें अघ तत्क्षणींच । लोपोनि त्यापरि अमंगल राशि साच ॥
जेथें मिळे सुयश, सौख्य परत्र लोकीं । नामा स्मरोनि भरता! तुझिया, विलोकीं २१

मी हा सुभावचि तुझा शिवसाक्ष सांगें । पृथ्वी सुरक्षित असे तव पुण्यसंगें ॥
ताता! कुतर्क न करीं निज मानसांत । न प्रीति वैर कवणां लपवूंहि येत! २२
जाती विहग, मृग वा मुनिसन्निधानीं । ते हिंसकां बघुनियां पळतात रानीं ! ॥
पक्षी मृगेंहि हृदिं जाणति मित्र वैरी । कैसा न मानव गुणोत्तमबुद्धिधारी ! २३
मी जाणतों तुजसि उत्तमरीतिं ताता! । कैसें करूं मजसि हें न कळेचि चित्ता॥
त्यागोनिही मजसि सत्यचि पाळि राय । मत्प्रेमनिश्चयिं नृप त्यजि आत्मकाय!
तातोक्तिलंघनिं मला मनिं दुःख होतें । संकोचतें परि तुला दुखवावयातें॥
आज्ञा असे दिधलि सद्गुरुनींहि आतां॥ जें सांगशील मज तेंच करीन ताता!२५
संकोच सोडुनि करीं हृदय प्रसन्न । जें बोलशील अजि तूं मज, तें करीन" ॥
सत्यप्रतिज्ञ रघुनाथवच श्रवोनी । झाले निमग्न जन तैं सुखसन्निधानीं ॥२६॥
सर्वां सुरांसहित हो परि इंद्र भीत । चिंतीत विघ्नतति येइल केविं यांत? ॥
चिंतोनिही नच दिसे सदुपाय त्यातें ! रामाप्रती शरण जाति अनन्य चित्तें २७
तैं एकमेक करिती सुविचार चित्तीं । रामास अंकित करी निजभक्तभक्ति ॥
दुर्वासला स्मरुनि, त्यापरि अंबरीषा । झाली सुरां, सुरवरा हृदयीं निराशा! २८
लागोनि कानिं वदती शिर हालवोनी । कीं 'दुःखपंक्ति किति सोसियली सुरांनीं
प्रह्लाद तैं प्रकटवी नृहरीसि भक्त । हो देवकाज भरतावरि आज सक्त ! ॥२९॥
हे देवहो! न दुसरा सदुपाय कांहीं । सद्भक्तसेवन रुचे रघुनायकाही ॥
प्रेमें हृदीं स्मरुं भलें भरतासि सारे । जो राघवा निजगुणीं धरि सत्प्रकारें!' ३०

परिसुनि अमरसुनिश्चय सुरगुरु वाखाणि देवभाग्य किती !
कीं 'शुभमूल जगत्त्रयिं अतिरति भरताचिया पदावरतीं ! ॥ ३१ ॥
जानकीरमणसेवकसेवा । कामधेनुशत मानुनि ठेवा ! ॥
भक्ति आलि हृदयीं भरताची । जाण दैवगति उत्तम हेचि ! ॥३२॥
शोक यांत अजि टाकुनि सारा । आणि तो विधि सुमंगल वारा ॥
हा प्रभाव मनिं घे भरताचा । रामराय वश त्याप्रति साचा ! ॥३३॥
हे सुरेन्द्र ! सुर हो ! भय टाका । चित्तिं सुस्थिर असा, अवलोका ॥
रामचंद्रविभुची गुणग्राही । सत्य हो भरत सत्प्रतिमा ही ' ॥ ३४ ॥

सुरगुरु, सुर यांचा ऐकुनी सद्विचार । बघुनि हृदयिं त्यांच्या दुःख जें कीं अपार॥
रघुवरमनिं वाटे थोर संकोचभाव । भरतहि निजशीर्षी भार मानी अतीव ॥३५॥

बहुविध मनिं त्याच्या कल्पनाकोटि येती।परि ठरवि तदा तो हेंचि निश्चिन्तचित्तीं
वचन रघुवरांचे ऐकणें भव्यकारी । प्रभु पण निज टाकी, ने मला प्रेमपूरीं ३६

राखी माझा पण रघुपति प्रेम ऐसें नितान्त ।
सीतानाथें मजवरि दया केलि आहे अनन्त ' ॥
ऐसें चित्तीं धरुनि भरतें वंदिलें रामराया ।
भक्त्युद्रेकें स्वकरयुगलांभोरुहां जोडुनीयां ॥ ३७ ॥

॥ इति श्रीराम० श्रीअयोध्याकांडोत्तरार्धे श्रीरामगुरुभरतसंवादवर्णनं नामाष्टादशस्तरङ्गः ॥

तरंग १९ वा

बोले तेव्हां भरत " भगवन् ! काय मी बोलुं आतां ? ।
अंतर्यामीं वससि करुणासागरा ! विश्वनाथा !
मातें झाले प्रभुवर तसे सद्गुरूहि प्रसन्न ।
गेलें माझें सकलहि लया कल्पिलें दुःख पूर्ण ! ॥ १ ॥
म्यालों होतों कळत नसतां, दुःख गेलें अशेष । ।
दिग्भ्रान्तीचा रविस नसतो दोष, तो आपणांस ॥
मद्दुर्दैवें विषमविधिनें आइच्या वक्रतेनें ।
कालाच्याही कठिण गतिनें व्याप्त मी पूर्णतेनें ॥ २ ॥
सर्वांहीं या मिळुनि मजला घातला क्रूर घाला ।
कारुण्याच्या परि रघुवरें पाळिलें स्वा पणाला ॥
नाहीं रीती प्रभुहृदयिंची ही नवीना जगांत ।
लोकांमध्यें विदित यश हें, वेदही ब्रीद गात ॥ ३ ॥

हो सर्व विश्व कटु हें, प्रभु मात्र गोड ! । कोणामुळें जगतिं होइल सौख्यजोड?
आहे प्रभू खचित कल्पतरूसमान । होतां प्रसन्न नच होइल तुष्ट कोण ? ॥
त्या कल्पवृक्षा मनिं ओळखोनी । छायेंत त्याच्या रिघतांच कोणी ॥
हो नाश शोकां, जगिं रावरंकां । भल्या बुऱ्या तोषवि सर्व लोकां ! ॥ ५ ॥
पाहूनि सर्व करुणार्द्र गुरु प्रभूही । नाशूनि शोक, मनिं अल्प न भीति राही॥
आतां कृपानिधि करोत असेंचि जेणें । होईल सर्वहित, जें प्रभुचीहि माने ॥
जो स्वार्थि दास अपुल्याच हिता प्रभूतें । संकोचिं पाडि, जगिं त्या अधमत्व येतें

हो सेवकास हित, टाकुनि सौख्यलोभ । तें सेवणें प्रभुसि, मानुनि तो स्वलाभ
सर्वार्थ हा परत येउत नाथ गेहा । नाथोक्तिपालन परी अतिमव्य ईहा ॥
हें स्वार्थसारपरमार्थविवेकसार । शृंगार हा सुगतिचा, अतिपुण्यभार ! ॥
मत्प्रार्थना प्रभुवरा ! परिसा जि ! एक । जें आपणां उचित तें करणीय नीक
राज्याभिषेक करण्यास्तव सिद्ध सारें । जें इष्ट तेंचि करणें प्रभुनें विचारें ॥
हो ! पाठवा मजसि सानुज काननातें । सान्या सनाथ करणें प्रभुनीं जनांतें ॥
दोनीहि बंधु अथवा परतोत गेहा । येईल काननिं तुम्हांसह मीच कीं हा ! १०
हें ना तरी अम्हि रिघूं वनिं तीनि बंधू । सीतेसवें प्रभु वसो गृहिं सौख्यसिंधू !
जेणें प्रसन्न मन होइल कीं प्रभूचें । तें आचरोत करुणाबुधि सर्व साचें ॥११॥
देवें दिला मम शिरीं सगळाहि भार । मातें न नीति, कळतें नच धर्मसार ॥
मी स्वार्थदृष्टिच असें वदणार जे तें । कैचें विचार करणें तरि आर्त चित्तें !
मी बोललों श्रवुनिही प्रभुचे निदेश । लाजेल लाजहि मला बघुनी विशेष ! ॥
मी दुर्गुणांबुधि अगाध जरीहि होत । प्रेमें प्रभु स्तवि मला गणुनी सुभक्त
आतां कृपाजलनिधे ! मज तेंचि सांगा । संकोच जेविं नच हो भवदंतरंगा
मी स्वामिपादशपथें करुनी वदें हें । हो विश्वमंगल असा सदुपाय आहे !
आज्ञा प्रसन्नमनिं ज्याप्रति देव देती । संकोच टाकुनि जशी करण्या सुरीतीं ॥
माथां धरूनि जर ती करतील ते ते।दुःखें लया अटळ जातिल कीं समस्तें"१५

ऐकोनी भरतोक्ति पावन, अती हो हर्ष देवांप्रती ।
शंसोनी बहु 'साधु साधु' म्हणुनी दिव्यें सुमें वर्षती ॥
गेले गोंधळुनी मनीं सकळही साकेतवासी जन ।
झाले तापस हृष्टचित्त, वन हो ज्यांचें असे केतन ! ॥ १६ ॥
संकोचोनि मनामध्यें गेह निःशंक राघव ॥
प्रभुस्थिति बघोनी ती लोक हो शोकविक्लव ॥ १७ ॥
इतुक्यांत तिथें येती जनकें दूत धाडिले ॥
ऐकोनि तें वसिष्ठांनीं जवळीं त्यां निमंत्रिलें ॥ १८ ॥
नमोनि बघती जेव्हां ते तिथें राघवाप्रति ॥
बघोनि वेष तो त्यांचा दुःख हो चित्तिं त्यां अति ॥ १९ ॥
जनकक्षेम दूतांतें मुनिनायक तैं पुसे ।
लवबोनि स्वमाथां ते जोडिती अंजली तसे ॥ २० ॥

बोलती ते " प्रभो ! जें कीं इतुक्या प्रेमिं आपण ॥
पुसतां भूपतिक्षेम हेंच तत्क्षेमकारण ! ॥ २१ ॥
कोसलनाथासंगें कुशलहि गेलें सरोनियां विल्या ।
मिथिला तशी अयोध्या होति अनाथा जगासवें उभया ! ॥ २२ ॥
॥ इतिश्रराम० जनकदूतवार्तावर्णन नामैकोनविंशस्तरङ्गः ॥

तरंग २० वा

कोसलपति दशरथगति कानीं येतांच लोक मिथिलेचे ॥
झाले दुःखें व्याकुळ शोकभरें इतर भान त्यां कैचें ? ॥१ ॥
ज्यांनीं तेव्हा पाहियेलें विदेहा । वाटे त्यांनीं माथनामा न कीं हा ! ॥
राज्ञीच्याही ऐकुनीया कुकल्या । कार्डी चित्तीं तें मुचेनाचि कीं त्या ! ॥
तो नागसा हृतमणी मनिं शोकधाम । का राज्य घे भरत ? कां वनवासिं राम ?॥
बोलावि मंत्रि बुध साधु सभासमूह । त्याते पुसे उचित कृत्य तदा विदेह ॥ ३
अयोध्यसंबंधीं समजुनि नृपप्रश्न असला ।
जनीं दोहीं पक्षीं मुळिंहि न सुचे मार्ग कमला ! ॥
अयोध्येतें जावें, गमन नच वा योग्य म्हणुनी ।
कुणीही सांगेना, सकळ बसले मौन भजुनी ॥ ४ ॥
तदा भूप धैर्या धरुनि, हृदिं चिंतूनि, विमलें ।
अयोध्येमाझारीं चर चतुर धाडूनि दिधले ॥
तया आज्ञा " आणा भरतकृतिवार्ता हुडकुनी ।
त्वरेनें हो ! मातें; उघड न करा ही कृति कुणी " ॥ ५ ॥
अयोध्येतें जाती चर भरतवृत्ती निरखिती ।
कृति ध्यानीं घेती, भरत वनिं रामार्थ निघती ! ॥
बघोनी हें, आले परत मिथिलेतें सकल ते ।
सभेमध्यें त्यांनीं विदित मग केले नृपतितें ॥ ६ ॥
तदा तें ऐकोनी गुरु सचिव भूपाल जनता ।
अती हो दुःखार्ता हृदिं कळवळा त्यांसि भरतां ॥
प्रशंसोनी रायें भरतगुणधामा अतिशय ।
स्वयें आमंत्रीले निज भट, बळें जीं गतभय ॥ ७ ॥

पुरीं, गेहीं, राष्ट्रीं उन्नित बल तो स्थापुनि निघे ।
सुसज्ज प्रस्थाना, हय–गज–रथीं वाहनहि घे ॥
मुहूर्ती तैं मार्गी निघुनि क्षणि कोठें न वसतां ।
प्रयागीं स्नानातें करिति अजि सारे उजडतां ॥ ८ ॥
येती समस्त यमुना उतरूनि जों ते । आलों अम्ही प्रभुपदीं कळवावयातें"॥
सांगोनि हें जनकदूत विनम्रशीर्ष । वंदीति सादर तयां मुनिनायकांस ॥ ९ ॥
तेव्हां सहासात किरात देउनी । दूतां मुनी धाडिति मागुतीं क्षणीं ॥
साकेतपौरां जनकागमें अती । प्रहर्ष झाला सकलां न ज्या मिति ! ॥१०॥
संकोच वाटे अति राघवाप्रति । शोकाकुला हो अमरेन्द्रधी किती ? ॥
पस्तावली पारचि निर्ति कैकयी । द्यावा कुणातें तरि दोष तो तयीं ? ११
नारीनरांतें बहुमोद जाहला । कीं वास तेथे दिन चार लांबला ! ॥
ऐशापरीं तो दिन जात संपुनी । स्नानें प्रभातीं शुभ केलिं त्या जनीं १२
पूजीति सर्व विधिनें नर आणि नारी । गौरीगणेशशिवभास्करमूर्ति सारीं
वंदीति सादर रमागमणाध्रिपद्मा । प्रार्थीति सांजलि तया सुखसारसद्मा १३
"असो राम राजा अम्हां सौख्यखाणी । असो जानकी विश्वपुण्यात्म राणी
निजानन्दसीमा अयोध्यापुरींत । स्वयें येउनी नित्य हे राहु देत! ॥१४॥
घेऊनियां सकललोकसमाज संगें । ते यौवराज्य भरता वितरोत अंगें ॥
सिंचोन हे सुखसुधा सगळ्यांवरीच । देवोत देव जगिं जीवनलाभ साच! १५
श्रीगुरु-बंधुसमेतचि राजा श्रीराम हो अयोध्येंत ॥
अक्षय्य राम राजा असतां आम्हांसि मरण यो तेथ!" ॥ १६ ॥
ही प्रार्थना जनाची भक्तिप्रेमें नितांत जी भरली ॥
ऐकुनि मुनि सुज्ञानी यांहीं निजयोगविरति लघु धरली! ॥ १७ ॥
ऐशापरिं त्या पौरीं सारुनि निज नित्य कर्म विधि सकल ॥
प्रेमें पुलकित होउनि वंदावें रामचंद्रपदयुगल ॥ १८ ॥
ते उच्चनीचमध्यम नारीनर रामदर्शना घेती ॥
आपापल्या परींनीं मिळविति आनंद थोर निज चित्तीं ॥ १९ ॥
सर्वांवरि समचि कृपा दावुनि सन्मानिती तयां राम ॥
सान्यांनीं भक्तिभरें आळविला, वानिला कृपाधाम ॥ २० ॥
"बाल्यापासुनिही हो रघुवर्यांचा असाच कीं बाणा ॥

पाळुनि नीतिन्याया प्रीतिकरा विसरणें न तें कोणा ॥ २१ ॥
शीलनिधान प्रभु हा संकोचाचा पयोधि सरलमना ॥
सुवदन कृपाविलोचन; राघवगुणगान करित भवशमना" ॥ २२ ॥
गाऊनि राघवगुणा अति भक्तिपूर्व । वाखाणिती सकलही निज थोर दैव ॥
"आम्हांसमान जगिं पुण्यनिधान थोडे । कीं ज्यांस राम 'अपुले' म्हणतात कोडें ॥
ते प्रेमपूरिं अधिमग्न समग्र तैसें । ये वृत्त कानिं तंव ' ये मिथिलेश ' ऐसें ॥
साऱ्या सभेसहित संभ्रमिं रामराय। तो तैं उठे रविकुलाब्जदिनेश काय!?॥२४॥
तो बंधुमंत्रिगुरुपौरजनांसमेत । श्रीराम जाइ जनकाप्रति आदरार्थ ॥
तैं चित्रकूट बघताक्षणिं तो विदेह ।वंदी लवूनि, रथ टाकुनि आत्मवाह॥२५॥
श्रीरामदर्शनिं समुत्सुक चित्तवृत्ति । न क्लेश लेशहि पथश्रम त्यांसि होती !॥
सीतारघूत्तम जिथे, मन तेथ त्यांचें। क्लेशीं तनूप्रति मनाविण भान कैचें?॥२६॥
येतां असे, जनक चालत याप्रकारें । प्रेमें समस्त जन मत्तचि भासणोर ! ॥
येतां तसें निकट ते अति भक्तिभावें। सारे परस्पर मिळूं रिघती स्वभावें !॥२७॥
वंदी तदा जनकराय पदें मुनींचीं । श्रीरामही नमित सर्व ऋषी तसेंचि ॥
भेटेहि राम जनका निजबंधुयुक्त। सर्वांसमेत मग आश्रमिं राम येत! ॥२८॥
तो राघवाश्रमचि शांतिरसाब्धि पूर्ण । ज्याचें पवित्र जल, यद्‌गुण वानवे न ॥
त्या लोकरूप करुणासरितेसि आणी। श्रीरामचंद्र निजसंगतिं वाहवोनी! ॥२९॥
जी ज्ञानवैराग्य अशा स्वकूलां । पाडीत वेगें वहतां सलीला ॥
शोकोर्मि दुःखें बहु जे उसासे । तुफान वारे सुटलेत भासे ! ॥ ३० ॥
धैर्यादि वृक्षां तटिच्या उदारां । पाडीत जीची दृढ वेगिं धारा ॥
फोफावतो शोक जिचा सवेग । आवर्त, भोरे, भ्रम भीतिसंघ ॥ ३१ ॥
कैवर्तक ज्ञानि, विशाल नावा । विद्यादिका या म्हणणेंचि किंवा ॥
न त्या प्रवाहीं टिकल्या म्हणोनी । सोडूंहि तेथें शकती न कोणी ! ॥ ३२ ॥
नदी तशी ती बघुनी किरातां । वन्यादिकां धीर न होत चित्ता !
ही आश्रमांभोधित ये मिळाया। तो कीं उठे क्षुब्धचि होउनीयां ! ॥ ३३ ॥
ते शोकविह्वल नृपाळसमाज दोनी । न ज्ञान धैर्य, नच लाजहि त्यां उरोनी
तें शील रूपगुण वानिति भूपतीचे । ते शोकसिंधुमधिं मग्न अतीव साचे ! ॥
शोकसागरीं बुडोनि गेले नारी नर अति आर्त मनें ।
रोषें सकलहि दोष देति किति दुर्दैवातें कटु वचनें ॥

देव सिद्ध तपि योगि मुनीही जनकाची तशि बघुनि दशा ॥
तुलसि वदे, नच राहि तयांना करुणासरितीं तरणाशा ! ॥ १५ ॥
तेव्हां तिथें सर्व जनां मुनींनीं । केलें किती सांत्वन योग्य वाणीं ॥
वसिष्ठही सांगति तें विदेहा । "धैर्या धरीं सोडुनि शोक देहा !" १६
॥ इति श्रीराम० श्रीअयोध्याकांडे द्विसमाजशोकवर्णनं नाम विंशतिस्तरङ्गः ॥

तरंग २१ वा

ज्याचा ज्ञानरवी विनाशित निशा ही संसृतीची क्षणीं ।
स्वीयीं वाक्‌किरणीं विकासबुनियां अंभोजिनीसे मुनी ॥
त्याच्या सन्निध केविं मोहममता राहाति हो ! येवुनी ? !
सीतारामपदाब्जभक्तिमहती सर्वांधि या कारिणी ! ॥ १ ॥
लोकीं हे त्रिविध प्रकार दिसती ज्यां वेदही वर्णिती ।
कोणी साधक सिद्ध कोणि विषयी कोणी, नसे ज्या मिति ॥
यामाजीं परि सन्मती रसिक जे श्रीरामपादांबुजीं ।
त्यांना साधुसमेंत आदर असे अत्यंत पुण्याढ्‌ जी ॥ २ ॥
शोभे ज्ञानहि तें न, जें असतसे श्रीरामभक्तीविण ।
कैसें तारु सजेल ज्या नच भला नावाडि सद्‌भूषण ? ॥
नानारीतिं वसिष्ठ सांत्विति नृपा ज्ञानी विदेहाप्रती ।
सारे येउनि रामघाटसलिलीं स्नानें करीती कृती ॥ ३ ॥
साऱ्या स्त्रीपुरुषांचिया हृदिं असा शोकास ये तैं भर ।
पाण्या वांचुनियां तयीं गमविला तो सर्वही वासर ॥
आहारा शिवतीहि ना पशुगणीं पक्षी मृगें ते तसे ।
अत्यंत प्रियभक्त पौर मग जे त्यांचें वदूं कायसें ? ॥ ४ ॥
दोनी समाज मिथिलाधिप आणि राम । स्नानें प्रभातिंच करूनि सुपुण्यधाम
ते बैसती सकल खालतिं त्या वटाचे । सारेच ते कृशतनू मलिनाभ साचे ! ५
तेव्हां दशरथपुरिचे विदेहपुरिचेहि विप्र सुज्ञानी ।
परमार्थतत्त्ववेत्ते समजाविति नृपतितें स्ववचनांनीं ॥ ६ ॥
रविवंशसद्‌गुरू तैं वसिष्ठ मुनि तेविं ते शतानन्द ।
जनकपुरोहित जनका करिती उपदेश निर्मिती बोध ॥ ७ ॥

ते सांगती बहुपुराण कथेतिहास । सद्धर्मनीतिविरती सुविवेकपोष ॥
साऱ्या सभेसि रुचली शुचि चारु वाणी । रामासही कथिलि जी मुनिकौशिकांनीं
श्रीकौशिकांसि वदले मग रामराय । "हे नाथ! काल जन निर्जल येथ होय!"
बोले मुनींद्र "बहु योग्यचि राम सांगे । झाला उशीर उलटूनि दुपार वेगें!"

ऋषिवाक्य ऐकुनी तें बोले मिथिलेश "येथ उचित नसे ॥
अन्नग्रहण विशेषे" लोकांतें रुचत, म्हणत जनक जसें ॥ १० ॥
आज्ञा घेउनि सारे निघती स्नानास सर्वही लोक ॥
इकडे आश्रमिं तोंवरि आणिति वनचर फलादिक अनेक ॥ ११ ॥
तैं कावड्या घेउनि लोक यती । सत्कंदमूलें फल खाद्यजाती ॥
झाला जणों कामद चित्रकूट । रामप्रसादें करुनी अवीट ॥ १२ ॥
विषाद लोपे बघताच त्यातें । सरोनदीदर्शन चारु कीं तें ॥
सप्रेम आनंद उचंबळोन । झाला गिरी तो सुखहर्षपूर्ण ॥ १३ ॥
तैं वृक्षवल्ली सुफला सुपुष्पा । साऱ्या मनोहारि मनोज्ञरूपा ॥
गुंजारवें मोहविती मिलिंद । पक्षी मृगें जाहलि मोदकंद ! ॥ १४ ॥
उत्साह नांदे किति काननांत । समीर वाहे त्रिविध प्रशांत ॥
सर्वांस सौख्यप्रद वायुवीचि । सौंदर्य तें शब्दिं न वानवेंचि ॥१५॥
पृथ्वी जणों कीं करि पाहुणेर । हर्षें नृकांता जनकास थोर !
स्नानें करोनी जन सर्व येती । योग्य स्थलें लाभुनि ते रहाती ॥१६॥
साऱ्यांसि रामें जनकें मुनींनीं । निर्देशिलें जेथ रहा म्हणोनी ॥
तेथें बघोनी तरु सांवलीही । समग्र तो पौरसमाज राही ॥ १७ ॥
फलें अनेकें दल कंद मूलें । पवित्र रम्यें अमृतें रसाळें ॥
देऊनि सर्वांप्रति थोर मान । घेती फलाहार सुधेसमान ॥ १८ ॥
ऐशापरी वासर चार गेले । रामा बघोनी नरनारि धाले ॥
दोंही समाजीं मनिं वासना ही । श्रीरामसीतेविण काहिं नाहीं ! १९
त्यांच्या विना ना फिरणें पुरासी । त्यांच्या सवें होउं अरण्यवासी ॥
संगें जर श्रीरघुनाथसीता । न स्वर्गही तेविं सुखप्रदाता ! ॥ २० ॥

दुर्दैव होय जर जाउं म्हणेल कोण । सीतासलक्ष्मणरघूत्तम यां त्यजून ॥
होईल दैव अनुकूल तरीच जाया । रामासवें सुलभ होइल कीं अम्हां या २१
मंदाकिनीसलिलिं मज्जन तीनि कालां । श्रीरामदर्शन शुभंकर हर्षमाला ! ॥

श्रीरामधेलिं वनिं तापससंगिं जाणें । तें कंदमूलफल कीं अमृतात्म खाणें !!
वर्षें सुखानेंच्चि समग्र चौदा । जातील कोणां कळतां न बाधा ॥
रिघेल हा काळ पळासमान । वाटूनि चित्तां जणुं कीं ल्हान ! ॥ २३ ॥
सर्वांस ऐसें नच भाग्य होय ! । थोड्यांस ऐशापरि भागधेय ! ॥"
श्रीरामभक्ती अशि दों समाजीं । सुव्यक्त होई वचनामधें जी ॥ २४ ॥

इति श्रीराम० श्रीअयोध्या० द्विसमाजपरस्परवार्ताकथनं नामैकविंशतिस्तरङ्गः

तरंग २२ वा

ऐशापरी जनांचे चालति तेथें मनोरथ उदार ॥
तन्मय होय प्रेमें, जन त्या प्रेमोक्तिनें परिसणार ॥ १ ॥
सीताजननी तेव्हां पाठवि सीतेप्रती स्वदासीनें ॥
भेटावयास अवसर आहे, हें स्वामिनीसि कळवी ते ॥ २ ॥
पाहुनि समया आल्या सीतेच्या सासवांसि भेटाया ॥
जनकान्त:पुरनारी तेविं सुनेत्रा सती जनकजाया ॥ ३ ॥
सन्मानी कौसल्या त्यांतें अत्यादरें बसाया दे ॥
तीं आसनें यथोचित सर्वांच्या प्रेमभाव हृदिं नांदे ॥ ४ ॥
सत्प्रेमशील बघुनी परिसोनि त्यांचे । वाटे द्रवेल जणुं वज्रहि उग्र साचें ! ॥
ये रोमहर्ष, शिथिला तनु, वारि डोळां । शोकार्त भू पदनखीं लिखि भावलीला!
सीतारामप्रीती सर्वांतर्यामिं पूर्ण वसणारी ॥
वाटे बहुविध मूर्ती करुणा धरि, खिन्नचित्त असणारी ! ॥ ६ ॥
सीतामाता बोले "गमत विधाता विशालधी हा कीं ॥
दुग्धाच्या मृदुफेना फोडाया शोधि वज्र ही टांकी !! ॥ ७ ॥
एकूं सुधा परि दिसे विष हें पुढ्यांत । हो क्रूर धातृकृति, ना कळुं ये अनंत
जेथ तिथें बक, कराल उलूक, काक । हो मानसांतचि मराल विहंग एक !"
ऐकोन तें अति सशोक वदे सुमित्रा । "आहृ किती उलटि दैवगती विचित्रा!
जो निर्मि, पाळि, परि नाशुनि टाकि अंतीं।हो बालकेलिपरि बालिश धातृमूर्ति !"
वद कौसल्या तैं "नच वितरणें दोष कवणां ।
सुखा दु:खा लाभा क्षतिसि गति हें कर्मचि गणा ॥
अशे कर्मांची ही गति कठिन, जाणे विधिच ती।
फलें देई धाता शुभ अशुभ सारीं न चुकतीं ! ॥ १० ॥

परेशाची इच्छा सतत सकलांच्या शिरिं वसे
म्हणोनी हो जन्म स्थिति लय सुखेतें, विधिं जसे ॥
नको मायामोहीं पडुनि करणें दुःखलवही ।
असे कीं धात्याची कृति अशि अनादी अचल ही ! ॥ ११ ॥
अहो कीं भूपाचें स्मरुनि जगणें वा न जगणें ।
मनीं दुःखी होणं निजहि न तशी हानि बघणें " ॥
तदा सीतामाता वदलि "कथितों सत्य वचनीं
अयोध्येची राज्ञी अमित सुकृताची जणुं खनी! " ॥ १२ ॥

" जाती वनांत जर लक्ष्मण, राम, सीता। त्यांचा भलाच परिणाम; न खेद चित्तां
मातें अतीव भरताविषयींच चिंता।" उद्गारि गद्गदरवें अशि राममाता ॥१३॥

" अहो! आशीर्वादीं सखि ! तुमचिया ईशकृपया ।
जगीं गंगा तैसे सुत सुतवधू सर्व मम या ॥
पहा, ना मी घेई खचित कधिंही रामशपथ ।
परी ती घेऊनी मम हृदयिंच सत्य वदत ॥ १४ ॥
वसे जें सच्छील प्रचुरगुणिता भक्तिविनय ।
तशी बंधुप्रीती अमित भरतीं सत्त्व सदय ॥
न वाग्देवीही ती भरतगुण गायासि शकती ।
कधीं शिंपीनें का जलनिधि रिकामे करवती !? ॥ १५ ॥
मना माझ्या ये कीं भरतचि असे दीपक कुलीं ।
कितीदां नाथांनीं मज भरतसद्वृत्ति वदली! ॥
कसानें ये सोने कळुनि, मणि ये पारखुनि कीं ।
प्रसंगें जाणावी करणि पुरुषाची तशि निकी! ॥ १६ ॥

हें बोलणें मम अयुक्तचि होय सारें । स्नेहांत शोकिं मन होत खुळें विचारें"॥
ऐकोनि ती सुरसरित्सम पुण्यवाणी । प्रेमें मनीं विकल होति समग्रराज्ञी १७

कौसल्या तैं वदत " मिथिलाराज्ञि ! हो आयकावें ।
चित्तीं धैर्या धरुनि निरखा ! काय आम्हीं वदावें ? ॥
भर्ता ज्यां या जनक नृपती जो विवेकाधिवास ।
त्या तुम्हां मी कथन करणें कोणता जी ! निदश ? ॥ १८ ॥
अहो ! सांगा तुम्ही अवसर बघोनी स्वपतितें ।

स्वतांच्या शब्दांनीं समजवुनि त्यांतें उचित तें ॥
बसों या सौमित्रा गृहिं, भरत या बाहुनि वनीं ।
जरी हे माने त्यां मम मतचि आणा घडवुनी ! ॥ १९ ॥
घ्यावा मनीं ह्य सुविचार आवडीं । चिंता मला हो भरतेंचि एवढी ॥
सद्भक्ति गूढा भरतांतरीं वसे । तो राहणें, ठीक मला न तें दिसे !" ॥२०॥
कौसल्येच्या सरलवचना यापरी आयकोनी ।
कारुण्याच्या रसनिधिमधें मग्न साऱ्याचि राणी ॥
गेले प्रेमें भरुनि हृदयीं सिद्ध योगी मुनीश ।
धन्योद्गारासह नमिहुनी ते झरे पुष्पवर्ष ! ॥ २१ ॥
अंतःपुरीय वनिता चकिता सुनेत्रा । पाहाति तें वदत धैर्ययुता सुमित्रा ॥
"हो रात्र ही प्रहर दोन, उशीर आतां" । प्रेमें उठे झणिंच तैं रघुनाथमाता
स्नेहेंचि तीं वदलि हार्दिक सत्यभावें । "आता निजस्थलिं तुम्ही रिघण्या उठावें
आधार येथ मज शंकर हाचि होत। तैसेचि साह्यकर ते मिथिलाधिनाथ!" २३
कौसल्येची विनयसहिता ऐकुनी स्नेहवाणी ।
भक्तिप्रेमें हृदिं सुनयना पूर्ण गेली भरोनी ॥
कौसल्येच्या शुचि पदयुगा वंदुनी बोलली हें
"नांदे चित्तीं विनय तुमच्या भक्तिही थोर राहे ॥ २४ ॥
दशरथगृहिणी तुम्ही साजतसां रामचंद्रजननीही ।
तेव्हां सुयोग्यचि अशी वसली तुम्हांत विनयभक्ती ही ! ॥ २५ ॥
प्रभुपण तेंचि म्हणावें कीं जें नीचाहि सादर धरीत ॥
वह्निहि धूमा धरि शिरि, अद्रि तृणा ही दिसे महद्रीत ! ॥ २६ ॥
आहेत नाथ अमुचे सेवक तुम्हास काय-वाक्-चित्तीं ॥
गौरी महेश्वर तसे साहाय्यक आपणां सतत असती ॥ २७ ॥
आहे कवण जगीं तरि साहाय्यक जो तुम्हास साजेल? ॥
दीपें साहाय्य किती दिवसकरातें यथार्थ करिजेल ?! ॥ २८ ॥
श्रीराम जातिल वनीं सुरकार्या करुनि येतिल फिरुनी ॥
राज्य अयोध्येमध्यें करितिल निश्चिंतपणें सुखेंकरुनी ! ॥ २९ ॥
श्रीराम-बाहुबलिं देव-मनुष्य-नाग । आपापल्या स्थलिं सुखें वसतील सांग ॥
ही याज्ञवल्क्य मुनिंनीं कथिली स्ववाणी।होईल ना मुनिगिरा कधिं खोटि,राणी!"

बोलेनी हे चरण कवळीं प्रेमभावें अतीव ॥
कौसल्येचे; पुसत विनयें जानकीसाठिं माव ! ॥
अत्यानंदें अनुमति तिला लाभतां ती मुलीला
घेऊनीयां निजसह निघे तैं सुनेत्रा सुशीला ॥ ३१ ॥

— इति श्रीराम० श्रीजनकराज्ञीकौशल्यासमागमो नाम द्वाविंशतितरङ्गः —

तरंग २३ वा

प्रियजनपरिवारा भेटली तेथ सीता । सुभग उचित रीती योग्य जी त्यां समस्तां
बघुनि जनकजेचा तापसी वेष तैसा । सकल जन विषादा स्थान झाला विशेषा!
घेउनि वसिष्ठमुनिचा निरोप येई स्वनासिं मिथिलेश ॥
तों तेथें त्या दिसली सीता आली तया मिळायास ॥ २ ॥
प्रेमें उरिं आलिंगी जनक तदा जानकीस कळवळुनी ॥
कीं हृदयप्रीतीची प्राणांची पाहुणीच ये मिळुनी ! ॥ ३ ॥
जलनिधि जनकान्तीं प्रीतिचा हो अथांग । जणु मन नृपतीचें वाटलें कीं प्रयाग !
वट जणु गमला तो स्नेह सीतेवरील । उपरि सबत रामप्रेम हें रम्य बाळ ॥!
विकल जनकचित्तीं ज्ञान तें भासलें कीं जणु मुनि चिरजीवी आश्रया जो विलोकी।
जलभरिं बुडतांना त्यास आधार हातीं । गवसलि सहजीं कीं राघवी बालमूर्ति !
न व्हायचा मोह कधीं विदेहा । परीं तयालागिंहि मोह हो हा ॥
हें स्नेहमाहात्म्यचि होय साचें । श्रीरामसीताविषयीं तयाचें ! ॥ ६ ॥
सीतेसही विव्हलता न आवरे । मातापित्यांच्या विषयीं महादरें ॥
धैर्या हृदन्तीं धरणीसुता धरी । सद्धर्मकालादि गणूनि ती परी ॥ ७ ॥
बघूनियां तापसवेषिं जानकी । होई पित्यातें परितोष पूर्ण कीं ! ॥
वदे "सुते ! तूं कुलयुग्म शोधिलें । मातापित्यांचीं उभयेंहि निर्मले ! ॥८॥
तुझ्या यशें विश्व समस्त हें गमे । अतीव झालें धवल प्रभागमें ॥
गंगेस जिंकी तव कीर्तिवाहिनी । ब्रह्मांडकोटीसहि टाकि भारुनी ! ॥ ९ ॥
त्रैलोक्यमाहात्म्यहि जानकीस्तव । तूं सत्समाजांप्रति देशि उत्सव ! " ॥
ही सत्यवाणी मिथिलेश बोलला । मनोहरा कोमल विश्वनिर्मला ॥ १० ॥
सीतेप्रती संकुचवी मनीं किती । मही जणों काय गिळीत तीस ती ! ॥
आलिंगिती तीस धरूनियां उरीं । मातापिता वत्सल ते किती तरी ! ॥ ११ ॥

आशीर्वचें त्यांहि तिला किती दिलीं । त्यांहीं सुता तैं अतिचारु बोधिली ! ॥
लज्जा न तंतें वदवी तरी तिला । रुचे न तेथें निशि वास तो भला !॥१२॥
जाणे सुनेत्रा, कळवी नृपाप्रती । स्वभावशीला स्तवि तो तिच्या किती !
पुनःपुन्हां तैं कवळीत त्यास ती । सन्मानुनी पोंचवि तो पतिप्रती ॥ १३ ॥
तेव्हां निवेदि जनका समया बघूनी । राणी यथोक्त भरताविषयीं शहाणी ॥
भूपाळ हृष्ट भरतस्थिति आयकून । सद्गंधहेमसम चंद्रसुधेसमान ॥ १४ ॥
सानंद नेत्रिं जल ये तनु हृष्टरोमा । तोहि स्तवी भरतकीर्ति तशी असीमा ॥
" तू ऐक गे ! सुनयने ! सुमुखि ! प्रसन्ना । हे मत्कथा भरतकीर्ति सुधेसमाना
संसारबंधनविमोचन ही करीत । सद्ब्रह्मधर्मनृपनीति विवेक यांत ॥
आहे यथामति मदीयगती जरीही । ना मन्मती भरतकीर्तिलवें तुलेही ! १६
स्पर्शेहि मन्मति न करी भरतयशाच्या छवीस लवलेश ॥
लपुनी छपुनीहि कधीं " ऐसें सांगत तियेसि मिथिलेश ॥ १७ ॥
" ब्रह्मा, महेश, गणराय, सरस्वतीही । ते शेष कोविद कवीश सुधी कितीही
त्यां धर्म शील, यश, कार्य, चरित्र भूति । सत्कीर्ति आवडतसे भरतोद्भवा ती!
भरतकीर्तिगुणादिक होतसे । सुखकर श्रवणा मनना तसे ॥
शुचिपणें, रुचिनें, बहु लाजवी । सुरधुनीस, सुधेस, वदे कवि॥१९॥
भरत भरतसाच, प्रीति रामास वाही। निरवधि गुणराशी, ज्या नसे तुल्य कांहीं ॥
गिरिवर म्हणतांना मेरु कीं शेरसाच । कविकुलमति जैशी स्पष्ट संकोचतेच !!
वर्णू कुणा ये वरवर्णिनि ! प्रिये ! । यथार्थतेनें भरता न वानु ये ! ॥
न वारिहीन स्थलिं मीन चालतो ! । अवर्ण्य तैसा भरतप्रभाव तो २१
अमेय आहे भरतप्रभाव । त्याचा न लागे कवणासि ठाव ॥
श्रीराम जाणे जरि तो यथार्थ । न वर्णण्या तोहि तया समर्थ ! " २२
सप्रेम वर्णि नृपती भरतानुभाव । जाणोनियां सुनयनामनिंचा सुभाव ॥
" ना लक्ष्मणें, विपिनिं गे! भरतेंचि जावें । हो हेंचि उत्तम; जनेप्सित हेंचि व्हावें
अन्योन्यिं रामभरतीं परि देवि ! होती । प्रीतिप्रतीति न कुणासहि तर्कवे ती ॥
श्रीराम होय अवधी समतागुणासी । स्नेहा तसा भरत तो ममतादिकांसी २४
न स्वार्थि तेविं परमार्थि सुखासि पाही । स्वप्नांतही भरत लोलुप ना कधींही ॥
श्रीरामभक्ति गणि साधन आणि सिद्धि । वाटे मला भरतिं एकचि हे सुबुद्धि!
रामोक्तिते भरत लंघिल ना कधींच । जाणोनि वा चुकुनिही, मनिं जाण साच

स्नेहाधिमग्न मनिं तूं करिं नैव चिंता" । भूपें अशी समजवीयलि आत्मकांता २६
॥ इति श्रीराम० दम्पतीसंवादे भरतगुणवर्णनं नाम त्रयोविंशतिस्तरङ्गः ॥

तरंग २४ वा

सप्रेम गात भरता, रघुनायकातें । गेली निशा क्षण अशी नृपदंपतींतें ॥
ते दोनि राजजन होत सकाळिं जागे । स्नानादिका करुन पूजिति देव चांगें
स्नानें करूनि गुरुपाशिं रिघोनि राम । वंदोनियां चरण बोलत पूर्णकाम ॥
" भो नाथ ! पौरजन, वृद्ध समस्त नारी । शोकाधिमग्न, वनवासिं सखेद सारीं
सर्वांसमेत मिथिलेशहि कष्ट सेवी । तो घालवीत दिन यापरि सर्व दैवीं ॥
जें योग्य यासमयिं तें प्रभुंनीं करावें । हो सर्व भव्य तुमच्याच करीं स्वभावें!"
श्रीराम हें वदुनि संकुचती अतीव । रोमांचले गुरु बघूनि सुशील भाव ॥
बोले मुनीश "सुख सर्व जनांत दोंही । तुम्हांविना नरकतुल्य गमेल त्यांही
प्राण प्राणां जो जिवाचाहि जीव । सौख्याचें जो सौख्य तो तूच सर्व
गेहीं प्रीती ज्यां रुचे त्वद्विना ही । दुर्दैवाला त्यांचिया जोड नाहीं!५
हो कर्म, धर्म, सुख दग्धचि तें समस्त । श्रीरामपादकमलीं नच भाव ज्यांत
तें ज्ञान अज्ञपण, योगहि तो कुयोग । ना जेथ रामचरणीं मन सानुराग ।६
तें दुःख जेथ नच तूं, सुख ते जिथें तूं । तूं जाणतोस जनहृद्गत भक्तितंतू
आज्ञा समर्थ तव सर्व शिरीं असे ती । तूं जाणसी सकलभव्य कृपालमूर्ति ७
जा आश्रमीं प्रभु ! तुम्ही " म्हणुनी मुनीश । हो भक्तिपूरिं भरला हृदयीं अशेष !
वंदूनि राम मुनितें, रिघला स्ववासीं । धैर्या धरून जनका मुनि भेटण्यासी ८
रामोक्तिभाव मुनि तें जनका कथीत । तत्प्रीतिशील बहुमानुनि साधुरीत ॥
" आतां कराजि ! तुम्हि, होय हितास कीं जें । सर्वांप्रती सकलधर्महि ज्यांत साजे
ज्ञानाधिवास शुचि सुज्ञ सुधर्मशील । आहां तुम्ही अवनिपाल ! सुकृत्यलोल ॥
आहे तुम्हांविण न कोणि समर्थ आतां । जो दावि या अतुलसंकटि योग्य पंथा "
ऐकोनियां या मुनिच्या वचातें । सप्रेम लोट जनकांतरीं तें ॥
पाहूनि त्याची स्थिति त्यापरी ती । ज्ञानें विरागें वरिली विरक्ति ! ११
प्रेमें भरोनी मनिं हेंचि चिंती । "आलों इथें, ना भलि गोष्ट कीं ती ॥
रामाप्रती धाडुनियां वनासी । भूपें कृता सिद्धचि मात ऐसी:-॥१२॥
कीं त्यावरी प्रेम अपार होतें । स्वर्गास केलें निजवास कीं तें ॥

आतां अम्ही पाठवुं त्या वनातें । मुर्दे फिरूं सर्व विवेकि चित्तें !" १३
त्या आयकोनि बघुनी जनकस्थितीसी । दुःखार्त होत मुनि विप्र तपी विशेषीं ॥
जाणोनि तो समय धीर धरूनि येत । भूपाळ आर्य भरता जनतासमेत १४
त्यां घेत जाउनि पुर्ढे भरत स्वकीयां । कालोचितासन तयांप्रति दे बसाया ॥
बोले तदा जनक " हे भरता! समस्त । आहे तुला विदित राघवचारुचित्त !
श्रीराम सत्यव्रत धर्ममूर्ति । सर्वांवरी स्नेह तदीय चित्तीं ॥
संकोचुनी संकट तो सहातो । त्वदुक्त त्या सांगुं अम्ही पहातों" ॥१६॥
रोमांचुनी भरतनेत्रिं भरोनि वारि । तो बोलला धरुनि धीर मनीं विचारीं ॥
"आहां तुम्ही प्रभु मला पितृतुल्य नाथा ! नाहीं वसिष्ठसम सौख्यद तातामाता
हे कौशिकादि मुनि, मंत्रिसमाज सारा । ज्ञानांबुधीच तुम्हिही गमतां विचारां!
जाणोनि बाल, निजसेवक ऐकणारा । कर्तव्य सर्व शिकवा मज नान्य थारा १८
स्थानीं समाजिं असल्या पुसतात तात । येथें न मौन मलिना मज योग्य होत !
बोलेन मी शिशुमुखीं गुरुशब्द आतां । त्याची क्षमा मज करा मज वाम धाता।
शास्त्रीं, पुराणिं, निगमीं तरि हें प्रसिद्ध । सेवा असे कठिण नीति जगीं विबुद्ध
हो स्वामिधर्म निजधर्म गुणीं विरुद्ध । हो प्रेम अंध जगिं वैरहि जेविं अंध !
जाणोनि राघवमनोव्रतधर्म सारा । आणोनि मीहि परतंत्र असा विचारा ॥
सर्वांसि संमत असे सगळ्या हवें तें । तुम्ही करा, करिल जें सकलां हितातें"
ऐकोनि तें भरतभाषण साधुभाव । पाहोनि शंसिति तया जन आणि राव ॥
जी चित्रवाक् सुगमही अगमा गभावी । जी मंजुला, मृदुहि वज्रकठोर भावी॥
वर्णाक्षरीं मित परी अमितार्थ दावी । ऐशीसि काय उपमा नरि ती वदावी ?॥
हस्तीं असे मुकुर, त्यामधिं आत्मरूप । अग्राह्य तें, भरतवाक् तशि हो अमूप!
राजा, मुनी, भरत, साधु, जनादि जाती । जेथें टसे अमर-कैरव-चंद्रमूर्ति ॥
ऐकोनि वृत्त सगळे जन होति खिन्न । कीं मीनसंघ, नववृष्टिजलीं निमग्न !
देवीं तदा कुलगुरुस्थिति देखियेली । स्नेहार्द्र ती जनकवृत्तिहि तेविं ठेली ॥
पाहोयला भरत, राघवभक्तिमूर्ति । स्वार्थी समग्र सुर घाबरले स्वचित्तीं ॥२५॥
रामप्रेमीं मग्न झाल्या जनांला । पाहोनीयां त्यापरी भक्तिलोलां ॥
देखा, ऐसें जाहलें दुःख लेखां । व्हावा कैसा? भाव तो शक्य लेखा ?२६
[देखा, ऐसें जाहलें दुःख देवां । काव्या कैसा भाव तो वर्ण्य व्हावा ?२६]
दुःखें तेव्हां इंद्र बोले " पहा कीं । भक्तिस्नेहा राम हा जाय अंकीं !

कैसें आतां हो रचावें किटाळ ? । जेणें साधे आमुचें कार्यजाल ! " २७
देवीं तेव्हां चिंतिली शारदा ती । जी भक्तांतें नित्यकल्याण दती ॥
प्रार्थीती ते " देवि ! आम्हांस पाळीं । आर्ती आतां आमुच्या तूंच टाळीं!

भरतमतिते तूं मायेनं क्षणीं फिरवीं अये ! ।
अमरकुल हें तूं रक्षावें छळेंहि निजाश्रयें" ॥
विबुधविनती ऐकोनी ती वदे विदुषी सती ।
अमरपतिची स्वार्थी मंदा अशी गणुनी मति ॥ २९ ॥

" मजसि वदसी तूं भ्रंशाया मती भरतांतरीं ।
दशशतहि या नेत्रीं मेरू न देखिसि तू तरी ! ॥
हरिहरविधी यांची माया जरी महती अति
भरतमतिते दवायाते तरी शकती न ती ! ॥ ३० ॥
वदसि मजसी मी मोहावी शुभा मति तन्मनीं
शकन कधिं का चोरायाते शशिप्रति चांदणी ? ॥
भरतहृदयीं सीतारामा निवास असे सदा ।
द्युति तरणिची जेथें तेथें तमा स्थल का कदा ? " ॥ ३१ ॥
सांगोनि ऐशापरि शारदा ती । हो ब्रह्मलोकाप्रति वेगिं जाती ! ॥
झाले मनीं विक्लव देव सारे । कीं कोकपक्षी निशिं ज्याप्रकारें ! ३२
स्वार्थी सुरानीं अति दुष्ट हट्टें । दुर्मंत्रयुक्तीं रचिलीं कचाटें !
मायाबळें निर्मिलि आर्ति, भीति, । उच्चाटन, भ्रांति तयीं समस्तीं ३३

॥ इति श्रीराम० श्रीअयोध्याकाण्डे जनकभरतसंवादे सुरशोकवर्णनं नाम
चतुर्विंशतिस्तरङ्गः ॥

तरंग २५ वा

दुष्टाइ ही करुनिही सुरराय चिंती । हो कार्य कीं भरतहस्तिं अकार्य वा तीं ॥
जाई तदा जनकभूप रघूत्तमातें । सन्मानिले रघुवरें सगळेचि की ते ॥ १ ॥

रघुवंशपुरोधा तैं वदले रामास योग्य समयास ॥
धर्मातें अविरोधी मान्यहि व्हावें जनास जें खास ! ॥ २ ॥
कथिला आधिं वसिष्ठें झाला संवाद जनकभरतांचा ।
" भरतोक्त सर्वपरिंनीं योग्य गमे हा विचार मम साचा ॥ ३ ॥

याची आज्ञा राघवा ! तूंच आतां । वर्तायातें या जनांना समस्तां " ॥
तेव्हां बोले राम जोडोनि पाणि । सत्या योग्या मंजुला साधु वाणी ॥ ४ ॥
" आहांत आपण तसे मिथिलेश येथ । मी बोलणें लवहि होय अयोग्य नाथ !
आज्ञा कराल मज आपण आणि राया।ती शीर्षवंद्य; शपथें तुमच्या, न वांय"
रामोक्त ती शपथ ऐकुनि या प्रकारीं । संकोचले मुनि नृपाळ सभाहि सारी ॥५
कोणी सदुत्तर तयां करण्या न जाणें । सारे पहाति भरताननिं आर्ततेनें ॥६
संकोचचित्त सगळे भरता पहाती । तैं रामबंधु हृदिं घे बहु धैर्यवृत्ति ॥
तो स्नेह वाढत तसा बघुनी अवेळीं । विंध्या अगस्तिमुनिसा झणिं दापि खालीं
श्रीशोणित कनकलोचनसाच शोक । कर्षीत तैं भरतमानसिंचा विवेक ॥
जो विश्वयोनि, शुचिसद्‌गुणराशि लोकीं।उद्धारि तीप्रति विशाल वराह तो कीं !
बद्धांजली करुनियां सगळ्यां प्रणाम । श्रीराम भूप, गुरु, साधुंसि शुद्धकाम
प्रार्थी " क्षमा मज करा, उचिता न जाणें।बोलें वचें कठिन मी मृदु आननानें"
प्रेमें तदा स्मरत तो हृदिं शारदेतें । ये मानसांतुनि मुखांबुजिं त्याचिया ते ॥९
सद्धर्मनीतिविमला सुविवेकशाली । ती मंजुला भरतवाग् गमली मराली !
स्नेहें हृदीं शिथिल जाहलिया जनांतें । पाहे विवेकनयनीं भरत स्वचित्त ॥
वंदी विनीत सकलां अतिभक्तियुक्त । सीता रघूत्तमपदां स्मरुनी मनांत "

॥ इति श्रीराम० श्रीअयोध्याकांडे वसिष्ठश्रीरामचन्द्रसंवादे सभाशोचवर्णनं नाम पञ्चविंशतिस्तरङ्गः ॥

तरंग २६ वा

भरत वदत " नाथा ! स्वामि माता पिताही । सकलहृदयवासी तूंच कल्याणवाही
गुरुवर अतिपूज्य ज्ञानवान् शीलराशि । प्रणतशरणपाळा ! तूं सुहृद् विश्वपोषी !
समर्थ तूं सर्वहितासि कर्ता । गुणज्ञ तूं दुर्गुणदोषहर्ता ॥
गोसांवि ऐसा दुसरा प्रभू न । माझ्यापरी अन्य नसेचि दीन ॥ २ ॥
आज्ञा पित्याची प्रभुचीहि तैसी । भंगूनि यें मी प्रभुच्या पदांसी ॥
मोठ्या जनांच्या समवेत येथ । आलों असें मी बहुदोष यांत ॥ ३ ॥
जगांत मोठे लघु उंच नीच । सुखाविषें मृत्यु अनंत साच ! ॥
दृष्टें अनेकें परि यांत कोणी । आज्ञा प्रभूची नच जो न मानी !॥ ४ ॥
केली धिटाई परि मीं अपारा । कली असे ही सकलप्रकारां ॥

स्नेहें परंतु प्रभुंनीं स्वसेवा । मानीयली प्रेमळ देवदेवा ! ॥ ५ ॥
कृपा भलाई अपुलीच, नाथा ! । कीं केलि कीर्ती मम ही अनंता ॥
दोषांहि मूषांसम ह्या गणोनी । हा आपुला मानियला प्रभूंनीं ॥ ६ ॥
विख्यात लोकीं प्रभुची सुरीति । सदुक्तिही गौरवशालि कीर्ति ॥
गाईयली ची निगमागमांनीं । जियेप्रती सर्वहि विश्व मानी ॥ ७ ॥
कीं क्रूर कोणी कुमती कलंकी । खलाग्रणी लिप्तहि पापपंकीं ॥
नीचात्म, निःशील, निरीशभक्ति । तेही जरी त्वच्छरणार्थि येती ॥ ८ ॥
नमीति तूंतें जरि एक वार । अनन्य भावें तुज सद्विचार ॥
तरी तयांच्या विसरूनि दोषां । गासी तयां साधुसमाजि, ईशा ! ॥ ९ ॥
दासासि पोषी सगळ्या परींनीं । स्वामी असा अन्य नसेचि कोणी ! ॥
दासासि पाळी अपुल्यासमान । स्वप्नींहि जो प्रौढि निज स्मरे न ॥ १० ॥
जो दाससंकोचहि वाढि चित्तीं । ऐसा कुठें स्वामि दयार्द्रमूर्ति ? ॥
स्वामीच ऐसे प्रभु रामराज । उभारुनी बाहु वदेन पैज ! ॥ ११ ॥
पशूहि ते नाचुनि दाखवीती । प्रवीण पाठीं शुकपक्षि होती ॥
प्रावीण्य तें नर्तनशिक्षकांत । कीं पाठ देत्या पटु पाठकांत ! ॥ १२ ॥
सर्वा परीं मानुनि गोड दासा । सन्मानुनी स्थापुनि साधुशीर्षो ॥
हें ब्रीद कोणां करि शक्य व्हावें । एका कृपामूर्तिविना स्वभावें ? ॥ १३ ॥

> शोकें, स्नेहें, विपुल अथवा माझिया बालभावें, ।
> आलों येथें दकलुनि दुरीं आपुले शब्द डावे ! ॥
> ऐशा मातें सदयहृदयीं स्वामिंनीं आत्मभक्ति ।
> मानोनीयां, मम सकलही शंसिलें तुष्टचित्तीं ॥ १४ ॥

सन्मंगलांचें जगतीं निदान । हें स्वामिपादांबुजसन्निधान ॥
मीं देखियेलें सहजानुकूल । हें भाग्य माझें कधिं वर्णिजेल ? ॥ १५ ॥

> साऱ्यां लोकां मम कळविलें भाग्य अत्यंत थोर ।
> माझी मोठी असुनिहि चुकी, स्वामिचा प्रीतिपूर ! ॥
> मातें स्वामी ! तुम्हि निववीलें सत्कृपानुग्रहानें ।
> विश्वामध्यें अधिकचि दयाराशि हा सर्वमानें ॥ १६ ॥

संभाळिली प्रभुवरें मम आवडी ही । शीलस्वभावि अपुल्या सहजप्रवाहीं ॥
हे नाथ ! केलिच मियां बहु दांडगाई।माथां अतिक्रमितसें, वडिलां जनांही ।

९

मी बोलतों अविनयें विनयें इवें तें । आतां क्षमा प्रभुवरें करणेंचि मातें ॥
दुःखार्त जाणुनि मला प्रभुंनीं मनांत । तारें मदीय सहणें करुणाधिनाथ ! १८
मी बोलणें बहुत, ही अतिखोडि माझी । जाणोनिही प्रभु सुजाण, सुहृद् असा जी!
आज्ञा करोत मज देव ! यथेच्छ आतां । सर्वा परीं मजसि सांवरणेंचि नाथा !
श्रीस्वामिपादकमलोद्भव जे पराग । जे सत्य, पुण्य, सुख यां अवधी सुभाग॥
घेऊनि तच्छपथ बोलत सत्य हें मी । हो आवडी मम मनीं प्रभुदास्यि नामी
हो स्वप्न, झोंप अथवा मम जागृती जी । वांछा असे सहज मानसि हेच्चि माझी
न स्वार्थ वा कपट वा मम अर्थ चार । याच्याविना इतर कांहिंच ना विचार !
आज्ञा प्रभूत्तम अशा तुमचीच सेवा । त्याचा प्रसाद मजला अजि हाच देवा!"
प्रेमें भरे भरत विह्वल हें वदोन । रोमांचकाय नयनांबुज अश्रुपूर्ण ॥ २१ ॥
तो व्याकुल प्रभुपदाब्ज धरीं नमून । तत्प्रीतिवर्णन यथार्थ करील कोण ! ॥
तेव्हां रघूत्तम कृपांबुधि त्यासि मानी । प्रेमार्द्रवाक् उचलि त्यासि करीं धरूनी !

राम, जनकही, साधु, सभाजन शिथिलित झाले प्रेमभरें ।
मनीं प्रशंसिति भरत-बंधुना भक्ति अनुत्तम जी विचरे ॥
भरता शंसिति देवहि वर्षति सुमनें, मनिं जरि मलिनमति ।
तुलसि वदे, जन विकल जाहले ऐकुनि, जशि निशिं कमलतति !२४

ऐकोनियां ती भरतोक्ति लीन । पाहोनि त्याचें मन भक्तिपूर्ण ॥
प्रेमार्द्र झाली सकला सभा ती । श्रीरामही स्नेहिं भरे स्वचित्तीं ॥ २५ ॥
दोंही समाजीं अति दुःखि दीन । नारीनरां सर्व तशां बघून ॥
मृतासि मारूनिच नीच इंद्र । साधावया पाहत आत्मभद्र ! ! ॥ २६ ॥

—:इतिश्रीराम० श्रीअयो० भरतविनयवर्णनं नाम षड्विंशतिस्तरङ्गः :—

तरंग २७ वा

ना इंद्रसा कपटि ना कुणि दुष्टचित्त । स्वार्थार्थ अन्यहितघातकरी यथार्थ ।
काकासमानचि दिसे जणुं इंद्रवृत्ति । विश्वासशून्य मलिना कपटी अती ती
आधीं करीत कपटी जुळणी विशेष । उच्चाटना सकलशीर्षि करी सुरेश ॥
मोही समस्त हृदयांप्रति इंद्रजाल । श्रीरामभक्ति परि वांचवि त्यां सलील ! २
उच्चाटनें हृदयिं चंचलवृत्ति झाली । हो आवडी क्षणिं वनीं, क्षणिं गेहिं ठेली
सारी प्रजा द्विविध चित्तिं सचिंत होय । कीं सिंधुसंगमिं दुभंगत आपगातोय ।॥ ३

कोठेंच त्यांस परितोष न तैं दुश्चित्त । कोणांस बोलुं शकती नच मर्म 'का तें!'
बोले हंसूनि मनिं तैं करुणानिधान। हो श्वान, तेविं मघवाहि, युवा, समान!"
भरत, जनक साधू, मंत्रि यांना त्यजून।तशिच मुनिजनांना सोडुनी जे सुजाण
छलि बहु सकलांना देवमाया अतीव ! जशि जशि मति ज्याची, त्यापरी भेदभाव!

पाहे कृपासागर रामराय । स्वस्नेहमार्गे जन आर्त होय ॥
तैसाच झाला जन दीनवाणी । इंद्रें कृता त्या कपटादिकांनीं ॥ ६ ॥
सभा, वसिष्ठादिक विप्र, राजा । मंत्री अशांच्या मति यंत्रिता ज्या ॥
भक्तीच हेतू भरतांतरींची । सर्वांप्रती मोहविणार साची ! ॥ ७ ॥
तैं चित्रसे पाहति सर्व रामा । संकोचुनी बोलति वाक्यसीमा ॥
ते भेजकें बोलति, वाटलें कीं । जणों तयां शिक्षित तेंचि लोकीं !॥८
ती प्रीतिभक्ती विनयप्रभाव । जे शोभती त्या भरतास सर्व ॥
ते ऐकतांना अति सौख्य देती । वर्णावया मात्र न शक्य उक्तीं !॥ ९
यद्भक्तिचा लेशहि पाहुनीयां । हो प्रेममग्ना मुनिवृत्ति ठायां ॥
तैसाच हो कीं मिथिलाधिनाथ । प्रेमामधे त्या विनिमग्नचित्त !॥ १०
माहात्म्य त्याचें तुलसीमतीला । वर्णू कसें ये जरि ती सुलोला ? ॥
ती भक्तिधारा हृदयांत ओती । सद्बुद्धि, उत्साह भरूनि चित्तीं ॥
माहात्म्य मोठें, लघु आत्मशक्ति । जाणोनि संकोचति बुद्धिवृत्ति ॥
म्हणोनि येथें कविसत्तमांनीं । न वर्णनीं प्रेरिलि भीरु वाणी ! ॥ १२
अत्यंत गोडी भरतातराची । तद्वर्णनें शक्यहि होति कैंचीं ? ॥
होते मतीची स्थिति वर्णितांना । कीं बालकोक्ती वदणें अजाणा ! ॥ १३

भरतविमलकीर्ती हाच कीं निर्मलेन्दु । उदित विमल चित्तीं सन्नभीं हर्षसिंधु
कविसुमति चकोरी त्याप्रती भक्तिलोला । नुसति बघत राही वर्णनीं बे अबोला !

सद्भाव जो कीं भरतांतरींचा । अगम्य शास्त्रां निगमांहि साचा ॥
तेथें मदीया मति चंचला ही । अल्पा क्षमावी कविनीं हि कांहीं ! ॥ १५

भरतविमलभावा वर्णितां ऐकतांना । मनिं रघुपतिसीताभक्ति लाभे न कोणां?
स्मरणहि भरताचें निर्मितें रामभक्ति।नच सुलभ जया ती, कोण ऐशी कुमूर्ति ?
निरखुनि सकलांची त्यापरी चित्तवृत्ति।गणुनिहि हृदिं त्यांची हार्दिका भावभक्ति
रघुपति नयशाली धीर, धर्मीं धुरीण। सुखजलनिधि सत्यस्नेहि बोले सुजाण ॥१७
विवरुनि मनिं सारे देशकालप्रसंग । विकल जनमनेंही चिंतुनी चित्तिं सांग

अमृतमधुरवाणी सार जें शारदेचें । इरुतहितपरिणामीं राम बोले स्ववाचें १८
"प्रियतम भरता रे ! तूंच धर्मीं धुरीण । तुजसम जगिं जाणे लोकशास्त्रादि कोण ?
कृतिवचनमनांनीं शुद्धतेमाजि अन्य । नच कुणि तुजऐसा; तूं जसा तूंच धन्य !
ऐशा गुरूंच्या बहु या समाजीं । कनिष्ठबंधुस्तुति योग्य ना जी ! ॥
करूं करूं ये गुणवर्णनातें । वेळा गमेना उचिता मनातें ! ॥ २० ॥
तूं जाणसी सूर्यकुलीन रीति । सत्यप्रतिज्ञारुचि तातचित्तीं ॥
सत्कीर्तिभक्ती तुज होय ठावी । लागे मला ती न तुला वदावी ! ॥ २१ ॥
तूं जाणसी समय, लोक, तशी गुरूंची । लज्जा, उदास-रिपु-मित्रमनेंहि साचीं
ठावें तुला सकलमर्म, तसेच धर्म । माझें तुझें अहित वा हित, सर्व वर्म ! ॥
आहे मला भरंवसा तव सर्वरीतीं । बोलेन कांहिं समयोचित अल्प उक्ति ॥
वत्सा ! पित्याविण अम्हां हितकारि जें तें । केलें समस्त कृपया गुरुंनीं सुचित्तें
नाहीं तरी परिजनांसह पौर सारे । आम्हांसमेत पडते असुलीं विचारे ! ॥
जातां अकालिं अथवा दिनराज अस्ता । क्लेशास पार कसला जगतीं समस्ता ?
उत्पात याचपरिचा विधि निर्मि ताता ! । संरक्षिलें मुनिवरें जनकें अनाथां ॥
हें राज्य, काज, धरणी, यश, धर्म, मान।गेहें धनें गुरुचि सांवरि यांसि पूर्ण
येणेंचि होतिल हितें सकलां अम्हांही । गेहीं वनीं गुरुकृपा तुज रक्षि पाहीं ॥
माता, पिता, गुरु, विभू कथिती निदेश।आधार धर्म; जणुं काय धरेसि शेष!'
तो सन्निदेश कर तूं भरता ! सुगीता! । माझ्याकडूनि करवूनिहि घेचि ताता !
ऐशा प्रकारिं कर रक्षित सूर्यवंश । हो हेंचि एक अपुलें करणें विशेष ॥ २७
जें सर्व सिद्धि मज साध्य करील पूर्ण ! जें कीर्ति-भूति-सुगतिप्रति वेगि जाण !
ऐशा विचारिं सहुनी लव संकटातें । ठेवीं प्रजा सपरिवार सुखांत की ते ! ॥२८॥
बंधो ! विपत्ति मजला, सकलां छळील । तूंतें परी कठिन ही अवधी गमेल ॥
जाणोनिही मृदु तुला वदतों कठोर । आहे कुवेळचि अशी; म्हण मी न उग्र ! ॥
येतां प्रसंग कुणि बंधुच होय साह्य । हो वज्रघात तर हात न वारि काय ? ॥
होतात सेवक जसे कर, पाद, नेत्र । स्वामीसमान म्हणणें मग कां न वक्त्र ? ॥
"हो प्रीतिची अतुल रीत अशी प्रशस्त । गातात सत्कवि" वदे तुलसी निजोक्ति ॥
ऐकोनियां रघुवरोक्ति समा बिमग्ना । प्रेमाब्धिनिर्मित सुधेमधिं भावलीना ॥ ३१ ॥
स्नेहान्वितां जणुं समाधित लोक रंगे । तैं शारदा धरित मौन निशांतरंगें ॥
झाला तदा भरतही अति हृष्ट चित्तीं । हो संमुख प्रभु; नुरे हृदयीं अपार्ति ॥

झालें प्रसन्न मन, सर्व विषाद लोपे । मूकास लाभलि गिरा जणुं वाक्स्वरूपें॥
प्रेमें प्रणाम करुनी वदला फिरूनी । जोडोनि अंबुरुहयुग्म असे स्वपाणि ॥३३॥
"नाथा! तुम्हांसह गतोत्सवसौख्य झालें। वाटे कृतार्थ जगिं जन्मुनि चित्त चालें।
आतां कृपाळ तुम्हि जेविं निदेश द्याल। तो शीर्षवंद्य मज होइल सर्वकाळ ॥३४॥
द्यावा विभो! मज असा अवलंब कांहीं। उत्तीर्ण होइल जेंय अवधो अवाही॥
देवाभिषेक करण्या शुभतीर्थवारी। म्यां आणिलें मजसवें गुरुसद्विचारीं ॥३५॥
आज्ञा तयाविषयिं कांहिं मला करा जी! ती मी करीनचि तयापरिं सर्व आजि॥
इच्छा असेचि महती मम एक चित्तीं। संकोचभीति मज या वदवीति ना ती"॥
"ती सांग, तात!" म्हणुनी कथितां प्रभूनें। स्नेहार्द्र तैं भरत बोलत याप्रमाणें॥
"आज्ञा कराल तर पाहिन चित्रकूटीं। सर्वस्थलें प्रभुपदांकित सान मोठीं ॥३७॥
तीर्थ, वनें, मुनिसदाश्रम अद्रिभाग। पक्षी, मृगें, सर, झरे, सरिताहि सांग॥
येईन पाहुनि मनोहर पुण्यभूमी। होईन धन्य शुभदर्शन लाभुनी मी" ॥ ३८॥
सांगे रघूत्तम तदा "बघ रे! अवश्य। घे अत्रिवाक्य शिरिं त्यापरि देख दृश्य॥
कांतारिं निर्भय तुवां अजि संचरावें। अत्रिप्रसादिं वनिं मंगल सर्व पावे॥
बंधो! मनोज्ञ वन पावन सर्व आहे। ज्या सांगतील ऋषि त्या स्थलिं तीर्थ वाहे॥
स्थापीं तिथें सकलतीर्थजलें" प्रभूक्ति। ही ऐकुनी भरत तुष्ट अतीव चित्तीं ॥४०॥
सानंद वंदि मुनिवर्यपदांबुजांला। तो तत्कृपा मिळवुनी मनिं धन्य झाला॥
संवाद रामभरतांतिल सद्रसाचा। देव प्रशंसिति महानिधि मंगलांचा ॥४१॥
स्वार्थी समग्र सुर शंसति सूर्यवंशा। ते वर्षती अमरपादपपुष्पवर्षा॥
सानंद गर्जति मनोहर धन्यवाद। 'हे धन्य धन्य भरता! जय राम!' शब्द॥
सारी सभा, जनक, लोक समस्त तेथ। सोत्साह होति, भरतोक्तिहि शंसतात॥
श्रीरामसद्गुणगणा स्तवुनी प्रशंसी। रोमांचुनी जनकभूपति तद्गुणांसी ॥४३॥
स्वामी विशुद्धमति सेवकही सुभाव। ते प्रेमनेम अति पावन पुण्य सर्व॥
जो तो प्रशंसि अतिसादरचित्त त्यांना। मंत्री, सभासद समग्र रघूत्तमांना ॥४४॥
संवाद रामभरतांतिल तो ऐकोनी। दोन्ही समाज सुख तेविं विषाद मानी॥
ती सौख्यदुःख सम मानित राममाता। राज्ञीमनां समजवी गुणदोषयुक्ता ॥४५॥
कोणी प्रशंसी गुण राघवाचे। गाई कुणी तैं भरता सुत्रांचें॥
मुनीश तेव्हां कथि अत्रि सारें। स्थापाविं तीर्थें कथि, सत्प्रकारें ॥४६॥
"शैलाचिया सन्निच हो सुकूप। पीयूषसा उत्तम जो अमूप॥

त्यापीं तिर्थे हे भरता ! सुतीर्थे "। तो प्रेषि पात्रें मग सर्व तेथें ॥ ४७ ॥
जाई स्वतां सानुज अत्रियुक्त । येती वसिष्ठादिकही समेत ॥
कीं जेथ तो कूप अगाध ठेला । स्थापीयली त्यामधिं तीर्थमाला ॥ ४८ ॥
सप्रेम तैं अत्रि वदे प्रसन्न । कीं " स्थान हें होय अनादि जाण ॥
हो लुप्त काळें, परि हा जनांनीं ! केला तुझ्या, उत्तम रे ! खणोनी ॥ ४९ ॥
देवें जगा हा उपकार होय । सुलभ्य होई जगिं तीर्थतोय ॥
हा कूप नामें तुझिया प्रसिद्ध । होईल लोकां करण्या विशुद्ध ॥ ५० ॥
स्नानादि येथें करतांचि नेमें । विशुद्ध पुण्यावलि त्यांत जन्मे " ॥
सांगोनि माहात्म्य समस्त येती । कीं जेथ होती प्रभुरायमूर्ति ॥ ५१ ॥
अत्रि मुनी तैं सांगे सकलांप्रति भरतकूपगौरव तें ॥
धर्मेतिहासगोष्ठी सांगुनि तो साधुवृंद तेथ रते ॥ ५२ ॥
यापरि रात्री सरतां स्नानादिक नित्य सर्व ते करुनी ॥
सानुज भरत निघे तैं रामात्रिवसिष्ठनमन आचरुनी ॥ ५३ ॥
सर्वांसमेत पायीं अनवाणी जाय भरत देखाया ॥
श्रीरामशैलशोभा, होई क्षिति मृदुळ तत्पद वहाया ! ॥ ५४ ॥
कुशकंटक तृण खुडुपें स्पर्शो दुस्तर सुमार्गि दूरवुनी ॥
सेवी भरता अवनी, पवनहि वाहे सुखावह त्रिगुणी ॥ ५५ ॥
वर्षति देव फुलांनीं छाया घन करि निवारुनी ऊन ॥
तरुराजी फलपुष्पीं भरली होती, तृणें सुमृदु पूर्ण ॥ ५६ ॥
हरिणें प्रेमें बघती, खग गाउनि मधुरशब्दिं सुखवीती ॥
त्या रामभक्त जाणुनि सेविति सारेचि आदरें चित्तीं ! ॥ ५७ ॥
सामान्य लोक जर का जांभइ देतांहि 'राम' नाम वदे ॥
त्यातेंहि सिद्धि सुलभा, भरता मग केविं चुकति आनंदे ? ॥५८॥
रामाचा प्राणप्रिय भरत, तया सिद्धि कां न भजतील ?
त्या सेविति सकलाही कथणें ही गोष्ट केविं हो नवल ? ॥ ५९ ॥
ऐशापरी भरत त्या वनिं संचरीत । तत्प्रेम तैं मुनिजनांसहि लाजवीत ॥
पुण्यें बरें, अवनिभाग विशेष पाही । जे कीं पवित्र अति चित्र विलोकतांही ! ॥
पक्षी मृगें तरु तृणें गिरि कुंज बागा । आलोकि तैं भरत काननिंच्या विभागा ॥
मार्गी पुढे मुकुटकें समजूनि घेत । आनंदि होत हृदयीं प्रिय रामभक्त ॥६१॥

हर्षेंचि सांगति ऋषी भरतासि नामें । पुण्यप्रभाव, गुण, कीर्ति महत्त्वमर्मे ॥
केलें निमज्जन कुठें, विनयप्रणाम । कोठें बघे भरत तें नयनाभिराम ॥६२॥
कोठें बसे मुनिनिदेशिं विनम्रभावें । सीतारघूत्तमपदां हृदयें स्मरावें ॥
बंधूसमेत भरतांतरिं रामभक्ति । ऐशापरी करित तन्मय चित्तवृत्ति ॥६३॥
सेवा अनुत्तम तशी उभयीं बघोनी । आशीर्वचें वितरिलीं वनदेवतांनीं ॥
येती फिरुनि तिसऱ्या प्रहरीं स्ववासा । वंदोनि रामपदिं पावति भूरि हर्षा ॥
तीर्थें स्थलें पंच दिनावधी अशीं । पाहीयलीं श्रीभरतें अहर्निशीं ॥
सत्कीर्तिगानें हरिशंभुकीर्तनें । नेले दिना, सांज गमे सुवर्तनें ॥ ६५ ॥

—इति श्रीराम० श्रीअयोध्या० श्रीरामचन्द्रभरतात्रिसंवादे सप्तविंशतितरङ्गः—

तरंग २८ वा

प्रातःकालीं स्नानें आटपुनी मीनले सकल लोक ॥
मिथिलेश्वर भरत तसे ब्राह्मण सुविचारकारण अनेक ॥ १ ॥
श्रीराम जाणुनि मनीं कीं आहे आजचा भला दिवस ॥
बोलुं बघे हृद्गत परि, संकोच शब्द ये न वदनास ! ॥ २ ॥
अवलोकुनि मिनले जन गुरु नृप भरतादि सर्वहि समेत ॥
संकोचोनि परि हृदीं राघव अवलोकि भूप्रतिच तेथ ॥ ३ ॥
तें शील रामरायीं वानिति जन भक्तिपूर्ण आर्तमनें ॥
उद्गारति ' नच दुसरा स्वामी संकोचशील रामविणें ! ' ॥ ४ ॥

पाहोनि कष्ट रघुनाथमनीं अतीव । धैर्यें उठे भरत जाणुनि तत्स्वभाव ॥
जोडोनि हस्त करि दंडवत प्रणाम । बोले "प्रभू पुरवि सर्व मदीय काम॥५॥

सहे माझ्यासाठीं प्रभुवर किती ताप सकल ।
दिलेंसें लोकेंनी निजतनुसि दुःखांत अतुल ॥
मला आज्ञा द्यावी प्रभुसि रुचते ती निजहृदीं ।
अयोध्येची सेवा करिन जंव हा जाय अवधि ॥ ६ ॥

सांगा उपाय, शुभ पाय पुन्हां बघेन । संपोनियां अवधि, दीनदयाळ ! पूर्ण ॥
द्या जी ! मला सदुपदेश कृपानिधाना । हे कोसलेश्वर विभो ! मजला सुदीना ॥
हे नाथ ! पौरजन, दास, शुभ प्रजाही । संबंध सर्व जरि उत्तम भक्तिवाही ॥
नाथा ! तुम्हांस्तव भली भवदुःखकोटी । तुम्हांविना मज नको जरि मोक्षभेटी ! ॥

स्वामी सुजाण शरणागत पाळणारे । जाणोनि दासरुचिकांक्षितवृत्त सारें ॥
सर्वांधि रक्षित असां, मम काय चिंता ? । दोनीहि पक्षि मज देवचि सौख्यदाता ॥
विश्वास हाच मम मानसि सर्वरीतीं । निश्चित मी म्हणुनि राहत आत्मचित्तीं ॥
आर्ती मदीय, विभुची मज ठायिं भक्ति । दोनी बळेंचि करिती मज धीट चित्तीं ॥
मद्दोष हा प्रभुवरा ! दुरि सारुनीयां । संकोच टाकुनि निदेश करा मला या " ॥
सारे तदा विनय तो भरतीं स्तवीती । कीं क्षीर-नीरविवृतिस्तव हंसकीर्ति ! ॥
ऐकोनि बंधुवच दीन ऋजु सुयुक्त । तो दीनबंधु रघुवीर वदे निजोक्त ॥
जें देशकालसमया अनुकूल होय । श्रीराम सुशमतिमान् बुधमाननीय ॥१२॥
"ताता ! गदीय तरही सकलां जनांची । चिंता गुरू नृप करीति गृहीं वनींची ॥
माथां मुनीश, मिथिलेश असे असोन । स्वप्नींहि दुःख तुज, तेविं मलाहि कोण ? ॥
माझा तुझाहि पुरुषार्थ महान् जगांत । सत्कीर्ति धर्म परमार्थ निजार्थ मूर्त ॥
हे दोहि साधु पितृशब्द करून बंधू । हो लोकवेदमत तातहिताहि साधू ॥१४॥
आज्ञा करीत पितृ-मातृ-गुरु-प्रभूंची । गेला कुमार्गिंहि तरी कधिं ना पडेचि ! ॥
ऐसा विचार करुनी त्यज दुःख सारें । साकेत रक्षि, सरतो वनवास तों रे ! ॥१५॥
तूं देश, कोष, परिवार, समस्त पौर । सोंपीव हा गुरुपदाब्जरजीं स्वभार ॥
मानीं निदेश जननी, मुनि, मंत्रि यांचे । साकेतपौरपृथिवीप्रति पाळ साचें

मुख्यें मुखाचे परि हें असावें । खाण्यापिण्यातें जरि एक व्हावें ॥
परी विवेकें सकलांगपोष । करी, वदे हें तुलसी विशेष ! ॥ १७ ॥
सर्वस्व हें जाणुनि राजधर्मी । संकल्प रक्षीं मम आत्ममर्मी" ॥
श्रीराम ऐसें भरतासि बोधी । नानापरी सांवरि बंधुची धी ॥ १८ ॥

परी न संतोष, न शांति चित्तीं । आलंबनावीण तयास हो ती ॥
जाणोनिही त्या भरतांतरास । संकोचला राम मनीं विशेष ॥ १९ ॥
संकोच कीं गुरुजनादिक पौर तेथ । स्नेहार्द्र बंधु भरतीं तरि सर्व चित्त ॥
श्रीराम दे सकृप त्यां निज पादुकांतें । शिर्षी धरी भरत त्यांप्रति भक्तिचित्तें !
तें पुण्यराशि पदपीठ दयानिधीचें । कीं पौरजीवपरिरक्षकयुग्म साचें ! ॥
कीं रत्नपेटि भरतांतरभक्तिभावा । मंत्राक्षरें उभय रक्षणकारि जीवा ! ॥
कीं तें कपाट परिपालक सूर्यवंशा । कीं पाणियुग्म करि उत्तमकर्मपोषा ! ॥
कीं युग्म तें विमल सेवनधर्मनेत्र । श्रीरामभक्तियुगतीर्थचि तें पवित्र ! ॥
आधारं तो भरत घेत मुर्दे भरोनी । सीतारघूत्तम जणों हृदिं लब्ध मानी !

रामा प्रणाम करि, मागि निरोप जाया। त्या राम दे कवळुनी हृदिं आपुलीया।
साधूनि वेळ कुटिला करि तैं सुरेश। उत्पाद्नासि जनचित्तगणीं विशेष ॥
सर्वांसि पथ्यकर जाहलि ती कुचाळी। आशा, सरे अवधि तों, जनजीविं आली!
ना हें तरी, विरह, लक्ष्मणरामसीता। यांचा जनांप्रति कुरोग तसा वधीता! ॥
तो वक्रयोग परि रामकृपें सुधारी। हो देवकोपहि गुणावह साह्यकारी! ॥२५॥
आलिंगि राम भरता हृदयें भरून। तो प्रीतिचा रस कथूं शकणार कोण? ॥
सप्रेम उल्लसुनि ये तनुचित्तवाचीं। धैर्येंहि विद्रवति धैर्यधुरंधरांचीं! ॥२६॥
अश्रु स्रवे कमललोचनिं सर्वलोकां। पाहोनियां सुरसभाहि मनीं सशोका ॥
जे धैर्यमेरु गुरुसे, मिथिलेश ऐसे। ज्ञानाग्नि यन्मन कसाप्रति लावि खासें!
ज्यांतें विरिंचि विरची जणु पद्मपर्ण। निर्लेप जें जलमलें जगतीं सुजाण ॥
त्यांनाहि रामभरतांतिल ती अमूपा। प्रीती करी विरति-वाक्-तनु-चित्तलोपा!
जेथें वसिष्ट जनकस्थिति होय मुग्धा। ती प्राकृत। समजणें नच बुद्धि शुद्धा
सांगेन रामभरतांमधला वियोग। मानील लोक मजलागिं कठोरभाग! ॥२९॥
संकोच तेविं रस तोहि अवर्ण्य साचा। संकोचते स्मरुनिही कविची सुवाचा!
भेटोनियां समजवी भरतासि राम। भेटे मुदें उरिं रिपुघ्न मनोऽभिराम ॥३०॥
भटोनि मंत्रिभरतां जन कार्यि लागे। आपापल्या सकलसेवकवर्ग वेगें ॥
ऐकोनि दोनिहि समाजिं सचिंत होती। तैं सिद्धता करिति ते परतावया ती
वंदोनियां प्रभुपदांबुजि दोनि बंधू। श्रीरामशब्द शिरिं घेउनि धैर्यसिंधु ॥
प्रार्थानियां ऋषितपीं वनदेवतांसी। संमानिती बहुपरीं सकलां सुतोषीं ॥३२॥
ते लक्ष्मणा मिळति, वंदिति जानकीतें। तत्पादपंकजरजां स्वशिरीं धरीते ॥
आशीर्वचें वितरि त्यांप्रति रामजाया। जीं सुक्षमें सकलमंगलता सुजाया ३३
श्रीराम सानुज नमी जनका सभक्ति। त्या प्रार्थि तो स्तवुनि तन्महिमा सुरीतीं
"हे नाथ! कष्ट किति घेउनि हे दयेनें। केलें असे विपिनिं आपण तात! येणें
आम्हां अम्हां वितरुनी शुभदा प्रभूनीं। कार्यो सुखी परतुनी निजराजधानी"
पूजूनि साधुमुनिविप्रगणां सुमानें। दे त्यां निरोप गणि शंभुहरींप्रमाणें ॥३५॥
अश्रूसमीप मग जाउनि बंधु दोनी। आशीसि घेति मग येति पदीं नमूनी॥
वाल्मीकि, कौशिक तसे मुनि वामदेव। ते पौर मंत्रि नृपसेवक वांद सर्व ३६
यांतें यथाविधि नमूनि निरोप देत। श्रीराम लक्ष्मणसमेत अती विनीत ॥
नारी-नरां परतवी लघु-मध्य-थोरां। संमानुनी करुनि आत्मकृपा अपारा

कैकेयीचें वंदि पादाब्ज राम । भेटे तीतें प्रेमभावें निकाम ॥
दुःखें लज्जा घालवी; पाठवोनी । दे माघारीं पालखीं बैसवोनी ३८
मातापिता परिजनादिक यांसि सीता । भेटोनि ये पतिप्रिया अनुरागि पूता ॥
श्वश्रूंसि भेटुनि नमी सकलांसि भावें । तत्प्रीतिवर्णन कवींप्रति केविं यावें !
आशीर्वचें अभिमतें मिळवूनि सीता । ऐकोनि घेत उपदेश मनीं पुनीता ॥
प्रीतींत दोनिहि समाजि निमग्न ठेली । भारावली सकलवृत्ति सुभावशाली ४०
श्रीराम मागवुनि सुंदर पालख्यांना । मातांसि त्यांत बसवी, समजावि नाना !
दोनीहि बंधु मिळती मिसळूनि त्यांतें । स्नेहें सँमे अतुल पोंचवि भक्तिचित्तें ॥
नानापरीं सजवुनी गजवाजि यांना । भूपाल सैन्य भरतादि करी प्रयाणा ॥
चित्तें ससीत सहलक्ष्मण रामि होतीं । वाटे समस्त चलतीं गतचेतसीं तीं ! ॥४२॥
तेव्हां वृषादि-गज-वाजि पशूहि सारे । ते चालती जणुं विना हृदयें, बिचारे! ॥
त्यांची दशा करुण ती कशि वर्ण्य व्हावी । ते चालती परवुनी परतंत्रभावीं ! ४३

गुरुतें, गुरुपत्नीतें, वंदुनि सानुज ससीत राम तदा ॥
परते पर्णकुटीतें हर्षभरें तेविं आर्तियुक्तहृदा ! ॥४४॥

॥ इति श्रीराम० श्रीअयोध्या० श्रीरामचंद्रसकाशाद्भरतप्रत्यागमनं नामाष्टाविंशतितस्तरङ्गः ॥

तरंग २९ वा

संमानुनी मग निरोपियेले निषादा। तो जाय चित्तिं धरुनी अमिता विषादा ॥
कोळी किरातगण भिल्ल वनाधिवासी। माघारिं जाति नमुनी कितिदां तयांसी ॥

सीतालक्ष्मणराम बैसति वटच्छायेंत विश्रांतितें ।
होती दुःखित आत्मलोकविरहें स्नेहार्द्र अत्यंत ते ॥
शंसी राम सुचारुभाव भरतीं सत्स्नेहवृत्ती तसी ।
सीतालक्ष्मण यांसि सांगत किती वाखाणुनी बंधुसी ॥ २ ॥

प्रीति प्रतीती कृतिवाक्मनें तशी । श्रीराम वर्णी भरतांतरीं जशी ॥
सप्रेम तो श्रीमुखिं वानि राघव । सत्प्रीतिचें जें भरतांत लाघव ! ॥३॥
खगमृगवल्लीनीं तेथवां चित्रकूटीं । चरिं अचरिं विशेषा म्लानता व्यापि पोटीं ॥
अमर बघति सारी राघवाची दशा ती। स्थिति कथुनि गृहींची ते सुमें वर्षताती ४

नमन करुनि देवां राम आश्वासि त्यांतें। विगतभय निघोनी जाति निश्चिंत चित्तें ॥
प्रभु विलसत सीतालक्ष्मणांच्या समेत। विलसति जणुं भक्ति, ज्ञान, वैराग्य मूर्त!
इकडे श्रीगुरु मुनिजन मिथिलाधिप भरत जाति आत्मपथें ॥
श्रीरामचंद्रविरहें झालेले आर्तचित्त सकलहि ते ॥ ६ ॥
ध्याती चित्तांमध्यें प्रभुचे गुणगण नितान्त अभिराम ॥
चालति मौनचि भजुनी, चित्तांमधिं राहिला भरुनि राम! ॥ ७ ॥
झाले समस्त यमुना उतरूनि पार। तो भोजनाविणचि वासर जाय सारा ॥
गंगा नदी उतरती दुसऱ्या दिनीं ते। सेवीत रामसख त्यां गुह सर्व तेथें ॥८॥
सई नदीतें उतरूनि येत। ते गोमतीच्या सलिलीं नहात ॥
चौथ्या दिनीं ते जन रामभक्त। सारे अयोध्यानगरीसि येत ॥९॥
राहे तदा जनकही दिन चार तेथ। तो राज्यकार्य तिथलें क्षणि सांवरीत ॥
तें सोंपवोनि सचिवीं, भरतीं, गुरूसी। तो जाय भूप मिथिलेसि मनें उदासी ॥१०॥
साकेतवासि जन मानुनियां गुरूक्त। ते राहती सकल रामपुरीं सुखांत ॥
श्रीरामदर्शनसुखास्तव आचरीती। नारीनरादि नियमव्रत सत्यभक्ति ॥११॥
करीति नाना उपवास साधनें। त्यजोनियां भोगविलास भूषणें ॥
न चित्त त्यांचें सुखसेवनामधीं। प्रतीक्षिती केविं सरे वनावधि! ॥१२॥
मंत्र्या, सुसेवकगणां भरत प्रबोधी। कार्यें निजें करिति ते भरतोक्तबुद्धि ॥
सांगे रिपुघ्न–हृदयासहि बोधुनीयां। योजीत मातृपदसेवन त्या कराया ॥१३॥
विप्रांसि बोलवुनि सांजलि सांगि त्यांतें। वंदोनियां भरत सद्विनयें सुचित्तें ॥
"हो उच्च, नीच, लघु–दीर्घ कसेंहि कार्य। सांगोनियां मज करीं करवोत आर्य! ॥
दासादिकां, पुरजनां, सकलां प्रजांना। बद्धांजली भरत वंदुनि सांगि नाना ॥
केलें तयां स्ववश, तोषवुनी तयांतें। ते मानिती सकलही भरतोक्ति चित्तें ॥१५॥
जाई पुढें गुरुगृहीं अनुजासमेत। बद्धांजली भरत दंडवतें करीत ॥
प्रार्थी "विभो! मज निदेश असो गुरूक्त। राहीन मी सुनियमें व्रत आचरीत ॥
प्रेमें मुनीश पुलकावृतगात्र बोले। "जें धर्मसार जगतीतलिं योग्य झालें ॥
तूं तेंचि जाणसि, कथीसि, करीसि सारें। आदर्श तूंच भरता! स्फुरतिसद्विचारें" ॥
ऐकें गुरूक्ति, शिरिं घेइ तदुक्तमाशी। बोलावुनी गणक पाहुनि सद्दिनासी ॥
सिंहासनीं स्थवि तो प्रभुपादुकांतें। निर्दोष सयश रचे कविनायकां तें ॥१८॥
श्रीराममाता गुरुपाद वंदुनी। श्रीपादुकांचाहि निदेश साधुनी ॥

ये नंदिगांवा भरत प्रभुप्रिय । राहे रचनी तरुपल्लवालय ॥ १९॥
तो धैर्यमेरू शुचि धर्मरक्षक । शोभे जटाजूटिं तदीय मस्तक ॥
तो वल्कलें प्रावरणें निजें करी । मुनिव्रतें सन्नियमादि आचरी ॥ २० ॥
मही खणोनी करि आसनस्थली । कुशावृना भू करुनी तयांतली ॥
आरंभि तो सद्व्रत खाद्यसेवनीं । राहे मुनीचें व्रत पूर्ण घेउनी ॥ २१ ॥
तो भूषणें, प्रावरणें, सुखावली । त्यजी तनूचित्तवचें धरातलीं ॥
विरक्तता श्रीभरतें निषेविली । मुनींद्रिंहीं तन्नियमादि गाइलीं !॥ २२ ॥
साकेतराज्या सुरराजहि स्तवी । श्री तेथली त्या धनदाहि लाजवी ! ॥
असा तेथें भरत व्रतोद्यमें । तो चंपकोद्यानिं अली तसा गमे ! ॥ २३ ॥
रामानुगामी, कमलाविलास ते । सद्भाग्यवान् होति समस्त टाकते ॥
न सेविती त्यां वमना गणोनियां । सुखोपभोगीं नच लालसा तयां ॥२४॥
भरत, रघुवराचा जो असे प्रेमपात्र । नच तयिं कुतुकाचें होय हें फार मात्र ॥
स्तवि जग कुतुकानें चातकाच्या व्रताला । स्तुतिसि निजविवेकें हंसही पात्र झाला ॥
त्याचा दिनानुदिन दुर्बल देह होत । तजोबलच्छवि मुखांबुजिं वृद्धिमंत ! ॥
तो नित्य रामनियमव्रतिं पुष्टता घे । सद्धर्मसैन्य भरतांतरिं वाढुं लागे! ॥
होई प्रसन्न मन नित्य तदीय पुण्यें । तेजोबलादिक तयीं गमतीं अगण्यें ! ॥
जैसें घटे जल जरी शरदागमांत । पद्में विकासति, विराजति रम्य येत ! ॥

भरतहृदयव्योमीं शोभा दिसे विमलोत्तमीं ।
शमिं, अनशनीं नक्षत्रीं या व्रतीं नियमीं, दमीं ॥
पुनिव अवधी, विश्वासाचा तिथें ध्रुव तारक ।
विकसत वियद्गंगा तशी प्रभुस्मृति तारक ! ॥ २८ ॥
अचल अमल प्रीती रामीं, गमे शशिची कला ।
विलसत तिथें तारासंगें शशी द्युतिनें भला ! ॥
अनुपमचि ती भक्ती रामीं विरक्ति विराजते ।
भरतचरितें वर्णायाला गिरा बहु लाजते !!! ॥ २९ ॥

भरतवर्तन-सत्कृति सद्गुण । कवण हें कवनीं करि गायन ?
सकल सत्कवि लाजति वर्णितां । थकति शेष, गणेशहि तत्त्वतां ! ॥ ३० ॥
पूजूनि नित्य प्रभुपादुकांतें । तत्प्रेम ना मानसिं मावेजे तें ॥
तो मागमागोनि निदेश त्यांचा । करीत राज्या बहुरीतिं साचा ॥ ३१ ॥

पुलक गात्रिं, हृदीं प्रभुजानकी । नयनिं नीर, सुनाम वसे मुखीं ॥
अशि असे भरतस्थिति निर्मळा । कशि बरें लवही कथवे मला ? ॥ १२ ॥
सीतारघूत्तम सलक्ष्मण काननांत । राहोनि जें तप करीति विरक्तियुक्त॥
तैसें करी भरतही भवनीं वसोनी । देहासि कष्टवुनि त्याचपरी कसोनी ! १३
दोघांसही तुलुनि, सांगति सर्व लोक । कीं सर्वरीतिं भरत स्तवनीय नीक ॥
साधूहि लाजतिच तन्नियमव्रतांसी । तैसे मुनींद्रहि तया नमिती स्वशीर्षी १४
भरतचरित आहे पुण्यराशी अनन्त । मधुरसुखद, मोदा मंगळा नित्य देत ॥
कलिकलुष निवारी, तीव्रही क्लेश नाशी।दिनकर जणुं, शोषी मोहरूपी निशेसी!
अघतति गज यांचा सिंह जें भासणारें । असह्य सकलतापां वारि जें सत्प्रकारें
रमवुनि जनचित्तां भंजि संसारभार । शशि जणुं रघुनाथप्रीति जी तींत सार।

सीतारामप्रेमसुधाकर भरत न जन्मा जर येता, ।
मुनिहृद्दुर्गम शमदमनियम–व्रतविषमा कां जन करता ? ॥
दुःखाग्नी, अघदंभ, अघनता कोण सदर्शी निज हरता ?
कलिकाळीं या तुलसीसम शठ कोण रामबापशिं धरता ? ! ॥ १७ ॥

तुलसिदास म्हणे, नियमें कुणी । भरतकीर्ति अशी जर आयके ॥
जनकजारघुनाथपदीं तया । रति घडोनि विरक्ति भवीं टिके ! ॥ १८ ॥

श्रीरामभरतभक्तिप्रेमाचा सिंधु हा मदीय मना ॥
व्यापुनि राहो संतत ' रामा'र्तिस रामभरत करुं शमना ! ॥ १९ ॥

इति श्रीरामचरितमानसानुवादकाव्ये ' श्रीसुश्लोकमानसे ' कलिकलुषविध्वंसने श्रीअयोध्याकाण्डोत्तरार्धे भरतवैराग्यविवेकवर्णनं नामैकोनत्रिंशस्तरङ्गः

—: इति अयोध्याकाण्डस्समाप्त :—

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादकाव्ये कलिकलुषविध्वंसने ' विमलविज्ञान-वैराग्यसंपादनो ' नाम द्वितीयः सोपानः श्रीसीतारामचंद्रकृपया संपूर्णः ॥

— श्रीरस्तु —

—० * * श्रीसीतारामचन्द्रार्पणमस्तु * * ०—

— शुभं भवतु —

[कांहीं श्लोकपंक्ति राहिल्या, त्या पुढीलप्रमाणें घालणें.]

पृ. ३९, अयोध्याकांड, पूर्वार्ध, तरंग ११

श्लोक १९ चा पूर्वार्ध–

ओहार त्या करुनि येति गृहाधि पौर । संध्याविधिस्तत्र निघे रघुवंशहीर ॥

श्लोक २७ चा पूर्वार्ध–

जें पुण्य सुंदर, सुचित्र सुभोगदायी । सद्गंधमाल्ययुत पूर्ण मणिप्रभांहीं ॥

पृ. ७३, अयोध्याकांड, उत्तरार्ध, तरंग ४

श्लोक ३० चा पूर्वार्ध–

जी शोचनीय पतिवंचक तेवि नारी । जी स्वैरिणी कुटिल, आवडि भांडणारी ॥

श्रीगणेशाय नमः ।

श्रीभवानीकमलेश्वराभ्यां नमः । श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ।

श्रीसरस्वत्यै नमः ।

तुलसीरूपिणे श्रीमद्वाल्मीकिमुनये नमः ।
यस्य प्रसादात्सुलभं स्वर्गीयममृतं भुवि ॥ १ ॥

❀ सुश्लोकमानस ❀

श्रीरामचरितमानस अथात् श्रीतुलसीरामायण

या महाकाव्याचा अनुवाद

तृतीय सोपान

अरण्यकांड

तरंग १ ला

मंगलाचरण

जो धर्मवृक्षाप्रति मूळ होय । आनंद द जो हृदया अमेय ॥
विवेकसिन्धूप्रति पूर्णिमेन्दु । त्या श्रीशिवाचें पदपद्म वंदूं ॥१॥
वैराग्यपद्मा रविसा विकासी । पापान्धकारा निवटूनि नाशी
त्रितापहारी, शमवीत पूर्ण । मोहांबुदाली अनिलासमान ॥ २ ॥
श्रीरामभूपप्रिय शंकराला । ऐशा नमीं मी अघनाशनाला ॥
ब्रह्मीं वसे जो नित लीन भावें । त्या शंकरें नित्य अम्हां जपावें ॥३॥

जो सान्द्रमेघापरि हर्षदच्छवि । पीतांबरें सुंदर, चित्त लोभवी ॥
सचाप-बाणांकित-पाणिपद्म तो । तूणीरिं ज्याचा कटिभाग शोभतो ॥४॥
श्रीराम तो पद्मविशाललोचन । शोभे जटाजूटशिरोविभूषण ॥
सौमित्रिसीतायुत मार्गि चालत । तो रम्य रम्यांहुनि मी स्मरें नित ॥५॥

उमे! श्रीरामाचे गुण अमित जे गूढ कळुनी !
मुनि ज्ञाते साधू विरति भजती निर्मल मनीं ॥
परी ज्यांच्या चित्तीं कधिंच नसते धर्मरति ती ।
मनीं अप्रीती ज्यां हरिगुणिं, तयां ते भ्रमविती ! ॥ ६ ॥

पुरजन-भरतांची प्रीति जी रामरायीं । अनुपम सुरसा ती मी यथाशक्ति गाई॥
प्रभुचरित वदें मी आचरी जें वनांत । सुर-नर-मुनिसौख्या विश्व जेणें पुनीत ॥७॥
एके दिनीं जमवुनी सुमनें मनोज्ञें । भूषा अनेक रचिल्या प्रभुनें रसज्ञें ॥
तो भूषवी प्रियतमेप्रति विश्वनाथ । सप्रेम ते उभय तैं स्फटिकासनस्थ ॥८॥
देवेन्द्रपुत्र धरि वायसरूपवेष । तो देखु इच्छि बळ राघविं जे विशेष ! ॥
मुंगी जणों कुबुद्धिं सागरिं पाहि खोली । तैसे बघे, 'रघुपती किति शक्तिशाली?'॥
तो मूर्ख मंदमति आपलि टोंचि चोच । सीतेचिया पदिं, पळे मग भीत साच ॥
श्रीराम देखुनि तदा व्रणिं येत रक्त । हाणी तया तृणशरें तृणचापिं युक्त ॥१०॥
दीनीं सदा अति कृपाळु जरीहि राम । त्यातेंहि तो छळित दुर्गुणपूर्णधाम ॥
तो ब्रह्मबाण अभिमंत्रित वेगिं जाय । धांवेहि काक हृदिं भीतमना असाह्य ॥
जयन्त तैं सत्वर मूळरूप घे । पित्याकडे आभय मागण्या रिघे ॥
परंतु तो राघवशत्रु जाणुनी । देवेन्द्र त्याच्या शकला न रक्षणीं ॥१२॥
निराश होऊनि भयें हृदीं भरे । दुर्वास त्या चक्रभयाकुल स्मरे ॥
ये ब्रह्मलोकीं शिवलोकिं, अन्यिही । भ्रमें भरे व्याकुळचित्त तो भयीं ॥ १३
कोणीहि त्यातें नच देइ आसरा । वदे न त्या कोणिहि 'बैस रे जरा !' ॥
त्या रामशत्रुप्रति कोणि आभय । देऊं शके काय कधीं विनिर्भय ? ॥ १४
श्रीरामशत्रुप्रति सर्व संकटें । होतात ऐकें गरुडा ! न एकटें ॥
मृत्यूपरी हो जननी, पिता यम । सुधाहि होई जणुं ती विषासम ॥ १५ ॥
सखाहि त्याचा शतशत्रुसा बने । गंगाहि हो वैतरणी तया गुणें ! ॥
ऐसें तया सर्वहि भासिजे जग । जे रामशत्रुत्व करीति दुर्भग ! ॥ १६

येथें तिथें व्याकुळ इन्द्रनन्दन । दुःखें बघे आश्रय कांहिं धावुन ॥
तेथें तिथें रामशरें न सोडिला । त्या पाठलागा करतां मुदु्वेला ॥ १७
जयंतदुःखा बघुनी तदा मुनी । श्रीनारदा ये करुणा मनांतुनी ॥
तो पाठवी त्या शिकवूनि राघवा।कीं बोल "रामा ! शरणार्थि वांचवा!"
तैं आर्त तो भीत रिघूनियां पदा । धरी प्रभूच्या, विनवीतहि तदा ॥
"हे नाथ ! दीनावन रामराय रे !। मां त्राहि ! मां त्राहि! दयानिधे! त्वरें
अतुलबल न जाणें, त्वत्प्रभावा न सीमा। मज नच कळला तो मंदबुद्धीस रामा!
प्रभुवर ! अजि पावें मत्कृतीच्या फला मी ।शरण तुजसि आलों त्वत्पदांभोजगामी
अत्यार्त वाणी परिसोनि त्याची । प्रभू करी त्यास कृपाच साची ॥
एकाक्ष त्यालागिं करूनि सोडी । भवानि ! हे रामकृपा न थोडी! ॥२१॥
त्या चित्रकूटीं प्रभुराम राहतां । नानापरीं दावि चरित्रचारुता ॥
जी वर्णितां चित्तिं सुधाच वाटती । तेव्हां विचारी प्रभुराय हृद्गतीं॥२२॥
" येथें समस्त जन जाणति आपणांस । भेटावया सकळ येति इथें विशेष !
संमर्द होइल" म्हणून, इथून दूर । जाती मुनींसि पुसुनी प्रभु रामचंद्र २३
सीतेसवें निघत सानुज रामराय । अत्र्याश्रमीं रिघति, तैं मुनि हृष्ट होय ॥
रोमांचकाय मुनि धावत जाय वेगें । त्या स्वागतें उभय हर्षेति अंतरंगें २४
श्रीराम त्या करित दंडवत प्रणाम । धांवूनि तच्चरणिं भक्तिभरें निकाम ॥
रामा मुनी उचलुनी कवळी स्ववक्षीं । प्रेमाश्रुनीं प्रभुसि न्हाणित तो निजाक्षीं
पाहूनि रामचरणां मुनिनेत्र धाले ! । सर्वांसि ने मुनि निजाश्रमिं अल्पकालें॥
पूजूनियां प्रभुवरा अति आदरें तो । सर्वांसि कंदफलमूल मुनीन्द्र देतो २६
तैं वंदुनी प्रभुवरा अतिशोभमाना । डोळेभरी निरखि, ज्या उपमा असेना ॥
जोडोनि हस्तयुगुलांबुरुहा तयातें । भावें स्तुती करित अत्रि निजोत्तमोक्तें २७
" हे भक्तवत्सल कृपामृदुशील रामा ! । निष्कामियांहि वितरीसि सुखस्वधामा
हे श्यामसुंदर भवांबुधिमंदरा रे ! । फुल्लांबुजाभनयना नमुं भक्तिपूरें २८
त्वत्पादपद्म मद-नाशन मी नमीत । देवा अमेयविभवा ! सुखवीशि भक्त ॥
हे दीर्घबाहुकृतविक्रम ! सज्जचाप । त्रैलोक्यनाथ ! शरणागतनष्टताप २९
हे सूर्यवंशशुभमंडन ! शंभुचाप । खंडीशि, तूं वरिशि जानकितें अपाप ॥
हे सज्जनावन ! मुनीन्द्रमनोभिरामा । दैत्यारिनाशन ! विभो चिरसौख्यधामा !

ज्या सेविती सुर अजादिक भक्तिभावें । ज्या वंदितो स्मररिपूहि निजस्वभावें ॥
ज्ञानस्वरूप विभु तो सकलाघनाशी । त्या श्रीपतीसि नमिं मी रघुनंदनासी ॥ ११ ॥
जो सौख्यराशि जगिं सद्गति सज्जनांचा । जो शक्तिसंयुत निजानुजयुक्त साचा
जो वानिला स्तविं सुरेन्द्रकनिष्ठबंधु । तो वंदितों निजजनाप्रति सौख्यसिंधु ॥
जे मत्सरा त्यजुनि, येति तुझ्या पदाब्जीं;त्यांना नसे पतन घोर भवाब्धिमाजीं
ना ते वितर्कलहरींमधिं मग्न होती । एकान्त सेवुनि तुला भजती सभाक्ति २३
भक्ती करीति तव इंद्रियनिग्रहानें । घेती तुझी सुगति साधुनि भक्त तेणें ॥
देवा ! तुला नमितसें प्रभुला निरीहा।एकाद्भुता विभुवरा ! अविकार्य तूं हा
हे भक्तिवल्लभ ! कुयोगिजनां दुरापा । हे भक्तकामतरुरूप समा ! अपापा ! ॥
हे विश्वसद्गुरुवरा ! अचला तुरीया।हे शाश्वता ! प्रभुवरा ! नित वंदनीया!२५
हे विश्वसुंदर नृपा ! तुज मी नमीत । हे जानकीरमण ! मी चरणाब्जभक्त ॥
होई प्रसन्न; मन हो तव भक्तिमग्न । भक्ता तुझ्या मिळतसे तव लाभ पूर्ण २६
जे स्तोत्रिं संस्तुति तुझी करितील ऐशी । वाढेल मानसिं तयां तव भक्तिराशी
लाभेल त्यांप्रति तुझें पद सौख्यसार । आनंदलाभ तव भक्त लुटी अपार"२७
प्रार्थोनि यापरि मुनी नमि त्यासि शीर्षीं । जोडोनि पाणियुग मागत हें तयासी
"देवा ! सदैव मम या मतिनें भजावें । त्वत्पादपद्मयुगलाप्रति भक्तिभावें"२८
॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सकलकलिकलुषविध्वंसने अरण्यकाण्डे
अत्रिकृतश्रीरामस्तववर्णनं नाम प्रथमस्तरङ्गः ॥

तरंग २ रा

तदा सीता प्रेमें नमुनि अनसूयेसि चरणीं ।
किती दाती भेटे तिजसि अनघा सादर मनीं ॥
हृदीं अत्यानंदें भरुनि अनसूया तिजसि दे ।
शुभाशीर्वादातें निज निकटही बैसवि मुदें ॥ १ ॥
ऋषिजाया अनसूया लेववि सीतेसि वस्त्रभूषण जें ॥
तें दिव्य अमल नूतन सतत शोभायमान तिजसि सजे ! ॥ २ ॥
सरस मृदुस्वरें ती प्रेमळा आर्यपत्नी । सहज कथि सतीचा धर्महि तत्त्ववाणी॥
" हितकर जरि आईबाप बंधू जगांत । परिमितचि तयांचें दान न रीसि होत

अमित वितरि भर्ता मात्र नारीसि सीते! ।अधम असम नारी जी न सेवी पती
समज मनिं कसोटी आपदा हीच चारां।धृतिगुणि निजधर्मी स्त्रीस तैसीच मित्रा
जी वृद्ध, रोगि, धनहीन जडा सुदीना । कोपिष्ट अंध बधिरा पतिला पुसेना
त्यातें करीत अपमानचि मात्र ऐसी। नारी लभे यमपुरीमधिं दुःखराशि ॥५॥
हो धर्म एक जगतीं व्रत नेम एक । कीं देहवाङ्मनिं भजे पतिलागिं नीक ॥
वेदीं पुराणिं सुजनीं कथिल्यात चार । नारी पतिव्रतपरा कथितें प्रकार ॥६॥
जी श्रेष्ठ, मध्यम, सुनीच कनिष्ठरीति । ती वर्णितें जनकजे ! धरिं तूं स्वचित्तीं ॥
जे ऐकतील वच हें, तरतील तेही । संसार हा जलधि, त्यांसि न कष्ट कांहीं॥७॥
ती जाण उत्तम अशी, जिस ना मनांत । स्वप्नींहि अन्य पुरुषस्मृति लेश होत॥
ती मध्यमा समज जी नर अन्य मानी ।भ्राता, पिता, सुत अशा उचिताभिधानीं
जी धर्म बुद्धि कुलनीतिविचारिं राही । ती हो निकृष्ट गणिली श्रुतिमाजिं, पाहीं
जी भीतिनें अवसराविण राहि तैसी । सीते ! गणीं अधम यापरि तूं तियेसी ॥९॥
जी भर्तृवंचक रमे परक्या नराशीं । ती रौरवीं नरकिं कल्प पडे न कैशी ? ॥
जी कोटिजन्मशत दुःखचि भोगण्यास ! सेवी क्षणैक सुख ती किति मूढ खास ! १०

पतिव्रता स्त्री सहजीं निषेविते । सत्यें सुशीलें गति उत्तमाचि ते ॥
जी वंचिते आत्मपतीस वर्तनें । वैधव्यिं ती यौवन अन्य जन्मिं ने !॥ ११
अपावनी स्त्री गमते स्वभावतां । घे सद्गतीतें जर ती पतिव्रता ॥
गाती तिचें सद्यश चारिही श्रुति ! प्रिया म्हणोनी तुलसी हरिप्रति ॥१२

सीते ! तुझें स्मरुनि नामचि अन्यनारी । धन्या पतिव्रत करीति सुखप्रकारीं ॥
प्राणांहुनी प्रिय तुला मनिं होय राम । हे मी वदें भविं हितास्तव नीतिधर्म"॥१३॥
ऐकोनि हृष्टलि मनीं अति जानकी तें । ती आदरें नमित तत्पदपंकजातें ॥
बोले रघूत्तम ऋषीसि कृपानिधान । "आदेश द्या जि ! दुजिया वनिं मी रिघेन॥
होवो कृपा मजवरी तुमची सदैव । स्नेहें अखंड मम मानुनि दास्यभाव" ॥
ती धर्मधीर विभुची परिसोनि वाणी । ज्ञानी मुनी वदत सादर या वचांनीं
"ज्याची कृपा विधि–हरी सनकादिकांना । इष्टा गमे सकलही परमार्थपूर्णा ॥
तो राम तूं जगिं अकाम समस्तसेवी । दीनीं कृपालु मृदुवाग् वदसी न केवीं ? ॥
आली मला चतुरता प्रभुची कळोन । वंदीन मी तुजसि, सोडुनि देव आन ॥
ज्याच्या समान न दुजा, कुठुनी विशेषें !। त्याचें करूं नच असेल सुशील ऐसें!।

आतां वदा म्हणुं कर्से प्रभुंनीं निघावें । सर्वांतरांत वसतां, प्रभुसीच ठावें " ॥
ऐसें म्हणोनि मुनि धीर बंध प्रभूतें । रोमांचली तनु विलोचनि अश्रु ये तें !॥१८॥
तनु रोमांचित पूर्ण प्रेमें प्रभुमुखकमलीं नयन दिले ।
मनोज्ञानगुण यांसि अगोचरिं जपतप मीं तरि कधि केलें ! ॥
जे कुणि निशिदिनिं शुभ रघुचरिता गाती सादर त्या मिळते ।
योगधर्मजप नाचरितांही, अनुपम भक्ती तुलसिमतें ॥१९॥
श्रीरामचंद्रयश उत्तम सौख्यमूल । दुःखासि नाशि, कलिपातक तें हरील ॥
जे आदरें परिसती यश राघवाचें । श्रीराम त्यास अनुकूलचि होति साचे ॥२०॥
आहे कराल कलिकाल निधी अघांचा । हो ज्ञान योग जप धर्म कलींत कैंचा ! ॥
जाणोनि हें भरंवसा न दुजा धरीती । ते मात्र या जगिं खरे चतुराग्रमूर्ती ! ॥२१॥
॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे कलिकलुषविध्वंसने अरण्यकाण्डे
श्रीरामस्यात्रिसमगमो नाम द्वितीयस्तरङ्गः ॥

तरंग ३ रा

मुनिपदकमलांतें वंदुनी नम्रशीर्षीं । सुरनरमुनि यांचा नाथ चाले वनासी ॥
रघुवर पुढतीं हो बंधु मागूनि चाले । मुनिवरसम वेषें ते अती शोभलेले ॥१॥
विलसत उभयांच्या मध्यि सीता कशी ती ॥ जणु विलसत माया ब्रह्म-जीवात होती॥
अवघड वनिं वाटा घाट शैलीं नद्या त्या । उमजुनि जणु नाथा त्याप्रती मार्गदात्या
रघुवर वनिं जाई यापरी जेथ जेथ । गगनिं घन करीती सावली तेथ तेथ ॥
पथिं असुर तयातें भेटला तैं विराध । प्रभु वधित तयातें, येत जों तो अशुद्ध॥३॥
त्वरित रुचिररूपा पावुनी तो विराध । प्रभु मग निजधामीं पाठवी त्या अबाध ॥
मग मुनि शरभंगा भेटती रामराय । सुभग अनुज सीता संगतीं ज्यास होय ॥४॥
रामचंद्रमुखपंकजाप्रति । नेत्रभृंग मुनिचे विलोकती ॥
आदरें करिति सौख्यपान ते । धन्य धन्य शरभंग सन्मतें ॥५॥
वदे मुनि " रघूत्तमा ! परिस गा ! दयाळा ! खरें ।
विराजसि विभो ! उमारमणमानसीं हंस रे ! ॥
विरिंचिसदनास मी निघत तों भलें ऐकिलें ।
वनांत तुम्हि येतसां, थविन आपुलीं पाउलें ! ॥६॥

म्हणोनि दिन रात मी बघितसें कधीं ये क्षण ।
अतीव अति हर्षलों मिळुनि आपुलें दर्शन ! ॥
प्रभो ! परम हीन मी सकल साधनीं हा असें ।
सुदीन समजूनिही मज कृपा करीतां असे ॥७॥
न हें करितसां प्रभो ! बघुनि कांहिं माझेमधें ।
स्वरीति तुम्हिं राखिली जनमनोहरा ! सत्रिधें ! ॥
कृपा करुनि राघवा ! तंवर येथ थांबा वरा ।
तनु त्यजुनि मी तुम्हांमधिं मिळेन जों ईश्वरा ! " ॥८॥

सो योग यज्ञ जप सत्तप सद्व्रतादि । अर्पी प्रभूसि शुभभक्तिवरासि साधी ॥
मोठी चिता करि, बसे शरभंग तींत । सोडोनि संग हृदिं ये मुनिं शुद्धचित्त ॥९॥
"नीलांबुदच्छवि विभो! रघुवर्यनाथा । सीतेसमेत अनुजासह विश्वकान्ता ! ॥
माझ्या हृदीं सगुणरूप तुम्ही रहावें । द्यावें निरंतर असें वरदान देवें!"॥१०॥

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे कलिकलुषविध्वंसने अरण्यकांडे शरभङ्ग-वैकुण्ठवर्णनं नाम तृतीयस्तरङ्गः ॥

तरंग ४ था

प्रार्थोनि हें करित दग्ध निजा तनूसी । योगाग्निनें मुनिहि हो हरिलोकवासी ॥
रामस्वरूपिं मुनि हो नच लीन तो कीं । तें द्वैतभक्ति वर मागत विष्णुलोकीं ॥१॥
पाहोनि तद्गति अशी,सगळ्या मुनींना । झाला प्रहर्ष हृदयीं मज वर्ण्य हो ना ॥
उद्गारती स्तुतिवचें मुनि हृष्ट भावें । " श्रीराम भक्तकरुणाकर कीर्ति पावे ! " ॥
जाती पुढें रघुवरादि वनीं समस्त । त्यांचेसवें मुनिसमूहहि सर्व जात ॥
मार्गांत त्यांस दिसतां बहु अस्थिराशि । 'कोठून हा !' पुसत राम दयाब्धि त्यांसी ॥
तें सांगती मुनि "कसें पुसतां जि ! नाथा ! । सर्वां हृदीं वसतसां, सकलां पहातां ॥
भक्षीयलें मुनिगणांप्रति राक्षसांनीं ! " । एकोनि रामनयनांमधिं येइ पाणी ॥४॥
उभारुनी बाहुसि, रामराय । तेव्हां प्रतिज्ञा करि जी न वांय ॥
' करीन मी राक्षसहीन भूमी । भक्तांसि निर्विघ्न करीतसें मी ' ॥५॥

॥ इति श्रीरामचरित० सकलकलिकलुषविध्वंसने अरण्यकाण्डे रामस्य निशिचर-विनाशाय प्रतिज्ञाकरणं नाम चतुर्थस्तरङ्गः ॥

तरंग ५ वा

सर्वोचिया आश्रमिं राम जाई । भेटे मुनींना बहु सौख्यदायी ॥
अगस्तिचा शिष्य सुतीक्ष्णनामा । स्वदेहवाक्चित्ति सुभक्त रामा ॥१॥
विश्वास त्याचा प्रभु रामिं एकीं । कळे तया जैं प्रभुवर्य ये कीं ॥
मनोरथां कैक करीत चित्तीं । सोत्कण्ठ तो धावत हर्षमूर्ति ॥ २ ॥

"दैवा ! मला बघिल कीं प्रभु दीनबंधु ?। दावो दया मज शठा करुणैकसिंधु ॥
मानोनि दास मजला बघतील नाथ ?। ते भेटतील मज कीं अनुजासमेत ? ॥३॥
विश्वास ना मम हृदीं दृढ एवढाही - न ज्ञानभक्ति, विरतीहि नसेचि कांहीं ॥
सत्संग योग जपयागहि म्या न केले । न प्रेमही प्रभुपदाबुजिं चारु ठेलें ॥४॥
बाणा असे दृढ दयानिधिचा असा कीं । जो हो अनन्य मनिं, तो रुचतो अनेकीं ॥
होतील आज मम लोचन हे कृतार्थ । पाहोनि राममुखपंकज सौख्य मूर्त !" ॥५॥
तो प्रेमनिर्भरिं निमग्न सुतीक्ष्ण ठेला । ज्ञानी मुनी, स्थिति न ती वदवे कुणाला ॥
तो या दिशीं, मग तया दिशिं गोरि ! जाय । त्यालागिं भान नुरले पथ कोण काय? ॥
केव्हां फिरे परत तो प्रभुभक्तिमग्न । सानन्द नाचत कदा गुण आळवून ॥
ती गाढ भक्ति मुनिच्या प्रकटे हृदन्तीं । श्रीराम पाहि तरुआडुनि कौतुकें ती ॥
प्रीती बघूनि मुनिमानतिची नितान्त । आविर्भवे हृदयिं जो भवभी हरीत ॥
बैसे जणों अचल तो मुनि तैं पथींच । रोमाञ्चुनी फणसशी तनु होइ साच ! ॥
तेव्हां तयानिकट ये प्रभु रामराय । त्याची दशा बघुनि राघव तुष्ट होय ॥
श्रीराम जागवुं बघे बहु त्या मुनीतें । तो ध्यानसौख्यि रत, जागृति घे न चित्तें ॥
तो भूपरूप दुरवी रघुराय त्याचें । ठेवी हृदीं निजचतुर्भुज रूप साचें ॥
तैं तो मुनी उठत आकुळ होत कैसा ?। कीं तो फणीश मणिहीन सुदीन जैसा !
पाही समोर घननीळ रघूत्तमासी । सीतासमेत, अनुजासह सौख्यराशि ॥
काष्ठापरी पडुनि तच्चरणांसि लागे । भाग्यें अतुल्य मुनि रामरतान्तरंगें ॥११॥
तेव्हां महाभुज रघूत्तम त्या स्वभक्ता । घेई हृदीं उठवुनी अतितुष्टचेता ॥
शोभे मुनीश मिळतां करुणाकरासी । कीं तो तमालतरु काचनवृक्षपाशीं ! ॥१२॥
राहे मुनी बघत राममुखांबुजाला । भासे जणों अचल चित्रिंच काढियेला !
[त्यांची स्थिती कवण वर्णुं शकेल शब्दीं । तो भक्तचातक मिळे प्रभुराघवाब्दीं ॥]

केव्हां धरूनि हृदिं धीर, पुनः पुन्हांही। तो राघवांघ्रि धरि लावुनि त्यासि डोई ! ॥
तो आश्रमीं अपुलिया अति भक्तिपूरें। रामासि नेउनि समार्चे बहुप्रकारें ॥१४॥
बोले मुनी " विनवितों प्रभुजी ! तुम्हां हें। कोण्यापरी स्तवन हो मज शक्य आहे?
आहे अगाध महिमा, मति अल्प माझी। खद्योत केविं रविच्या पुढतीं असे जी!
इंदीवरांचितमनोहरदामकाय। माथां जटामुकुट, वल्कलशोभनीय ॥
हातांत चापशर, होत कटीस भाते। मी हा निरंतर नमीं रघुवीर चित्तें ॥१६॥
जो मोहघोरविपिना दववह्नि साजे। जो सूर्य सज्जनसरोरुह पोषि तेजें ॥
जो राक्षसाख्य गजसंघि हरीच भासे। जो श्येन संसृतिखगा, मज रक्षि हर्षें ॥१७॥
रक्तोत्पलोपमविलोचन चारुवेष। सीताविलोचनचकोरशशी विशेष ॥
जो शंभुचित्तमयमानसराजहंस। तो राम मी नमिं विशालभुजाढ्यवक्ष ॥१८॥
जो सह्ययोरगखगेश्वर शोभणारा! जो तर्ककर्कश विषाद विनाशणारा ॥
संसारभंजक सुराप्रति रंजवीता। रक्षो अम्हा सतत तो करुणार्द्रचेता॥ १९ ॥
जो निर्गुणी, सगुणही सम वा तसा न। ज्ञानेन्द्रियासि वचनांसि अतीत पूर्ण॥
निर्दोष निर्मल अपार असा अरूप। भूभारहारिरघुनाथ नमीं अमूप॥ २० ॥
आराम कल्पतरुपूर्ण असा स्वभक्ता। जो क्रोधलोभमदकाम अघांसि हन्ता ॥
जो सेतु होय भवसागरिं जो कुशाग्र। तो केतु सूर्यकुलिचा मज रक्षणार॥२१॥
ज्याचें अतुल्य बलतेज, भुजप्रताप। यन्नाम नाशि कलिकल्मषही अपाप ॥
ज्याचा गुणौघ सुख दे जगिं धर्मवर्म। रक्षो अम्हांस क्षणिं संतत तोच राम॥
नोहे जरी रज तुझ्यान, अनन्त होशी। व्यापूनि सर्व सकलांहृदिं तूं निवासी॥
राहो तरी मम मनीं विपिनाभिचारी। सीतेसमेत अनुजासह हा खरारि॥२३॥
जाणोत ते तुजसि जाणति जे अनन्ता!। कीं होशि तूं सगुणनिर्गुण चित्तनाथा!॥
तूं कोसलेश, कमलाक्ष, हृदीं सदैव। माझ्या निवास कर राघव देवदेव! ॥२४॥
मी दास तूं रघुपती मम नाथ ऐसा। लोपो न हा मदभिमान कदापि ईशा!" ॥
ऐकोनियां मुनिवरोक्तिस राम तोषे। त्यातें पुन्हा कवळि तो उरिं राम हर्षें॥
सांगे तया प्रभु " अतीव सुतुष्ट मी हा। तूं माग रे! वर मला, पुरवीन ईहा"॥
बोले मुनी " वर न मी कुठलाहि याचीं। खोटा खरा मजसि ठेहि न हो कळचि!
जो आपणांस दिसतो मज योग्य तोच। हे भक्तसौख्यद विभो! मज देइं साच!"॥
'विज्ञान, भक्ति अति, तेविं भली विरक्ति। ज्ञाना गुणांसि निधि होशिल सर्व रीतीं"

"मातें दिधल वर जो मज पावला तो। मी मागतों वर मला अति इष्ट होतो"
ऐसें म्हणोनि अति भक्तिभरें मुनीश। बोले प्रसन्न करुणाकर राघवास ॥२८॥
" हे चापबाणधर! लक्ष्मण आणि सीता। यांचे समेत मम चित्तिं वसावि! नाथा!
हें व्योमसें हृदय जें मम, त्यांत इंदू। निष्काम संतत वसा तुम्हि सौख्यसिंधु"२९
॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सकलकलिकलुषविध्वंसने अरण्यकाण्डे
सुतीक्ष्णप्रेमस्तुतिवर्णनं नाम पंचमस्तरङ्गः ॥

तरंग ६ वा

तेव्हां 'तथाऽस्तु!' म्हणुनि प्रभुवर्य राम। चाले अगस्तिमुनिसन्निध पूर्णकाम ॥
"झाले कितीक दिन मी गुरुला बघोनी। या आश्रमीं निवसण्या जंव यें तिथूनी ॥
येईन मी प्रभुसवें गुरुदर्शनार्थ। हो मार्गदर्शिहि इवाच तुम्हांस नाथ!" ॥
हांसे प्रभू कुशलता मुनिची बघूनी। जाती तयासह शुचिस्मित बंधु दोनी ॥२॥
गेला सुतीक्ष्ण, मुनिच्या झणिं सन्निधानीं। घालोनि दंडवत सांगत गोड वाणीं ॥
" हे कोसलेश्वरकुमार तुम्हांस येती। भेटावयास जगदीश्वर रम्यमूर्ति ॥३॥
ज्यातें अहर्निश तुम्ही जपतां हृदब्जीं। तो जानकीसह सलक्ष्मण राम ये जी!"॥
जाती अगस्ति मुनि धांवत तैं उठोनी। पाहोनियां हरिसि लोचनिं वाहि पाणी ॥
हे दोनि बंधु धरती मुनिपादपद्म। तो प्रीतिनें कवळि त्या मुनि भक्तिधाम ॥
ज्ञानी मुनी कुशल त्यां पुसि भक्तिपूर्ण। तो आसनीं बसवि त्यांप्रति आणवून ॥
पूजी अनेक परिनीं प्रभुसी विनीत। प्रार्थी " नसेचि कुणि मत्सम भाग्यवंत"॥
जे अन्य तेथ मुनिवृंद समस्त होते। ते पाहती सुखनिधि प्रभु हृष्टचित्तें ॥६॥
सर्वांचि संमुख बसे मुनिवृंदिं राम। वाटे अवर्ण्य सुषमा नयनाभिराम ॥
कीं शारदेन्दु अतिसुंदर रामराय। त्यांतें चकोरगण ते बघतात काय!? ॥७॥
तेव्हां वदे मुनिवराप्रति रामचंद्र। "नोहेचि ना विदित कांहि तुम्हां मुनीन्द्र!॥
आलों कशास्तव वनीं तुम्हि जाणतां कीं। सांगूं कशास फिरुनी वचनीं अनेकीं!॥
द्यावा मला आज तुम्ही उपदेश साचा। हो नाश जेविं मुनिभक्षक राक्षसांचा" ॥
रामोक्ति ऐकुनि वदे मुनि हांसुनीयां। 'जाणोनि कोण पुसतां मज गोष्टि हो या!॥
मी जाणतों प्रभुसि! भक्तिबळेंकरून। माहात्म्य ज तरिहि तें तुमचें अपूर्ण!॥
उंबरासम गुरू भवदीय माया। ब्रह्मांडकोटि गमते फळरास ती या ॥१०॥

सारें चराचर असें तवि जंतुसें तें । राहे फळीं परि न जाणतसे परातें ॥
ऐशा फळासि जरि भक्षक उग्र काळ । त्यातेंहि भीति तुमची असते कराळ ॥११॥
हे तुम्हि हे सकलदैवत देवदेव ! । हें प्राकृतापरि मला पुसतां सुभाव ॥
मी मागतों वर तुम्हांस कृपानिधान ! । श्रीलक्ष्मणांसह बसा मम चित्ति पूर्ण ॥
भक्ती दृढा, विरति, सज्जनसंगतीही । प्रीती अभंग तुमच्या चरणांकिं राही ॥
हें ब्रह्म यद्यपि अखण्ड अनन्त ऐसें । संतांस ये अनुभवा भजनें विशेषें ॥१३॥
तें रूप निर्गुण जरी समजे मलाही । वाखाणितोंहि जरि मी नित त्या स्तवांहीं॥
माझें परी हृदय हें फिरुनी फिरूनी । ब्रह्मीं रमे सगुणि या सुखसंनिधानीं !
मोठेपणा वितरतां तुम्हि आत्मदासीं । मातें तुम्ही म्हणुनि हें पुसतां विशेषीं॥
आहे प्रभो ! परमसुंदर ठाव एक । त्या नाम पुण्यतम पंचवटी सुरेख १५
रामा ! पुनीत करणें तुम्हि दंडकातें । कीं उग्रशापिं मुनिगौतमिं शापिलें तें ॥
तेथें निवास करणें तुम्हि आपला हो! । होवो मुनींसि करुणानिधिचा सुलाहो"

निघती, मुनिवर्याची आज्ञा त्यापरि लाभुनी ॥
येती पंचवटीमध्यें रामचंद्रहि ते क्षणीं ॥ १७ ॥

भेटे जटायु खग त्या स्थलिं गृध्रराय । स्नेहासि वृद्धि घडली उभयीं अमेय॥
गोदावरीनिकट बांधुनि पर्णशाला । श्रीरामचन्द्र निजवास करी तियेला ॥१८॥

— ॥ इति श्रीरामचरितमानसे सकलकलिकलुषविध्वंसने अरण्यकाण्डे
अगस्त्यरामसमागमपंचवटीवर्णनं नाम षष्ठस्तरङ्गः ॥ —

तरंग ७ वा

श्रीराम तेथ वसले, तिथुनी समस्त । झाले मुनी विगतभीति तया वनांत ॥
सारे गिरी वन तटाक नद्या सुशोभा । रूपें दिनानुदिन निर्मिति नेत्रलोभा १
तेथें विहंगमृगवृंद अतीव मोदें । संचारती, मधुप गुंजति मंजुनादें ॥
व्हावा अहीशहि कसा वन गावया तें । श्रीरामही सजत ज्यांत वसावयातें!२
श्रीराम एक समयीं सुखिं बैसलेले । त्यां लक्ष्मणें पुसियलें वच सानुशीलें ॥
" स्वामी सुरां, मुनिनरां सचराचरांला । साक्षात्प्रभू मम, तुम्हां पुसतों चि । बोला
सांगा मला समजवूनि जयें सदा मी । टाकूनि सर्व, रत हो प्रभुपादपद्मीं ॥
हो ज्ञान तेवि विवरा चि ! विरक्तिमाया । तेवें दया करुनि भक्ति निवेदणें वा

सांगा मला ईश्वरजीवभेद । जेणें मला सर्व कळेल शुद्ध ॥
वाढोनि मोहभ्रम अंतरींचे । भवत्पदीं चित्त जडेल साचें ! " ॥५॥
बोले रघूत्तम " कथू समजेल ऐसें । एकाग्रधीमतिमनें परिसें विशेषें ॥
मी तूं, तुझें मम अशी गण सर्व माया । जीवास अंकित करी सकलांसही या ॥
जें होय गोचर मनाप्रति इंद्रियांसी । मायाच ती सकल तू समजोनि तैसी ॥
बंधो ! तिचे उभय भेदहि जाण बुद्धया । विद्या तशी अपर ती समजें अविद्या ॥
अविद्या असे सर्वही दुःखरूपा । जियें पाडिला जीव संसारकूपा ॥
प्रभुप्रेरिता जाण विद्या करीत । गुणें सृष्टि ही, सार हें जाण तात ! ॥८॥
नसे ज्ञान वा मान ज्यातें जराही । बघे ब्रह्म सर्वत्र जो पूर्णवाही ॥
म्हणावें विरागी तयालागिं ताता ! । गुणातीत, सिद्धी तृणें त्यासि चित्ता ॥
मायेश आपण असूनहि ज्या कळे ना। बा लक्ष्मणा ! हृदयिं त्याप्रति 'जीव' जाण ॥
जो बंधमोक्ष वितरी, सकला अतीत । मायाधिचालक तया 'शिव' नाम होत ॥

* ॥ इति श्रीराम०अरण्यकाण्डे ईश्वरजीवभेदवर्णन नाम सप्तमस्तरङ्गः ॥ *

तरंग ८ वा

धर्में विरक्ति लाभे, योगापासोनि लाभतें ज्ञान
ज्ञान असे मोक्षप्रद वाखाणिति वेद तत्त्व हें जाण ॥ १ ॥
जेणें द्रवे त्वरित मन्मन, ती मदीय । तू जाण भक्तिच खरोखर एक होय !
आहे स्वतंत्र निज आश्रय नान्य लागे। हो ज्ञान तेवि विरती तिच्यियाच संगें
भक्ती खरी अनुपमा सुखमूल सारी । सत्संगतिस्तवचि लाभत भव्यकारी ॥
प्राण्यास भक्ति मिळण्या सदुपाय होती । तीं साधनें सुगम पंथ वदेन उक्तीं ॥३॥
सुप्रीति विप्रचरणीं पहिली असावी । श्रुत्युक्तिरीति निजकर्मरतीहि व्हावी ॥
लाभे विरक्तिफल या कृतिवल्लरींना । मद्भक्तिधर्मि उपजे रति येरवीं ना ! ॥४॥
तै आवडे नवविध श्रवणादि भक्ति । लीला मदीय अति आवडतीहि चित्तीं ॥
संतांघ्रिवा पदसरोरुहिं भक्ति गाढ । देहें वचें मनिं निरंतर हो अपाढ ॥५॥
मातेंच बंधु गुरु आइ वडील देव । स्वामीहि मानुनि मला भजणें सदैव ॥
गातां गुणां मम भरे तनु रोमहर्षें । येई गळा भरुनि, लोचनिं अश्रु वर्षे ॥६॥

कामादि दंभ मद होति विकार ज्यास न। त्यांनाच मी वश्य असें प्रिय रे! सुजाण!
जे देहवाक्मनिं मला भजती अकाम। त्यांच्या हृदीं वसत मी नित सौख्यधाम" ॥
—॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे 'सुश्लोकमानसे' कलिकलुषविध्वंसने
अरण्यकाण्डे भक्तियोगवर्णनं नामाष्टमस्तरङ्गः ॥—

तरंग ९ वा

हा भक्तियोग परिसोनि अती सुखावें। सौमित्रि रामचरणां नमि भक्तिभावें ॥
ज्ञाना, गुणा, विरति-नीतिस वानितांना। त्यांचे निरूपणिं असे दिन जाति नाना

भगिनी रावणाची जी नाम शूर्पणखा तिचें ॥
दारुणा दुष्टहृदया उपमा नागिणी सुचे ! ॥२॥
ती ये पंचवटीमध्यें एकदा घोर राक्षसी ॥
कामार्त होय पडतां रामलक्ष्मण दृष्टिसी ॥३॥

भ्राता, पिता, पुत्र अशा सुरूपा। बघोनि नारी पुरुषा अमूपा ॥
रोधूं शके चित्त न ती स्मरार्त। सूर्या द्रवे पाहुनि सूर्यकान्त ॥४॥

धरुनि रुचिर रूपा जाय ती राघवासी। वचन वदत त्यातें लोलनेत्री सुहासी ॥
"पुरुष न तुजऐसा, मत्समा नाहिं नारी। विधिच जणुं विचारी साधि ही गोष्ट सारी!
जगतिं न नर माझ्या योग्यतेचा दिसे कीं। निवडुनिहि पहावी त्वां समग्रा त्रिलोकी
म्हणुनि अजिवरीं मी राहिलेंसें कुमारी। भुलत अजिच कांहीं मी तुला पाहणारी"
रघुपतिहि, बघोनी जानकीलागिं, बोले। "मम अनुज असे हा लग्न ज्याचें न झालें!
त्वरित मग तयातें जाय ती, तोहि जाणे। निजरिपुभगिनी हे, बोलला याप्रमाणें
प्रभुसि बघत बोले तीस वाक्यें मृदूशीं। "परिस! रघुवरा मी दास हों, रूपराशि!
परवश पति तूंतें योग्य गे! केविं व्हावा?। प्रभुवरचि अयोध्यानाथ तूं हा वरावा।
प्रभु करिल तसें त्या सर्वही साजणारें। सुख मिळत न दासा, मान भिक्षाप्रकारें ॥
व्यसनि धनि न राहे, ना यशं लोभियाला। सुगति न शिनळाला, हाच निष्कर्ष झाला
होऊनि सेवक सुखांप्रति लुब्ध झाला!। गर्वान्वितासि कधिं साधुपणा मिळाला ?॥
जो स्वास्थ्य इच्छि असुनी परदास्यपाशीं। तो कांक्षि दुग्ध जन दोहुनियां नभासी"
आली पुन्हां फिरुनि ती प्रभुरामराया। सौमित्रिते तिज पुन्हां प्रभु लावि जाया ॥
"तो तूजला वरिल" लक्ष्मण तीज सांगे। "लज्जेसि तोडि तुण जो निज सर्व अंगें!"

ती क्रुद्ध होउनि पुन्हां क्षणि जाय रामा । रूपा भयंकर अशा प्रकटी निकामा ॥
सीतेसि पाहुनि भयाकुल, तें खुणावी । श्रीरामराय अनुजा कृति काय व्हावी ॥
तैं नाक कान अति लाघवें लक्ष्मणानें । कापीयलें क्षणि तिचे कुपिताप्रमाणें ॥
तेणें जणों वितरिलेंचि दशाननाला । आह्वान त्या उघड मार्गि, लढावयाला ! ॥
ती नाककानविण दारुणरूप दुष्ट । रक्त स्रवे गिरिहुनी जणुं गेरुलोट ! ॥
गेली निनादत क्षणीं खरदूषणांतें । "धिग् धिग्" वदे "बल, भवत्पुरुषत्वही तें! ॥
बंधो ! तुम्हां बघवते मम कीं दशा ही !" ते तैं तिला पुसति कारण काय होई?
घेतांचि त्यां कळुनि कारण सर्व शोका । सेना सुसिद्ध करिती लढण्या अनेका
तेव्हां निशाचर अपार क्षणीं निघाले । कीं घोर कज्जलगिरीच सपक्ष झाले! ॥
ज्यां वाहनें विविध आयुधराशि नाना । आकार रूपहि अनेकपरीं तयांना ॥
केलें पुढें प्रथम शूर्पणखेस त्यांहीं । जी नासिकाश्रुतिविहीन अशोभना ही ! ॥
झाले तदा शकुन दुष्ट अनेक त्यांतें । ना लक्ष देति, मरणा वश जाहले ते !
ते गर्जती सकल तर्जुनि एकमेकीं । उड्डाणही नभिं करीति तयांवरी कीं ॥
झुंझार त्यांत म्हणती अति हर्षुनीयां । "बांधून आणुं उभयां क्षणि बंधुंना या
मारूनि त्यां धरुं बळें ललनेसि आम्ही" । या गर्जती नभ भरे धुळि आणि धूमीं
श्रीराम तें निरखुनी अनुजास सांगे । " जा जानकीस गिरिकंदरिं नेइं वेगें!
हें देख भीषण निशाचरसैन्य आलें । तूं राहिं सावध ! " असें रघुराय बोले ॥
सीतेसमेत मग लक्ष्मण चापबाण । घेऊन जाय, कळतां प्रभुहेतु तूर्ण ॥२०॥
श्रीरामचंद्र अरिसैन्य बघूनि येत । हांसोनि सज्ज करि कार्मुक शीघ्रहस्त ॥
तैं शोभले सहजसुंदर नीलराम ॥ । द्युतप्रभाधर मनोज्ञ घनाभिराम ॥ २१ ॥

कठिन शरासन चढवुनि बांधित शि रीं जटांचा जूट सबे ।
मरकतशैलीं कोटिदामिनी चमकति, कु गद्वय वरि जें ॥
कटिसि ठाकले निषंग भुजवरिं चापशरा । सज्ज असे ।
वाटे निरखी मृगपति तो प्रभु गजराजघटां आवेशें ! ॥ २२ ॥

" धरा धरा ! " क्रोशत वीरराक्षस । आले तयांचे वरि शीघ्रसाहस ॥
एकाकिशा पाहुनि बालभास्करा । घेरूं जसे पाहति दैत्य सत्वरां !

तो सब सैन्य हृदिं चकचि राक्षसांचें । पाहोनि तैं प्रमुखि बाण न सोडि साचें
तो बोलवोनि सचिवां खरदूषणांनीं । सांगीतलें निजमनोगत हें स्ववाणीं २४

" हे राजपुत्र नरभूषण होति खास ! । आम्ही सुरासुरनरां मुनिनाग यांस ॥
जिंकोयलें, बधितलें, वधिलें अनन्तां । सौंदर्य यांसम कधींच न मोहि चित्तां ॥
सान्याहि जन्मि असलें अतिरम्यरूर । ना देखिलें अजिवरीं कधिंही अमूप ॥
केली इहीं जरि कुरूप मम स्वसा ती । ना ह्या वधाहि गमती मनिं चारुमूर्ति ॥
देवोत सोडुनि अम्हांकरिं आत्मनारी । यांनीं तिला लपविलें इतुक्यांत दूरी
जावोत हे उभयबंधुहि आत्मगेहा । त्यांतें त्वरेंचि कळवूनि निरोप या हा."
रामासि सर्व क्षणिं ते कळवीति दूत । ऐकोनि राम वदले हंसुनी सुयुक्त ॥
"हो क्षात्रनीति अमुची मृगया वनींची । दुष्टां तुम्हां मृगगणां वधुं शोधुनीचि ॥
शत्रू बलाढ्य बघुनीहि न भीति आम्हां । काळासवेंहि लढुं वेळि बलें असीमा ॥
आहों मनुष्य तरि दैत्यकुलांसि नाशूं । रक्षूं मुनींसि, सगळे खळ आम्हि शासूं ॥
तुम्हां नसेल बल तों, परता गृहातें । होती रणा विमुख, संहरुं आम्हि ना तें ॥
युद्धामधें कपट ही तुमची भलाई । शत्रूवरी सदयता नच शौर्य होई "॥१०॥

सांगती जाउनी तेव्हां सारे ते खरदूषणां ।
ऐकतांक्षणिं तें, झाला कोपानें ाप तन्मना ॥ ११ ॥

क्रुद्ध होउनी म्हणति " धीर घ्या राक्षसभट हो ! निजहृदयीं " ।
घेति चापशर तोमरशक्ती परिघ परशु असि शूल तयीं ॥
रामें निजधनु टणत्कारिलें आधिं भयंकर कटु निनदें ।
झाले राक्षस बधिर व्याकुल भान लव न तो ध्वनि उरुं दे ! ॥ १२ ॥
होती पुन्हां सावध ते निशाचर । बलिष्ठ शत्रू समजे तदंतर ॥
शस्त्रास्त्र ते त्यावरि सर्व वर्षती । नानाप्रकारीं निज आयुधांप्रति ॥१३॥
शस्त्रें परी खंडिलिं सर्व राघवें । तिळांपरी खंड करूनियां जवें ॥
आकर्ण ओढूनि शरासनाप्रति । त्यांचेवरी सोडित बाणसंहति ॥१४॥
फुंकरत सर्पसे चालले बाण ते । तीक्ष्ण अग्रें जयां राम हो हाणिते ॥
युद्धिं कोपे बहू रामराय स्वतां । राक्षसांचे गणीं भीतिनें निर्भिता ॥१५॥
पाहुनी बाण ते राघवाचे खर । टाकिलें भीतिनें राक्षसीं संगर ॥
तेधवां क्रुद्ध ते भाउ तीनी तयां । बोलती "जो रणा टाकुनी जाइ या ॥१६॥
त्यास आम्ही वधूं, दाखवूं ना दया !" सर्व ते वाहती मृत्युच्या निश्चया ॥
आयुधें घेउनी तें अनेकें करीं । हाणुं पाहाति ते राघवाचे वरी ॥१७॥
कोपल्या शत्रुला त्यापरी पाहुनी । चापिं जोडी शरां राम वीराग्रणि ॥
बाणवृष्टि प्रभू तें करी त्यांवरी । कापिले, खंडिले शस्त्र ते संगरीं॥१८॥

वक्षि शीर्षीं तसें पादकरबाहुंनीं । पूर्ण झाली तिथें संगरीं मेदिनी ॥
लागती बाण जैं विव्हळत त्या क्षणें । पडत भूमीतलीं शैलसे रक्ष तें॥४०॥
वीर ते खंडिले जरिहि शस्त्रें किती । उठुनि भूतें परी त्यांतुनी नाचती ॥
व्योमिंही उडति किति दंड, मुंडें तदा । मौलिविण धांवती तैं धडें धडधडा ! ॥
ओरडत धांवती काक गृध्रादि ते । कर्णकटुभीषणें तीं शृगालीं रुतें ॥
वर्णणें केवि तें दृश्य जें भीषण । राघवें मारिला स-खर जैं दूषण! ॥४१॥

क्रंदति जंबुक भूतप्रेतें तेवि पिशाचें रक्त पिती ।
वेताळहि ते वीर कपालीं तालीं जोगिणि नृत्यमती ॥
रघुवीराच्या चंडशरांनीं खंडित अवयव वीरांचे ।
पडति चहुंकडे तरिहि लढति,किति 'धर! धर!' भयकर रव वाचें ! ॥
धरुनि आंतडीं गृध्र उडति तैं भुजा घेउनी भूतगण ।
रण-पुरवासी जणों बालकें खेळति झेंडे उभवून ! ॥
मेले, पडले, विदीर्ण झाले वीर व्याकुल रणिं कण्हती ।
बघुनि अशां त्यां, त्रिशिरा दूषण खर हे 'आपण लढुं' म्हणती ॥४३॥
शक्ति-तोमरा, परशू शूला, खड्गशरांहीं एकसरीं ।
श्रीरघुवीरीं अगणित राक्षस हाणिति घेवुनि कोपभरीं ॥
प्रभु क्षणांतचि वारुनि सार्‍यां गर्जुनि सोडी त्यांजवरीं ।
राक्षसनायकिं दश दश सकलीं बाण चंडकृति शीघ्र उरीं ! ॥४४॥
पडति महीवरिं उठति पुन्हां परि लढति झटुनि अति मायावी ।
सहस्र चौदा ते, प्रभु एक, प्रेमें अमरां हें भिववी ॥
सुरमुनि-भीती मायानाथ प्रभु तैं घालवि कुतुककृती ।
परस्परांतें राम गणुनियां राक्षस हाणिति, मृत होती ! ॥४५॥

ते 'राम राम !' म्हणतां त्यजिती तनूतें । निर्वाण थोर पदवी मिळवीति कीं ते ! ॥
युक्ती अशी करुनियां प्रभु तो दयार्द्र । मारीत राक्षस समग्रहि रामचंद्र ॥४६॥
तेव्हां प्रहर्षभरिं वर्षुनि पुष्पराशि । सारेहि देव भरती नभ वाद्यघोषीं ॥
रामस्तुती करुनि ते फिरुनी फिरूनी । जाती निघूनि सजुनी अपुल्या विमानीं ! ॥

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे कलिकलुषविध्वंसने अरण्यकाण्डे श्रीरामखरदूषणयुद्धवर्णनं नाम नवमस्तरङ्गः ॥

तरंग १० वा

जेव्हां रणीं रघुपती अरि सर्व जिंकी । झाले मुनी सुरनरादि अभीति ते कीं ॥
सौमित्रि येइ तंव घेउनि जानकीतें । वंदी प्रभूंसि चरणांबुजिं हृष्ट चित्तें ॥१॥
सीता पहात मृदुलांग सुनील मूर्ति । प्रेमें तिचे नयन पावति नैव तृप्ति ! ॥
श्रीराम होत मग पंचवटी-निवासी । देवां-मुनींसि अति तैं सुखराशि वर्षी ! ॥२॥
झाले बघून खरदूषण नष्ट साच । ये रावणानिकट शूर्पणखा क्षणींच ॥
क्रोधें तयास वदली वचनें कठोरें । "देशादि-कोष निज नाठवसी कसा रे ? ॥३॥
रात्रंदिनीं पिउनि मद्यचि घोरतोस । नाहींच शुद्धि तुज, शत्रु चढे शिरास ! ॥
ना राज्य नीतिविन, धर्मविना धनें न । ईशार्पणाविण नसे शुभकर्म जाण ! ॥
विद्या तरी कशि विवेकविना सजावी । लब्धा तरी भ्रमचि ती म्हणुनी गणावी ॥
दुःसंगिं नासति यती, नृपती कुमंत्रें । गर्वें सुधी स्खलत लाजहि पानमात्रें ॥५॥
प्रीती विरे प्रणयहीन, गुणी मदानें । हे नीति ऐकिंकि तुझ्या कधिं कां न कानें? ॥
न व्याधि, शत्रु अघ अग्नि अही प्रभूही । मानोनि अल्प म्हणुनी अवमानिं पाहीं!"
ऐसें परोपरिं वदून तया त्वेषानें । आरंभिलें रुदन फारचि रोषमानें ॥
आक्रंदुनी बहु असें, पडली सभेंत । अत्याकुला वदत होउनि आर्तचित्त ! ॥७॥
"तूं एवढा दशमुखा ! असतां जिवंत । व्हावी कशी करुण मत्स्थिति हे समस्त?" ॥
तों त्या सभेंतिल किती, झणिं तैं उठूनी । तीतें धरोनि उठवीति भलें करांनीं ॥
ते सांत्विती तिजसि, रावणही विचारी । "हे कान नाक तव जाय कशा प्रकारीं?" ॥
सांगे तदा सरुष शूर्पणखा तयातें । जें शल्यसेंच तिजला दुखवीत होतें-॥९॥
"दशरथनृपतीचे पुत्र साकेतवासी । नरहरि मृगयेतें पातले काननासी ॥
करणि सकळ त्यांची आलि मातें कळून । करितिल धरणीच्या राक्षसां नाश पूर्ण ॥
हे रावणा ! विचरती मुनि काननांत । ज्यांच्या बळें करुनि निर्भय हृष्टचित्त ॥
ते बाळ हे दिसति काळसमान मूर्ति । अत्यंत शूरवर धीर धनुष्यकीर्ति ॥११॥
शक्तिप्रतापिं न तुला मुळिं बंधुयुग्मा । दुष्टा वधीति, सुख देति सुरां न सीमा ॥
विश्राम जी मुनिमनाप्रति रामराय । जो सुंदरीसह असे अतिरम्यकाय ॥१२॥
सौंदर्य कोटिरतिंहून तिचें अतीव । ओंवाळिजेतिल तिच्यावरुनीच सर्व ! ॥
नासाश्रुती तदनुजें मम कापियेली । मी हो तुझी बहिण, यास्तव हास्यकेली ! ॥
युद्धा तयास खरदूषण बोलवीती । सैन्यांसमेत सकलां, क्षणि ते वधीती ! " ॥
मारीयले त्रिशिर ते खरदूषणादि । ऐकोनि रावण जळे हृदिं स्वबुद्धि ॥१४॥

काढी तिची तें समजूत रावण । बहुप्रकारीं स्वबल प्रशंसुन ॥
अत्यंत चिंतेत रिघे स्वमंदिरीं। रात्रीं न निद्रा, लव सौख्य अंतरीं! ॥१५॥
"अनुचर मम होते शक्तिचे पूर्ण धाम।सुरनरखगनागीं देत्यि वा ते असीम॥
खर बलि मजऐसा, दूषणीं शक्ति तीच । कवण वधुं शके त्यां, ईश्वरावीण साच?
झाला असेल अवतीर्ण जर प्रभू तो । भूभार जो हरुनि देवहिता करीतो ॥
जाऊनि त्यासिं हठिं मी करणार वैर । प्राणान्त हो प्रभुशरें; भव होय पार!
होतें न सद्भजन तामसि मत्तनूनें । वाक्कायाचित्तिं मज निश्चय हाच मानें ॥
कीं राजपुत्रयुग तें नररूपिं कोण । जिंकूनि त्यासि रणिं तल्लने हरीन!"
चिंतूनि हें रथिं चढे क्षणिं एक, येत । मारीच सिंधुतटिं वास करीत जेथ ॥
तों रामही करितसे इकडेहि एक । वैचित्र्ययुक्ति गिरिचे! कुतुकेंचि ऐक! ॥
गेला लक्ष्मण जेव्हां आणाया कंद मूल फल विपिनीं ॥
जनकसुतेतें बोले राघव सुखकंद सकृप मनिं हसुनी ॥ २० ॥
"ऐकें प्रिये! रुचिरशील शुभव्रते गे! लीलाविशेष नरयोग्य करीन अंगें ॥
तूं राहिं तोंवरि वसूनि कृशानुमाजीं । मी ओंवरीं करिन नष्ट निशाचरें जीं" ॥
जेव्हां तिला समजवी प्रभु रामराय । चिंतूनि भर्तृपद, ती अनलांत जाय!॥
राखूनि ठेवि निज ती प्रतिबिंब मात्र । हो तेंच शील विनयादिक रूपगात्र!॥
जाणें न मर्म परि लक्ष्मण हें जराही। जें आचरीत भगवान् विभु तेथ कांहीं!॥
मारीचसन्निध निघे तंव राक्षसेश । स्वार्थी सुनीच नमि त्याप्रति नम्रशीर्ष!॥
नम्रत्व अंगिं धरि नीच कुणी यदा कीं। लोटावयासिच दुज्याप्रति तें सुदुःखीं!॥
जैसें धनुष्य अहि, अंकुश वा बिडाल। वांकोनियांच इतरां करि दुःखजाल!॥
दुष्टोक्ति हो प्रिय तरी भयकारिणीच । जैसी अकालकुसुमोद्गति दुष्ट साच" ॥
मारीच पूजि अति आदरपूर्ण त्यास।"कां पातलां?" पुसत "आज असे विशेष?
तुम्हां करी कवण हेतु असे सचिंत । हे पातलां त्वरित कां प्रभु तुम्हि येथ?"
तेव्हां दशानन तयाप्रति सर्व सांगे । चित्तीं तदीय अभिमानविशेष वाढे ॥
[मारीच पूजुनि पुसे अति आदरेंसीं। "कां आज राक्षसपते! मज पातलासी?"॥
तेव्हां अभागि कथि रावण त्यास सारें। चित्तांत त्यास अति गर्व तसा भरारे॥]
सांगे "असें कपट तूं मृगरूपिं साधीं। जेणें नृपालयुवती गृहिं आणुं आधीं!"
मारीच सांगत "दशानन! नीट जाण।होती चराचर-विभू नरता धरून २७
त्यांशीं नको करूं रे! कधिं काळिं वैर। त्यांचे करींच बरवें मरणें समग्र।

गेले कुमार मुनिच्या मखरक्षणाला । रामें फळाविण मला शर हाणिपेला ॥
मी फेंकिलों क्षणिं शतावधि योजनें कीं। त्याशीं विरोध करणें हित ना, विलोकीं
हे कीटभृंग म्हणती तशि मन्मती हे । त्या दोन बंधुंचिच मी चहुंभागिं पाहें
आहेत ते नर तरी अति शूर होती । शत्रुत्व त्यां करुनि नाहिं निभाव अंतीं
जे ताटकेसि वधितीच सुबाहुतेंही । खंडीयलें हरशरासन यत्कराही ॥ १० ॥
जे दूषण-त्रिशिर तेविं खरा वधीती । ते केविं मानुं नर केवळ, वीर्यमूर्ति ?
तूं जाउनी निज विचार करीं कुळाचा । कल्याणकारि घर मार्ग गृहाधि साचा''
ऐकोन तें वचन रावण रुष्ट होय । देई शिव्या बहुत त्याप्रति ज्या अदेय ॥
बोले " मला करिशि तूं गुरुसाच बोध। आहे जगीं कवण योग्य मला सुयोध?"
मारीच तैं निजहृदीं करि हा विचार । ' नोहे नवांप्रति विरोध सुखप्रकार–
मर्मज्ञ, शस्त्रि, शठ, वैद्य, धनी, नृपाशीं । बंदी, कवीश, निज सूपकरादिपाशीं'
दोहीं प्रकारिं बघुनी मरणा स्वकीया । जाऊं म्हणे शरण तो रघुनाथपायां ! ॥
यातें अमान्य करतां मज हाच मारी । मारो न कां मज शरें प्रभु रावणारि!'
चिंतूनि हें क्षणिच रावणसंगिं जाय । मारीच रामपदिं ठेवुनि चित्तकाय
ना रावणासि परि जाणवि तो स्वभक्ति । 'देखेन आज करुणानिधि राममूर्ति

पाहुनि त्या निज सौख्यसागरा नयनसार्थका करिन सुखें ।
सीतालक्ष्मणसमेत रामा स्मरिन दयाळा मी हरिखें ॥
क्रोधहि ज्याचा मोक्षद हो जो भक्तिस वश जगिं सर्वपरीं ।
निजशर जोडुनि मजवधि वधो तो अपुल्या करिं सुखराशि हरि॥१६॥

घेऊनि चापवर सायक आत्महस्तीं । धावेल पाठिं मज राघव रम्यमूर्ति ॥
मी त्या बघेन फिरुनी फिरुनी किती तें!॥माझ्यासमान नच धन्यपणा कुणातें!'

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे कालिकलुषविध्वंसने अरण्यकांडे
रावणमारीचवार्ता-श्रीरामसमीपगमनं नाम दशमस्तरङ्गः ॥

तरंग ११ वा

मारीच जाय वनिं रावणसंगिं तूर्ण । मायामृगत्व अतिचारु असें धरून ॥
कायास वर्ण्य सुषमा कपटी मृगाची । सौवर्ण रत्नमणि यांहिं मनोज्ञ साची ॥

सीता बघे परमसुंदर कांचनांगा । तेजस्वि चित्तहरणा हरिणा सुरंगा ॥
रामा वदे, “ रघुवरा ! दयिता कृपाला । याचें मनोज्ञ मज चर्म गमे मनाला
सत्यप्रतिज्ञ तुम्हि या हरिणा वधा जी॥त्याचें सुचर्म मज द्या !” वदते प्रिया जी
जाणोनि सर्व, रघुनाथ उठे सहर्ष । सिद्धीस नेउं बघतो सुरकाज ईश ॥३ ॥
श्रीराम देखुनि मृगा, क्षणिं सिद्ध होत । घेऊनि चापशर सज्ज करांबुजांत ॥
तो लक्ष्मणा समजवी “ वनिं संचरीती दुष्टात्म राक्षस, रहा अति दक्षवृत्त ४
सीतेसि रक्षण करीं प्रियलक्ष्मणा रे । ठेवोनि सावधपणा सगळ्या प्रकारें ! ”
पाहोनियां प्रभुसि, दूर पळे कुरंग । मागूनि राघव पळे शरचापसंग ॥ ५ ॥
ज्या ‘नेति नेति’ म्हणती सगळ्या श्रुतीही।जो ध्यानिंही शिवमनाप्रति गम्य नाहीं
मायामृगा बघुनि धांवत त्याजपाठीं । तो रामचंद्र विभु ही किति गोष्ट मोठी !
केव्हां गमे निकट तो मृग, दूर केव्हां।केव्हां दिसे प्रकट, गुप्तहि होत केव्हां ॥
ऐशापरीं दिसत, लोपत, भूलवीत । नेलें प्रभूप्रतिहि दूर तयें वनांत ! ॥ ७॥
श्रीराम तीक्ष्ण शर त्यावरि एक सोडी । जो त्यास घोर रविं शोक करीत पाडी
तो ‘लक्ष्मणा!’ म्हणुनि आधिं विरावि नाम।चित्तामधें स्मरतसे मग ‘राम राम!’
प्राणां त्यजी प्रकटुनी निज सत्यरूप । चित्तीं स्मरूनि रघुनाथपदा अमूप ॥
श्रीराम जाणुनि तदीय रती हृदींची। योग्या सुदुर्लभ अशी गति त्यासि देचि !॥

तदा देवांनींही वरुनि सुमवृष्टी वितरुनी ।
प्रभूची सत्कीर्ति स्तविलि गुणमूर्ती सुवचनीं ॥
‘दिलें औदार्यानें स्वपद असुरातें प्रभुवरें ।
सुदीनांचा बंधू रघुतिलक वंदूं किति बरें ! ’ ॥ १०॥
दुष्टासि वधुनी ऐसें रघुराय फिरे क्षणीं ॥
चाप बाण करीं साजे भाते कटिसि लावुनी ॥ ११ ॥
आयके जानकी जेव्हां आर्तस्वर तसा वनीं
बोलली लक्ष्मणातें ती अतीव भिउनी मनीं ॥ १२ ॥
“ वेगेंचि नीघ साह्यार्थ संकटीं बंधु रे ! अति ॥ ”
बोले लक्ष्मण हांसोनी “ माते ! परिस मन्मति ॥ १३ ॥
ज्याच्या भृकुटिलीलेनें सृष्टीचा लय होतसे ॥
संकटामाजिं तो कैसा पडावा तरि मानसें ? ” ॥ १४ ॥

मर्मभेदक वाक्यांनीं भेदी जैं जानकी तया ॥
चळे लक्ष्मणधी दोला हरिसत्तेकरूनियां ! ॥ १५ ॥
सर्व कांहीं सोंपवोनी वनदिग्देवताकरीं ॥
जाय तो जिकडे राम रावणद्विपकेसरी ॥ १६ ॥

पाहूनि शून्य तंव आश्रम रावणानें । केला प्रवेश तनुवेष यतिप्रमाणें ॥
ज्याच्या भयें हृदयिं धाक सुरासुरांसी। रात्रीं न झोंप, दिनिं अन्नविना उपाशी
तो येत तेथ दशशीर्ष विशेषभीत । कुत्र्यापरी लपत धाइंत, दुष्टचित्त ! ॥
जाती असे कुपथिं जे गरुडा ! खगेशा !।त्यांना न तेज लव बुद्धिहि राहि शेषा
नानाविधा कथुनि पाहि कथादि सीते । तो राजनीति कथि हृद्गति भीतिही ते
सीता म्हणे "यतिपरी दिसतोस योगी । हें दुष्टभाषण कसें करिशी अभागी?"
तेव्हां करी प्रकट रावण आत्मरूप । झाली मनीं सभय तो कळतांच पाप !
सीता वदे धरुनि धैर्य मनांत थोर । "थांबें खला ! परतण्या प्रभु ना उशीर
सिंहीसि वांछि जणुं नीच ससा स्वसंगीं।तूं होशि मृत्युवश राक्षसनाथ! वेगीं"
ऐकोनियां वचन ते दशशीर्ष लाजे । चित्तांत तपद नमी सुखवी मना जें ॥

क्रोधेंचि तेव्हां धरि तीस रावण । रथामधें बैसवि तीस घेउन ॥
नभःपथें तो तिज घेउनी निघे । रथें न जाई मनिं रामभीति घे ! २२

"हे राघवा ! प्रियतमा ! जगदेकवीरा ! । कैशी दया विसरला ? प्रभु रामचंद्रा !
माझ्या करीं कवण हो! अपराध झाला ?।नाशूनि दुःख सुख द्या शरणागताला,
हे भानुवंशकमलाप्रति भानुराया ! । हे लक्ष्मणा ! लवहि दोष तुझा नसे या ॥
रागावलें तुजवरीं फल हें तयाचें!" । सीता विलाप करि यापरि दीन वाचें ॥
"होती कृपा मजवरी प्रभुच्या हृदन्तीं।स्नेहासि मीच मुकल्यें तुमच्या कशी ती!?
सांगेल कोण विभुतें मम आपदा ही?।यज्ञीय भाग खळ रासभ खाउं पाही!"
ऐकोनियां जनकजामुखिंचा विलाप । झाला चराचरिं अतीवचि शोकताप !
तों गृध्रराज परिसे करुणार्तवाणी । चित्तांत ओळखित तो रघुनाथपत्नी २६
ने दुष्ट राक्षस तिला पळवून काय ? कीं म्लेच्छहस्तिं पडली कपिलाच गाय ॥
"सीते ! मुली ! भय नकोच धरूं मुळींही।मी राक्षसास वधितों लवलाहिं पाहीं!"
धांवे जटायु खग यापरि देत धीर । कीं क्रुद्ध वज्र करितें गिरितें प्रहार !
बोले "खला ! नच कसा वद थांबसी रे।निःशंक जाशि मज नेणशि काकरें"

ऐशा तया जणुं कृतान्तसमा विलोकी । चित्तांत रावण करी अनुमान हें कीं–
"मैनाक हाचि अथवा खगराज होय।तो तत्प्रभूहि बळ जाणतसे मदीय!" २१
जाणोनि गृध्रपति वृद्ध असा जटायू।"मत्पाणितीर्थि निज नेइल नाशि आयू!"
हें रावणोक्त परिसोनि जटायु धावे । क्रोधें वदे "दशमुखा! हित ऐक भावें
सीतेसि सोडुनि भलेपणिं जा गृहासी । नाहीं तरी तव गती टळणार कैशी !॥
अत्युग्र घोर रघुनायककोप वह्नि । जाशील तूं सकुल टोळ तयीं जळूनी ! !"
देतां न उत्तर दशानन युद्ध मांडी । तों गृध्र त्याप्रति रुषें नखि चोंचि खंडी
त्यातें धरूनि कचिं भूवरिं शीघ्र पाडी । सीतेसि रावण-रथांतुनि दूर काढी ॥
येई फिरूनी, करि रावणदेहिं घाय । झाला दशानन विमूर्च्छित दीणकाय ॥
क्रोधें उठूनि फिरुनी दशकंधरानें । हाणीयलें खगवरा अपुल्या कृपाणें ॥२२
तोडीयले दशमुखें झगिं पंख दोनी । तेणें जटायु पडला तळिं आदळोनी ! ॥
चित्तीं स्मरे रघुपतीस अनन्य भावें । शौर्यें लढूनि शुभकीर्तिसि गृध्र पावे!॥
घालोनि ने रथिं पुन्हां जनकात्मजेसी ।आकाशमार्गिं रथ हांकि दशास्य रोषीं
आतां विलाप करि आर्त अतीव सीता।कीं व्याधपाशिं पडली हरिणीच भीता!
देखोनियां गिरिवरी बसल्या कपींना । ती खालिं टाकि पट 'राम' म्हणोनि दीना
सीतेसि घेउनि असें दशवक्त्र जाय । ठेवी अशोकवनिं तीस तसें असाह्य॥
तो प्रीति भीति तिज दावुनि फार भागे । ठेवी अशोकवनिं तो तिज एक जागे
जैसे सुवर्णमृग-पाठिंसि राम जाती । ती मूर्ति चित्तिं, मुखिं राघवनाम घे ती!

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे कलिकलुषविध्वंसने अरण्यकाण्डे
जानकीहरणवर्णनं नामैकादशस्तरङ्गः ॥

तरंग १२ वा

जेव्हां वधे रघुपती अनुआस येतां । दावीत मानसिं विशेषाचि दुःखचिंता ॥
बोले " कसा तिजसि ठेवुनि एकटीतें।आज्ञेविरुद्ध मम लक्ष्मण! येसि कां तें!
संचारती वनिं निशाचरसंघ मत्त । सीता नसेचि, गमतें मज, आश्रमांत!"
तेव्हां धरूनि पदपंकज राघवाचें। बद्धांजली वदत लक्ष्मण दीनवाचें ॥ २ ॥
"हे नाथ! दोष मम यांत मुळीं न कांहीं।मी पातलों प्रभुवरा! अनिवार्यता ही!"
तैं जाय राघव निजाश्रम पाहण्यासी । गोदावरीतटिं जयास्थलिं ते निवासी ३

पाहोनि आश्रम दिसे नच तेथ सीता । तेव्हां रघूत्तम अतीवचि आर्तचित्ता ॥
सामान्य लोकचरिता प्रभु दावि ऐसें । शोकें विलाप करि दीन नितान्त ऐसे

“ हा सीते ! हे जानकि ! गुणखनि सौंदर्यराशि ! मम भार्ये ! ॥
शीलव्रतनियमघने ! पुण्यतमे ! लोपलीस कां आर्ये ! ” ॥ ५ ॥
बरि लक्ष्मण समजावी राममनातें बहुप्रकारांनीं ॥
सीतावृत्त विचारी राम लतावृक्षपल्लवां रानीं ! ॥ ६ ॥
“ सांगा खगमृगगण हो ! अलिवृंदांनो ! तुम्हीं बघितली का ? ॥
सीता मृगनयना मम रमणी सुकुमार चारु शशिलेखा ! ॥७॥
हे शुक-कपोत-खंजन ! मृग-मीन- भ्रमरनिकर पिक मधुर ! ॥
सौदामिनि ! कुंदकली शारदशशि नागिणी कमल रुचिर ! ॥ ८ ॥
हे हंस वरुणपाशा ! स्मरधनु गज सिंह हो ! तुम्हां मिळे ॥
स्वस्तुति ऐकायातें कीं येथें जानकी न हें कळतें ! ॥ ९ ॥
श्रीफल ! कांचन कदली ! हर्ष तुम्हां फार वाटतो आतां ॥
शंका लेश न उरली कीं तुम्हां लाजवी न अजि सीता ! ॥ १० ॥

गे ! ऐक जानकि ! तुझ्याविण यां समस्तां। झाला प्रहर्ष, जणुं राज्यचि येत हस्तां ॥
त्यांचा कसा सहतसे तुज हर्ष आज?। वेगें प्रिये ! कशि न दर्शविसी मुखाब्ज ? ”
ऐशापरी प्रभु विलाप करूनि शोधी । जाणों महाविरहिं तो रतिकामबुद्धि ॥
जो पूर्णकाम सुखराशि अनाद्यनन्त । तो मानवी चरित दर्शवि बुद्धिमन्त ॥१२॥
त्या गृध्रराज दिसला पुढतीं जटायु । जो रामचंद्रपदचिंतनिं नेत आयु ॥
त्या स्पर्शि राम शिरिं लावुनि हस्तकंज । जो शोकनाशन विभू करुणाधिराज ॥

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे कलिकलुषविध्वंसने अरण्यकाण्डे श्रीरामविरहवर्णनं नाम द्वादशस्तरङ्गः ॥

तरंग १३ वा

सौंदर्यधाम बघुनी मुख राघवाचें । होई जटायु गतदुःख अतीव साचें !
पीडा नुरेचि कसलीहि तया शरीरीं । धैर्या धरूनि वदला वच या प्रकारीं ॥१॥
“ हे नाथ राम ! भवभीति विलोपवीशी। माझी दशा करि दशानन आज ऐशी ॥
दुष्टेंचि त्या हरियलें तव जानकीला । तो होय दक्षिणदिशेप्रति शीघ्र गेला ! ॥

होती विलाप करती कुररीपरी ती। हे प्राण ठेविं मम मी तव दर्शनार्थी ॥
आतां निर्धूं बघति हे करुणानिधाना"।त्यातें वदे रघुपती "त्यजि ना तयांना!"
तैं हांसुनी वदत त्यासि जटायु "रामा। ये नाम ज्यांसि मरतां, तव सौख्यधामा ॥
हो कां जरी अधम तो तरि मुक्ति त्यासी।लाभे असे वदतसे श्रुतिशास्त्रराशि ॥
तो तूं मला नयनगोचर आज होतां। राखूं कशास मम जीव कृतार्थ आतां!"॥
अश्रू भरूनि नयनीं रघुराय बोले। "बा! त्वां स्वकर्मगतिचें फल मेळवीलें ॥
ज्याचें मनीं परहितास्तव थोर चिंता। त्याला नसेचि जगिं दुर्लभ कांहिं ताता!॥
त्यागून देह अजि जा मम सौख्यधामा। मी पूरवूं कवण रे! तव अन्य कामा?॥
स्वर्गीं पित्यास मम तूं कळवूं नकोस। श्रीजानकीहरण हें अजि या क्षणास!॥
जैं राम मी सकुल रावण संहरीन। येऊन तो कथिल सर्वचि वृत्त तूर्ण!" ॥७॥
तो गृध्रदेह विसृजी–हरिरूप होई। हो दिव्यभूषणविभूषित दिव्यदेहीं ॥
शोभे चतुर्भुज मनोहर पीतवासा। सुश्याम तो स्तवि सगद्गद सादरु ऐसा ॥८॥

" जय जय रामा! निरुपमरूपा निर्गुणसगुणां सृजक गुणां।
दशास्यबाहुच्या खंडनकर्त्या चंडशरीं, क्षितिनंदना! ॥
घनश्यामतनु सरोजवदना कमलदलायतलोचना!।
नमीं सतत मी कृपालु राघव विशालभुज भवमोचना! ॥९॥

अमेयबल तूं अनादि ईश्वर एक अगोचर अव्यक्त।
ज्ञानघना! निर्द्वन्द्व अतीन्द्रिय जो गोविन्द क्षिति धरित ॥
'राम' मंत्र जे संतत जपती संत असे तू सुखि करिशी।
निष्कामप्रिय त्या तुज मी नमि रामा! खलदल तूं हरिशी ॥१०॥

ब्रह्म व्यापक विरज निरंजन निगमें अज ज्या वर्णियलें।
ध्यानें ज्ञानें विरक्तियोगें मुनिजनिं ज्यातें मेळविलें ॥
शोभासागर तो करुणाकर मोहितसे जो चराचरा।
प्रकट होउनी तो विभु शोभवुं मम हृत्कमलीं भृंग खरा! ॥११॥

अगम्य सुगमहि निर्मल सुमती शांत सुशीतल सम असम।
योगि जयातें यत्नें बघती इंद्रियदमनें सुख परम ॥
स्वभक्तवश जो विश्वाधीश्वर रमानिवास प्रभु राम।
पावनकीर्ती भवहरमूर्ती करो हृदय मम निजधाम!!" ॥१२॥

श्रीरामभक्ति अचला वर मागुनीयां । गेला जटायु हरिधामि सुखें वसाया ॥
त्याची क्रिया करि यथोचित आत्महस्तें । श्रीरामराय अति आदरपूर्ण चित्तें ॥१३॥
॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे कलिकलुषविध्वंसने अरण्यकाण्डे
गृध्रराजमोक्षवर्णनं नाम त्रयोदशस्तरङ्गः ॥

तरंग १४ वा

श्रीराम कोमलमना करुणानिवास । दीनीं अहेतुक दयाळु उदार ईश ॥
तो नीच गृध्र खग आमिषभोगि ऐसा । योग्यांसि योग्य गति त्यासि दिली सुवासा ॥१॥
ऐकें उमे ! जन किती तरि हे अभागी । होती त्यजूनि हरितें विषयानुरागी ॥
ते दोन बंधु मग धुंडित जातिसीते ! । त्या काननीं सकल शोधुनियां पहाते ॥२॥
कातार ते तरुलतादिकिं दाट घोर । पक्षी, मृगें बहु जिथें गज, सिंह उग्र ॥
मार्गी कबंध वधिला प्रभुरामरायें । तो आपला कथित शाप कदा कसा ये ॥३॥
"दुर्वास देति मजला बहु उग्र शाप । देखोनि पुण्यपद लोपत सर्व पाप ! ।
बोले तयास विभु "सांगत मी तुला हें । जो ब्रह्मवैरि मज तो प्रिय नैव, पाहें ॥४॥
निर्दंभ सेवन करी हृदि विप्रपादा । देहें मनें वचनिं त्या स्तविती विशुद्धा ॥
ब्रह्मादि शंभु वश त्याप्रति सर्व भावें । यासाठिं भूसुर विनम्रपणे नमावे ॥५॥
हो कां जरी परुषवाक्शरिं ताडणार । वा शापणारहि असो द्विज कोणि उग्र ॥
त्यातेंहि पूज्य म्हणुनि स्तवितात संत । गंधर्व ! रे समज तूं अपुल्या मनांत ॥६॥
हो विप्र शीलगुणहीन तरीहि मान्य । ना शूद्र पूज्य जरि सद्गुणराशि धन्य"
त्या आत्मधर्म कथि राम कृपानिधान । सद्भक्ति पाहुनि तयीं प्रभु हो प्रसन्न ॥
वंदोनि रामपदपद्मयुगा सभक्ति । स्वर्गी रिघे मिळवुनी गति आपुली ती ॥
अर्पोनि त्या स्वपद, राम उदार येत । ते आश्रमीं शबरिच्या अतिहृष्टचित्त ॥८॥
झाली प्रहृष्ट शबरी गृहिं राम येतां । आशी दिल्या मुनिवरें मुदिं येति चित्ता ॥
आजानुबाहु कमलाक्ष बघे स्वदृष्टीं । शीर्षासि भूषवि जटा, वनमाळ कंठीं ॥९॥
सुश्यामगौर अतिसुंदर दोन बंधु । वंदीतसे शबरि केवळ सौख्यसिंधू ॥
पादांबुजा कवळि, शब्द मुखीं फुटे न । माथा लवूनि नमि त्या किति भक्तिपूर्ण ॥
प्रक्षाळि राघवपदां जळ आणुनी ती । त्या आसनीं बसवि सुंदर भक्तिमूर्ती ॥
ती कंदमूलफळ सद्रस देइ त्यासी । प्रेमें प्रशंसित किती प्रभु घांस भक्षी ॥११॥

बोलोनि पाहि शबरी उभि राहि भावें । श्रीराघवापुढतिं ती हृदिं हर्ष पावे ॥
बोले "विभो ! स्तवुं तुला कवण्यापरीं रे ! । मी नीचजाति जडबुद्धि अशा प्रकारें ॥
ही होय मी अधम, त्यांतुनि हीन नारी । मी मंदबुद्धि, अघराशि मदीय भारी ! ॥
तीतें वदे रघुपती "परिसें मदुक्ती । मातें करीत वश भक्तिच एकली ती ॥१३॥
ना जातपात कुलधर्म महत्त्व मान । न द्रव्य शक्ति विभवादि, गुणाढ्यता न ॥
चातुर्य सर्वपरिंचेहि न शोभणारें । हो भक्तिहीन जर तन्मन कीं विचारें ! ॥१४॥
पाण्याविणा घन, तसें मन भक्तिहीन । सांगेन मी नवविधा तुज भक्ति जाण ॥
तूं ठेव नीट हृदिं ऐकुनि सावधान । सत्संग ही प्रथम भक्ति विशेष मान ! ॥
माझ्या कथारसिं रती अति अद्वितीया । ही जाण तूं हृदयिं भक्ति मम द्वितीया ॥
भक्ती तृतीय गण सद्‌गुरुपादसेवा । टाकोनियां दुरभिमान,धरोनि भावा ॥१६॥
गाणें मदीय गुणकीर्ति उदारमूर्ति । भक्ती तुवां समजणें मम ही चतुर्थी ॥
विश्वासयुक्त जपणें मम मंत्रबीजें । श्रुत्युक्तभक्ति गण ही मम पांचवी जे ॥१७॥
जी कर्मकांडिं विरती, दम-शील-युक्ता । जी सज्जनानुकृति संतत धर्मसक्ता ॥
ती भक्ति साहवि बरी शबरी ! मनीं धओवेंचि मीं कथियली तुजलागिं ही गे ! ॥
माझ्यासमान बघणें सगळया जगातें । संतां गणून मजहूनहि थोर कीं ते ॥
ही सातवी समज तूं हृदयांत भक्ति । संसारतापशमना गण या सुयुक्ति ! ॥१९॥
हो लाभ जो सहज त्यावरि तुष्ट होणें । स्वप्नींहि नैव बघणें परदोष तेणें ॥
ही जाण भक्ति बरवी मनिं आठवी गे ! । नाहीं सुखा कमति, हें जर चित्तिं वागे ॥
सर्वांसि निष्कपट वर्तन साधुभावें । विश्वास सर्वपरि कीं मजठायिं पावे ॥
ना हर्ष खेद कसलाच मनांत घेणें । ही जाण तूं नववि भक्ति सुधीस लेणें ॥२१॥
यांतूनि एक जरि भक्ति मनीं यदीय । विश्वीं चराचरिं मला प्रिय तोच होय ॥
स्त्री वा असो पुरुष तो प्रिय तोच मातें । साऱ्या प्रकारिं दृढभक्ति तुझी असे ते ॥
जी योगिवृंद गणती गति दुर्लभा ती । हो आज गे ! सुलभ ती तुज साधुरीतिं ॥
जें दर्शनें अनुपमें फल माझिया हो । जीवा मिळे सहज कीं निजरूपलाहो ! ॥२३॥
सीतागती तुजसि का जरि होय ठावी । ती त्वां मला शबरि ! सत्वरिं जाणवावी" ॥
सांगे तदा शबरि "जें सर होय पंपा । तेथें मिळेल तुज वृत्त तिचें अपापा ! ॥
सुग्रीव तेथ तुजलागिं सखा मिळेल । त्याचेकडून विभुरा सगळें कळेल ! ॥
जाणोनिही मजसि हें पुसतां सुधीरा!" । सांगे तदा प्रभुपदां नमुनी उदारां ॥२५॥

वदे सकल ती, विलोकि हरिमुख धरि हृदिं राघवपदकमला ।
योगाग्नीमधिं विसृचि तनूतें अनन्तपदिं हो काम जिला ।।
टाकुनि कर्मां तथा अधर्मां मतांसि नर हो दुःखकरां ।
तुलसि वदे दृढ रामपदांबुजिं विश्वासें अनुरक्ति करा ।।२६।।
स्त्री जातिहीन अबला, अघजन्मभूमी । ऐशीसि मुक्ति दिधली प्रभुंनीं स्वधामीं।।
त्या राघवा विसरुनी सुखकांक्षि होसी । मूढा मना ! न तुलना तव मंदतेसी ।।२७।।

— ।। इति श्रीरामचरितमानसानुवादे कलिकलुषविध्वंसने अरण्यकाण्डे शबरीभक्ति–मुक्तिवर्णनं नाम चतुर्दशस्तरङ्गः ।। —

तरंग १५ वा

त्यागोनि तें वन, दुज्या वनिं येत राम । शौर्यें अतुल्यबलतेज नृसिंहयुग्म ।।
शोकाग्निमग्न विभु तो विरहीच भासे । संवाद लक्ष्मणसवें करि कामि ऐसे ।।१।।
"हे लक्ष्मणा ! बघ वनीं सुषमा किती ही।कैसा वियोगिजन हीप्रति चित्तिं साही?।।
हे देख पक्षि मृगवृंद सह-स्व-नारी । माझा जणों करिति हीं उपहास सारीं ! !
मातें बघूनि पळती मृगवृंद दूरीं । त्यांतें मृगी कथिति 'भ्या न; तुम्हां न वैरी।।
खेळा सुखांतचि अहो ! मृगबालकांनो । शोधीत हे फिरति हेममृगासि जाणों !'।।
जाती करी बघ कसे करिणींसमेत । जावें प्रियेसह असी शिकवीति रीत ! ।।
शास्त्रें सुचिंतित तरी फिरुनी शिकावीं । राजा सुसेवित तरी न कृपेसि दावी !।।
स्त्री स्थापिली जरि उरीं तरि त्यापरी ती ।शास्त्रं,नृपाळ, युवती जणुं तुल्यरीति!
बंधो ! पहा तरि वसंत वनांत शोभे। माझ्या वियोगिहृदयीं परि निर्मितो भें ! ।।५।।
हा एकला, विरहदुःखि नितान्त दीन । ऐशा मला बघुनि केवळ साह्यहीन ।।
स्वारी करूं मजवरी बघतो अनंग । कांतार-भृंगयुतसंगिं विहंगसंघ ! ।। ६ ।।
जैं कामदूत बघुनी मज बंधुसंगीं । तें वृत्त सांगति तसें मदनासि वेगीं ।।
नेलें त्वरें स्वदल मागुति तैं स्मरानें । डेरे दिले उचित पाहुनि काय रानें !७
वे कीं विशाल तरु, वेष्टित वल्लरींनीं । जाणों छतें विविध ताणिलिं जेविं ताणीं ।।
जे नाल रम्य-कदली-ध्वज-सत्पताका । पाहोनि मोहित न हो जन धीर तो कां ? ।।
नाना तरू विविध पुष्पभरीं नटोनी । ते वाटती रुचिरवेषि धनुर्ध्यि कोणी ।।
कोठें कुठें विटप सुंदर शोभणारे । ते दूर दूर जणुं सैनिकयुक्त डेरे ! ! ।।९।।

जे कूजती मधुर कोकिळ-मत्तदन्ती । ते उंट सारस, महोक्षहि खेचरें तीं !
ते सुंदराश्व शुक मोर तसे चकोर । ताजी सदश्व जणुं हंस कपोत साग्र॥१०॥
तें पादचारिदल तित्तिर आणि लावे । तें कामसैन्यवर केविं बरें तुलावें ? ॥
वाटे, शिलाच गिरिच्या रथशा विशाला । त्या निर्झरीं सहज दुंदुभिभास झाला ॥
त्या चातकांधि गुणगायक भाट मानूं । भृंगालि भेरि सनयादि सुरेल वानूं ॥
सद्गन्धशील मृदु मारुत शिष्ट आले ! । सेनानिवेश चतुरंगि विराजलेले !॥१२॥
ऐशांसमेत अधिनायक कामदेव । सर्वांसि कीं सुचवि-तद्वश विश्व सर्व ! ॥
हे लक्ष्मणा ! बघुनि कामचमू अशी ही । जो धैर्य राखि, जग वानि तयाच पाहीं ! ॥
नारीच ही परमशस्त्र मनोजहस्तीं । तीतें न जो वश, तयासचि वीरकीर्ति ।
ताता ! गणीं प्रबळ हे खळ लोकिं तीन।जे काम कोप, तिसरा रिपु लोभ जाण॥
ते ज्ञानपूर्ण मुनिच्याहि मना क्षणांत । व्यापावयास असती जगतीं समर्थ !
इच्छा तसें कपट हें म्हण लोभसैन्य । नारीच हो मदनसैन्य जगीं अनन्य ॥१५॥
हो क्रोधसैन्यबल-भाषण जें कठोर ! ऐसा असे मुनिजनीं कथिला विचार !॥
बोले महेश्वर "उमे ! समजें मनीं हें । सर्वांतरीं वसत रामचि एक आहे ॥१६॥
तो हो चराचर विभू त्रिगुणां अतीत । विश्वांत कामिजनदैन्य निदर्शवीत ! ॥
तैसाच वाढवित तो निजभक्तचित्तीं । सर्वोपरी सुखद जी सुदृढा विरक्ति ॥
जे क्रोध काम मदलोभ तशीच माया । श्रीरामरायचि दयानिधि वारिता यां ॥
ज्यातें प्रसन्न नटनायक रामराय । त्या इंद्रजाल भुलवील कदापि काय ? ॥१८॥
मी सांगतों मम उमे ! हृदयानुभूति । हें स्वप्नवत् जग करी खरि रामभक्ति !॥
गेले पुढें प्रभु सरोवररम्यतीरा । पंपा सजे सुभग नाम सरा गभीरा ॥१९॥
ज्याचें विशुद्ध जल सज्जनचित्त जैसें । ज्या घाट चार सजती अति चारु तैसे ॥
पक्षी मृगे पिवति ज्या जलपानकामें । जैसे उदारगृहिं याचकवृंद नेमें !॥२०॥
पर्णादिकीं कुवलयीं बहु झांकळोनी । त्याच्चि न तें सलिल सत्वर ये कळोनी ! ॥
आच्छादि ज्यासि चहुंबाजुंसि गाढमाया । तें ब्रम्ह जेविं बहु दुस्तर हो कळाया ॥
ज्याचें अवर्ण्यजल यापरि सर्व रीतीं । पपेसि त्या रघुकुलोत्तम बंधु येती ॥
ज्यांतील मीनगण मग्न जलीं गभीरीं । सौख्यासि सेवि अतिमात्र बहुप्रकारीं ॥
सद्धर्मशील नर सौख्यरसासि सेवी । सेवीति सर्व जलवासि सुखासि तेवीं ॥
देती जया सरसिजें बहुरंगि शोभा । भृंगालि गुंजन करी मकरंदलोभा ॥२२॥

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे 'सुश्लोकमानसे' कलिकलुषविध्वंसने अरण्यकांडे श्रीरामचन्द्रस्य पम्पासरगमनवर्णनं नाम पंचदशस्तरङ्गः ॥

तरंग १६ वा

केले निनाद जलकुक्कुटरम्यहंसीं ! वाटे प्रशंसिति रवें बघुनी प्रभूसी ! ॥
जे चक्रवाक-बक पक्षिसमूह तेथे। त्याची विभा विपुल वर्णनशक्य ना ते ॥१॥

ते वल्गुकंठि खगवृंद मृदुस्वराने । पाचारितात पथिका जणु आदरानें ! ॥
तीरीं सुशोभतिही आश्रम ते मुनींचे । सर्वत्र रम्य तरु शोभति काननींचे ॥
चाफे पलाश बकुलादि कदंब ताल । आंबे तमे पनस पाटल जे विशाल ॥
नाना तरू कुसुमपल्लविं शोभणारे । ज्यांचेवरी मधुप गुंजनमग्न सारे ॥३॥
वाहे मनोहर सुगंधित मंद वारा । जो वर्षतो सकलमानसिं हर्षसारा ॥
'कूहू–कुहू' वदति कोकिळ मंजुनादें। ध्यानेहि भग करिती मुनिंचीं स्वशब्दें॥४॥
होती तरू फलभरें लवले क्षितीसी । लक्ष्मी उदार पुरुषा करि नम्र जैसी! ॥
ऐसे सरोवर बघून मनोज्ञ, राम । स्नानादि त्यांत करि, सेवि सुखा निकाम
पाहोनि सुंदर तरू, बसले तळीं ते । छायेंत लक्ष्मणसमेत सुशांत चित्तें ॥
तेथें पुन्हा मुनिसमेत सुरादि येत । रामा स्तवोनि निजधामिं निघोनि जात ॥
होते प्रसन्नमनिं राघव बैसलेले : बंधूसमेत अभिभाषण रम्य चाले ! ॥
देखोनियां प्रभुसि तैं विरहाधिमग्न । झाले मनात मुनिनारद फार खिन्न ! ॥७॥
'मी शापिलें प्रभुसि यास्तव दुःख सोसी । श्रीरामचंद्र विभु भक्तसुखासि पोषी॥
ऐशा प्रभूसि अवलोकुनि धन्य व्हावें !॥ ऐसा पुन्हां समयही मज केविं पावे?'
चिंतूनि हें प्रभु जया स्थलिं बैसलेले । वीणा करीं धरुनि नारद तेथ आले ॥
गाऊनि रामचरितः अति गोड वाचें । प्रेमें स्तवीत मुनि सद्गुण राघवाचे ॥९॥
घालीत दंडवत जों मुनि त्यासि राम । आलिंगितो उठवुनी प्रभु सौख्यधाम ।
लावी उरीं फिरफिरूनि किती तया तो !। त्या स्वागता करुनि सन्निध बैसवीतो ॥
अत्यादरें मुनिपदांबुज लक्ष्मणानें । प्रक्षाळिलें नमियलें अतिपूज्यमानें ॥
नानापरीं स्तवि मुनीश रघूत्तमातें। जाणेहि त्याप्रति अतीव सुतुष्ट चित्तें ॥११॥

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे कलिकलुषविध्वंसने अरण्यकाण्डे
श्रीरामसमीपे नारदगमनवर्णनं नाम षोडशस्तरङ्गः ॥

तरंग १७ वा

जोडोनि हस्तकमलां मुनिवर्य बोले । ऐकोनि जें सकलसज्जनचित्त डोले ॥
" ऐका उदारतम सुंदर रामराय ! । आहां अगम्य वरदायक चिंतनीय॥१॥
मागेन मी, 'प्रभुवरा! वर द्याच एक।सर्वान्तरस्थ विभु त्या जरि जाणि नीक" ॥
बोले रघूत्तम "मुने! तुम्हि जाणतांच । माझा स्वभाव, नच मी कधिं ठेविं खाच ॥
माझ्या जनाजवळुनी दुरवूनि कांहीं । तुम्हां अदेय मजपाशिं मुळींच नाहीं !
जाणा तुम्ही मुनिवरा! मम सत्य हें हो । विश्वास मद्वचनिंचा हृदिं नित्य राहो!"
तेव्हां वदे मुनि मनीं अति हर्षुनीयां । "मी धाष्टर्यही करुनि मागतसें वरा या॥
नामें जरी असति कीं प्रभुचीं प्रभूत । ज्यांतें श्रुतीहि चतुरा बहु वर्णितात ४
त्यांमधेंहि अधिकोत्तम नाम 'राम' । पापात्मपक्षिगण संहरि जें निकाम ! ॥
भक्ती रघूत्तम! तुझी जणुं पौर्णिमा ही । ज्या यामिनींत शशि 'राम'सुनाम राही!॥
नामें अनन्त इतरें जणुं तारकाली । भक्तांचिया विमल हृन्नभिं नित्य ठेली!"॥
बोले 'तथाऽस्तु!' करुणाब्धि मुनीसि राम । श्रीनारदाधि हृदिं लाभत सौख्यधाम॥
वंदीत रामचरणीं मुनिवर्य माथां । बोलेहि मंजु वच जाणुनि हृष्ट नाथा ॥
"हे राम! मी पुसतसें परिसा ! स्वमाया।प्रेरूनि मोहवियलें तुम्हि मन्मना या।
व्हावा विवाह मम हें मनिं जें उदेलें । तें फोल कां प्रभुवरें मम आर्त केलें?"
" ऐका मुने ! कथित मी मन खोलुनी हें । जो विश्वसूनि मज ठायिंच भक्त राहे-८
त्याचें सदैव परिपालन मी करीत । बाळासि माय करि रक्षण तीच रीत !
अज्ञान बाळ धरुं धावत, वत्स नागा। त्यां वारि आइ तशिं धेनुहि धावुनी गा!
जे प्रौढ होति सुत त्यांवरि माय दावी। प्रीती, परी पहिलि ती अतुला वदावी॥
ज्ञानी मला गमति पुत्र जणों अ-बाल ॥ हो बाल पुत्रसम भक्त अगर्वशील!१०
ज्ञान्या गमे स्वबल; मद्बलि भक्त नांदे।तो क्रोध-काम,-रिपु त्यां उभयां भया दे!
ऐशा विचारिं बुध ते भजतात मातें । ज्ञानासि पावुनिहि टाकिति भक्ति ना ते!!
तूं जाणसी मुनिवरा! मनिं भक्ति माझी।येथें परी विशद केलि मियां तुला जी
जे क्रोध-काम-मद-लोभ बलाढ्यसेना । मायाचि पोषित हिला, दुसरें असेना १२
त्यांतूनि होय अति दारुण दुःखदात्री । मायास्वरूपचि अशी भविं एक ती स्त्री !
गाती मुने ! निगम आगम सर्व संत । नारीच मोहविपिनाप्रति हो वसंत ! १३

ती ग्रीष्म होउनि विशोषि जलें झरे वा। जे शोभले जपतपोमय पुण्यपर्वी! ॥
जे क्रोधकाम मदमत्सररूपि भेक। वर्षा ऋतूपरि तयां करि हर्षसेक! ॥१४॥
दुर्वासनादि कुमुदांप्रति सौख्य देती। स्त्री हो जणों शरदृतू अति इष्ट त्यां ती!
ती वाढवीत फिरुनी ममता-जवासा। जैसा ऋतू शिशिर त्याप्रति दे विपोषा॥
पापादि संघ जणुं भीतिद जे उलूक। स्त्री हो तमोरजनि हर्षद त्यांसि एक१६
ते सत्य-शील-बल-धी-मयमीनघात। स्त्री ही करी बडिशसी, बुध बोलतात!
जी दोषमूल अतिशूलद दुःखखाणी। ती एक होय जगतीं प्रमदा गणोनी १७
केलें निवारण मुने! तुमच्या विवाहा। मी तें तसें, मज नसे मुळिं अन्य ईहा॥"
ऐकोनि तें रघुवरोक्त मनोज्ञ सारें। रोमांच ये मुनिसि लोचनिं अश्रुनीरें!
हे गौरि! सांग कवण्या प्रभुची स्वभक्तीं। प्रीती तशीच ममता अशि हो सुरीती?
निःशंकचित्तिं भजती प्रभुला न ऐशा। दुर्दैवि मंदमति ते नर जाति नाशा!"
बोले पुन्हांहि मुनि नारद आदरानें। "आहां विशारद विभो! तुम्हि सर्व मानें
सांगा मला रघुवरा! तुम्हि लक्षणें तीं। जीं शोभतात जगिं संतत मात्र संतीं!"
बोले विभू सकलसंसृतिभी-विनाशी। "सांगेन तीं मजसि वाटति सौख्यराशि
मी ज्यांमुळें वश असें मम भक्त संतां। तीं लक्षणें वदतसें मुनिवर्य आतां-२१
जे संत ते अनघ, षड्रिपु जिंकिलेले। जे कीं अकिंचन, अकाम शुचित्व ल्याले॥
जे सौख्यधाम, मतिमान्, अति ज्यांसि बोध। ईहा न ज्यां, अमद, सुस्थितधी विशुद्ध
सत्यप्रतिज्ञ, मितभोगि, कवीश, योगी। जे सावधान, विनयान्वित जे अरागी
जे भक्तिमान्, परमपंडित भक्तिमार्गी। ज्ञानी गुणाढ्य भवदुःख जयां न भागी!
निःशंकचित्त, तनुगेहिं न सक्ति ज्यांस। माझ्या पदांब्जि करि यन्मति नित्यवास
संकोचती निजगुणश्रवणें मनांत। संतोषती परगुणश्रवणीं नितान्त ॥ २४ ॥
जे शांत शीतल, न टाकिति जे सुनीति। सद्भावशील ऋजु, ज्यां प्रिय सर्व होती
ज्यां आवडे जपतप व्रत संयमादि। जे नित्य नेम, दम राखिति निर्मला धी २५
ज्यां विप्र-विष्णु-गुरुपादसरोजभक्ति। श्रद्धाक्षमासुजनताकरुणा यदन्तीं ॥
जे नित्य हृष्ट मम भक्ति खरी करीती। विज्ञान युक्ति विनयादि जयां विरक्ति
ज्यांतें यथार्थमति वेदपुराणसारीं। ज्यां दंभ-मान-मद हे नसती विचारीं॥
जाती अनीतिपथिं जे चुकुनी कदा न। ज्यांतें रुचे सतत मद्गुणकीर्तिगान॥
निष्काम जे भजति अन्यहितें कराया। संतां यथार्थपणिं गाइल कोण गा यां?
संतां न गाउं शकती श्रुतिशारदाही। त्यांच्या गुणां न दिसतो मज पार कांहीं"

"संतांचे गुण शेष शारदा वर्णु न शकती !" प्रभु वदतां ।
मुनि नमि विभुतें, भक्तगुणां जो सदय निजमुखीं हो स्तविता ॥
पुनःपुन्हां शिरिं नमुनी रामा ब्रह्मपुरातें जाय मुनी ।
तुलसि वदे, ते धन्य हरिगुणीं रंगति आशा त्यजुनि मनीं ! ॥ २९॥
पवित्र हें सद्यश राघवाचें । जे ऐकती, गातिल वा स्ववाचें ॥
त्यां रामभक्ती दृढ होय वेगें । त्यां योग वैराग्य न मंत्र लागे !॥३०॥
रे चित्त ! जाण युवतीजन दीपवह्नि।ना हो पतंगपरि त्यावरि तूं पडोनी!
सोडोनि काम, भज रामपदाब्ज गोड।सत्संग जोड, मद सोड, सुखा न जोड
संतांच्या चरणातें वंदुनि विनवीत ' राम ' त्यां विनयें ॥
श्रीरामकृपें लाभो सत्सुख जे नैव सत्कृपेविन ये ! ॥ ३२ ॥

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे सकलकलिकलुषविध्वंसने अरण्यकाण्डे
विमलवैराग्यभक्तिसंपादनं नाम सप्तदशस्तरङ्गः ॥

* इति श्रीसुश्लोकमानसे ' विमलवैराग्यसंपादनो ' नाम
तृतीयः सोपानः श्रीसीतारामकृपया संपूर्णः *

इति अरण्यकाण्डः समाप्तः

॥ श्रीसीतारामचन्द्रार्पणमस्तु ॥

॥ शुभं भवतु ॥

श्रीगणेशाय नमः ।

श्रीभवानीकमलेश्वराभ्यां नमः । श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ।
श्रीसरस्वत्यै नमः ।

तुलसीरूपिणे श्रीमद्वाल्मीकिमुनये नमः।
यस्य प्रसादात्सुलभं स्वर्गीयममृतं भुवि ॥ १ ॥

सुश्लोकमानस

श्रीरामचरितमानस अर्थात् श्रीतुलसीरामायण

या महाकाव्याचा अनुवाद

चतुर्थ सोपान

किष्किन्धाकांड

तरंग १ ला

मंगलाचरण

ज्यां कुन्दनीलोत्पलगौरनीलता । सामर्थ्य ज्यांचें मुळिं ये न तोलतां ॥
विज्ञानराशी शरचापभूषण । वंदूं अम्ही भक्तिद रामलक्ष्मण ॥ १ ॥
ज्यां वेद गाती, द्विज-धेनु ज्यां प्रिय । मायामनुष्यत्व धरीति निर्भय ॥
सीतेसि जे शोधिति दोन राघव । वंदूं तयां धर्मपरां हिताळवं ॥२॥

ब्रह्माण्डिम्माशारिंच जन्मलेलें । ज्याच्या प्रतापें कलिपाप गेलें ॥
जें श्रीशिवाच्या मुखचंद्रिं साजे । श्रीजानकीजीवन जें विराजे ॥३॥
संसाररोगाप्रति नाशितें जें । श्रीरामनामामृत एक गाजे ॥
सेवोनियां संतत हेंचि संत । कृतार्थता पावति कीं अनन्त ! ॥४॥

पापापहा, जगतिं मुक्तिस जन्मदेती । जी ज्ञानखाण अशि वर्णियली सुकीर्ति॥
श्रीपार्वतीहर सदैव जिथे निवासी । काशी अशी सतत सेव्य अम्हां न कैशी ? ॥
ज्येणें समस्त सुरवृंदहि दग्ध होता । त्या जो विषा पिउनि रक्षि जगा समस्ता ॥
हे मूढचित्त ! भजसी न तयास काय? । श्रीशंकरासरिस कोण कृपालु होय?॥६॥

येती प्रभू पुढति सन्निध ऋष्यमूका । सुग्रीव मंत्रिसह ज्या स्थळिं राहि एका ॥
सुग्रीव त्यां अतुलवीर्यबलां विलोकी । जे शक्तिचें गमति त्याप्रति शींवसे कीं ! ॥
बोले भिऊनिच तदा "बघ मारुते ! रे । येती इथें पुरुष दोन अतुल्य सारे ॥
सौंदर्यसागर तयांप्रति ये बघोन । घेऊनि वेष बटुचा, मनिं त्यांसि जाण॥८॥

हे पाठवीत मज का जर दुष्ट वाली । जाऊं त्वरेंचि अम्हि येथुनि अन्यशैलीं ! ॥
तेव्हां धरीत हनुमान् द्विजवेष साचा । जाई, तयांसि नमि आणि वदे सुवाचा॥
"हे श्यामगौरतनु कोण तुम्ही अहांत? । कां क्षत्ररूप धरुनी फिरतां वनांत ? ॥
भूमी कठोर, तुम्हि हे सुकुमारपाद । स्वामी कशास्तव वनीं फिरतां सखेद ?॥
आहां मनोहरतनू मृदुरम्यकाय । कां वात ऊन सहतां वनिं हे असह्य ? ॥
देवत्रयांतिल तुम्ही कुणि देव दोन । नारायणासहित जो नर ते तुम्ही न?॥११॥

जे विश्वकारण, निवारण जे भवाला । भूभारभंजक तुम्ही अवतीर्ण झालां ॥
त्रैलोक्यनाथ तुम्हि का मनुजावतारी । सांगा मला अजि कथा तुमचीच सारी"
वदत रघुपती तें वाक्य हें त्या बटूतें । "दशरथसुत आम्ही; तद्वचें येत येथें
मजसि असत आख्या 'राम' हा लक्ष्मणाख्य। अम्हि उभयहि बंधू ज्यांसचे भक्तिसख्य
मजसह सुकुमारी जानकी होति जाया। परि वनिं पळवीली राक्षसांनीं स्वठायां॥
द्विजवर ! अम्हि तीतें शोधताहोंत येथें । चरितहि अपुलें बा ! ऐकवावें अम्हांतें"॥

प्रभूतें जाणोनी पदकमल तैं मारुति धरी ।
उमे ! त्या सौख्याचें कवण तरि तें वर्णन करी ? ॥
तनू रोमांचांनीं भरलि, वदनीं शब्द न निघे ।
अशा भक्तिप्रेमा सहृदयपणें जाण अनघे ! ॥ १५ ॥

चित्र.-श्रीविनयकुमार मित्र] श्रीराम-हनुमान् [मानसांक, कल्याण कृपेनें.



" मातें कळे न मुळिंही भजनाद्युपाय । हें सांगतों, नमित मी प्रभुचेच पाय ॥
निश्चिन्त मी प्रभुकृपेस्तव हो विशेषीं । स्वामी स्वदासिं, जननी स्वशिशूसि पोषी" ॥२१॥
ऐसें वदे कवळि आकुळ तत्पदांसी । दावी स्वरूप हनुमान् हृदिं भक्तिवर्षी ॥
श्रीराम त्या उठवुनी धरि आत्मवक्षीं । सिंचून बिंदु विभु शांतवि पंकजाक्षी ॥२२॥

सुश्लोकमानस-चतुर्थसोपान-किष्किन्धाकांड, तरंग १, पृ. १७७

धरूनी हृदयीं धैर्य करीं स्तवन मारुति ।
माला कीं भक्तिनें घाली प्रभूसि अति चारु ती ! ॥ १६ ॥
" स्वामिन् ! मीं पुसलें तुम्हां तें असे न्याय्य अंतरीं ॥
परी केसें तुम्हीं ऐसें सर्वज्ञ पुसणें तरी ? ॥ १७ ॥
आधीं मी चुकलों होतों मायाविवश होउनी ॥
प्रभूसि ओळखायातें आधीं मी चुकलों मनीं ॥ १८ ॥

अज्ञानि मी कुटिलहृद् मतिमंद त्यांत । मोहें वृताहि मम धी मज भूलवीत ॥
हे दीनबंधु भगवन्! मजलागिं कवीं । तुम्हो सुधी विसरलां मनिं शुद्धभावीं ! ॥
आहेत दोष जरि कीं मम ठायिं भारी । दासासि विस्मरुं नये प्रभुनें विचारी ॥
मायेमुळेंचि तुमच्या, अति मूढजीव । त्या मुक्तिकारि विभुचीच कृपा सदैव ॥२०॥
मातें कळे न मुळिंही भजनाद्युपाय । हें सांगतों, नमित मी प्रभुचेच पाय ॥
निश्चिन्त मी प्रभुकृपेस्तव हों विशेषीं। स्वामी स्वदासि जननी स्वशिशुसि पोषी"॥
ऐसें वदे कवळि आकुळ तत्पदांसी । दावी स्वरूप हनुमान् हृदिं भक्तिवर्षी ॥
श्रीराम त्या उठवुनी धरि आत्मवक्षीं । सिंचूनि बिंदु विभु शांतवि पंकजाक्षीं ! ॥
बोले विभू "समज ना कपि आपणांसी । तूं लक्ष्मणाहुनि रे ! प्रिय मन्मनासी ॥
सारे जरी म्हणति मी समदर्शि होय । मातें अनन्यगति भक्त रुचे स्वकीय ॥२३॥
ज्यातें चराचर गमे प्रभु विश्व सारें । जो आपणांसि गणि दास असा तया रे !
ऐसा सुनिश्चय जया हृदिंचा ढळे ना।तो मी म्हणंन मम भक्त अनन्य जाण ! ॥२४॥

—॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे कलिकलुषविध्वंसने किष्किन्धाकांडे हनुमद्रामसमागमवर्णनं नाम प्रथमस्तरङ्गः ॥—

तरंग २ रा

पाहूनि हृष्ट अनुकूल अशा प्रभूतें । झाला प्रहृष्ट हनुमान् अतिमात्र चित्तें ॥
बोले "प्रभो ! वसत येथ कपीश शैलीं । सुग्रीव दास तुमचा अतिभक्तिशाली ॥१॥
मैत्री तयासह बरी करणें प्रभूनीं । जाणोनि दीन वितरा अभय स्ववाणीं ॥
दाही दिशांसि कपिकोटिहि पाठवोनी।सीतेसि काढिलचि शोधुनि तो प्रयत्नीं "

ऐसें कथोनि समजावुनि त्या द्रुयासी । तो नेत बैसवुनि त्यां निज पृष्ठदेशीं ।।
सुग्रीव जैं प्रभुवरा नयनीं विलोकी । त्यातें स्वजन्म अति धन्यचि वाटला कीं ।।
ठेवूनि मस्तक पदांवरि भक्तिचेता तो सानुजा मिळत राघववंशनाथा ।।
चिंती कपीश मनिं कीं, "करितील का हे प्रीती विधे! मजवरी, तर धन्य आहें"
तेव्हां ! समस्त कळवी हनुमंत वृत्त । दोघांहि पक्षि अति सादर भक्तिचित्त !
तो सख्य जोडि दृढ त्यांमधिं अग्निसाक्ष । जेणें सुखावत मनीं प्रभु पंकजाक्ष ।।
होतांच सख्य उभयांत विशुद्धभाव । सौमित्र रामचरितासि निवेदि सर्व ।।
सुग्रीव तैं वदत नेत्रिं भरोनि वारि ।"सीता मिळेल, विभुच्या असुखा निवारी
होतों विचार करण्यास्तव मंत्रिमेळीं । मी बैसलो गिरितटावरि एकवेळीं ।।
मीं देखिली युवति शोक करीत जातां । आकाशमार्गिं रिपुपाशिं निबद्ध नाथा !
'हा राम राम!' म्हणुनी मुखिं फोडि टाहो । आम्हां बघूनि पट खालतिं फेंकि ती हो"
श्रीराम मागत तया, पट तूर्ण दे तो । लावूनि त्यासि उरिं शोक विभू करीतो ।।
सुग्रीव सांगत "विभो ! रघुनाथ ! ऐका । घ्या धैर्य चित्तिं निवटूनि समस्त शोकां
ऐशा प्रकारिं करुं आम्हि समग्र सेवा । सीता मिळेल झणिं जेविं तुम्हांस देवा!"
ऐकोनि मित्रवच तें हृदिं धैर्य देतें । होई अमेयबल तो प्रभु हृष्ट चित्तें ।।
त्यातें पुसे "कवण कारण या वनांत । सुग्रीव रे ! वससि तूं कपिराज्यनाथ !?"
सुग्रीव बोलत "विभो ! मम बन्धु वाळी । प्रीती अवर्ण्यचि अम्हांमधिं भाग्यशाली
'मायावि' नामक मयासुरपुत्र आला । पंपापुरावरतिं चालुनि एक वेळा ।।११।।
वेशीपुढें करित गर्जन मध्यरातीं । मायावि येत, नच वालि सहे अराति ! ।।
धावूनि जाय रिपुपाठिं सरोष वाली । मी बंधुसंगतिंच जाय तयाच कालीं१२
मायावि जाय भिउनी गिरिच्या गुहेंत।वाली म्हणे मजांस 'मीहि शिरेन तेथ !
सप्ताह दोन जर मी परतोन यें न । मी जाहालों हत असें हृदयांत जाण !' ।।
मी राहिलों खररिपो ! दिन तीस तेथ । आला महान् रुधिरपूर तिथें वहात।।
वालीस मारुनि मलाहि वधील वाटे । मी लावुनी मग शिला, करिं रुद्ध वाटे ।।
आलोंहि मी स्वपुरिं धांवत तांतडींच । माजे अराजक असें बघतांच साच ।।
मातेंचि भूप सचिवादि बळें करीती । वाली, वधूनि अरितें, परते गृहान्तीं ।।
राज्यीं बघून मज, वालिस रोष येत । मातेंहि मारि अरिसा, करि तो अनर्थ ! ।।
सर्वस्व तो मम हरी, दयितेसि तेवीं । त्याच्या बळें विकळ मी अतिदैन्य सेवीं

मी त्रस्त हिंडुनि फिरें भुवनें समग्र । तो येथ शापवश वालि न येत उग्र ! ॥
माझें तथापि मन भीत असे तयाला।भक्तार्ति जाणत असां प्रभुजी ! दयाळा !"
तेव्हां उभारुनि विशाल भुजांसि वीर।श्रीराम गर्जुनि वदे " नच सोड धीर !
वालीस मी वधिन एक शरींच तूर्ण।घात्या, हरा, शरण तो जरि जाय जाण !
जे मित्रदुःखि नच दुःखित अंतरंगें। व्यक्ती अशा बघुनिही अघ फार लागे॥
ज्यांतें रजःकणपरी निजदुःखशैल। ज्यां मित्रदुःखरज मेरुपरी गमेल ॥१९॥
ऐशापरी कळवळा नच ज्यां मुळींही । ते मित्रता शठ करीति बळेंचि, पाहीं॥
वारोनि दुष्टपथ सत्पथि चालवंती । झांकुनियां अवगुणां, सुगुणां स्तवीती२०
जे देति, घेति गतशंकचि एकमेक । जे कीं यथाबल करीति हितेंचि नीक ॥
जे संकटीं करिति उत्तम भक्तिपोषा । सन्मित्रलक्षणगणा श्रुति वानि ऐशा२१
तोंडावरी मृदुवचें करि दंभराशि । मागें करी कुटिलनीति सुदुष्ट ऐशी ॥
सर्पांपरी कुटिल चित्तगती जयाची, । ऐसा कुमित्र नलगे, म्हणि त्या त्यजाचि!
राजाहि जो कृपण, सेवक जो लबाड । नारी कुशील, कपटात्मक मित्रजोड ॥
हे चार शूल सखया ! दृढ सख्य माझें।विश्वास ठेव, करतों तव कार्य हो जें"॥
बोले सुकंठ " परिसा रघुवर्य ! मात । वाली महाबलि, रणांगणि शूर होत"॥
तो अस्थि दाखवि तया मग दुंदुभीचे । तैसेच ताल, बल पारखण्यास साचे२४
लीलेंचि त्यां उलथवी रघुराय वीर । सुग्रीव घे, बल अनन्त बघोनि, धीर ॥
प्रीतीहि वाढलि तया प्रभुपायिं चित्तीं । वालीस तो वधिल ही दृढ घे प्रतीति
तो रामपायिं शिर लावि अनेकवार । जाणोनियां प्रभुसि हर्ष तया अपार ॥
त्या ज्ञान होउनि वदे वचनें प्रभूतें । झालों कृपें प्रभुचिया, स्थिरधी सुचित्तें॥
संपत्ति, सौख्य, परिवार महत्त्व हें मी । टाकुनियां करिन दास्यचि एक रामीं!
हीं रामभक्तिस विरोधक सर्व होतीं। हें संत भक्त विभुचे वदती मदुक्ति ॥२७॥
जे शत्रुमित्र, सुखदुःख वदूं जगांत।मायाच ती गमत, ना परमार्थ होत!॥
वाली गमे परम जो हितकारि माझा । गेला विषाद ! मज लाभत रामराजा !
[वाली गमे परममित्र, कृपाचि त्याची । चिंता निमे, मज तुम्ही प्रभु भेटलाचि]
स्वप्नीं जयासह घडे समरप्रसंग । संकोच वाटत मना जंव येत जाग ॥
आतां कृपा प्रभुवरें करणें अशी ती । सर्व त्यजून दिनराति करीन भक्ति !" •
वैराग्ययुक्त अशि ती कपिवाक् अवोनी । हांसोनि बोलत विभू शरचापपाणि॥
" जें सांगतोस मज, सत्यचि तें सखारे !॥मीही वदें तुजसि सत्यचि जाण सारें"

कीं नर्तवीत नट ज्यापरिं मर्कटास । विश्वा तसा हरि, वदे श्रुति रे! खगेश!॥
सुग्रीवसंगतिं निघे मग रामराय । हातांत चापवर-सायक ज्यास होय ॥२१॥
श्रीराम वालिजवळीं सु-गलासि धाडी।तो जाय गर्जत, मिळे जणुं शक्ति गाढी!॥
ऐकोनि, वालि अति कोपुनि ये लढाया । वारी जरी नमुनि त्या दयिता तदीया॥
वंदोनि ती चरण हातिं, म्हणे''जि! नाथा ।सुग्रीव ज्यांसि मिळला, प्रभु ते समस्तां
ते दोन बंधु अमितद्युति शक्तिशाली । श्रीरामलक्ष्मण अजेयचि सर्वकालीं!''॥
वाली वदे ''परिस गे! दयिते! मदीये। तूं भीरु जाणसि रघूत्तम हा पुढें ये॥
मारील तो जर मला समदर्शि राम। होईन धन्यचि सनाथ, सुखात्मधाम!''॥
बोलोनि हें निघत तो अभिमानशाली।सुग्रीव, वाटुनि तया, तृण काडि झाली॥
तेजस्वि ते उभयही मिळले घडाडी । मुष्टिप्रहारिं अनि गर्जुनि वालि ताडी॥
सुग्रीव वज्रसम तो न सहोनि मार । होऊनियां विकल जाइ पळोनि दूर॥
रामा वदे ''म्हणत मी नच काय होतो? । भ्राता न हा, प्रभुवरा! मज काळ होतो!''
सांगे विभू ''तुम्हि समानचि दोनबंधू । भ्रांतीमुळें न कळुनी, न शंकचि विंधू!''
सुग्रीवदेहिं निजहस्ति रघूत्तमानें । स्पर्शोनि केलि दृढता कुलिशाप्रमाणे ॥२७॥
त्याची व्यथाहि हरिली, गळिं पुष्पमाला।घालोनि पाठवि बलाढ्य तया रणाला॥
नानाविधा करिति ते फिरुनी लढाई । राहोनि आड तरुच्या रघुराय पाही॥
सुग्रीव पुष्कळ करी जरि डावपेच । सामर्थ्य दावि परि हो हृदिं भीत साच!॥
श्रीराम जैं निजसख्या भयभीत लक्षी । वालीसि हाणि शर वेधुनि नीट वक्षीं।
वाली पडे क्षितिसि आर्त शरप्रहारीं । बैसे उठोनि, तंव राम दिसे समोरीं!॥
तो श्यामलाङ्ग शिरिं शोभतसे जटांनीं । रक्ताब्जनेत्र शरकार्मुकि सज्जपाणि॥
लावूनि चित्त निरखी चरणाब्ज वाली। जाणे प्रभूसि,जनि सत्फल मानि झाली॥
सप्रेमचित्त हृदयीं, परि वाक् कठोर । वाली वदे, बघुनि राम उभे समोर॥
''हे नाथ! धर्मपरिपालनहेतुसाठीं । झालांत येथ अवतीर्ण जि! भूमिपृष्ठीं॥
कां व्याधसे मज तुम्हीं वधिलें असें हें। माझा वदा कवण तो अपराध आहे?!॥
मी वैरि केविं? तुमचा प्रिय का सुकंठ?'' । तेव्हां वदे वच रघूत्तम त्यासि नीट॥
''रे ऐक! सून भगिनी तशि बंधुनारी।कन्याहि तेविं समजें, सम होति चारी॥
यांच्याकडे बघत जो जन पापरूप । दुष्टा! तयास वधणें नच होत पाप॥
मूर्खा! अतीवचि तुझ्या मनिं गर्वमान।नारी तुला शिकवि त्याहि न देयि कान॥
जाणोनिही मम भुजाश्रित बंधुलागीं । मारूं पहासि अधमा! अभिमानसंगी!''

वाली म्हणे "प्रभुजि ! नाथ तुम्हीं जगासी । माझी घडे सकलरीतिं चुकीच ऐसी ॥
मी कां अजूनिहि असें प्रभुवर्य ! पापी । पावेन अंतिं तरि सद्गति रामरूपीं !" ॥
ऐकोनि तें वच सुकोमल भक्तियुक्त । स्पर्शी तयासि शिरिं ठेवुनि आत्महस्त ॥
बोलेहि राघव "तुझे असु राखुं, देहा देऊनि तेविं अमरत्व जर त्वदीहा" ॥
वाली वदे "परिस गा! करुणानिधाना! । मी प्रार्थना करितसें अजि तीस माना ॥
हो ! जन्मि जन्मि करिती मुनि थोर यत्न। ना अंतिं येत मुखिं 'राघव'नामरत्न।
जें नाम चिंतुनिच शंकर काशिवासी । भक्तासि देति सुगती नच नाश जीसी ॥
तो राम तू दिससि आज मदन्तकालीं । यत्नेंहि का फिरुनि ये घडि भाग्यशाली ?
ही आणवोनिहि कधीं नच आणितां ये । केलें मला अजि सुधन्यचि रामरायें ! ॥

गाति श्रुति ज्या 'नेति नेति' नित तो प्रभु दिसतां मज ऐसा ।
दुर्लभ जो मन, पवन जिंकुनी इंद्रियदमनें मुनिंसि तसा ॥
जाणुनि मातें अत्यभिमानी सांगे प्रभु मम राख तनू ।
कोण असा शठ तोडुनि सुरतरु बाभुळकुंपण करित जणूं ? ! ॥५०॥

आतां नाथा ! करुणादृष्टीं द्या वर जो मी मागतसें ।
ज्या ज्या योनित घेइन जन्मां तेथ तेथ तुज भजिन असें ॥
विनय -बलें हा मम सुत मजसम मंगलपदिं तव आश्रयि हो ।
धरुनि करीं निज दास करावा अंगद अपुला माना हो ! " ॥५१॥

श्रीरामपादकमलीं दृढभक्तिशाली । ठेवूनि चित्त निज टाकि तनूसि वाली ॥
कीं पुष्पमाळ करिकंधरिं घातलेली। गेली गळोनि तरि त्याप्रति ना कळाली!! ॥५२॥

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे 'सुश्लोकमानसे' कलिकलुषविध्वंसने,
किष्किंधाकांडे वालिवधो नाम द्वितीयस्तरङ्गः ॥

तरंग ३ रा

वालीस दे रघुपती निजसौख्यधाम । तैं पौरलोक धरि आकुलता निकाम ॥
तारा विलाप करि दुःखित वालिजाया । तत्केश विस्कळित सावरि ते न काया ।
तारेसि दुःखित अती रघुराय पाहे । मायेसि आवरुनि तन्मनिं बोधताहे ॥
"भू, वारि, अग्नि, नभ, वायु मिळूनि साच । हो पंचभूतमयदेह खराच नीच ॥

तें दृश्य हें तुजपुढें पडलें शरीर । हो नित्य जीव, मग शोक कशास फार!" ॥
तें ज्ञान चित्तिं उपजे, प्रभुपायिं लागे। श्रीरामभक्ति विमला वर मागुनी घे ॥३॥
हे गौरि! काष्ठपुतळीपरि विश्व सारें । श्रीरामचन्द्र विभु नाचवि याप्रकारें ॥
तो वालिबंधुसि वदे मग योग्यरीतीं । अंत्यक्रिया सकलही करण्यास ती ती ॥४॥

मग रघुपती सौमित्रीतें वदे समजावुनी ।
'कर कपिपती सुग्रीवाला यथाविधि जाउनी' ॥
रघुवरपदीं वंदोनीया तदा सगळे जण ।
करिति वदलें जें नाथांनीं यथोचित योजुन ॥ ५ ॥

सौमित्रि आमंत्रि समस्त पौर । विप्रादिकांतें अविलंबिं धीर ॥
सुग्रीव राजा कपिराज्यिं झाला । तैं अंगदाला युवराज केला ॥६॥

रामासम हितकर्ता नाहिं उमे! कोणि अन्य जगतांत ॥
गुरु माता बंधु पिता स्वामी हेही तसे न असतात ॥ ७ ॥
सुर नर मुनि सर्वहि ते असती परि दाखवीति हे रीती ॥
स्वार्थास्तव सगळ्यांची प्रीति असे, स्वार्थ सर्व हेरीती ॥८॥

ज्या त्रास रात्रिदिन वालिभयें अपार । चिंतेमुळें हृदिं घरे, जळतें शरीर ॥
सुग्रीव तो प्रभुवरें कपिराय केला । नाहीं तुला रघुपतिप्रभुच्या कृपेला! ॥९॥
जाणोनिही प्रभु असा, न कसा भजावा? । त्याचेविना सकलतापहि केविं जावा? ॥
त्याची कृपा अमित जाळि विपत्तिजाल। रामा भजाल तर दुःख तरून जाल! ॥

तो सुग्रीवा बोलवूनी पुन्हां घे । नाना रीतीं राजनीतीहि सांगे ॥
बोले "ऐकें, वानरेशा! न यें मी । चौदावर्षें ग्रामिं वा लोकधामीं ॥११॥
वर्षर्तू हा पातला, ग्रीष्म गेला । पर्जन्च्छायीं मी निवासीन शैला ॥
सेवीं राज्या अंगदाचे सवें रे । ठेवीं चित्तीं नित्य मत्कार्य सारें" ॥१२॥

आला परत सुग्रीव तेथुनी स्वगृहाप्रती ॥
प्रवर्षण गिरीतें तैं येवोनी राम राहती ॥ १३ ॥

आधींच देव करिती अतिरम्य तेथ । सान्या गुहादि गिरिभागिं सुशोभिवंत ॥
कीं रामराय करुणांबुधि,कांहिं काल। येवोनि त्या गिरिवरी वसती करील! ॥१४॥
शोभे अतीव वन तें कुसुमादिकांनीं । भृंगालि गुंजन करी मधुरें मुखेनी ॥
पानें फुलें किसलयें तशिं कंदमूलें । झालीं मनोहर, जधां प्रभु राहुं आले ॥१५॥

पाहोनि सुंदर अतुल्य असाचि शैल । राहे सलक्ष्मण रघूत्तम साधुशील ॥
येऊनि रूप वनिं पक्षि-मृगालि यांचें । रामासि सेविति मुनी सुरसिद्ध साचें ॥
तें जाहलें विपिन मंगलरूप पुण्य । श्रीराम येइ वसतीस्तव जें शरण्य ॥
पाहोनि त्या स्फटिकशुभ्र शिला तिथील । ते बैसती उभय बंधु मनोज्ञशील ॥
सौमित्रिशीं वदत राम कथा अनेका । ज्यां ज्ञान भक्ति विरती नृपनीति रेखा ॥
वर्षर्तु काल नभ झाकिति मेघमाला । ज्या गर्जतां सुभग लागति अंतराला ॥१८॥
श्रीराम बोलत तदा "बघ लक्ष्मणा रे ! । हे नर्तती बघुनि मेघ मयूर सारे ॥
येतांचि दृष्टिपथिं भक्त रमापतीचा । हर्षे जसा विरतियुक्त गृहस्थ साचा ! ॥१९॥
हा मेघ वर्षत नभीं घनघोर नादें । भीती प्रियाविरहिता मम या मना दे ॥
सौदामिनी चमकुनी घनिं गुप्त होत । मैत्री जशी खलजनीं स्थिर ना रहात ! ॥
हे वर्षती जलद येउनि भूसमीप । विद्याविभूषित नवे बुध कीं अमूप ! ॥
आघात साहति कसे गिरि, बिंदुजात । दुष्टोक्ति जेविं सहती भविं धीर संत ॥
क्षुद्रा नद्या भरुनि वाहति वारिपूरीं । थोड्याहि वैभविं वहे खळ गर्वभारीं ॥
पाणी धरे पडुनि पंकिल होत, जेवीं मायेमुळें मलिनता भरतेचि जीवीं ॥२२॥
पाणी हळू हळु भरी सकला तलावा । कीं सद्गुणीं भरुनि सज्जन पूर्ण व्हावा ॥
जाई समुद्रिं मिळुनी सरिदंबु सर्व । पावे प्रभूसि मिळुनी स्थिरभाव जीव ॥२३॥

गेले हरित तृणांनीं झांकुनि, उमगति न साधु पंथ कसे ? ।
पाखंडवाद करिती सद्ग्रंथांतेंहि गुप्त लुप्त जसे ! ॥ २४ ॥

सर्वत्र दर्दुरख प्रकटूनि येत । कीं विप्रवृंद मिळुनि श्रुति घोषतात ॥
ये पालवी नवनवी बहुतां तरूंसी । कीं साधकांतरिं भरे सुविवेकराशि ॥२५॥
ते पर्णशून्य तरु अर्क, जवास होती । जैसें सुराज्यिं खळ उद्यमशून्यवृत्ति ॥
शोधूनिही मिळत नाहिं कुठेंचि धूल । कीं क्रोध जेविं उरवी नच धर्म शील!
शोभे धरा सुभग सस्यभरें अतीव । संपत्ति जेविं उपकारिजनीं सदैव ॥
खद्योत दाट तिमिरांत विराजतात । कीं दंभशालिजन लोकसमाजिं होत २७
वृष्टी महा, विघडवीत जलाऽलवाला । नारी स्वतंत्र बिघडे मुकुनि स्वशीला ॥
केली कृषी अतृण सुज्ञ कृषीवलांनीं । कीं मान-मोह-मद टाकुनि बुद्धि ज्ञानीं ॥
देखावयास न मिळे खग चक्रवाक । येतां कली नच मिळे जणु धर्म नीक ॥
वर्षे तरीहि नुगवे तृण वाळवंटीं । ना काम जेविं उपजे हरिभक्तपोटीं ! ॥२९॥

शोभे मही विविध जीवसमूहिं पूर्णा । जैसी सुराज्यजनता सुखराशिमग्ना ॥
जेथें तिथें थबकुनी वसले प्रवासी । ज्ञानासिनें अचल इंद्रियवृत्ति जैसी ॥३०

केव्हां केव्हां येउनी वात मोठा । आकाशींचा विस्कटे मेघ-सांठा ॥
जन्मा येतां वंशिं कोणी कुपुत्र । सद्धर्मांचें लोपें आतपत्र ! ॥ ३१ ॥

केव्हां दिनीं निबिड होत घनांधकार । केव्हां दिसे रवि, घनालि पिघूनि दूर ॥
ज्ञानद्युती विलसते, अथवा नुरे ते । सत्संग वा कुटिलसंगति हेतु त्यांतें ॥३२॥

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे 'सुश्लोकमानसे' सकलकलिकलुषविध्वंसने
किष्किन्धाकाण्डे वर्षाऋतुवर्णनं नाम तृतीयस्तरङ्गः ॥

तरंग ४ था

वर्षर्तु जाउनि, पहा, आला शरदृतु मनोहर नितान्त ॥
रे लक्ष्मणा ! वनश्री वर्णाया कुतूहली स्वान्त ! ॥ १ ॥

ही काशपुष्पिं सकला आच्छन्ना शोभत कशी धरणी ।
कीं ही वर्षर्तूच्या वार्द्धक्याचीच भासली करणी ? ! ॥ २ ॥

होतां उदित अगस्ती मार्गांतिल जल सुकोनियां जाय ॥
कीं लोभ उदित होतां हृदयीं तोषासि नुरतसे ठाय ! ॥ ३ ॥

सरिता-सरोवरांचें सलिल विनिर्मल अतीव शोभतसे ॥
जाउनि मदमोहादिक संतांचें हृदय सदयशील तसें ! ॥ ४ ॥

ज्ञानी जसे हळुहळू ममता त्यजीती । शोषे सरिज्जल, सरोजल त्याचरीतीं ॥
आला बघोनि ऋतु सुंदर शारदीय । ये खंजनालि सुकृतालि सुकालिं काय ?

ना पंक धूलि अशि शोभतसे धरा ही । कीं नीतिशालि नृपकीर्ति मनोज्ञ राही ॥
संकोच संचितजलीं भिववीत मीन । कीं ते कुटुंबि जन अज्ञ धनें विहीन! ॥६॥

मेघांविहीन नभ निर्मल शोभतांहे । आशाविहीन भगवज्जनचित्त का हें ? ॥
हो शारदी विरल वृष्टि कुठें कुठें हो । भक्ती मदीय जशि अल्प जनींच कांहीं ! ॥

हर्षेंचि हे नगर सोडुनि जाति चारी । राजे, वणिग्जन, तपस्वि तसे भिकारी ! ॥
पावोनि भाक्ति हरिची त्यजिती श्रमांतें । चारीहि कीं भवपथांतिल आश्रमी ते ! ॥

नीरीं अगाधिं सगळेहि सुखांत मीन । निर्बाध ज्यापरि जन प्रभुभक्तिलीन ॥
शोभे सरोवर जसें कमळें फुलून । कीं ब्रह्म निर्गुण जसें गुणयोगिं पूर्ण ! ॥९॥

हे गुंजती भ्रमर गोडिस ज्या तुला न । नाना मनोहररवीं खगवृंदगान ॥
देखोनि रात्र अतिदुःखित चक्रवाक । देखोनियां परधनें खल मानि दुःख ! ॥
तृष्णार्त चातक निनादति दुःखितान्त । कीं शंभुशत्रु सुख लेश न पावतात ! ॥
नाशीत चंद्रचि जसा शरदातपाला । सद्भक्तदर्शन निवारित पापमाला ! ॥
चंद्रासि देखत चकोरसमूह तैसा । होतां प्रसन्न हरिला हरिभक्त जैसा ! ॥
थंडीमुळें मशकदंश नुरे कुठेंहि । कीं विप्रमत्सर कुलासहि नाशि वाही !
वर्षर्तुकालिं बहु जीव मरोनि ठेली । आतां धरा शरदिं त्यांविण शोभलेली ! ॥
कीं लाभतां जगतिं सद्गुरुसंग जैसा । भ्रांत्यादि संशय समूह रिघे विनाशा ! ॥

सरला वर्षर्तु पहा आला शरदृतु नितान्त निर्मल हा ॥
नाहीं अद्यापि कसा सीतेचा शोधसमय येत अहा ! ! ॥१४॥
समजोचि एकदां ती आहे अमुकस्थलीं म्हणुनि सीता ॥
काळासहि जिंकुनि मी तिजला आणीन निमिष ना जातां ॥१५॥

होवो कुठेंहि, जर ती असली जिवंत । यत्नें करून तिज आणिन मी अनन्त ॥
सुग्रीव तो मजसि विस्मरलाचि वाटे । तो राज्य-कोष-युवती-पुरिं काल कंठे ! ॥
मीं ज्या शरें वधियला लवलाहिं वाली । तेणेंचि मारिन उद्यां खळ हा सकाळीं !" ॥
ज्याच्या कृपें नुरति कोपमदादि वैरी । स्वप्नींहि कोपवश तो नच होय गौरि ! ॥
ज्यांची रती रघुपदांबुजिं हो पवित्रा । ते ज्ञानि सन्मुनिच जाणति या चरित्रा ! ॥
तैं लक्ष्मणें गणुनि कोपवश प्रभूतें । केलें सुसज्ज धनु घेउनि बाण हस्तें ! ॥
तेव्हां दयांबुधि अपार असाच राम । बंधुप्रती समजवूनि वदे स्वकाम ॥
"दावूनि भीति नुसती मजपाशिं आण । सुग्रीव तो मम सखा प्रिय तात ! जाण" ॥
चित्तीं विचार इकडे करि मारुती कीं । सुग्रीव चित्तिं नच राघवकार्य राखी ॥
जाई तयानिकट शीर्षिं पदीं नमूनी । सामादि चारि विधि जाणवि त्या स्ववाणीं ॥
सुग्रीव तें परिसुनी भयभीत होई । बोले "कसे विषय लोपविती मती ही !
आतां असेंचि करिं वायुसुता ! म्हणीं रे । सर्वत्र धाडिं कपि दूतसमूह सारे ॥२१॥
त्यां सांग 'जो न परतेलचि अर्धमासीं । राहेन मीच वधिल्याविण ना तयासी'" ॥
तैं बोलवी पवननंदन सर्व दूतां । सन्मान त्यां बहुपरीं करि तो समस्तां ॥२२॥
प्रीती तसें भय, सुनीतिहि त्यांसि दावी । सारेहि ते नमुनि त्या निघती सुभावीं ॥
ये तोंच लक्ष्मणहि त्या कपिच्या पुरींत । क्रुद्धा बघूनि कपि धांवत जेथ तेथ ! ॥

श्रीलक्ष्मण स्वधनुतें चढवूनि बोले। "जाळीन मी नगर हें क्षणिं अग्निलेळें!"॥
होती समस्त पुरवासि अतीव भीत। तों तेथ वालिसुत अंगद वीर येत ॥२४॥
सौमित्रितें नमुनि तो पदपद्मिं माथा। प्रार्थी तया अभय लक्ष्मण दे विनीता॥
संक्रुद्ध लक्ष्मण, असें परिसूनि कानीं। बोले कपीश अति आकुल भीतवाणी!॥
"तारेस ने तुजसवें हनुमंत! तेथें। श्रीलक्ष्मणा समजवीं सुविनीत उक्तें" ॥
तारेसमेत हनुमान् मग लक्ष्मणातें। जाऊनि वंदि सुयश स्तवि पुण्यगीतें ॥
प्रार्थूनि त्यासि निजमंदिरिं आणवूनी। प्रक्षाळि तच्चरण मंचकिं बैसवूनी ॥
सुग्रीव लक्ष्मणपदांबुजिं शीर्षिं भेटी। घेई भुजीं, कवळि लक्ष्मण त्या स्वकंठीं॥
सुग्रीव बोलत "विभो! विषयासमान। मोही मुनींसहि क्षणीं असलें दुजें न!"॥
ऐकोनि ती विनयवाक्, सुख लक्ष्मणातें।तोही तया बहुपरी समजावि तें तें २८
सांगे तया पवननंदन सर्ववृत्त। शोधार्थ दूतगण धाडियलेच्चि होत ॥
सुग्रीव हर्षभरिं घेउनि अंगदादि। सौमित्रिपाठिं मग ये, प्रभुभेट साधी ॥२९॥

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे कलिकलुषविध्वंसने किष्किन्धाकाण्डे लक्ष्मणस्य सुग्रीवसमीपगमनवर्णनं नाम चतुर्थस्तरङ्गः ॥

तरंग ५ वा

श्रीरामपायिं शिर लावुनि जोडि हस्त। बोले "नसे मदपराध मुळींहि नाथ!॥
मायाच देव अपुली प्रबला अती हे। सोडील ती, जर दयाकर राम पाहे!।१॥
होतीच लोक विषया वश सर्व नाथा। मी तों पशू कपि अतीवच्चि कामचेता!॥
स्त्रीचे कटाक्षशर ज्या नच लागतीच। तो हे रघूत्तम तुम्हांसम होय साच! २
जो क्रोध-घोरतिमिरा रजनींत जागा। ज्या लोभपाश न गळ्याप्रति बांधिला गा!
तो वाटतो नर तुम्हांचसमान धन्य। ना या गुणा तव कृपेविण हेतु अन्य"।
बोले तदा रघुपती स्मितयुक्त बोला। " मद्बन्धु तूं भरतसा प्रिय मन्मनाला॥
आतां करीं सकलयत्न मनेंच्चि साचा। लागेल शोध क्षणिं ज्यापरिं जानकीचा"
ऐशापरी चंव तयांमधिं होति गोष्टी। आले तिथें कपिसमूह अनन्त कोटी!॥
त्यांचे किती विलसती तनुवर्ण नाना।त्यांच्या यथार्थ करि कोणिहि वर्णना ना!

ती मीं उभे ! कपिचमू निरखीलि डोळां।मोजूं बघेल तिज तो जणुं मूर्ख भोळा!
येवोनि ते नमिति रामपदीं स्वशीर्षीं । देखोनि रामवदना हृदिं हर्ष वर्षी ! ६
ऐसा न कोणि कपिं त्या चमुमाजिं राही।रामें न ज्यासि पुसलें कुशलादि कांहीं
आश्चर्य यांत कसलें ? प्रभुराम आहे । व्यापोनि विश्वहि समग्र परोपरीं हें ॥७॥
आज्ञापिलें कपि उभे मग ठाइंठाईं । सुग्रीव त्यांसि समजावि निजोक्ति कीं ही॥
" हो रामकार्य-मजही उपकार मोठा । जाहो ! ह्मणींच कपियूथ समस्त वाटां॥
काढाचि शोधुनि तुम्ही जनकात्मजेसी।या बंधुंनो ! परतुनी मज एक मासीं ॥
शोधाविना समय टाळुनि येति जे कां।त्यां मी वधीनचि घरा नच यांत शंका"
तें ऐकतांच वच वानर सर्व जाती । चोहोंकडे त्वरित शोध करूं पहाती ॥
सुग्रीव तैं जवळ घे निज बोलवूनी । ते वायुपुत्र, नल, अंगद वीर तीनी १०
"हे नील ! अंगद ! मरुत्तनया !" वदे तो "ऐका सुजाण ! धृतिमन्त ! निदेश देतों
जावें तुम्ही सकल सद्भट दक्षिणेतें । सर्वां पुसा जनकजा कवण्यास्थलीं तें !
देहं वचें, मनिं करा अतियत्नधीर । श्रीरामकार्य करणें तुम्हि हें समग्र ॥
पृष्ठीं रवीस भजणें, उरिं अग्निलागीं । स्वामीसि निष्कपट भाविं समग्र अंगीं! !
माया त्यजून, परलोक सुखें भजावा । जेणें पुन्हां सकल संसृतिशोक जावा! ॥
पावोनि जन्म जर सार्थक देहिं व्हावें । सोडूनि काम भजणें प्रभु राम भावें १३
तो हो गुणज्ञ सकलांपरिं तो सुधन्य । कीं जो रघूत्तमपदीं रत हो अनन्य !!"
आज्ञा अशा मिळवुनी नमुनी कपीशा । रामा स्मरूनि निघती धरुनी प्रहर्षा॥
रामप्रणाम करि मारुतिराय अंतीं । बोलावि त्यासि निकटीं प्रभु हेतुचित्तीं ॥
स्पर्शोनि मारुतिशिरा करपंकजानें । दे मुद्रिका स्वकरिंची, निजदास जाणे
सांगे "अनेकपरिं तूं समजाविं सीते । ये शीघ्र सांगुनि बला, विरहादि येथें॥
तेव्हां गणी सुफल मारुति आत्मजन्मा । गेला धरूनि हृदिं तो करुणाब्धि रामा ॥

प्रभु श्रीराम तो जाणे जरी वृत्तान्त सर्वही ॥
त्राता तो देवदेवांचा राजनीति जपे मही ॥ १७ ॥

शोधावया निघति वानरयूथ सारे । रानें नद्या सर गिरी सकल प्रकारें ॥
श्रीरामकार्यरत तन्मन गाढ होतां । त्यां देहभानहि नुरे, श्रम केविं चित्तां !! ॥

॥ इति श्रीरामचरितमानसानुवादे 'सुश्लोकमानसे' कलिकलुषविध्वंसने
किष्किन्धाकाण्डे सीतान्वेषणाय कपिविसर्जनं नाम पंचमस्तरङ्गः ॥

तरंग ६ वा

कोठें कुठें जर निशाचर त्यांस भेटे। एकेक देउनिच त्यां वधिती चपेटे!! ॥
त्यांनीं अनेकपरिं धुंडिलिं अद्रिरानें,। भेटे कुठें मुनि तरी मिळती सु-मानें॥१॥
झाले तृषार्त अति ते कपि, त्यां मिळेना। पाणी कुठेंहि चुकती पथ हिंडतांना॥
तेव्हां करीत हनुमान् हृदयानुमान। सान्यांसि ये मरण, ना जर वारिपान॥२॥
तैं पर्वताग्रिं चढुनी हनुमान् विलोकी। सर्वत्र, तों विवर कौतुकिं भूत देखी! ॥
जेथूनि हंस निघती, बक, चक्रवाक। पक्षी उडोनि शिरती विवरीं अनेक ॥३॥
तेव्हां गिरीवरुनि मारुति खालिं येत। सर्वांप्रती विवर नेउनि दर्शवीत ॥
त्यांनीं पुढारि करुनी पवनात्मजातें। ते होति शीघ्र विवरीं तयिं सर्व जाते ॥४॥
उद्यान तेथ दिसलें सकलां तयांना। तैसा सरीं विकसिताम्बुजराजि नाना॥
होतेंहि मंदिर मनोहर जें नितान्त। नारी तपोद्युतिमयी बसली तयांत ॥ ५ ॥
दूरूनि वंदिति तिला नतशीर्ष सारे। ती जें पुसे, कथिति तें सगळें विचारें॥
सांगे तयांस जलपान करावया ती। सुस्वाद सुंदर फलेंहि तयांस देती ॥६॥
स्नानादि ते करुनि खाति फळें रसाळ। आले तिच्या जवळि ते मग काहिं वेळ॥
सांगीतली मग तिनें स्वकथा समूळ। बोले "रिघेन रघुराय जिथें दयाळ!॥७॥
डोळे मिटा तंवर या विवरा त्यजाल!। चिंता त्यजा जनकजेप्रति सर्व जाल!"
ते नेत्र घेति मिटुनी मग जों पहाती। तों सर्व सिंधुतटिं पोचति ते क्षणान्तीं॥८॥
रामाकडे निघुनि जाय तपस्विनी ती। त्याचे पदाम्बुजयुगीं नमि ती सुभक्ति ॥
नानापरी स्तवुनियां विनवीत रामा। दे भक्ति राम तिज उत्तम सौख्यधामा॥९॥
गेली पुढें बदरिकाश्रमिं ती सुधन्या। चित्तीं स्मरूनि रघुनाथपदां अनन्या॥
ज्यां ध्याति वंदुनि उमापति तेविं धाता। अत्यंत भक्तिभरिं लाभुनि तोष चित्ता॥
सारे कपी बसुनि चिंतिति अब्धितीरीं। 'आतां सरेल अवधी क्षणिं' या विचारीं॥
"नोहेचि कार्यलवही! न चले उपाय।सीता कुठें न कळतें, करणें जि! काय!॥
डोळे भरूनि म्हटलें मग अंगदें कीं।"दोहीं परीं मजसि निश्चित मृत्यु ठाकी॥
शुद्धी न लागत मला मुळि जानकीची। सुग्रीव खास वधणार गमे मलाचि!॥
तातासि मारुनि मला वधिता कपीश। मी वांचलों, करि दया प्रभु रंकनाश॥
मातें वधीलचि, गमे नच यांत शंका। ऐसें वदे बहुत वालिज सर्व लोकां॥१२॥

ऐकोनि अंगदवचा कपिवीर शोकीं । होऊनि मग्न, नयनीं बहु नीर ये कीं ॥
शोकार्त ते क्षणभरीं, वदती परी ते । "ना शोधितां जनकजे न फिरूं गृहांतें ॥१४॥
हे अंगदा! कपिवरा! युवराज वीरा!" । ऐस म्हणोनि रिघती कपि सिंधुतीरा ॥
दर्भासि तेथ पसरूनि कपी समस्त । ते त्यांवरी बसति चिंतनशीलचित्त ॥१५॥
जैं जांबुवंत बघि दुःखित अंगदासी । बोले तदा सदुपदेशवचें विशेषीं ॥
"ताता! न तू समज मानव मात्र रामा । तो ब्रह्म निर्गुण अनादि जया न सीमा ॥
हा ब्रह्म कीं सगुण राघव रामराय । तद्भक्तिपूत अम्हि धन्य सुभागधेय ॥
स्वेच्छेंचि हा अवतरे प्रभु भक्तपाल । गोविप्रदेवबसुधावन हेंचि शील ॥१७॥
आम्ही असे सगुणसेवक सर्वरीतीं । त्यातें भजू त्यजुनि मोक्षसुखादिकें तीं" ॥
ऐशा तदुक्ति बहु चालति अब्धितीरीं । संपाति अद्रिकुहरीं परिसे–विचारी
येवोनि बाहिर बघे कपि ते अनन्तामानी " दिले विधिकरें जणु खाद्य होत!
आताचि खाइन तया सकलां, क्षणात । खाण्याविना मरत मी बहुकाल येथ!
आहार पोटभरि आजवरीं न देता । आताच एक समयीं परि देव विधाता!"
ते गृध्रवाक्य पडतां श्रवणीं कपीहि । उद्गारती " मरण आजि चुके न कांहीं!!"
संपातिते बघुनि ते उठले समस्त । ते जाबुवन्त मनिं चिंतित भीतियुक्त ॥
बोलेहि अगद मनामधि चिंतुनीयां ।" नाहीं जटायुसम लोकिं सुधन्य कीं या!
श्रीरामकार्यि तनुंा त्यजिले तयानें । भाग्येचि किं निज पुरा हरि त्याप्रती ने!"
ती हर्षशोकयुत ऐकुनि सर्व वाणी । सपाति त्यांनिकट ये, कपि भीति मानी!
सारे कपी पळति, पाहुनि गृध्रराया । देऊनि त्यां शपथ थांबवि तोहि आयां ॥
देई तयां अभय, सर्व विचारि वृत्त । तेही तयासि सगळे मग तें कथीत २४
संपाति ऐकुनि तदा निजबन्धुकीर्ति । तोही स्तवी बहुपरीं प्रभुराममूर्ति ॥
सांगे "मला जलधिच्या तटिं वाहुनी न्या।बंधूसि देइन तिलांजलि मी सुधन्या!
तुम्हांसही करिन साह्य, वदोनि कांहीं।सीतेसि शोधुनि बघा; मिळवाल तीही!"
बंधुक्रिया करुनि तो मग अब्धितीरीं।बोले, "कथा निज कथीन तुम्हांसि सारी
दोघेहि बंधु अम्हि यौवनिं आधि होतों।तेव्हा नभीं रविकडे उडु लागलों तों–
मार्गे जटायु परते, रवितेंं न साहे । मी मात्र जाय रविसन्निध, आयका हें!
गर्वात मी उडुनि दग्ध मदीय पंख । मी भूवरीं पडत, ओरडलों सशोक ॥
तों 'चद्रमा'-मुनि दयायुत पाहि मातें । ज्ञानादि सांगुनि मला समजावि तें हें

नानाप्रकारिं कपि हो ! मज तो विबोधी । देहाभिमानरहिता मम तो करी धी ॥
' त्रेतायुगीं धरिल जें सगुणावतार । सद्ब्रह्म तें दशरथात्मज रामवीर २८
भार्या तदीय दनुजाधिप तैं हरील । शोधार्थ राम कपियूथहि पाठवील ॥
ते भेटतांचि तुज, होशिल तूं पुनीत । येतील पंखहि पुन्हां, नच हो सचिंत !
कोठें असे जनकजा कथि रामदूतां '– तें वाक्य आज मुनिचें ऋषि सत्य होतां
ऐका तुम्ही मम वचा,* प्रभुकार्य साधा । लंका त्रिकूटगिरिमाजिं वसे अबाधा ॥
तीचेवरी करित रावण राज्य देखा । ज्यातें न भीति लवही, नच चित्तिं शंका !
त्याच्या अशोकवनिं ठेवियली सशोका । सीता दिसे मजसि, ना जरि तुम्हि देखां
गृध्रांसि दृष्टि अति तीक्ष्ण, तशी न कोणां । तेणें तुम्हांस न दिसे, मम शब्द माना
मी जाहलों बहुत वृद्ध अशक्त होई । नाहीं तरी वितरतों लव साह्य मीही !
जाईल जो उडुनि हा शतयोजनाब्धि । तो रामकार्य करणार अपारबुद्धि ॥
पाहूनियां मजसि धीर धरा कपी हो ! कैसें शरीर मम रामकृपेचि हें हो ? !
जो कोणि *आठविल पापिहि रामनाम । तो हा भवाब्धिहि अपार तरी निकाम !
आहांत दूत तुम्हि त्या प्रभु राघवाचे । ध्याऊनि राम हृदिं, कार्य कराचि साचें !"
हे गौरि ! सांगुनि असें जंव गृध्र जाय । सारे कपी करिति विस्मय की अभय
आपापल्या कथिति सर्व कपी बलातें । ओलांडण्या जलधि त्यां परि धैर्य नातें
तैं जांबुवंत म्हणतो " अजि वृद्ध मी हों । नाहींच पूर्विल मला बल लेश तें हो !
झाले त्रिविक्रम जधां प्रभु हे खरारि । होतों तदा तरुण, तैं मज शक्ति भारी !
बांधीत जैं बलिस तैं प्रभुरूप मोठें । ज्या वर्णना जगिं नाहिच शक्ति कोठें !
त्यातेंहि दोन घडिमाजिंच सात वेळ । आलों प्रदक्षिणिं पळोनिच मी सलील !"
सांगेहि अंगद "जरी मज येइ पार । जाया, परी परतण्या मज नाहिं धीर !"
तैं जांबुवंत वदला "जरि तूं समर्थ । स्वामी अशा तुज अम्ही त्यजणें न युक्त !"
तैं मारुतीस वदला वच ऋक्षराज "कां गप्प तूं ? बल अपार तुझेंचि तेज !
तूं वायुसूनु बल वानुं तुझें तसेंच । विज्ञानबुद्धि मतिसागर तूंच साच ! ॥
हे तात ! कार्य तरि तें कुठलें जगांत ? । होणार जें न करण्याप्रति तूं समर्थ
हो रामकार्य करण्या अवतार तूझा !" हो अद्रिसा परिसतां क्षणिं तो महौजा !
सौवर्णवर्ण नटला कपिराज साच । मेरूचि की अपर ! त्या तुलना नसेच !!
तो सिंहनाद करि गर्जुनियां कितीतें ! "लीलेंचि लंघिन, अपार न अब्धि मातें

मारीन रावण, समेत तदीय सेना । आणीं त्रिकूटहि विपाटुनि, सत्य माना ।।
हे जांबुवंत ! पुसतों तुज, सांग मातें । दे तूं मला सदुपदेश विशुद्ध चित्तें।"
तें जांबुवंत वदला "कर एवढेंचि । सीतेसि ये बघुनि, आणचि शुद्धि तीची।।
येईल तों रघुपती व पिसैन्यसंगें । राजीवनेत्र विभु तो कुतुकान्तरंगें ! ।।४३।।

कपिसेनान्वित राम रावणा वधुनि आणितिल सीतेतें ।
तें त्रैलोक्या पावन करि यश, सुर मुनि नारद वर्णिति तें ! ।।
प्रभुयश गाउनि, ऐकुनि, वानुनि, चिंतुनि नर ये परमपदीं ।
रघुवरचरणांभोरुहमधुकर तुलसि गात तें स्वच्छंदीं ! ।।४४।।

संसारभेषज असें यश राघवाचें । जें ऐकतील जन गातिल वा स्ववाचें ।।
त्यांचे मनोरथ करीलचि पूर्ण सारे । श्रीरामराय करुणाबुधि सत्प्रकारें ! ।।४५।।
नीलोत्पलापरि सुनील तनू जयाची । कीं कामकोटिसुषमाहि उणीच साची ! ।।
त्याचें अनन्तगुणवर्णन आयका हो ! । तन्नाम पापखगनाशक, गायका हो ! ४६

किंष्किन्धाकाण्डाचें गायन हें आवडो सदा रामा ।।
'रामा'च्या हृदया या देवो प्रभुगान नित्य आरामा ! ! ।।४७

।। इति शम् ।।

श्रीरामचरितमानसानुवादे 'सुश्लोकमानसे' सकलकलिकलुषविध्वंसने किष्किन्धाकाण्डे हनुमदादिवानराणां संपातिसमागम-समुद्रतीरगमनवर्णनं नाम षष्ठस्तरङ्गः ।

इति श्रीरामचरितमानसानुवादे श्रीखण्डेकुलचिन्तामणितनुजरामचन्द्रकविरचिते **'सुश्लोकमानसे'** महाकाव्ये रामायणे कलिकलुषविध्वंसने विमलसन्तोषसंपादनो नाम चतुर्थः सोपानः श्रीसीतारामचन्द्रकृपया संपूर्णः

—* इति किष्किन्धाकांडः *—

।। शुभं भवतु ।।

।। श्रीसीतारामचन्द्रार्पणमस्तु ।।

— श्रीकमलेश्वरस्तुति * —

हृदय—सत्कमलं कमलेश्वरा । नमुनि भक्तिभरें प्रभुशंकरा ॥
विनत मी सदया विनवीतसें । प्रभुवरा ! मम हृत्कमलीं वसें ॥ १ ॥
विमलता मम हृत्कमलीं भरें । सदय सुंदर भो कमलेश्वर !
कमलिनी मम मानसनन्दिनी । तुज समर्पित मी पदिं वंदुनी ॥ २ ॥
अजि मला घडलें तव दर्शन । अमृतमेघ करी जणुं वर्षण ॥
तुजसि वंदुनि धन्य गमे मना । पुरविं रे ! मनिंच्या शुभकामना ॥३॥
तव पदाम्बुजिं संतत मन्मन । वसुनि नित्य करो तव गायन ॥
तव कृपानिधि हा मम वैखरी । करिल सत्कविता रसनिर्झरी ॥ ४ ॥
हृदयिं मानस, 'मानस' सुंदर । तुलसिदासकृती सुमनोहर ॥
रचुनि काव्यमयी मम भावितीं । तुजसि अर्पुनि होइन मी कृती ॥ ५ ॥
प्रभुवरा ! वरदा ! वर दे असा । कवनिं गाइन मी तव सद्यशा ॥
सहज अशुचि मी अति पामर । परि कृपा करिं भो ! परमेश्वर ! ॥ ६ ॥
हें कोरगांव जणुं सुंदर चन्द्रकोर । जी शोभते तव शिरीं, सुषमा अपार ॥
सेवीति सादर तुझे प्रिय जे चकोर । हा त्वत्प्रसाद कमलेश्वर ! हे उदार ! ! ॥७॥
'श्रीखण्डे'कुल. मला कमलेश्वर तूं विभो ! विकासविता ॥
कविताकमलाष्टक हें ' राम ' तुला वाहि तूं सकलसविता ॥ ८ ॥

॥ इति श्रीभवानीकमलेश्वराभ्यां नमः ॥

[* मी प्रथमच ता. १९।१२।५२ कोरगांव-पेडणेमहाल गोंवा येथील आमचें कुलदैवत श्रीकमलेश्वर यांचे दर्शनार्थ गेलों असतां रचलेलें हें कविताकमलाष्टक श्रीकमलेश्वरपदीं अर्पण केलं आहे.]

महत्त्वाचें शुद्धिपत्रक

पृ.	श्लोक	शुद्ध
१३	१५५	प्रेम स्वकीय•
१४	२	म्हणूनि अश्रुनीहि•
२०	८८	बोलुनीयां
२१	४	केला असे
२४	१५	राज्यदाना
२४	१७	रामविरहा
२४	१८	जणुं
२५	२८	पुण्यशील
२५	३०	प्रकारें
२५	३७	श्लोकांक १७ ऐवजीं ३७
२६	४०	हृत्प्रीतिची
२६	४९	मातेसही
२६	तळची ओळ	मातेसमीप
२७	१	राजतनये !
२७	४	गोड वाणी
२८	९	जलाविण
३०	२८	तुम्हांसि बोलवुनि
३१	८	हृदिं दुःखहि•
३५	६	परि हें केकयीवच
३८	७	सकलार्ति•
३९	१८	निषादपति व श्लो. १९व२७ची दुरुस्ति. पृ. १४२ वर पहा.
४०	३७	श्राव्यहरणा•
४१	७	रामराय प्रबोधी
४१	८	कठिन हि
४२	१४	संकोचुनी
४२	१९	त्यजुनियां
४३	३२	बगेल कैशी ! ’ श्लोकांक ३१ ऐवजीं ३२ हवा

पृ.	श्लोक	शुद्ध
४४	३	" हे नाथ !
४५	१ली ओळ	श्लोकांक १० हवा
४५	१७	त्यां करोनी
४५	२३	श्लोकांक खालून दुसऱ्या ओळीस हवा
४७	१०	निषादराय
४८	१	० कन्यकेसि ०
४८	२	" अशां तुम्हां०
५०	३१	शेषावरी जोंवरि
५०	३४	काढुनी !" हवें
५०	३७	घाता करीत
५२	९	तेहि धन्य !
५२	१६	लाभे रामधार्मी०
५४	६	मज
५६	४	तनूसि वेंचिते
६०	४	जणुं सावल्या या !
६१	३	ते चालतां
६१	८	दुभंग ! "
६१	९	स्ववित्त
६७	२०	कपटादरपूर्ण
६८	२१	भेट दिलीत
६९	४१	शल्यम तें०
७३	२५	मुनीन्द्रहि वसिष्ठ निमग्न होई
७३	३०	दुरुस्ती पृष्ठ १४२ वर पहा
७४	३८	शोक योग्य
७५	३	तुझ्यावरुनी
७९	४	कैकयीऱ्या
७९	६	कीं ऐकि
८०	१७	राज्याभिषेकास्तव
८३	११	कोठें अगाध

पृ.	श्लोक	शुद्ध
८३	१४	सांगे निषाद् •
८५	३७	केलें एकलें पुण्यधाम
८८	५	कैकयिच्याहि
९३	४	वर्षति देव पुष्पें
	८	चित्तामधें त्यांचिया
११०	४	प्रभुहृदयिंची
११२	३५	वाटे थोर
	३०	श्लोकांक १० ऐवजीं ३० हवा
११४	८	शृंगार
	१३	निदेश । लाजेल
१२०	३	सीतेच्या राघवांसि
	८	ऐकूं सुधा
१२१	१८	त्या तुम्हा मीं कथन करणें कोणता जी! निदेश?
१२३	९	ब्रह्माण्ड०
१२६	१७	तातमाता
१२७	२८	कल्याण देती ॥
	२९	विबुधविनती
	२९	स्वार्थी
१२८	५तळ.ओळ	केली असे ही सकलप्रकारां
१३३	४७	शैलाच्चिया सन्निध
१३५	६२	नयनाभिराम
	२	सकोचें शब्द ये न वदनास!
१३७	२९	ती प्राकृता समजणें नच बुद्धि शुद्धा
	३१	भेटोनि मंत्रिभरतां जन कार्यि लागे
	३२	प्रार्थोनियां
१४०	२६	तेजो०
	२६	सद्धर्मसैन्य
	२८	तैशी प्रभुस्मृति०
	३१	निदेश त्यांचा
१४३	१	आनंद दे जो हृदया अमेय

१४७	४	अधम समज नारी की न सेवी पदीतें
	१५	धर्मधीर
	तळची ओळ	ज्याच्या समान न दुजा, कुठुनी विशेषें
१४९	९	मुनि शुद्धचित्त ॥
१५१	१७	राक्षसाख्य गजसंधि
	१९	संशयो ०
	२१	विपिना ०
	२६	कळेचि !
१५२	९	अजि तुम्ही
१५१	१०	माहात्म्य जें तरिहि तें०
१५३	२	० विहंगमृगवृंद ०
१५६	२१	अरिसैन्य
	२१	विद्युत्प्रभाधर मनोज्ञ घनाभिराम
	२४	हो सर्व सैन्य०
१६२	२	चित्तहरणा हरिणा
	४	दक्षवृत्ति
१६३	२१	चित्तांत तत्पद नमी सुखवी मना जें
१६४	१०	मत्पाणितीर्थि०
१६८	१५	पाण्याविना घन०
	२१	जें दर्शनें०
१७०	१५	० विचार ! ”
१७७	१८ उत्तरार्ध	प्रभूसि ओळखायातें शकलों मी न मन्मनीं ॥ हक्क
१७७	२३	तूं लक्ष्मणाहुनिहि रे !
१७८	११	पंपापुरावरतिं०
१७९	१९	ज्यांतें रजःकण०
१८०	३१	कोपुनि ये लढाया।
१८४	९	शोभे सरोवर तसें कमळें फुलून।
१८५	१९	तेव्हां दयाबुधि
१९२	टीप ओळ १	ता. १९।१२।५२
	ओळ २	कुलदेवत श्रीकमलेश्वर यांचे दर्शनार्थ

श्रीरामपादुकाप्रदान रंगित चित्रकार श्रीद्विजेन्द्र ऐवजीं श्रीव्रजेन्द्र असें वाचावें.

तव कथामृतं तप्तजीवनं कविभिरीडितं कल्मषापहम् ।
श्रवणमङ्गलं श्रीमदाततं भुवि गृणन्ति ते भूरिदा जनाः ॥

श्रीमद्भागवत १०-३१-९

— श्री —

सुश्लोकमानस

गोस्वामी श्रीतुलसीदासजी यांच्या श्रीरामचरितमानसाचा
मराठी सुरस श्लोकानुवाद

भाग तिसरा

पंचमसोपान-सुंदरकांड, षष्ठसोपान-लंकाकांड व
सप्तमसोपान-उत्तरकांड.

—: रचयिता :—

कॅ. डॉ. रामचंद्र चिन्तामण श्रीखंडे, एम्. बी.; बी. एस्.
' वाङ्मय-श्री-खण्ड ' ' सुश्लोक-गोविन्द ' ' कुन्दमाला '
' सुश्लोककुमार ' ' सुश्लोकमेघ ' ' सुश्लोकमानस '
इ. चे संपादक, प्रकाशक व रचनाकार.

प्रथमावृत्ति

श्रीरामनवमी शके १८७७
तारीख १ एप्रिल १९५५ इ.

मूल्य ५ रुपये

प्रकाशक :

कॅ. डॉ. रामचंद्र चिंतामण श्रीखंडे,

एम्. बी.; बी. एस्.

संग्राहक :

श्री. यशवंत रामचंद्र श्रीखंडे,

'श्रीतुलसी–मंजरी'; बेलबाग वसाहत

मंगळवार पेठ, कोल्हापूर.

★

पुणें येथील प्रमुख संग्राहक—

पं. महादेवशास्त्री जोशी, श्रीज्ञानराज प्रकाशन,

४२१ शनिवार, पुणें २.

★

मुद्रक :

बा. ना. ठकार,

श्रीसिद्धेश्वर प्रिंटिंग प्रेस,

२६२९ ए वार्ड, कोल्हापूर.

सुश्लोकमानस-सुंदरकांड-लंकाकांड व उत्तरकांड यांतील कांहीं चित्रप्रसंग ३



मैनाकाचा सन्मान (पृ. २, श्लो. ९)



लंकिनीचा उद्धार (पृ ४, श्लो. ४)



रावणाच्या दरबारांत (पृ. १२, श्लो. ३१)



मारुतिपुच्छास पेटविणें (पृ. १३, श्लो. ९)

४ सुश्लोकमानस-सुंदरकांड-लंकाकांड व उत्तरकांड यांतील कांहीं चित्रप्रसंग

लंकादहनं (पृ १२, श्लो. १२) बिभीषणावर चरणप्रहार (पृ.२१,श्लो.१८)









शरणागत बिभीषण (पृ. २२, श्लो २१) नागपाशबंध-लीला (पृ.६६, श्लो. ११)